નિબંધ
૨૧૩૨

REFBK-0016607

ठिकाण
५५१२६
२२।३।६१.
~~२०३१~~
२१३२

गोमन्त विद्यानिकेतन प्रकाशन – २

दुरितांचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥

– श्रीज्ञानेश्वर.

गोमन्तकाची सांस्कृतिक घडण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्रमांक ७५९२६ वि: निबंध
दा.क्र. २-१३२ दा. दि: २३.१.७०

लेखक :–

काशिनाथ दामोदर नायक

REFBK-0016607

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे दा. क्र. १९९०७ संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मडगांव - गोवा.

१९६८.

प्रकाशक :–
गोमन्त विद्या निकेतन
प्रकाशन विभाग
मडगांव – गोवा.

मुद्रक :–
दा. अ. कारे
गोमन्त छापखाना,
मडगांव.

वेष्टनचित्र :–
दीनानाथ दलाल
दलाल आर्ट स्टूडियो, मुंबई.

मूल्य ७ रुपये

निवेदन

'गेल्या पावशतकांतील गोमंतक' या १९३८ सालीं रौप्यमहोत्सवप्रसंगीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकाच्या रूपानें संस्थेच्या ग्रंथप्रकाशनाला सुरुवात झाली होती. तथापि या पुस्तकाचें स्वरूप बरेंचसें स्मरणिकेसारखें होतें. त्याकरतां आलेल्या तुटीची भरपाई संस्थेचे एक संस्थापक सभासद श्री. केशव अनंत नायक यांनी केली होती. त्यानंतर त्या पुस्तकाची एक पुरवणी प्रसिद्ध करून हा वाङ्मयप्रकाशनाचा पायंडा पुढें चालू ठेवण्याचें ठरलें होतें. पण ती कल्पना फलद्रूप होऊं शकली नाहीं. अनेक अडचणींमुळें स्थगित राहिलेल्या संस्थेच्या प्रकाशनकार्याला प्रस्तुत पुस्तकाचे लेखक व संस्थेचे एक संस्थापक सभासद काशिनाथ दामोदर नायक यांच्या देणगीमुळें आणि त्यांच्याच संशोधनपर ग्रंथाच्या प्रसिद्धीच्या निमित्तानें आज पुनश्च चालना मिळत आहे, हा सुयोग कौतुकास्पद होय. ज्ञानप्रसाराप्रमाणेंच ज्ञानोपासनेबद्दल समाजांत प्रेम निर्माण व्हावें हें जें संस्थेचें एक प्रमुख उद्दिष्ट, तें तिच्या एका संस्थापकाच्या जीवितांतच सुफलित झालेलें अशा रीतीनें दिसून येत आहे. हें उदाहरण सर्वांना मार्गदर्शक व उत्तेजक झाल्याशिवाय राहणार नाहीं.

प्रस्तुत पुस्तकाच्या मुद्रणाचा सर्व खर्च लेखक वै. का. दा. नायक यांनी स्वतः केला असून पुस्तकाचे सर्व हक्क त्यांनी संस्थेकडे सोंपविले आहेत. पुस्तकाच्या विक्रींतून येणारी रक्कम संस्थेनें आपली देणगी म्हणून स्वीकारावी व प्रकाशन विभागाचा निधि म्हणून ती नंतर उपयोगांत आणावी, अशी योजनाहि त्यांनीं आंखून दिली आहे. त्यांच्या देणगींतून संस्था मुख्यतः गोमंतकीय लेखकांच्या दर्जेदार पुस्तकांचें प्रकाशन चालू ठेवील. संस्थेच्या प्रकाशन विभागाचा पाया त्यांनीं आपल्या देणगीनें घालून दिला आहे, याबद्दल संस्था त्यांची ऋणी आहे. त्यांनीं आणखी दोन संशोधनपर पुस्तकें लिहून ठेवलीं आहेत तींहि यथाकाल संस्थेतर्फे प्रसिद्ध करण्यांत येतील.

वै. का. दा. नायक यांच्या हयातींतच या पुस्तकाची छपाई पूर्ण झाली होती. त्यांचें प्रकाशनहि झाल्याचें ते पाहूं शकले असते तर त्यामुळें सर्वांनाच समाधान वाटलें असतें. दि. २-२-१९६८ रोजीं त्यांचें शोचनीय निधन झाल्यामुळें तें घडून आलें नाहीं, याबद्दल कार्यकारी मंडळाला वाटणारा खेद हें निवेदन पुरें करतांना व्यक्त केल्याशिवाय राहवत नाहीं.

मडगांव, दि. ४-३-१९६८.

गोविंद पै काणे, अध्यक्ष
गोपिनाथ कृ. कुराडे, चिटणीस
जयवंत वि. घोडे, खजिनदार
कार्यकारी मंडळ
गोमन्त विद्या निकेतन.

अनुक्रमणिका

	निवेदन	
	पौरोहित्य	
	हृद्गत	
	प्रास्ताविक	१
१	भारताची सांस्कृतिक घडण	१३
२	गोमन्तकाची संस्कृति : उद्गम आणि विकास	२७
३	गोमन्तकाची ऐतिहासिक परंपरा	३६
४	बुद्धशिष्य पूर्ण (पुण्ण) गोमंतकीय ?	४३
५	वैदिक नदी सरस्वती	५३
६	भार्गव परशुराम व गोमंतक	६०
७	दक्षिण कोंकणांतील सारस्वत ब्राह्मण	६९
८	गौड सारस्वत ब्राह्मणांचें गोमंतकांतील आगमन	९०
९	गोमंतकीय सारस्वत ब्राह्मण बंगालमधून आले काय ?	९९
१०	गोव्यांतील खिस्ती आदिवासी	११८
११	कुशस्थली	१२२
१२	नागेशींचा शिलालेख	१२७
१३	कवि हरि पंडित गोमंतकीय नव्हे	१३०
१४	वासुदेव दंडनायक गोमंतकीय नव्हे व सारस्वतहि नव्हे	१३४
१५	आसामची देवी कामाक्षा	१३६
१६	लत्तलूर अगर लत्तलौर म्हणजे लातूरच, लोटली नव्हे	१४६
१७	हेमाडपंत गोमंतकीय ?	१५२
१८	गोव्यांतील राज्यकर्त्यांचीं नाणीं	१६१

पौरोहित्य

एक मौलिक ग्रंथ मराठी शारदेच्या सेवेला रुजू होत आहे. त्याचं नाव आहे 'गोमंतकाची सांस्कृतिक घडण' आणि त्याचे लेखक आहेत विद्वद्वर्य काशिनाथ दामोदर नायक. गेल्या १०–१५ वर्षांच्या कालखंडात त्यांनी भिन्नभिन्न नियतकालिकांतून जे अभ्यासपूर्ण लेख लिहिले, त्यांचा हा संग्रह आहे. नंतरच्या काळात त्यांनी जे वाचन व संशोधन केले, ते त्या त्या लेखात समाविष्ट करून त्यांनी प्रस्तुत लेखसंग्रहाला अद्ययावत्पणा आणला आहे.

गोमंतकाची सांस्कृतिक घडण असे जरी त्यांनी या संग्रहाला नाव दिले असले तरी या संग्रहाची व्याप्ती केवळ गोमंतकापुरतीच मर्यादित नाही. तसे करतांना त्यांना अखिल भारतीय संस्कृतीचा परामर्ष घ्यावा लागला आहे. गोमंतकाच्या संस्कृतीचा शोध घेतांनाही त्यांनी भारताच्या फार मोठ्या प्रदेशांत आणि हजारो वर्षांपूर्वीच्या भूतकालात आपली शोधज्योत फिरवली आहे. तसे करणे हे रास्त आणि आवश्यकच होते. गोमंतभूमीचा प्रादेशमात्र तुकडा वेगळा काढून त्याच्या संस्कृतीचा विचारच अशक्य आहे. गोमंतकाच्या संस्कृतीचा विचार अखिल भारताच्या संदर्भातच करावा लागतो. तिथे 'शाखाचंद्र न्याय'च अनुसरणे भाग आहे. श्री. नायक यांनी ही गोष्ट पुरती जाणली आहे. म्हणूनच त्यांनी गोमंतकाच्या आधी 'भारताची सांस्कृतिक घडण' हा विस्तृत निबंध लिहिला आहे.

संस्कृती हा अव्याख्येय शब्द आहे. 'ज्ञानाचे लक्षण सांगता येत नाही; ज्ञानी माणसाच्या लक्षणांवरूनच ज्ञान लक्षित करावे लागते' असे ज्ञानेश्वर म्हणतात. तीच गोष्ट संस्कृतीची समजावी. संस्कृत माणूस किंवा संस्कृत मानवसमाज यांच्या समग्र दर्शनावरूनच त्याची संस्कृती जाणून घ्यावी लागते. पण तरीही अनेक विद्वान संस्कृतीला व्याख्येच्या चौकटीत बसवण्याचा प्रयत्न करीतच असतात. अशा अनेक प्रयत्नांचा साकल्याने विचार केल्यावर संस्कृतीविषयी थोडेबहुत सांगता येते ते असे —

जिजीविषा ही माणसाची प्रबल एषणा होय. माणसाला सर्वप्रथम जगावेसे वाटते. जगण्यासाठीच तो सदैव धडपडत असतो. त्याला जसे जगायला हवे असते, तसेच जगायचे जीवन समृद्ध, सफल, सुखपूर्ण आणि सौंदर्यपूर्ण व्हायला हवे असते. जगण्याच्या आकांक्षेइतकीच प्रबल अशी मरणाची भीतीही त्याच्या हृदयात घर करून राहिलेली असते. या दोन मूलभूत भावनांतूनच माणसाची संस्कृती निर्माण झाली आहे आणि माणसानेच ती जन्माला घातली आहे.

माणूस हा निसर्गाचाच एक घटक असला आणि निसर्गाच्या पोटातच वावरत असला तरी बुद्धी, भावना आणि कर्तृत्व या गुणांनी तो निसर्गाहून वेगळा ठरतो. निसर्ग कधी त्याला अनुकूल तर कधी प्रतिकूलही असतो. अनुकूल निसर्गाला आत्मशक्तीचे

बळ देऊन आणि प्रतिकूल निसर्गावर विजय मिळवून त्याला आपली जीवनयात्रा चालवावी लागते. ती चालवीत असता त्याला पदोपदी विश्वातल्या अनेक वस्तूंवर संस्कार करावे लागतात. आणि ते संस्कार करण्याची क्षमता येण्यासाठी त्याला आपल्या तन-मनांवरही काही संस्कार करावे लागतात. या दोन्ही क्रिया एकसमयावच्छेदानेच चालू असतात. हे अंतर्बाह्य संस्कार म्हणजेच संस्कृती होय. प्रकृती आणि विकृती या दोन शब्दांच्या संदर्भात संस्कृतीचा विचार केल्यास ही गोष्ट स्पष्ट होईल. प्रकृती म्हणजे बाह्य विश्व आणि माणसाचे पांचभौतिक शरीर. विकृती म्हणजे प्रकृतीत होणारा बिघाड. या प्रकृतीला विकृतीपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करणे, इतकेच नव्हे, तर प्रकृती ही सुकृती कशी होईल याचा विचार करून तदनुरूप प्रकृतीवर संस्कार करीत राहणे, म्हणजे संस्कृती. कोणतीही संस्कृती आधिभौतिक, आधिदैविक आणि आध्यात्मिक अशा तीन प्रकारांनी अवतीर्ण होते.

विश्वातल्या वस्तूंवर संस्कार करून त्या वस्तू आपल्या जीवनयात्रेला उपयुक्त बनवणे, त्या वस्तूंच्या संघटनेतून आणि विघटनेतून नवे नवे उपयुक्त आविष्कार घडवणे हा संस्कृतीचा आधिभौतिक विभाग समजावा. शेती, पशुपालन, अर्थार्जनाची साधने, शिल्पे, स्थापत्ये, इत्यादि प्रकार हा संस्कृतीचा आधिभौतिक पसारा होय.

माणसाला त्याच्या व्यवहारात कित्येकदा स्वतःची ताकद पुरेशी वाटत नाही. किंबहुना सभोवतीच्या निसर्गातल्या प्रचंड शक्तींच्या पुढे आपण अगदीच क्षुद्र आहो, असेहि त्याला वाटत असते. म्हणून मग तो अदृश्य अशा दैवी शक्तीचा शोध घेऊ लागतो, स्वतःचा संरक्षक देव निर्माण करतो आणि त्याला शरण जातो. या त्याच्या शरण वृत्तीतूनच देवदेवता, पूजापुनस्कार, मंत्रतंत्र, व्रतवैकल्ये इ. दैवतविषयक पसारा निर्माण होतो. या सर्वाला आधिदैविक संस्कृती म्हणतात.

मन, बुद्धी, आत्मा, हे माणसाचं आंतर विश्व आहे. त्या गोष्टींवर विद्या-कलांचे व नैतिक गुणांचे संस्कार करून अंतरात्म्याला ओजस्वी, प्राणवान, चैतन्यमय करणे आणि अंतिम सत्य हे महामूल्य डोळ्यापुढे ठेवून तदनुसार वर्तन करणे हे संस्कृतीचे आध्यात्मिक अंग समजावे.

माणूस हा स्थूलमानाने सगळीकडे सारखाच; पण ज्या भूमीवर तो जन्मतो, ज्या काळात वागतो, आणि ज्या प्रकारच्या निसर्गात वावरतो, त्या सर्वांना अनुसरून त्याचे सांस्कृतिक आविष्कार मात्र भिन्न भिन्न प्रकारे होत असतात. ते मग त्या प्रदेशात परंपरेने चालू राहतात. भाषा, साहित्य यांच्या द्वारे ते प्रतिष्ठित होतात. आणि मग त्या प्रदेशाची ती संस्कृती असे ठरते.

माणसाला नवे हवे असते. इतर गोष्टीप्रमाणेच तो संस्कृतीच्या क्षेत्रातही नवे नवे आणू पाहतो. नवे आविष्कार घडवतो पण तरी त्याला जुने टाकवत नाही. नव्या-

बरोबरच जुनेही तो पोटाळून ठेवीत असतो. या वृत्तीतूनच परंपरांना शतसहस्रकांचे आयुष्य लाभते. भारतीय संस्कृतीतल्या अशा कित्येक परंपरा सहस्रायुषी ठरल्या आहेत. सहा, सात हजार वर्षांपूर्वी आपले पूर्वज जो मंत्र जसा म्हणून इंद्राला सोमरस समर्पीत होते, तो मंत्र तसाच म्हणून आजही आपण इंद्राला आहुती देत असतो. वैदिक आर्यांनी ज्या मंत्राने गंगायमुनादी नद्यांचे स्तोत्र केले, तो मंत्र आजही म्हणून आपण नदीत बुचकळी मारतो.

याचा अर्थ असा, की माणसाला संस्कृतीचा वारसा पितृपितामहप्रपितामह परंपरेने प्राप्त होत असतो. पुत्र केवळ पित्याच्या धनाचाच वारस होत नाही, तर त्याने जतन केलेल्या संस्कृतीचाही वारस होतो. श्रीमती इरावती कर्वे यांनी याविषयी एक सुंदर दृष्टांत दिला आहे – 'फुलपाखराची आळी अगदी नव्याने आयुष्यास आरंभ करते; पण माणसाचे मूल पूर्वजांच्या संचयावर पोसते. त्याचा देह संचित द्रव्यावर पोसतो, तर त्याचे मन धर्म, रूढी, विज्ञान व मुख्य म्हणजे भाषा ह्या संचित मनोद्रव्यावर पोसते.'

संस्कृतीही एका पिढीतून दुसऱ्या पिढीत संक्रांत होत असतांना कालमानानुसार तिच्यातले काही गळते आणि नवे काही त्या जागी दाखल होते. हा बदल पुष्कळदा सावकाश व संथगतीने होत असतो. पण कित्येकदा हा बदल क्रांतिकारक गतीनेही झालेला दिसतो. अशा वेळी सगळेच सांस्कृतिक जीवन घुसळून निघालेले दिसते. असे प्रसंग येतात, ते एखाद्या प्रचंड भौतिक उत्पाताने किंवा एखाद्या प्रबल किंवा तुल्यबल अशा संस्कृतीच्या घनिष्ठ संपर्काने. भारताच्या संस्कृतीत हे सर्व काही घडले आहे.

भारतीय संस्कृतीला पुष्कळ लोक आर्य संस्कृती या नावाने उल्लेखितात. तसे करतांना त्यांना मोठा आत्मगौरव वाटत असतो. पण भारतीय संस्कृती ही आर्य संस्कृती आहे असे म्हणणे हे सत्याला धरून नाही. भारतात आर्यांच्याही पूर्वी अनेक मानवसमाज चहूदिशांनी येऊन वसत होते आणि त्यांनी या भूमीवर आपापल्या संस्कृतीची मांडणी केली होती. आर्यांचा त्या सर्वांशी संपर्क आला. कोणाशी मित्र म्हणून तर कोणाशी शत्रू म्हणून. भिन्न मानवसमाजांशी आर्यांचे आर्थिक आणि वैवाहिक संबंधही निर्माण झाले. कालांतरानें संघर्षाची भावना ओसरली आणि समन्वयाची प्रक्रिया सुरू झाली. मूठभर वैदिक आर्यांच्या समाजाला तसे करण्यावांचून गत्यंतरच नव्हते. कारण हे आर्येतर समाज संख्येने मोठे होते आणि या भूमीत त्यांची पाळेमुळे खोलवर गेली होती. य. गोष्टी वैदिक आर्यांना अनुभवाने पटल्या. मग या सर्व समाजांना एका विशाल आणि व्यापक सांस्कृतिक जीवनात आणण्यासाठी त्यांनी आर्येतरांच्या देवता, त्यांच्या धर्मकल्पना, त्यांच्या उपासना, त्यांचे संकेत, त्यांचे तात्त्विक आणि सृष्टिविषयक विचार हे सर्व जाणून घेऊन आणि त्यांवर परिष्कार करून त्या सगळ्या मानव

समाजांना एका महासंस्कृतीत समाविष्ट केले. त्यानंतर पुराणे निर्माण झाली आणि त्यांनी वरील प्रक्रियेने निर्माण झालेल्या विशाल सांस्कृतिक जीवनाचा प्रासाद उभा केला. आजमितीस आपण जी काही संस्कृती जगतो, ती श्रौत नाही, स्मार्तही नाही. ती आहे पौराण संस्कृती.

ज्या अनेक जाती, जमातींनी मिळून आजची 'पुराण'प्रसिद्ध संस्कृती निर्माण केली, त्या सर्व जातीजमातींचे सांस्कृतिक दर्शन ग्रंथकर्त्याने घडवले आहे. त्यांच्या इतिहासाचाही मागोवा घेतला आहे. या अनेक जाती ज्या तीन मोठ्या मानवसमाजांच्या पोटात समाविष्ट होऊ शकतात, असे समाज तीन– आर्य, द्रविड व ऑस्ट्रिक (किरात). या तिघांचाच भारतीय संस्कृतीवर मोठा प्रभाव आहे, असे ग्रंथलेखक सांगतात. या त्यांच्या सांगण्याशी कोणाचे दुमत होण्याचे कारण नाही. पण त्याचबरोबर आणखी एका मानवसमाजाचा उल्लेख करायला हवा. हा समाज म्हणजे असुरसमाज होय. आर्यपूर्व भारतातला तो एक प्रबळ समाज होता. त्या लोकांना कोणी सुमेरियन मानतात, तर कोणी असीरियन समजतात. ते बाबिलोनियाहून निघाले आणि भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर उतरले. ते लढाऊ आणि महत्त्वाकांक्षी होते. त्यांनी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर प्रथम आपली राज्ये स्थापली आणि पुढे कोल, चंड, मुंड, इ. जमातींचे नेतृत्व करून मध्य भारतात आणि पूर्व भारतातही आपली सत्तास्थाने निर्माण केली. तसे करतांना देवांशी अर्थात् देवानुयायी आर्यांशी त्यांनी अनेकदा मोठी युद्धेही केली. 'देवासुराः संयत्ता आसत्' हे वाक्य यजुर्वेदामध्ये वारंवार येते. पुराणांतही देवासुर-संग्रामांच्या कथा विपुल आहेत.

असुर समाजातला मोठा राज्यकर्ता म्हणजे बली. सौराष्ट्रापासून तो केरळापर्यंतच्या समुद्रतीराच्या पट्टीवर त्याने सत्ता स्थापली होती. वामनाला पुढे करून देवांनी त्याला पाताळात दडपले खरे; पण त्याची पुण्यस्मृती मात्र अजून लोकमानसात जागृत आहे. केरळातला ओणम् हा उत्सव बलीच्या स्मृतीप्रीत्यर्थच होत असतो. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातही 'इडा पिडा जावो; बळीचे राज्य येवो' अशी आकांक्षा दिवाळीच्या दिवसात व्यक्तविली जाते.

या असुरांमध्ये चातुर्वर्ण्य संस्था होती. भारतात चातुर्वर्ण्य बलीनेच प्रस्थापित केले असा पुराणात उल्लेख आहे. असुरांची विवाहपद्धती मन्वादी स्मृतिकारांनी आसुरविवाह म्हणून स्वीकारली आहे. महाराष्ट्रातल्या, गोमंतकातल्या आणि दक्षिणतल्या अनेक जाती नवरा मुलगा वधूगृही जायला निघाला असता त्याच्या हाती कट्यार देतात. कित्येक जातींत वरप्रस्थानाच्या पुढे घोडेस्वार नाचवतात. कित्येक जातीत नवऱ्या मुलाने नवरीला पळवून नेण्याचाही लुटुपुटीचा प्रकार होत असतो. या सर्व गोष्टी आसुर-विवाहाच्या साम्यदर्शक होत. असुरांमध्ये श्राद्धपद्धती होती, हे गृह्यसूत्रावरून कळते. असुर हे भारतात येण्यापूर्वी प्रजापतीचे उपासक असावे. भारतात आल्यावर द्रविडांच्या

संपर्काने ते शिवोपासक बनले. कारण बहुतेक असुरांना शिवाकडूनच वरदान मिळाल्याच्या कथा पुराणात आहेत. कलशरूपाने वरुणाची पूजा, आणि देवघरात शंखाचा समावेश या गोष्टी असुर संस्कृतीतूनच आपण स्वीकारल्या असे माझे अनुमान आहे. यावरून भारतीय संस्कृती ही आर्य, द्रविड, किरात आणि असुर या चार मुख्य समाजांच्या समन्वयातून निर्माण झाली असे म्हणणे अधिक योग्य ठरेल.

गोमंतकाच्या संस्कृतीचा शोध घेणे हे या निबंधसंग्रहाचे प्रधान उद्दिष्ट आहे. ग्रंथकर्त्याने ते अनेक अंगांनी चर्चा करून साध्य केले आहे. या निबंधसंग्रहावरून गोमंतकाविषयी आजवर न कळलेले बरेचसे काही कळते आणि ते साधार, सप्रमाण कळते. गोमंतकाचे मूळ वसाहतकार गावडे व कुणबी हे असल्याचे ग्रंथकर्त्याने सांगितले आहे आणि ब्राह्मणांचा क्रमांक शेवटी दाखवला आहे. गोमंतकाची प्रकृती शैव असल्याचे ग्रंथकार म्हणतात, ते पटते. गोमंतक नव्हे, तर सर्व कोकणपट्टीच शैव प्रकृतीची आहे.

सारस्वत ही एक गोमंतकातली पुढारलेली जात होय. परशुरामाने सारस्वतांना त्रिहोत्रपुराहून गोमंतकात आणून वसते केले, अशी कथा सह्याद्रिखंडांत आढळते. त्या कथेच्या आधारे आपण मुळात बंगालमधून (गौडदेश) इकडे आलो अशी बहुतेक सारस्वतांची समजूत. पण श्री. का. दा. नायक यांनी ही समजूत भ्रामक असल्याचे साधार दाखवून सारस्वतांचे गोव्यात आगमन काश्मीर, पंजाब, राजस्थान, गुजरात या मार्गे झाले असल्याचे सांगितले आहे. त्यांचा हा संशोधनवर लेख अत्यंत मौलिक समजावा लागेल. चित्पावनांविषयी श्री. ना. गो. चापेकर व श्री. ज. स. करंदीकर या विद्वान् गृहस्थांनी संशोधनपूर्वक बरेच लिहिले आहे; पण तरीही कित्येक गोष्टी अजून अनिश्चितच राहिल्या आहेत. पण का. दा. नायक यांच्या या संशोधनाने सारस्वत जातीच्या अधिक संशोधनाला योग्य मार्ग उपलब्ध झाला आहे. गोमंतकाच्या संस्कृतीचे लागेबांधे शोधण्यासाठी त्यांना जसा भारतीय संस्कृतीचा विस्तार तपासावा लागला, तशीच सारस्वतांच्या संशोधनासाठी परशुरामाची समग्र कथा तपासावी लागली आणि त्याच कारणासाठी सरस्वती नदीचाही शोध घ्यावा लागला आहे. इतरही लहान-मोठे लेख गोमंतकाच्या संदर्भातच लिहिले गेले आहेत.

श्री. का. दा. नायक हे खरे सत्यशोधक आहेत. कोणताही पूर्वग्रह मनात न धरता पुढे येतील त्या पुराव्यांची ते छाननी करतात आणि भावनेला न पटणारे सत्यही खुल्या मनाने स्वीकारतात. हे सगळे निबंध लिहिण्यासाठी त्यांनी किती विशाल वाचन केले आहे, ते ग्रंथाच्या पानोपानी दिसून येते. श्री. नायक यांना हिंदी, गुजराती व बंगाली या तीन भाषा चांगल्या प्रकारे येतात. त्याशिवाय इंग्रजी व पोर्तुगीज. त्यामुळे त्यांचे वाचन चतुरस्र झाले आहे. आणि या सगळ्याच्या जोडीला संशोधनाविषयीची आस्था आणि चिकाटी.

श्री. नायक यांच्या ठिकाणी वणिग्वृत्ती आणि ब्रह्मवृत्ती यांचा मनोज्ञ संगम झाला आहे. गोव्यातले ते एक प्रसिद्ध व्यापारी समजले जातात. त्यांनी आपला व्यवसाय

यशस्वीपणे चालवला, अर्थार्जन चांगले केले आणि त्याचा विनियोगही चांगल्या प्रकारे केला. 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे। उदास विचारे वेंच करी' ही तुकोबांची उक्ती त्यांना ठीक लागू पडते.

त्यांनी व्यापार उदीम पद्धतशीर केला; पण ते त्यात रमले नाहीत. ते खरे रमले ज्ञानार्जनात. एका पैचा हिशेब चुकत होता तो शोधण्यासाठी एकनाथांनी रात्रभर तेलवात जाळली अशी आख्यायिका आहे. पण नायकांनी दिवा जाळला असेल तो पैची चूक शोधण्यासाठी नव्हे; तर आपल्या अनुमानात काही चूक वा घोटाळा असेल तर तो दुरुस्त करण्यासाठी. गोमंतकात संदर्भग्रंथांची वाण असल्यामुळे संशोधकाला पदोपदी अडावे लागते, असे ते एका ठिकाणी म्हणतात. पण ती अडचण दूर करण्यासाठी त्यांनी स्वतःचा संदर्भग्रंथांचा संभार जमवला जन्मभर तो वाचून विवंचून, आलोडून थोड्या दिवसांपूर्वी तो सगळाच्या सगळा मडगावातल्या गोमंत विद्यानिकेतन या संस्थेला समर्पित केला. नव्याने उदयाला येणाऱ्या संशोधकांना त्या ग्रंथसंग्रहाचा मुक्त मनाने उपयोग करून घेता येईल. गोमंतकातल्या पुढील संशोधनकार्याची त्यांनी पायाभरणीच केली असे म्हणावे लागेल.

ते आयुष्यभर वाचनात, अभ्यासात रमले, रंगले. पण मी कोणी संशोधक आहे याची कोणाला जाणीवही त्यांनी होऊ दिली नाही. 'हा अमुका ऐसी नोहावी। सेचि लोकां' ही ज्ञानेश्वरांची उक्ती त्यांना नेमस्त लागू पडते. चतुरस्र विद्वान् असूनही विद्वत्तेच्या आढ्यतेपासून बारा हात दूर राहणारा असा हा सात्त्विक पुरुष आहे. पण प्रस्तुत निबंधसंग्रह प्रकाशित झाल्यावर एक विद्वान् संशोधक म्हणूनच महाराष्ट्र त्यांना ओळखील. त्यांनी लपवलेली आपली विद्वत्ता आता प्रस्तुत ग्रंथामुळे परिस्फुट झाली आहे. त्यांचा हा ग्रंथ १९६८ सालातला एक नावाजता ग्रंथ ठरेल, यात मला तिळमात्र संदेह वाटत नाही.

प्रस्तुत ग्रंथाला त्यानी स्वतःच प्रास्ताविक नावाचा विस्तृत लेख लिहिला आहे. त्यात त्यांनी आपण कोणत्या मार्गाने वाटचाल केली व कोणत्या निष्कर्षाप्रत पोचलो, ते निःसंदिग्ध रीतीने सांगितले आहे. त्यांचे विचार स्वच्छ आहेत. मतभिन्नता कोणीही दर्शवावी. त्या दृष्टीने विद्वान् समीक्षक या ग्रंथाचे योग्य ते परीक्षण करतीलही.

मी त्यांचा एक चाहता आहे. ते मला मित्र समजतात, हे मी माझे भाग्य समजतो. त्या भाग्यामुळेच प्रस्तुत ग्रंथाचे पौरोहित्य करण्याचे काम त्यांनी मजकडे सोपवले असावे. 'पुरः एनं दधाति' अशी पुरोहित शब्दाची व्याख्या आहे. तिला अनुसरून मी प्रस्तुत ग्रंथ वाचकांच्या आणि विद्वज्जनांच्या पुढे ठेवण्याचे कार्य विनम्र भावाने करीत आहे.

पुणे, सौर पौष एकादशी, शके १८८९
दि. १-१-१९६८.

महादेवशास्त्री जोशी.

हृद्गत

'प्रास्ताविकां'त उल्लेखिलेले लेख छापून झाल्यावर तीन लेखांची भर पुस्तकांत घातली आहे.

'लत्तलौर म्हणजेच लातूर' हा पहिला होय. आजचें लातूर हेंच लत्तलौर होय, हें म्हणणें व्युत्पत्तिशास्त्राच्या व इतर दृष्टींनीं अधिक सयुक्तिक वाटत होतें. पण या वादग्रस्त प्रश्नाचा निकाल लागण्यासाठीं निर्णायक पुराव्याची गरज होती. तो पुरावा श्री. ग. ह. खरे यांच्या नवीन प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत दिलेला आढळून आला व हा विषय आतां वादग्रस्त राहिलेला नाहीं असें दिसून आलें म्हणून हा लेख लिहिला.

दुसरा लेख हेमाडपंतांबद्दलचा होय. या लेखांत शेवटीं जी टीप दिली आहे तिच्यावरून सर्व खुलासा होईल. श्री. फाटक यांचें निश्चित मत असें कीं, हेमाडपंत हे खानदेशी आहेत. त्यांच्याकडून पुरावा येतांच तो कोणत्या ना कोणत्या तरी मार्गानें प्रसिद्ध होईल.

तिसरा लेख म्हणजे 'गोव्याच्या राज्यकर्त्यांचीं नाणीं' या पुस्तकाचें परीक्षण. या पुस्तकामुळें गोव्याच्या नाण्यांच्या बाबतींत अतिशय गोंधळ उत्पन्न होत असल्यानें निरुपाय होऊन हा लेख लिहिण्याचा निर्णय घ्यावा लागला.

एकंदर लेख पुरावा व आधार देऊन लिहिलेले आहेत. जर कुणाला त्यांच्यावर टीका करावयाची असेल तर त्यानें आपलें म्हणणें पुराव्यानिशीं पुढें मांडावें. जगलों वांचलों तर मी उत्तर देईन. नाहींतर भावी जनता आहेच. वाचकांना माझी अखेर एक नम्र विनंती आहे. अनेक वर्षांच्या तपश्चर्येचें व अभ्यासाचें हें फळ आहे हें त्यांनीं लक्षांत ठेवावें.

प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशनांत अनेकांचें मला साह्य झालें आहे. श्री. दामोदर अच्युत कारे यांनीं पुस्तकाचें हस्तलिखित लक्षपूर्वक वाचून भाषादृष्ट्या लिखाणांत नेटकेपणा येण्यासाठीं योग्य ते संस्कार केले. या बहुमोल साह्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. ते माझे मित्र व सामाजिक कार्यांतील सहकारी आहेत. म्हणून याहून अधिक शब्दांत मी त्यांचे आभार मानीत नाहीं.

माझे मित्र पंडित महादेवशास्त्री जोशी हे संस्कृतिकोशाचे प्रमुख संपादक असून सांस्कृतिक विषयांच्या अभ्यासांत रमले आहेत. त्यामुळें या पुस्तकाला प्रस्तावना लिहून देण्याची त्यांना विनंती केली. त्यांनीहि तत्परतेनें ती मान्य करून पुस्तकांतील विषयांचें अंतरंग आपल्या मार्मिक व रसाळ शैलींत स्पष्ट केलें आहे. माझ्या विनंतीला मान दिल्याबद्दल त्यांचा मी आभारी आहें.

मुंबईचे पत्रकार श्री. श्रीपाद शंकर नवरे यांच्यामुळें वयोवृद्ध तपोनिधी महामहोपाध्याय काणे यांची पत्र-भेट झाली. वयोमानानुरूप त्यांना पुरावा हुडकून पाठविणें शक्य झालें नाहीं. तथापि या वयांत तीन कार्डें लिहून जें हृद्गत त्यांनीं व्यक्त केलें त्याबद्दल आभार.

प्रा. नरहर रघुनाथ फाटक यांनीं मी त्यांच्याकडून अपेक्षिलेला पुरावा देण्याचें आश्वासन दिलें याबद्दल त्यांचाहि मी आभारी आहें. हेमाडपंतांवरील लेखाखाली टीपेंत सांगितल्याप्रमाणें त्यांच्याकडून पुरावा येईल आणि वादग्रस्त मुद्दयांचा निर्णय लागेल असा मला विश्वास वाटतो.

वेष्टनचित्राच्या बाबतींत माझे ग्रामबंधु व मित्र चित्रकार श्री. दीनानाथ दलाल यांचें अमोल साह्य झालें आहे. त्यांना चित्राबाबत केलेल्या विनंतीला स्नेहभावानें विनामूल्य मान देऊन त्यांनीं मला आभारांत ठेवलें आहे.

येथील पुरातत्त्व मंडळाचे डायरेक्टर डॉ. टी. व्ही. गुणे यांनीं मी मागितलेली माहिती लगेच पुरविली याबद्दल त्यांचाहि मी आभारी आहें.

नजरचुकीनें कुणाचे आभार मानावयाचें राहून गेलें असल्यास त्यानें मला क्षमा करावी. पुस्तकाच्या बाबतींत सांगावयाचें झाल्यास माझ्या आयुष्यांतील हें पहिलें व शेवटचें पुस्तक दिसतें. आणखी दोन पुस्तकें मी लिहून ठेवलीं आहेत. तीं म्हणजे 'भारतांतील ग्रामसंस्था' व 'जुन्या भारतांतील नागजात' हीं होत. पं. महादेवशास्त्री जोशी यांनीं आपल्या प्रस्तावनेंत ज्या असुरसमाजाचा उल्लेख केला आहे, त्याच्याशीं विशेष संबंध जुन्या भारतांतील नागजातीचा आला होता. नागजातीवरील माझ्या पुस्तकांत यासंबंधीं सविस्तर माहिती दिली आहे. 'गोमंत विद्या निकेतन' संस्था योग्य वेळीं हीं दोन पुस्तकें प्रकाशित करील. हा प्रयत्न पैसे मिळविण्याचा नसून ज्ञानप्रसाराचा आहे. या तिन्ही पुस्तकांचे सर्व हक्क मी गोमंत विद्या निकेतन संस्थेच्या प्रकाशन विभागाला देत आहें.

मडगांव, ता. १५-१-१९६८. **काशिनाथ दा. नायक.**

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र
क्रमांक ५५९२८ वि: निबंध
२२३२ नों वि: २५३८१
REFBK-0016607

प्रास्ताविक

'गोमंतकाची सांस्कृतिक घडण' या माझ्या प्रस्तुतच्या लेखसंग्रहांत या शीर्षकाखालीं अंतर्भूत होऊं शकणारे लेखच मीं निवडले असून पुनरुक्ति टाळण्यासाठीं निरनिराळ्या वेळीं लिहिलेल्या कांहीं लेखांवर फिरून हात फिरवावा लागला आहे.

माझ्या पहिल्या लिखाणाच्या प्रसिद्धीची तारीख २६ मार्च १९२३ ही आहे. केपें येथील 'भारत' पत्राकडे 'आमचें कर्तव्य' या मथळ्याखालीं मी एक लेखमाला पाठविली होती. ती भारतकारांनीं आपल्या पत्राच्या अग्रलेखांतून प्रसिद्ध केली. पहिल्या लेखांकांत मी महामना गोखले यांचें अवतरण घेतलें होतें तें असें कीं, आपल्या देशाची स्थिति चांगली नाहीं व भविष्यकालहि उज्ज्वल होण्यासाठीं खूपच कष्ट करावे लागतील. याकरतां दुसऱ्या कोणत्याहि देशांतील तरुणांपेक्षां आपल्या देशांतील तरुणांनीं विशेष स्वार्थत्याग केला पाहिजे. शेवटच्या लेखांकांत सुप्रसिद्ध हिंदी कवि मैथिलीशरण गुप्त यांच्या 'भारतभारती' या काव्यग्रंथांतील 'हम कौन थे क्या हो गये' हें अवतरण घेतलें होतें.

माझी प्रवृत्ति मूलतः संशोधनाकडे आहे. वाचनाची गोडी लागल्यावर मी लगेच ललित वाङ्मयाकडून संशोधनात्मक वाङ्मयाकडे वळलों. त्याकरितां मी हिंदी, गुजराती व बंगाली या भाषांचा घरींच अभ्यास करून त्यांतील उच्च वाङ्मयाचा संग्रह व अभ्यास करीत राहिलों. मी १९१६ सालीं सारस्वत ब्राह्मण समाजाच्या (आजचें गोमन्त विद्यानिकेतन) साप्ताहिक सभेंत एक निबंध वाचला. त्याचा विषय रामायण-रहस्य हा होता. गुरुकुलाचे एक हिंदी प्राध्यापक प्रो. रामदेव यांच्या भारताच्या इतिहासावरून तो तयार केला होता.

ऑगस्ट १९२४ मध्यें मडगांवच्या 'हिंदु' साप्ताहिकांत माझा निनांवी एक लेख 'नागपंचमीचा सण' या विषयावर प्रसिद्ध झाला. त्यांतहि हीच दिशा होती. तो प्रसिद्ध झाल्यावर लगेच मुंबईच्या 'सुबोधपत्रिका'कारांनीं एक वाचनीय लेख म्हणून आपल्या २४ ऑगस्टच्या अंकांत त्या लेखाचा विवेचनात्मक भाग छापला. या विषयावर मी नंतर अभ्यास करीत राहिलों. 'गोमंतवाणी' या पत्रांत मी या विषयावर तीन लेख प्रसिद्ध केले. या लेखांचेंहि एक लहानसें पुस्तक मी तयार केलें असून तें 'हिंदुस्थानांतील नागजात' या नांवानें याच मालेंत प्रसिद्ध होणार आहे. पूज्य साने गुरुजी यांची 'आस्तिक' नांवाची कादंबरी १९४० सालीं प्रसिद्ध झाली. या कादंबरींतलीच विचारसरणी मी १९२४ सालीं 'नागपंचमीचा सण' या लेखांत मांडली होती.

सन १९३८ सालीं आमच्या सा. ब्रा. समाज संस्थेचा रौप्यमहोत्सव साजरा झाला. त्यावेळीं संस्थेमार्फत 'पावशतकांतील गोमंतक' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्यांत गोमंतकीय लेखकांनीं आपापल्या अभ्यासाच्या विषयांवर लेख लिहिले होते. 'आमची आर्थिक परिस्थिति' हा माझाहि लेख त्यांत प्रसिद्ध झाला होता. या लेखांतील माहिती अत्यंत परिश्रम घेऊन एकत्रित केली होती. लेख बऱ्याच लोकांना आवडला. 'कला' या गोमंतकीय मासिकांत त्यावर अभिप्राय देतांना लेखकानें खालील मत व्यक्त केलें होतें :- "या प्रकारचा लेख आमच्या गोमंतकांत पहिल्यानेंच प्रसिद्ध होत आहे. या लेखानें आमच्या आर्थिक परिस्थितीचें ज्ञान वाचकांस बहुतेक होईल. फार परिश्रम करून हा लेख लिहिला आहे."

माझ्या लेखनांत प्रागतिक विचार व अभ्यास वाचकांना दिसून येई. मी जसे मधूनमधून लेख लिहीत असें तशींच कित्येक वेळां अध्यक्षस्थानावरून भाषणेंहि करावीं लागत. यांतील कांहीं मी त्या त्या प्रसंगीं छापून प्रसिद्ध केलीं होतीं. सन १९३६ सालीं पणजीच्या कन्याशाळेच्या उद्घाटनाचा मान चालकांनीं मला दिला. त्या वेळीं केलेलें भाषण हें माझ्या सामाजिक विचारांचें सार होतें. त्याचप्रमाणें त्याच सालीं मुंबईच्या गोवा हिंदु असोसिएशन या संस्थेच्या वार्षिक संमेलन-प्रसंगीं केलेलें भाषण आर्थिक विषयावरील होतें. त्यावेळीं गोव्यांत उद्योगधंदे स्थापन व्हावेत, अशी एक विचारसरणी मुंबईतील गोमंतकीयांमार्फत प्रसृत केली जात होती. परंतु गोव्याचें क्षेत्र किती लहान आहे व परकी राजवटीमुळें पडणाऱ्या मर्यादा कोणत्या, याचा विचार होत नव्हता. येथें उत्पन्न केलेल्या मालाला पेठ कुठली याचें उत्तरहि ते देऊं शकत नव्हते. या सर्व आर्थिक प्रश्नांचा विचार या भाषणांत केला होता. हेंहि भाषण वरील भाषणाप्रमाणें निराळ्या पुस्तिकेच्या रूपांत छापलेलें होतें. या माझ्या भाषणानें लोकांत खळबळ उडाली. कै. शणै गोंयबाब यांनीं 'नवें गोंय' या आपल्या त्रैमासिकांत थोडी टीकाहि केली. माझ्या भाषणाचा रोख त्यांच्या वरील मुद्द्यावर व होता. या भाषणाची एक प्रत पुण्यांतील सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ (त्यावेळचे गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सचे क्युरेटर आणि आजचे पुणें विद्यापीठाचे कुलगुरु) यांना पाठविली होती. त्यांचें उत्तर आलें तें असें :- "निरनिराळ्या सभासंमेलनप्रसंगीं अध्यक्षीय भाषणें सारखीं होतातच. पण आपल्यासारखें विचारपूर्वक लिहिलेलें आणि खरोखर मार्गदर्शक क्वचितच होतें." हा त्यांचा अभिप्राय केसेंच्या 'भारत' पत्रांतून प्रसिद्ध झाला होता.

पंधरासोळा वर्षांपूर्वी माझ्यावरील आर्थिक जबाबदारीचा भार कमी झाला. व्यापाराचा जम बसलेला होता व मुलेंहि कर्तीसवरती झालीं होतीं. त्यावेळीं गोव्याच्या सांस्कृतिक इतिहासाकडे माझें लक्ष गेलें. केवळ शिलालेख, ताम्रपट या साधनांतूनच हा इतिहास उपलब्ध होतो, असें नसून, देवदैवतें, आचार, सण इत्यादिकांतूनहि तो मिळतो, इतकेंच नव्हे तर देवदैवतें आणि सण व आचार यांमागें तो विशेषेंकरून आहे,

असें मला वाटलें. भारताची संस्कृति हा माझा आवडता विषय होता. त्याचप्रमाणें भारताचा जुना इतिहास हाहि माझ्या आवडीचा व अभ्यासाचा विषय होता. या विषयांवरील बरेच ग्रंथ मी संग्रहित केलेले होते. इतिहासज्ञ राजवाडे यांच्या लिखाणांत कांहीं बाबतींत त्यांचा एककल्लीपणा असला तरी ही दृष्टि होती व त्यांच्याबद्दल मला आदर होता. मला बंगाली व इंग्रजी या भाषा अवगत असल्यानें बंगालचे सुप्रसिद्ध भाषा-शास्त्रज्ञ व संस्कृति विषयाचे इतिहासज्ञ डॉ. सुनीतिकुमार चटर्जी यांच्या लिखाणाकडे लक्ष गेलें. त्यांचें बरेंचसें लिखाण माझ्या वाचनांत आलें. त्यांची विचारसरणी मला पटली व तिच्याकडे मी विशेष आकर्षित झालों. माझे आतांचे कांहीं लेख त्यांच्या विचारसरणीवरच आधारलेले आहेत. याच वेळीं गुजरातमधील एक इतिहासज्ञ श्री. रत्नमणि भीमराव जोटे यांचा 'गुजरातनो सांस्कृतिक इतिहास' हा ग्रंथ माझ्या वाचनांत आला. त्यांत तसेंच त्यांच्या 'खंबायताचा इतिहास' या ग्रंथांतील टिप्पणींत लिंग व नाग जात यांवर केलेलें विवेचन अभ्यसनीय वाटलें. त्याचा उपयोग मला माझ्या नागजातीसंबंधींच्या अभ्यासांत झाला. गुजरात हा कोंकणचा शेजारी असल्यामुळें तेथील संस्कृतीचा साहजिकच आपल्यावर परिणाम होई.

सन १९५४ सालीं माझे 'गोमंतकांतील धार्मिक स्थित्यंतरें' आणि 'गोमंतकाची संस्कृतिः उद्गम व विकास' असे दोन लेख प्रसिद्ध झाले. पहिला 'गोवा हिंदु असोसिएशन'च्या रौप्यमहोत्सवानिमित्त प्रकाशित झालेल्या 'आजचा व कालचा गोमंतक' या ग्रंथांत, तर दुसरा त्या सालच्या 'दीपावली' वार्षिकांत. गोमंतकांतील धार्मिक स्थित्यंतरें' या लेखाचा प्रास्ताविक भाग साधारणतः सांस्कृतिक दृष्ट्या जुन्या इतिहासावर प्रकाश टाकणारा होता, व तीच विचारसरणी 'दीपावलीं'तील लेखांत होती. 'दीपावलीं'-तील लेखानें गोमंतकीय वाचकांत खळबळ उडाली. उलटसुलट टीकात्मक पत्रें माझ्याकडे आलीं. त्या वेळीं राजकीय कारणामुळें माझें वास्तव्य मुंबईत होतें. तेथील कांहीं तरुणांना माझी विचारसरणी व माहिती उद्बोधक वाटली. लगेच कित्येकांनीं आपल्या व्याख्यानांतून ही विचारसरणी मांडली. एका गोमंतकीयानें तर आपल्या पुस्तकांत ही माहिती शब्दशः घेऊन आपली म्हणून प्रसिद्ध केली. या विषयाची साधकबाधक चर्चा होत आहे हें पाहून मला समाधानच वाटलें.

यानंतर मी मुंबईच्या 'दूधसागर' पाक्षिकांत देवदैवतें, ग्रामसंस्था इत्यादिकांसंबंधीं अनेक लेख लिहिले. दैवतांवरील व ग्रामसंस्थांवरील माझ्या लिखाणामुळें माझे विचार लोकांना कळून आले. तरुणांना माझी विचारसरणी आवडली, अभ्यास कळून आला. पण श्रद्धा व भावना यांना धक्का बसत असल्यानें परंपरागत विचारसरणीच्या लोकांना दैवतांवरील लिखाण तितकेंसें पसंत पडलें नाहीं. अभ्यासांतून उपलब्ध झाल्यामुळें गोष्टी सत्य वाटत होत्या, पण भावना दुखत होती. पण मला त्यांत जुना सांस्कृतिक इतिहास दिसत असल्यानें त्या गोष्टींकडे दुर्लक्ष करणें शक्य नव्हतें.

या पुस्तकांत सामान्यतः माझे सांस्कृतिक संशोधनात्मक लेख दिले आहेत. प. वा. विद्वान डॉ. के. ल. दप्तरी यांनीं १९४० सालीं तरुण संशोधकांना पुढील संदेश दिला होता :– "अनुभव व स्वतंत्र विचार हेंच ज्ञानाचें खरें साधन होय. ग्रंथ केवळ मार्गदर्शक आहेत. संशोधकानें स्वतःच्या अनुभवावरून स्वतंत्र विचार केला पाहिजे. इतिहासांत मात्र ज्यांनीं घडलेल्या गोष्टी स्वतः पाहिल्या त्यांचीं वचनें मुख्य प्रमाण मानलीं पाहिजेत. संशोधन करण्यांत कितीहि श्रम पडले तरी ते टाळूं नका. असें कराल तरच तुम्हांस सिद्धि मिळेल. तुमची चूक झाली आहे असें दिसून आलें तर तीहि दाखविण्यास कचरूं नका." मी ही दृष्टी ठेवूनच लेखन केलें आहे. केवळ भावनेच्या दृष्टीनें केलेलें नाहीं.

एकंदरींत आतांपर्यंतच्या माझ्या लिखाणाची परंपरा अशी आहे. प्रस्तुत लेखसंग्रहांतील पहिला लेख 'भारताची सांस्कृतिक घडण' हा आहे. गोमंतक हा भारताचा एक भाग. अर्थात् भारतांत ज्या घडामोडी झाल्या, त्यांचा परिणाम त्याच्या कुठल्याहि भागावर होणारच. अर्थात् तो भौगोलिक स्थिति आणि कालमान व परिस्थिति यांना अनुसरून असणार, हें उघड आहे. या लेखांत मी भारतांत ज्या नऊ मानवभेदांचे पांच भाषागटांतील लोक येऊन राहिले,[१] त्यांची माहिती दिली आहे. यांतील चार मौलिक भाषा चालू होत्या. मूळ जाती सहा पण त्यांपैकीं तिनांत कांहीं शाखा होत्या.[२] या सहा जातींतील निग्रोइड ही अत्यंत जुनी व फक्त शिकारीवर राहणारी होती. पुढें ती ऑस्ट्रिक जातींत मिसळून गेली व भारताबाहेर निघून गेली. मॉंगोलॉइड–जिला आपल्या पुराणग्रंथांत किरात असें म्हटलें आहे तिचा प्रभाव आसाम, बंगाल व हिमालयीन डोंगर भाग यापुरताच जास्त पडला. राहिल्या तीन जाती :– ऑस्ट्रिक, द्रविड व आर्य. यांचा प्रभाव हिंदुस्थानांतील बऱ्याच भागावर पडला. व यामुळें आपल्या गोमंतकांतील सांस्कृतिक घडणींत या तीन जातींचाच जास्त भाग दिसतो. मूळ जरी या जाती किंवा यांतील थोडे भेद असले तरी हिंदुस्थानांत एकमेकांशीं संबंध आल्यामुळें त्यांचें आपसांत मिश्रण झालें व प्रांतपरत्वें अनेक भेद होत गेले. हें मिश्रण होण्याची क्रिया ही नैसर्गिक आहे. मी या लेखांत आर्यांतील आल्पाइन जातीची माहिती दिली आहे. ही जात आर्य नव्हती. मिश्रित होती. पण तिनें आर्य भाषा स्वीकारली होती. आपल्या गोमंतकांत ऑस्ट्रिक जातींतील कोणती शाखा आली अगर ज्यांच्याकडे तिचें मिश्रण झालें अशांपैकीं इकडे कोणती जात आली हें निश्चित सांगतां येत नाही. तसा अभ्यास अद्यापपर्यंत इकडे झालेला नाहीं. या ऑस्ट्रिक जातीचीं कांहीं वैशिष्ट्यपूर्ण शेतीपिकें होतीं. ज्या ज्या ठिकाणीं पहिल्यांदां एखादी जात नवी वसाहत करते, त्या त्या ठिकाणीं ती भौगोलिक परिस्थिति व पाऊसपाणी पाहून आपलीं परंपरागत पिकें काढीत

१ भारतमें आर्य और अनार्य (हिंदी). डॉ. सुनीतिकुमार चटर्जी, पृ. ३१.
२ तत्रैव, पृ. ६.

असते. आसाम, बंगाल, ओरिसा, केरळ, गोवा या ठिकाणीं भात, नारळ, केळें, सुपारी, पानवेल, मिरीं, वगैरेंचें साम्य कां या प्रश्नाचें उत्तर यांत मिळतें.

भारतांत पूर्वकाळीं ज्या पांच भाषिक जातींचें आगमन झालें, त्यांची माहिती मी विशेषतः डॉ. चटर्जी यांच्या ग्रंथांवरून दिलेली आहे. त्यांच्या मतें आर्यांचें मूळ वसतिस्थान उरल पर्वत (रशियांतील पर्वतश्रेणी) होय. तेथून फिरत फिरत कांहीं टोळ्या इकडे आल्या. भारतीय संस्कृतिकोशांत डॉ. रा. ना. दांडेकर यांनीं आपलें मत असेंच दिलें आहे.[1]

श्री. रामधारी सिंह 'दिनकर' यांचेंहि मत असेंच आहे. ते म्हणतात, "आतां बहुतेक हें मत मान्य झालेलें आहे कीं, आर्यांतील मूळच्या लोकांची वसती रशियांत दक्षिणेस होती. त्यांतील कांहीं शाखा पश्चिमेंतून युरोपमध्यें पोंचल्या. कांहीं इराणमध्यें आल्या. त्या काळांत देश असे बनलेले नव्हते. तसेंच मानवांच्या टोळ्या एका भागांतून दुसऱ्या भागांत जात नव्हत्या. लोक हळूहळू पसरत पुढें जात असत व जेथें जीवननिर्वाहाला उपयुक्त साधनें प्राप्त होत, तेथें शेकडों वर्षें रहात असत. यामुळें दक्षिण रशियांतून इराणमध्यें जाण्यास आर्यांना किती तरी शतकें लागलीं असतील. तसेंच ते इराणमधून भारतांत येईपर्यंतहि कितीतरी शतकें गेलीं असतील. यामुळें भारत हा एक नवा प्रदेश आहे, हें त्यांना समजलें नाहीं, तर त्यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नाहीं." (संस्कृतिके चार अध्याय, पृ. २३.)

आर्य हे मूलतः पशुपाल होते, पण पुढें त्यांच्यांत शेतकी आली. अर्थात् या ज्या जाती आल्या, तसेंच त्या इकडे आल्यावर प्रांतपरत्वें त्यांच्यांत जे नवे भेद निर्माण झाले, त्यांतील अनेकांचें एकमेकांशीं मिश्रण झालें. या मिश्रणांत एकमेकांचे आचारविचार, देवदैवतें एकमेकांनीं ग्रहण केलीं. यामुळें एक नवी संस्कृति येथें बनत गेली. हिंदुस्थानांतील जातिभेदाचें आजच्या काळीं कोणी समर्थन करणार नाहीं. व तो कालौघांत हळूहळू लुप्त होत जाणार आहे यांत संशय नाहीं. परंतु जुन्या काळीं तो निर्माण झाला, त्याचीं कारणें आहेत. त्याला इतिहास आहे. किंबहुना ती प्रथा स्वीकारण्यांत मूळच्या समाजधुरीणांपुढें एक ध्येय होतें. माझें हें विधान पुष्कळांना आश्चर्यकारक वाटेल. या लोकांनीं हिंदी कवि दिनकर यांचा 'संस्कृतिके चार अध्याय' हा सुप्रसिद्ध ग्रंथ—कीं ज्याला पं. जवाहरलाल नेहरू यांनीं प्रस्तावना लिहिली आहे—आणि त्यांतील जातिप्रथेचा जन्म कसा झाला हें प्रकरण पहावें. ते म्हणतात, "आर्योंने जातिप्रथाका आश्रय इसलिये किया कि उन्हें इस देशके अनेक वर्गों और लोगोंको एकहि समाजके अंदर अपनी अपनी सभ्यता व संस्कृति के अनुसार उचित स्थानोंपर बिठाना था. असल में जातिवाद के रूपमें आर्योंने समाज के भीतर एक दीर्घा खडी

१ भारतीय संस्कृतिकोश भाग १. संपादक – पं. महादेवशास्त्री जोशी. 'आर्य' शब्द पहा.

कर दी जिसमें नीचेसे उपरतक सभी श्रेणियोंके लोग अपनी अपनी हैसियत के अनुसार आसानीसे बैठ सकते थे.[१]"

अर्थात् सर्व लोकांना आपापल्या आचारविचारांप्रमाणें राहतां यावें, त्यांच्या भावनेवर आक्रमण होऊं नये आणि तसें असूनहि त्या सर्वांना एका संस्कृतींत आणावें, हा त्या प्रथेमागचा उद्देश होता. जुन्या काळांत या जातिप्रथेचे नियम कठोर नव्हते, तर जातिपरिवर्तनहि होत असे. हिंदी कवि दिनकर सांगतात कीं, "वेदांच्या आरंभींच्या काळांत सर्व श्रेणींचे लोक ब्राह्मण होत असत. जातिपरिवर्तनाची प्रथा पंजाबमध्यें महाभारतकालांत बरीच प्रचलित होती. याबद्दल निंदा करून कर्ण शल्याला म्हणतो, "बाल्हीक देशांत ब्राह्मण हे क्षत्रिय, वैश्य, शूद्र अगर नापित होतात व पुन्हा ब्राह्मण बनतात." [२] इतिहासज्ञ जयचंद्र विद्यालंकार म्हणतात, "या प्रथेचे कडक निर्बंध दहाव्या शतकानंतर झाले. त्यानंतरसुद्धां हें मिश्रण पुरतें बंद झालेलें नव्हतें. शहाबुद्दीन घोरीच्या वेळीं त्याचे कांहीं मुस्लिम सैनिक कैद झाले होते. गुजरातच्या राजानें त्यांची दाढी काढवून त्यांना रजपूत जातींत सामील करून घेतलें. आसाममध्यें अहोम नांवाचे लोक आले. ते येथें आल्यावर येथील चालीरीती व आचारविचार घेऊन हिंदु झाले." [३] अर्थात् त्याकाळचें आपलें उद्दिष्ट भारतांतील सर्व लोक एका संस्कृतींत यावे हेंच होतें.

आज आपण विसाव्या शतकांत आहों. आजच्या जगांत अमेरिका सर्वांत प्रगत राष्ट्र आहे. पण तेथील स्थितीचें वर्णन डॉ. सुनीतिकुमार चटर्जी पुढीलप्रमाणें करतात, "दक्षिण अमेरिका, ब्राझील, पाराग्वाय, उरुग्वाय, बोलिव्हिया, कोलंबिया वगैरे भागांत व्यापक स्वरूपांत हें जातिमिश्रणाचें कार्य चालू आहे. तेथें युरोपांतील, आफ्रिकेंतील, हिंदुस्थानांतील सर्व लोकांचें मिश्रण होऊन एक मानवजात तयार होत आहे. परंतु उत्तर अमेरिकेंत हें मिश्रण फक्त गोऱ्या लोकांपुरतें मर्यादित असून त्यांत काळ्या निग्रोंचें मिश्रण होणें त्यांना पसंत नाहीं."[४]

तेव्हां सांगावयाचा मुख्य मुद्दा असा कीं, येथें ज्या ज्या जाती आल्या त्यांच्या चालीरीतींचें, देवदैवतांचें, आचारविचारांचें मिश्रण होऊन येथें एक संस्कृति आकाराला आली. या संस्कृतींत विविधता कां, कोट्यावधी दैवतें कां (दैवतांबद्दल मी पुढें विचार करणार आहें), आचार अनेक कां, या सर्व प्रश्नांचीं उत्तरें यांत समाविष्ट आहेत. याची जाणीव हिंदुस्थानाबाहेरच्या विद्वानांना मात्र पुरेपूर आहे. सुप्रसिद्ध इतिहासकार मिस्टर डाडवेल म्हणतात, "भारतीय संस्कृति ही, ज्यांत अनेक नद्या येऊन विलीन होतात अशा महासागरासारखी आहे." दुसरे एक विचारवंत सी. ई. एम्. जोड हे

१ संस्कृतिके चार अध्याय. रामधारी सिंह दिनकर. पृ. ५७.
२ तत्रैव. पृ. ५३.
३ इतिहासप्रवेश, भाग २ रा, ३ री आवृत्ति. जयचंद्र विद्यालंकार. पृ. ६६.
४ भारतमें आर्य और अनार्य. डॉ. सुनीतिकुमार चटर्जी. पृ. ३०-३१.

म्हणतात, "मानवजातीला भारतीय लोकांनीं जी एक मोठी देणगी दिली आहे ती ही कीं, भारतीय लोक अनेक प्रकारच्या विचारांचा समन्वय करावयास सिद्ध राहिले आणि सर्व प्रकारच्या विविधतेमध्यें एकता कायम करण्याचें सामर्थ्य त्यांनीं व्यक्त केलें." प्रस्तुतच्या लेखसंग्रहांतील पहिला लेख वाचकांना या गोष्टींची माहिती व्हायला उपयोगी होईल, अशी आशा आहे.

संग्रहांतील दुसरा लेख 'गोमंतकाची संस्कृति, उद्गम आणि विकास' हा आहे. या विषयावरील माझा हा पहिलाच लेख असून त्यासंबंधीं वर उल्लेख केलाच आहे. यांतील विचारसरणी पहिल्या लेखासारखीच आहे. या लेखांत मी 'गोमंतक' या नांवाचा अर्थ गाईंनीं संपन्न असलेला प्रदेश असा होत असल्यानें कोणती तरी गोपालन करणारी जात या भागांत आली असावी आणि ती गोप जात असावी असें मत दिलें आहे. कारवार हा गोव्याजवळचा भाग आहे. या ठिकाणींहि गोपशिट्टा हें गांव असून तें गोपराष्ट्राची खूण दाखवितें, असें तिकडील माहितगारांचें म्हणणें आहे. [१] यादवांत गोपालन होतें हें सिद्ध आहे. आभीर नांवाची एक गोपालन करणारी जात बाहेरून इकडे आली; या जातींत बाळकृष्णाच्या पूजेची प्रथा होती, व ही जात यादव गोपांत मिळून गेली, असें एक मत आहे. यादवांबद्दल "यादव हेच गवळी आणि वऱ्हाडांतील गाविलगड यांचा आहे. या यादवांचें आक्रमण महाराष्ट्रावर एकीकडून होत होतें तर जरासंधाच्या मागध सैन्याचें आक्रमण दुसरीकडून होत होतें. गोपांची संस्कृति ब्राह्मणी संस्कृतीपासून भिन्न असावी, असें राजारामशास्त्री भागवत यांचें मत होतें. गोपधर्मास जें प्राधान्य मिळालें तें या यादवांच्या वर्चस्वामुळें मिळालें. यादवांचें वर्चस्व महाराष्ट्रावर कुरुयुद्धकालींच होतें." असें डॉ. केतकर यांचें मत आहे. [२] गोमंतकांतील गोमंत पर्वतावर म्हणजेच दूधसागरच्या आसपास श्रीकृष्ण व जरासंध यांचें युद्ध झालें, असें हरिवंशांत आहे. त्यावरून यादवांना या प्रदेशाची माहिती होती, असें सिद्ध होतें. तेव्हां यादवांतील गोपांचें भ्रमण मूळच्या वसतिकारांनंतर या प्रदेशांत झालें असें अनुमान केल्यास चूक होणार नाहीं.

यानंतरचा लेख म्हणजे 'गोमंतकाची ऐतिहासिक परंपरा' हा होय. इ. सनाच्या चौथ्या शतकांतील ज्या देवराजाचा चंद्रपुर (चांदर-सासष्टी) येथून दिलेला ताम्रपट शिरोडें येथें मिळाला आहे, तो देवराज भोज राजवटीचा होता, आणि त्याच सहासात शतकांतील भोज राजवटीचे आणखी ताम्रपट गोव्यांत मिळाले आहेत असें या लेखांत दाखवून दिलें आहे. यावरून ही राजवट गोव्यांत चारपांच शतकें होती असें म्हणतां येतें. भोज राजवटीचा गोमंतकांतील इतिहास अद्याप उजेडांत आलेला नाहीं. गोमंतकांतील तरुण इतिहासाभ्यासकांचें याकडे लक्ष गेलें पाहिजे.

---

१ कारवार. आनंद नाडकर्णी. पृ. ८.

२ प्राचीन महाराष्ट्र, भाग १ ला. डॉ. केतकर. पृ. १५-१६.

भोजांच्या महाराष्ट्रांतील भ्रमणाबद्दलची माहिती या लेखांत दिली आहे. यांचें भ्रमण नदीकांठानें होई, असें डॉ. केतकर यांचें मत आहे.[१] विठ्ठल रा. शिंदे यांचेंहि मत मराठे हे किनाऱ्यावर वसती करीत असेंच आहे.[२] गोव्यांतील सासष्टी तालुक्यांत समुद्रकिनाऱ्यावरील सर्व गांवें चारडे म्हणजे क्षत्रिय जातीचीं आहेत हें आम्ही त्या लेखांत दाखवून दिलें आहे. यदु चंद्रवंशी होते.[३] अर्थात् त्यांची शाखा भोज ही चंद्रवंशी ठरते. याच राजवटीनें चांदर (चंद्रपुर), चंद्रनाथ, चंद्रेश्वर हीं नांवें दिलीं असणें शक्य आहे.

चांदर व यादव यांचा घनिष्ठ संबंध असल्याचा अणखी एक पुरावा असा कीं, "चांदर येथील खिश्चन समाज क्षत्रिय मराठे समजला जातो. त्यांच्यामध्यें मुसळाचा खेळ व उत्सव साजरा होतो." (पहा गो. सां. प. दे. उपपत्ति–डॉ. गुणे. Goa Souvenir, 1965.) हा मुसळाचा खेळ यादवांत होता असें दिसतें. या मुसळानें यादवांचा शेवटीं नाश झाला. या चालीरीती यादवांचें व भोजांचें गोव्यांतील अस्तित्व दाखवितात.

यानंतरचा लेख 'बुद्धशिष्य पूर्ण हा गोमंतकीय?' या शीर्षकाचा आहे. कै. शणै गोंयबाब यांनीं अशीं विधानें केलीं आहेत कीं, 'पूर्ण हा गोमंतकीय असून त्याच्या विनंतीवरून बुद्ध मुलु आरामांत आले. मुलु म्हणजे चंद्रवाडींतील पारोडेंजवळचें मुळें. येथील आरामांत बरेच दिवस राहून त्यांनीं धर्माचा उपदेश केला. ही त्यांची दक्षिणेंतील व लंकेची तिसरी खेप. येथून ते लंकेस गेले.'[४] मी त्या लेखांत असें दाखवून दिलें आहे कीं, बुद्धाचें आगमन अपरांतांत झालेलें दिसत नाहीं, तसेंच लंकेंतहि स्वतः गौतम बुद्ध गेल्याची माहिती नाहीं; ज्या पुस्तकांवरून ही माहिती घेतली आहे तीं विश्वसनीय नाहींत व गांवांचीं नांवेंहि निश्चित नाहींत, यामुळें तीं अपुऱ्या पायावर उभारलेलीं विधानें ठरतात. हा लेख लिहिण्यास एक कारण झालें तें असें :– सन १९५४ सालीं ज्या वेळीं मी 'दीपावलीं'त 'गोमंतकाची संस्कृति' हा लेख लिहिला, त्या वेळीं माझ्या विचारसरणीला जास्त विरोध एक गोमंतकीय विचारवंत श्री. शांबाराबजी सरदेसाई यांजकडून झाला. त्यांच्याबद्दल मला आदर आहे. माझे त्यांचे संबंध फार चांगले असून मतभेदामुळें ते स्नेहसंबंधांत अंतर येऊं देणारे नाहींत, याची मला खात्री होती. देशांतील सामाजिक, राजकीय व शैक्षणिक प्रश्नांवर त्यांनीं विचार केला असला तरी इतिहासाचे ते अभ्यासक असे नसल्यामुळें त्यांनीं पत्रांतून व्यक्त केलेल्या मताबद्दल मला विशेष असें कांहीं वाटलें नाहीं. अलीकडे मार्च १९६५ मध्यें त्यांचें

---

१ प्राचीन महाराष्ट्र, भाग १ ला. डॉ. केतकर. पृ. ३३५.
२ शिंदे लेखसंग्रह. 'कोंकणी-मराठी' हा लेख. वि. रा. शिंदे. पृ. १३९.
३ ,, ,, 'मराठ्यांची पूर्वपीठिका' ,, ,, पृ. ७१.
४ गोंयकारांची गोंयाभायली वसणूक. शणै गोंयबाब. पृ. ११-१२.

मला एक पत्र आलें. त्यांत त्यांनीं, 'मी आपले अलीकडील संशोधनात्मक लेख लक्षपूर्वक वाचतों. त्यामुळें शणे गोंयबाब यांच्या वसणुकीचें विस्तृत परीक्षण करण्याची आवश्यकता दिवसेंदिवस फारच भासत आहे. आपणाकडून हें काम यथायोग्य रीतीनें होईल असें वाटतें. तरी तें हातीं घ्यावें' असें लिहिलें होतें. त्या पत्रानें मला समाधान वाटलें. मी उत्तरांत त्यांना गोमंतकांत संदर्भग्रंथांची कशी उणीव आहे व संदर्भग्रंथांशिवाय हें काम होणें कसें शक्य नाहीं, वगैरेसंबंधीं लिहिलें. त्यानंतर आमच्या Publication Department नें प्रसिद्ध केलेलें Ancient Shrines of Goa हें पुस्तक माझ्या वाचनांत आलें. व त्यांतील पुढील मजकुराकडे माझें लक्ष गेलें :– It is said that a Buddhist monk named Punna, a resident of Sunaparant, i. e. the modern Jambauli in Goa, was responsible for the spread of Buddhism in this region. (P. 2).

पुण्णाची ही गोष्ट सन १९२८ सालीं शणै गोंयबाब यांचें पुस्तक प्रसिद्ध होतांच गोमंतकीय वाचकांनीं वाचली होती व १९२९ मध्यें 'विविधज्ञानविस्तारां'त प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकाच्या परीक्षणांत प्रा. अ. का. प्रियोळकर यांनीं तिला दिलेलें उत्तरहि त्यांच्या अवलोकनांत आलें होतें. माननीय धर्मानंद कोसंबी यांचेंहि मत, गोदावरीच्या खालच्या भागांत बुद्ध गेल्याचा प्रमाणभूत अशा ग्रंथांत उल्लेख नाहीं,[1] असेंच आहे. पण या चर्चेनंतर बऱ्याच कालानें आपल्या Publication Department च्या पुस्तकांत वरील मत आल्यानें सर्वसाधारण लोक हा आधार घेतील असें वाटल्यावरून सत्य हुडकून काढण्याच्या इच्छेनें मी हा प्रयत्न केला. वास्तविक या प्रयत्नांत पाली भाषेचें ज्ञान आवश्यक आहे. व ते ते संदर्भग्रंथ पाहिजेत. तरीपण माझ्या संग्रहीं असलेल्या ग्रंथांवरून मला शक्य त्या मर्यादेंत मी प्रयत्न केला. इतकेंच नव्हे तर लेख लिहून प्रकाशनार्थ पाठविल्यावरहि अभ्यास चालू ठेवला. या अभ्यासांत मिळालेली नवी माहिती पुढें देत आहें.

बिहार राष्ट्रभाषा परिषदेनें अलीकडे 'बौद्धधर्म व बिहार' हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यांत लेखक म्हणतात, "भगवान् बुद्धाच्या काळांत बौद्धधर्माचा प्रसार मगध (बिहार), अंग (चंपा, भागलपुर), वज्जि, मल्ल (वैशाली, गंडकी नदीजवळ), कोसल (अयोध्या), वत्स (कौशांबी, अलाहाबाद), अवंती (माळवा, उज्जयिनी) राज्य इतक्यापुरताच मर्यादित होता. त्या काळीं भगवान् बुद्धाच्या शिष्यमंडळाची संख्या १२५० वर गेली नाहीं. पण सम्राट् अशोकानें बौद्धधर्माला आंतरराष्ट्रीय धर्म मानलें व जगाच्या उच्च शिखरावर प्रतिष्ठित केलें." यावरून नर्मदेच्या खालीं या धर्माचा प्रसार बुद्धाच्या काळीं झाला नव्हता, तो सम्राट् अशोकाच्या कालांत त्याच्या प्रयत्नानें झाला, असें दिसून येतें.

---

१ विविधज्ञानविस्तार–वर्ष ६० अंक ११-अ. का. प्रियोळकर यांचा लेख.

उत्तर प्रदेश सूचनाविभागातर्फे अलीकडे 'बौद्धधर्मके विकासका इतिहास' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. लेखक म्हणतात, "तृतीय संगीतीच्या (बुद्धाच्या परिनिर्वाणानंतर २३६ वर्षांनीं अशोकाच्या कालांत) पश्चात् मोगलीपुत्र यानें महेंद्र यास धर्मप्रसाराकरतां लंकेस पाठविलें. सुयान चांग यानें अशोकाचा भाऊ महेंद्र (कित्येकांनीं महेंद्र हा अशोकाचा मुलगा असें म्हटलें आहे.) हाच सिंहलांत गेलेला बौद्धधर्माचा पहिला प्रचारक होय, असें सांगितलें आहे."[१] दीपवंश, महावंश व समन्तपासादिका या ग्रंथांत ज्या भिक्षूंना प्रचाराकरतां अशोकानें पाठविलें त्यांची सूचि आहे. त्यांत लंकेंत गेलेल्या प्रचारकांचें नांव महेंद्र व अपरांतांत पाठविलेल्या प्रचारकाचें नांव युनानी भिक्षु धर्मरक्षित असें असल्याचा उल्लेख आहे.[२] तसेंच पाली साहित्याच्या परंपरेंत भगवान् बुद्ध सुप्पारक (सोपारें) येथें गेल्याचा कांहीं उल्लेख नाहीं, असें या साहित्याचा अभ्यास केलेले विद्वान मत देतात.[३] तेव्हां दंतकथात्मक विधानाच्या आधारें इतिहास निर्माण करणें योग्य नसून त्याला तसेच पुरावे पाहिजेत, हें दाखवून देण्यासाठीं मी हा लेख लिहिला.

'गौड सारस्वत ब्राह्मणांचें गोमंतकांतील आगमन' व 'हें आगमन बंगालमधून झालें काय?' असे दोन लेख या संग्रहांत आहेत. सारस्वत ब्राह्मणांची महति सांगावी हा माझा हेतु नाहीं. उपलब्ध इतिहास काय आहे तेंच मला सांगावयाचें आहे. गोमंतकांत ब्राह्मणांचें आगमन झालें हें चौथ्या शतकांतील चांदरच्या देवराज याच्या ताम्रपटावरून सिद्ध होतें व त्यानंतरच्या अनेक ताम्रपटांतून त्यांचा उल्लेख आहे. हे ब्राह्मण गौड सारस्वत कीं द्रविड ब्राह्मण हाच प्रश्न आहे. ११ व्या शतकांत शिलाहारांच्या ताम्रपटांत शेणवी नांव मिळतें व राष्ट्रकूटांच्या दहाव्या शतकांतील ताम्रपटांत गौड सारस्वतांचा उत्तर कोंकणांत उल्लेख आढळतो. तेव्हां त्यापूर्वी त्यांचें आगमन झालें हें निश्चित. गोव्यांतील ग्रामसंस्थांत मराठ्यांनंतर सारस्वतांचाच प्रभाव आहे, व अनेक ग्रामसंस्था फक्त त्यांच्याच आहेत. त्यावरून बऱ्याच कालापूर्वी ते आले व त्यामुळेंच त्यांच्याकडे जमिनीचा चांगला भाग आला असें अनुमान निघतें. दुसरा लेख बंगालमधून ते आले या समजुतीबद्दलचा असून बंगालमधील ब्राह्मण व गोव्यांतील गौड सारस्वत ब्राह्मण यांचा एकमेकांशीं कांहीं संबंध नाहीं, हें मी दाखवून दिलें आहे. बंगालमधील समाजाची संस्कृति ही गोव्यापासून फार वेगळी आहे; तेथें बौद्ध व शाक्त धर्माचा प्रभाव आहे, तर गोव्यांत पूर्णतः वैदिक संस्कृति कांहीं अंशीं शुद्ध अशी आहे. व याचें श्रेय जुन्या काळांतील ब्राह्मणांना, विशेषतः सारस्वत ब्राह्मणांना आहे, हें विधान ऐतिहासिक सत्याचें निदर्शक होय. नंतरच्या काळांत ब्राह्मणांत स्वार्थबुद्धीचें प्राबल्य झालें असलें तरी मागील पर्वाचा इतिहास हा असा आहे.

---

१. बौद्धधर्मके विकासका इतिहास. गोविंदचंद्र पांडे. पृ. २००-२०१.
२. पाली भाषेचा इतिहास. भरतसिंह उपाध्याय. पृ. ९७-९८.
३. बुद्धकालीन भारतीय भूगोल. भरतसिंह उपाध्याय पृ. ४८९.

यानंतरच्या लेखाचा विषय झालेला नागेशींचा शिलालेख हा मराठींत व पोर्तुगीजपूर्व आहे. यांत श्रीनागेश व श्रीमहालक्ष्मी या देवस्थानांचा उल्लेख असल्यानें तीं मूळ त्या ठिकाणचींच आहेत, हें कळून येतें. या शिलालेखांत देवाला सुरय तांदूळ द्यावे, असा उल्लेख आहे, त्यावरून त्या वेळींहि उकडा तांदूळ होता, असें अनुमान निघतें.

वासुदेव दंडनायक व कवि हरि पंडित हे गोमंतकीय नाहींत हें दोन लेखांत मी दाखवून दिलें आहे. या हरि पंडिताचा गोमंतकीय म्हणून आतांपर्यंत उल्लेख होत होता.

'गोमंतकांतील खिस्ती आदिवासी' हा यापुढील लेख होय. गोमंतकांतील आदिवासींसंबंधीं आतांपर्यंत अभ्यासच झालेला नाहीं. पोर्तुगिजांच्या राज्यांत पाद्रीशाहीला महत्त्व होतें व खिस्तीकरणाशिवाय त्यांच्यासमोर ध्येय अस्सें नव्हतें. आदिवासींमागें फार मोठा इतिहास आहे असें माझें मत आहे. गोमंतकांत सर्व ठिकाणीं विखुरलेल्या या लोकांचा अभ्यास झाला पाहिजे.

'आसामची देवी कामाक्षा' हा दैवतावरील लेख या संग्रहांत घेतला आहे. गोमंतकांतील दैवतांच्या मागें सांस्कृतिक इतिहास आहे, ही नजर ठेवून मी या विषयाचा अभ्यास केला व माझ्या दृष्टीनें त्या इतिहासाचे धागेदोरे मला समजून आले. या विषयाकडे भावनेनें पाहतां येणार नाहीं. इतिहासाच्या दृष्टीनें पाहणें जरूर आहे. इतिहासकाराचें तें काम आहे. माझें या विषयावरील लेखन अनेकांना आवडलें. मात्र सनातनी लोकांना तें आवडलें नाहीं व आवडणें शक्यहि नव्हतें. या संग्रहांत गोमंतकांतील दैवतांवरील लेखांचा समावेश केलेला नाहीं. ते पुढील पुस्तकांत घ्यावे व त्यांना अभ्यासपूर्ण प्रस्तावना असावी असा विचार आहे. वय वाढतें आहे; आरोग्याबाबतहि कांहीं सांगतां येत नाहीं. तथापि त्याच अभ्यासाची उजळणी करीत आहें.

कामाक्षी हें दैवत मूळ आसामचें. तें दक्षिणेंत कांची (कांजीवरम्) मध्यें तसेंच गोमंतकांत आहे. ही देवता कौरंज देशाहून इकडे आली असें कोंकणाख्यान सांगतें. कौरंज देश हा कांजीवरम् असणें शक्य आहे. ही देवता ऑस्ट्रिक लोकांबरोबर आसामांत आली व आसाममधील कामाक्षा हें मुख्य शाक्तपीठ होय वगैरे माहिती त्या लेखांत दिली आहे.

या लेखसंग्रहांतील कांहीं लेखांवरून वाचकांना कळून येईल कीं, भारतांत हजारों वर्षांपासून निग्रो, किरात, ऑस्ट्रिक, द्रविड, आर्य, ग्रीक, शक, हूण, मुसलमान इत्यादि अनेक जाती व अनेक वंश आले. ते अनेक देशांतून अनेक चालीरीती घेऊन आले. या सर्वांना भारतीय संस्कृतीनें पचविलें. आज कोणती चाल व कोणतें दैवत कोणाचें, हें कळणें कठीण. अनेक औषधी मिश्र होऊन भारतांतील संस्कृतीचें हें रसायन बनलें. त्याला आर्यत्वा चें लेबल लागलें आहे. या रसायनाचा स्वाद कांहीं निराळा झाला आहे; हेंच याचें वैशिष्ट्य आहे. याला आम्ही हिंदु (धर्मवाचक नसून देशवाचक) संस्कृति

असें म्हणतों. आश्चर्य असें कीं, अनेक संस्कृतींना आपल्यांत पचवून भारतीय संस्कृतीनें तिला आर्य संस्कृतीचें आवरण दिलें. वेदकालांतील कोणी व्यास आज भारतांत पुन्हा जन्माला आला तर त्याला विशेष फरक आढळून येणार नाहीं. होम, हवन, वेदमंत्र, सर्व कांहीं होत आहे, असेंच दिसून येईल. भारतीय संस्कृतीचें वैशिष्ट्य हें आहे. शेवटीं मान्यवर हिंदी कवि दिनकर यांच्या शब्दांत हें प्रास्ताविक पुरें करतों. ते म्हणतात, "आजपासून तीन हजार वर्षांपूर्वी भारतीय संस्कृतीचें जें रूप होतें तसेंच मूलतः आजहि आहे. मिसर, बाबिलोन, ग्रीस वगैरे देशांतहि प्राचीन कालीं संस्कृति उच्च पदवीला पोंचली होती. पण कालानें त्यांना उध्वस्त केलें. केवळ भारत हाच देश असा आहे कीं, ज्याचा पूर्वकाल मृत झालेला नाहीं. तो वर्तमानकालाच्या रथावर बसून भविष्यकालांत चाल्ला आहे. भारताचा पूर्वकाल पूर्वी जिवंत होता, आज जिवंत आहे व पुढेंहि जिवंत राहील." (संस्कृतिके चार अध्याय, पृ. १०१).

काशिनाथ दामोदर नायक.

दा. क्र. .....

१
भारताची सांस्कृतिक घडण

वायुपुराणांत 'उत्तरं यत्समुद्रस्य हिमवद्दक्षिणंच यत् । वर्षं यद् भारतं नाम यत्रेयं भारती प्रजा ।' (४५-७५) म्हणजे 'समुद्राच्या उत्तरेला व हिमालयाच्या दक्षिणेला जो भूभाग आहे तो भारत असून तेथें निवास करणारी जनता भारतीय आहे' असा श्लोक आहे. याच आशयाचा श्लोक विष्णुपुराणांतहि आहे.[१]

अर्थात् हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतचा सर्व भूभाग हा येथें वसती करणाऱ्या सर्व भारतीयांचा आहे. ही एकात्मतेची भावना सर्वांच्या मनांत रुजविण्याचें कार्य जुन्या वाङ्मयांतून झालेलें आहे, व जुन्या काळांत त्याला यशहि आलेलें होतें. परंतु काय असेल तें असो, आजच्या काळांत प्रांतीयतेच्या व भाषिक अलगपणाच्या भावनेला जोर आलेला आहे. ह्या गोष्टी एकात्मतेच्या भावनेला तडा आणणाऱ्या आहेत. ही फुटीरतेची भावना नष्ट होऊन एकात्मतेच्या भावनेची वाढ होणें आवश्यक आहे. भारताच्या संमिश्र वांशिक घडणीचा इतिहास नजरेसमोर आल्यास या एकात्मतेच्या भावनेची जोपासना होण्यास मदत होईल, यांत संशय नाहीं.

जुन्या वाङ्मयांत अनेक जातींचीं नांवें आढळतात. हीं त्यावेळच्या लेखकांनीं दंतकथांस अनुसरून अगर आपापल्या कल्पनेनें दिलेलीं आहेत. आजच्या संशोधकांनीं शास्त्रीय दृष्ट्या त्यांतील सत्य शोधण्याचा प्रयत्न केला आहे व त्यांना बरेंचसें यशहि आलेलें आहें. असें असलें तरी त्यांच्या निष्कर्षांना विरोध करणारें एक मतहि प्रचलित आहे. या विरोधकांचें म्हणणें काय आहे, हें प्रथमतः मांड्रन नंतर मी बहुमान्य मताकडे वळगार आहें.

साधारणतः ज्या जातींनीं अगर वंशांनीं भारत वसविला त्यांत आर्य व द्रविड हे दोन वंश प्रमुख आहेत. विरोधी मत मांडणारांचें म्हणणें असें कीं, आर्य हे हिंदुस्थानांत बाहेरून आले असें जें अनेक विद्वान सांगतात तें खरें नसून आर्य मूळचे इथलेच होत. या मताचे एक प्रमुख पुरस्कर्ते उत्तर प्रदेशाचे माजी मुख्य मंत्री बाबू संपूर्णानंद हे असून त्यांनीं हिंदी भाषेंत 'आर्योंका आदिदेश' नांवाचें एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, "आर्य लोक ध्रुवप्रदेश, मध्य आशिया किंवा पश्चिम युरोप येथून भारतांत आलेले नसून त्यांचें घर सप्तसिंधु (सिंधु, विपासा, झेलम, चिनाब, रावी, सरस्वती व सतलज या नद्यांतील प्रदेश – कीं ज्याचें आजचें नांव पंजाब व काश्मीर आहे) येथेंच होतें. येथून ही संस्कृति बाहेर पसरली." २

---

१. उत्तरं यत्समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम् । वर्षं तद्भारतं नाम भारती यत्र संतति ॥
– विष्णुपुराण, द्वितीय अंश, अ. ३×१.

२. आर्योंका आदिदेश (हिंदी). बाबू संपूर्णानंद. पृ. ३६, २०६.

यानंतर दुसरा वंश ज्याला आज द्रविड असें नांव आहे तो होय. त्याच्याबद्दलहि अशीच एक विचारसरणी आहे. तिचे पुरस्कर्ते दक्षिणेंतील एक विद्वान् श्री. व्ही. आर. रामचंद्र दीक्षितार एम्. ए. हे आहेत. ते म्हणतात, "माझी अशी पक्की खात्री आहे कीं, जुन्या काळचे तामीळ हेच दक्षिण भारतांतील पाषाणयुगीन संस्कृतीचे वारसदार होत." [१] त्यांचें असेंहि म्हणणें आहे कीं, "शिवालिक पर्वत हें मानवाचें उगमस्थान असण्याची शक्यता आहे, हें मत जरी अग्राह्य ठरवितां येत नसलें तरीहि आदिम मानव पहिल्याप्रथम दक्षिण भारतांत अस्तित्वांत आला असणें संभवनीय आहे. आम्हांला तरी दक्षिण भारत हेंच मानवाचें पहिलें निवासस्थान असावें, असेंच वाटतें." [२] त्यांच्या मतें "दक्षिण भारताची लोह संस्कृति खिस्तपूर्व ८ ते १० हजार वर्षांइतकी जुनी असावी." [३] तसेंच ते असेंही म्हणतात कीं, "द्रविड लोक भूतलावरील दुसऱ्या कोणत्याही प्रदेशांतून भारतांत आले नसून ते पूर्णपणें स्थानिक लोक होत." [४]

भारत हीच आर्य व द्रविड या वंशांची मूळ जन्मभूमि, अशी ही विचारसरणी जरी कित्येकांनीं पुढें मांडली असली, तरी जगांतील संशोधकांना ती मान्य नाहीं. बहुसंख्य विद्वानांच्या मतें "भारताच्या भूमीवर वानरापासून विकसित झालेला मानव उत्पन्न झाल्याचा कांहीं पुरावा अजून सांपडलेला नाहीं." [५]

आजच्या बहुसंख्य विद्वानांच्या मताप्रमाणें मानवजातीचें वर्गीकरण कसें केलें जातें, तें हिंदुस्थानांतील एक शरीरमापनशास्त्रज्ञ डॉ. बी. एस्. गुहा यांच्या विवेचनावरून कळून येतें. त्यांनीं १९३१ सालीं लोकसंख्यागणनाच्या अहवालांत विवेचनात्मक निबंध लिहून आणला अभ्यास पुढें मांडला. त्यांत त्यांनीं खालीलप्रमाणें सहा मुख्य जाती व तदंतर्गत नऊ पोटभेद (Six main races with nine sub-types) असें वर्गीकरण केलें आहे :–

1. The Negrito.
2. The Proto-Australoid.
3. The Mongoloid, consisting of :
   (i) Palaeo-Mongoloids of (*a*) long-headed and (*b*) broad-headed types
   (ii) Tibeto-Mongoloids.

---

१. Origin and Spread of Tamils. V. R. Ramachandra Dixitar. M. A., पृ. १३

२. Prehistoric South India. V. R. Ramachandra Dixitar. पृ. २३४.

३. तत्रैव. पृ. २४३.

४. तत्रैव. पृ. २४६.

५. Indo-Aryan and Hindi. Dr. S. K. Chatterjee. पृ. २.

4. The Mediterranean, comprising:
   (i) Palaeo-Mediterranean,
   (ii) Mediterranean, and
   (iii) the so-called Oriental type.
5. The Western Brachycephals,[१] consisting of:
   (i) the Alpinoid,
   (ii) the Dinaric, and
   (iii) the Armenoid.
6. The Nordic.[२]

डॉ. गुहा यांचें म्हणणें असें आहे कीं, रुंद डोक्याच्या जातींत जें वैचित्र्य दिसून येतें ती मानवी इतिहासांत नंतर घडून आलेली गोष्ट आहे. ज्यांचे पुरावे सांपडतात असे पूर्वीचे सगळे नमुने (types) लांब डोक्याचे होते. रुंद डोक्याच्या नमुन्यांचा डोंगरमाथ्यावरील उंच प्रदेशांशीं संबंध असलेला दिसत असल्यामुळें असा एक तर्क करण्यांत येतो कीं, हा बदल बहुतकरून मध्य आशियांतील डोंगराळ उंच प्रदेशांत – कीं जेथें डोक्याची पुढून मागें लांबट वाढ होण्याऐवजीं रुंदीच्या दिशेनें वाढ होण्यास अनुकूल परिस्थिति अस्तित्वांत होती – घडून आला असावा. तिबेट-मधील उंचावरील सपाट भूमीवर मोंगोलॉइड जातींत, तसेंच नैर्ऋत्य सायबेरिया व आर्मेनिया या उंच भागांतील जमातींत एकाहून अधिक बदल झाले असावे.[३]

मानवजातीच्या या सर्व नमुन्यांचे तोंडवळे डॉ. गुहा यांनीं आपल्या पुस्तिकेंत दिले असून त्यांचा ठावठिकाणाहि दिलेला आहे. भारताच्या भूमीवर वसती करण्यास आलेल्यांत सर्वांआधीं आलेले नेग्रिटो या जातीचे लोक होत. इ. सनाच्या कित्येक हजार वर्षें पूर्वी यांचें आगमन आफ्रिकेहून बहुतकरून दक्षिण अरेबिया, दक्षिण इराण, बलुचिस्तान व दक्षिण सिंधु प्रदेशाच्या वाटेनें भारतांत झालें. साधारणतः निग्रो जातीच्या लहान ठेवणीचे हे लोक होते. निग्रोप्रमाणेंच त्यांचा रंग व ठेवण होती. हे लोक लहान डोक्याचे व स्थूल नाकाचे होते. ज्या अवस्थेंत मानव फक्त शिकारीवर व अरण्यांतील कंदमुळें वगैरे खाऊन रहात होता, कृषीची माहिती त्याला अद्याप झाली नव्हती, त्या अवस्थेंत हे लोक होते. यामुळें धनुष्य व बाण हेंच यांचें मुख्य अस्त्र होतें. भारतांत

---

१. Brachycephals = ह्रस्वकपाल (ज्यांच्या डोक्याची कवटी पुढून मागें लांबीला कमी म्हणजे अर्थात् डावीकडून उजवीकडे रुंदट आहे असे लोक.)
Dolicocephals = दीर्घकपाल (डोक्याची कवटी पुढून मागें लांबट असलेले लोक.)

२. The Vedic Age. प्रकाशक - भारतीय विद्याभवन. पृ. १४२.

३. Racial Elements in the Population. Dr. B. S. Guha. पृ. २०-२१.

बऱ्याच ठिकाणीं विशेषतः दक्षिणेंतील समुद्रकिनाऱ्यावर यांचा निवास होता. यांच्यानंतर आलेल्या जातींमुळें हे लोक नामशेष झाले. कांहीं त्या जातींत मिश्रित झाले व यामुळें त्यांचें येथील स्वतंत्र अस्तित्व नष्ट झालें. कांहीं आसाममार्गें दक्षिण मलाया द्वीपकल्पांत गेले. तेथून न्यू गिनी, उत्तर फिलिपीनपर्यंत पोंचले. ब्रह्मदेशांतून एका वेटाच्या मार्गें अंदमान वेटांत पोंचले. तेथें आज या जातीचे अंदाजें ६०० लोक आहेत. हिंदुस्थानांतील कोचीन व त्रावणकोरमधील कादार व पालायन, तसेंच वायनाडमधील इरुला या लोकांत या जातीच्या कांहीं खुणा मिळतात. या जातीच्या भाषेंतील शब्द येथें फारच थोडे मिळतात. डॉ. चटर्जी यांनीं बंगाली भाषेंतील 'बादुड' हा शब्द त्यांचा असें दाखविलें असून[१] त्याचा अर्थ पक्षयुक्त प्राणी (Flying Fox) असा आहे.

यानंतर भारतांत आलेली दुसरी जात म्हणजे Austric (दक्षिणदेशीय) अगर Proto-Australoid (आदिम ऑस्ट्रेलियन जातिसदृश) ही होय. हे लोक काळे, मध्यम आकाराचे, लांब डोकें असलेले व स्थूल बसक्या नाकाचे होते. आपलें मूळ स्थान पॅलेस्टाइन सोडून आशिया मायनर, इराक, इराण येथून ते भारतांत आले. पूर्वी आलेल्या नेग्रिटोंशीं यांचें मिश्रण झालें असें दिसून येतें. या जातीचे लोक सर्व भारतांत विखुरलेले दिसून येतात. या लोकांना आपल्या जुन्या वाङ्मयांत निषाद व महाभारतांत सौद्युम्न असें म्हटलें आहे. बऱ्याच प्राचीन कालीं या जातीचे कांहीं लोक हिंदुस्थानांतून ब्रह्मदेश, मलाया व इंडोनेशिया या मार्गानें ऑस्ट्रेलियाला पोंचले. यांचे वंशज आजसुद्धां तेथील आदिवासींच्या स्वरूपांत असून सिलोनमध्येंहि यांची वसाहत झाली होती.[२] या जातीचे भारतांतील आजचे वंशज म्हणजे संथाळ, मुंडा, हो, भूमीज, शबर, गदर, कोरकू, भिल्ल या कोल जातीच्या नाना शाखा होत.[३] त्याचप्रमाणें आसामांतील खासी जमात होय. (ही तज्ज्ञांच्या मतें किरात वंशीय व ऑस्ट्रिक भाषी होय.) यांतील संथाळ, मुंडा, हो, भूमीज या जमाती बिहारमध्यें असून बंगालमध्यें संथाळ व मुंडा या जमातींची वसती आहे.[४] भिल्लांचें वसतिस्थान खानदेश व मध्य भारतांतील कांहीं भाग होय. कोळी लोक यांचेच वंशज होत, असें डॉ. सांकळिया यांचें मत आहे.[५]

या जातीचें शेतकी उत्पादन – सर्वांत अगोदर आलेल्या नेग्रिटो जातीला मातीचीं भांडीं करतां येत नव्हतीं, त्याअर्थी ही कला या ऑस्ट्रिकभाषी लोकांची ठरते. जमीन खणण्याची कुदळहि (Hoe) यांचीच. एका टोकदार लाकडानें जमिनींत खांचा करून

१. भारतमें आर्य और अनार्य, (हिंदी). डॉ. सुनीतिकुमार चटर्जी, पृ. ७, ८.
२. तत्रैव. पृ. १०.
३. जाति संस्कृति साहित्य (बंगाली). डॉ. सुनीतिकुमार चटर्जी, पृ. १५.
४. हमारी आदिम जातियां. श्री. भगवानदास केला, पृ. १३२ ते १४७.
५. रविवार सकाळ, १६-८-६४. 'भिल्लकोळी मध्यपूर्वेतून आले.' डॉ. हं. धी. सांकळिया.

त्यांत बीं पेरणें, तसेंच कांहीं ठिकाणीं उंचवट्यावरील जमिनींत भातशेती करून तांदूळ पिकविणें वगैरे शोध मूळचे या जातीचे आहेत. ज्यांचीं नांवें आज संस्कृत दिसतात अशीं कांहीं फळें, पिकें व भाजी इत्यादींच्या लागवडीस सुरुवात यांच्याकडून झालेली आहे. केळें, ऊस, तांदूळ, नारळ, वांगें, कोहळा, लिंबू, जांब वगैरे यांचीं शेती-बागायतीचीं उत्पादनें होत. याशिवाय पानवेल, सुपारी, मिरीं, हळद, आलें, सांवरीचा कापूस या वस्तुही यांच्या आहेत. तांदळाची उत्पत्ति पहिल्याप्रथम केल्याचा मान चीनकडे जातो. ऑस्ट्रिक् जातीचा संबंध इंडोचीनकडे होता. तेथून तिनें भारतांत तांदूळ आणला असावा. नांगर शब्दहि या जातीच्या लोकांचा आहे असें म्हणतात. कापसाचें कापड विणणें ही यांची देणगी आहे. लाकडाचा तुकडा घेऊन त्यांत मध्यें खोलगट जागा करून नदीपार जाण्यासाठीं त्याचा उपयोग करण्यास यांनींच सुरुवात केली. डुकर, कुत्रा, कोंबडी, मोर, हत्ती यांची यांना माहिती होती. फक्त गाय त्यांना माहीत नव्हती. धनुष्यबाण, बूमरँग हीं यांचीं शस्त्रें होती. संख्या मोजतांना यांचा शेवटचा अंक वीस हा होता. याला कोडी असें ते म्हणत.[1] एक विसा, दोन विसा अशी ते मोजणी करीत. मेंढा हें जनावर यांना माहीत होतें. कांबळ किंवा घोंगडीहि यांची आहे. या जातींत गांवाला महत्त्व होतें. संथाळ जमातींत गांवाला हातो हा शब्द आहे व तोच मुंडा जमातींतहि आहे. पंचायतीची किंवा गांवच्या जमिनीवरील सामुदायिक मालकीची म्हणजे जिला आम्ही गोव्यांत ग्रामसंस्था म्हणतों ती प्रथा यांच्यांत होती.[2] जिला जूम (जमाव) असें म्हणतात, ती एकत्र शेती करण्याची पद्धतहि यांच्यांत होती.[3] संथाळ जातींत ऋण, उधार, सूद (व्याज), महाजन (सावकार) हे शब्द असेच आर्य भाषेंतील आहेत, यावरून या गोष्टी त्यांच्यांत पूर्वी नव्हत्या असें कळून येतें. त्यांच्यांत प्रथमतः कर्ज वगैरेची पद्धत नव्हती. त्याचप्रमाणें भिक्षा, दान, धनिक, निर्धन, मालक, नोकर यांना संथाळी लोकांच्या मूळ भाषेंत शब्द नाहींत.[4] याचा अर्थ असा कीं, त्यांचा जीवनव्यवहार समाजवादी पद्धतीचा असल्यामुळें त्यांना अशा शब्दांची गरज भासली नाहीं. मुंडा जातींत पंचायतीचें एवढें प्रस्थ आहे कीं, प्रत्येक कामांत शपथ घेतांना ते 'शिर मोरें शिंग ओ तेर पंच' म्हणजे 'आकाशांत सूर्य देवता व पृथ्वीवर पंच'[5] असें म्हणतात.

यांच्या धार्मिक समजुती—आत्म्यावर यांचा विश्वास आहे. मृत्यूनंतर जीवाचा आत्मा वृक्षांत अगर कोणत्याहि जीवजंतूच्या आंत जातो अशी यांची समजूत आहे.

---

१. The Vedic Age. पृ. १५०.
२. Hindu Civilisation. Dr. R. Mukerjee. पृ. ३४, ३५.
३. भारतमें आर्य और अनार्य. डॉ. सुनीतिकुमार चटर्जी. पृ. ११
४. पंचदश लोकभाषा निबंधावली. बिहार राष्ट्रभाषा परिषद. पृ. १०५.
५. बांगालीर इतिहास. डॉ. नीहाररंजन राय. पृ. १४.

श्राद्धांत पितरांना पिंडदान यांच्यांत आहेसें दिसतें. मृतदेह कापड अगर वल्कलें यांत गुंडाळून वृक्षावर ठेवण्याची किंवा पृथ्वीच्या आंत गाडून त्यावर एक दगड समाधिरूपानें ठेवण्याची यांच्यांत पद्धत होती. [१]

आतां यांच्या भाषेचा विचार करूं. गंगा हा शब्द ऑस्ट्रिक जातीचा असें तज्ज्ञांचें म्हणणें आहे. [२] याचा मूळचा अर्थ नदी असा आहे. चिनी भाषेंत खोंग मेखोंग असे शब्द आढळतात. आजच्या मराठींतहि मूळचे ऑस्ट्रिक असलेले अनेक शब्द आढळतात. प. वा. भाषाशास्त्रज्ञ कृ. पां. कुलकर्णी यांनीं ते दिलेले आहेत. [३] अंगार, अम्मा, आलें, उंदीर, कुकुलें, कुरंग, गज, गोचीड, चरू, चिचुंद्री, चुडी, जांगड, जांब, डाळिंब, तंबाकू, नांगर, नारळ, रामफळ, वांगें, सुणें हे शब्द त्यांपैकीं होत. गुजरातेंत भडोच शहर किनाऱ्यावर आहे. याचें संस्कृत मूळ भृगुकच्छ असें असावें व ज्यांत परशुरामाचा अंतर्भाव होतो त्या भृगु या आर्यकुलानें तें शहर वसविलें असावें, असा समज होता, व या शब्दावरून अनेक ऐतिहासिक सिद्धांत काढण्यांत आले होते. पण आतां हा शब्द 'भरुकच्छ' असा आहे व तो संस्कृत नसून ऑस्ट्रिक आहे असें तज्ज्ञांना आढळून आलें आहे. [४]

मुंडारी भाषेच्या कोशांतील कांहीं शब्द नमुन्याकरतां खालीं देत आहें. (पहा Mundari English Dictionary by M. B. Bhaduri, B. A.)

Kadali Daru	केळ
Kanji	पेज
Mad	बांबू
Mandi	उकडा अगर शिजविलेला तांदूळ.
Kaman	घरांत मृत्यु झाल्यानंतरची हजामत.
Mandowa Baikora	मांडव घालणारा तरुण.
Mandowa Daram taka	वराची वरात वधूकडे आल्यावेळीं खोटी
Mandowa Kessel taka	अडवणूक करून सव्वा रुपया दंड घेणें.

मुंडारी भाषेचा कोश पाहिल्यास त्यांत अनेक शब्द आपलेच दिसतात. उदाहरणार्थ Maghi Parob (माघी परब) या शब्दाचा उल्लेख करतां येईल. हा पौष महिन्याच्या पौर्णिमेला होणारा पितर उत्सव असून हा सण मुंडा जातींत मुख्य समजला जातो.

---

१. जाति, संस्कृति ओ साहित्य. डॉ. सुनीतिकुमार चटर्जी. पृ. १३.
२. तत्रैव. पृ. १४.
३. मराठींतील ऑस्ट्रिक शब्द. कृ. पां. कुलकर्णी. महाराष्ट्र साहित्य पत्रिका. अंक ७० (एप्रिल १९४४).
४. भारतीय संस्कारो (गुजराती). दु. के. शास्त्री. पृ. २०८.

या जातीच्या एकंदर संस्कृतीचा गोमंतकाच्याहि उभारणींत बराच भाग दिसतो. या जातीचे कोणते वंशज कोणत्या भागांतून इकडे आले हें अद्याप निश्चित नाहीं. पण गोमंतकाच्या उभारणीचा पाया या जातीकडून घातला गेला असावा, असें प्रस्तुत लेखकाचें अनेक कारणांमुळें मत बनलें आहे. गोमंतकांत ग्रामसंस्थेचें वैशिष्ट्य आहे. याचें मूळ कोणीकडे जातें, याबद्दल वर दिलेल्या माहितीवरून वाचकांनीं स्वतःच निष्कर्ष काढावा. गोमंतकांतील आदिवासी समाजांत गणनाची कमाल संख्या वीस होती. तिला ते कोडी असेंच म्हणत. कांहीं महिन्यांमागें प्रस्तुत लेखकाला सांकवाळ, कुठाळ, केळशी या भागांत जुन्या काळाबद्दलच्या कांहीं माहितीकरतां फिरावें लागलें. केळशीला लहान डोंगुरल्यांवर भातशेतीची जमीन दिसली. कांहीं दिवसांमागें पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्थेतर्फे कांहीं मंडळी प्रस्तुत लेखकाला चर्चेकरतां भेटली होती. त्यांच्याकडून अशी माहिती मिळाली कीं, ते एका गोमंतकीय शेतकऱ्याकडे गेले असतां चहा दुधाशिवाय मिळेल असें त्यानें सांगितलें. त्याच्याकडे आठदहा गाई होत्या. असें असतां दुधाचा तुटवडा कां या प्रश्नाचें उत्तर त्यानें असें दिलें कीं, आपल्याकडे गाईंचें दूध काढण्याची पद्धतच नाहीं.

यांची मूळ प्रथा गोपालनाची नसल्यामुळें शेतीकरतां जरी यांनीं गाई पाळल्या, तरी दूध वापरण्याची पद्धत त्यांच्यांत रूढ झाली नाहीं, असें अनुमान निघतें. सारांश भारतीय संस्कृतींत सर्व दृष्टींनीं या जातीचा फार मोठा भाग आहे.

नेग्रिटो व ऑस्ट्रिक यांच्यामागून द्रविड व आर्य यांचा क्रम लागतो. व शेवटीं किरात ऊर्फ मंगोल यांचें आगमन झालें. द्रविड व आर्य या जातींचा वांटा भारतीय संस्कृतींत फार मोठा असल्यानें व त्यांच्यासंबंधीं जरा विस्तृत विवेचन करणें भाग असल्यानें शेवटच्या मंगोल जातीची माहिती आधीं देऊन नंतर त्यांच्याकडे वळणार आहें.

पश्चिम चीनमध्यें यांगत्सेक्यांग नदीच्या उगमाजवळ भोट चीन वंशाची भाषा बोलणाऱ्या आदि मंगोल जातीचा मूळ निवास होता. ह्यांचें दुसऱ्या जातीशीं संमिश्रण झाल्यानें यांच्यांत दीर्घकपाल व ह्रस्वकपाल असे दोन्ही मापनांचे लोक आढळतात. यांतील एका शाखेनें सनपूर्व दोन हजार वर्षांपूर्वी उत्तर चीनमध्यें जाऊन चिनी संस्कृतीचा पाया घातला.

भारतांत यांचें आगमन ब्रह्मपुत्रा नदीच्या आश्रयानें झालें. यांच्या आगमनाचा काल सनपूर्व पहिल्या सहस्राब्दींत असावा. आर्यांच्या दुसऱ्या टोळीपूर्वी हे लोक इकडे आले असण्याचा संभव आहे. कारण यजुर्वेद, अथर्ववेद, महाभारत, रामायण यांमध्यें उत्तर व पूर्व भारताच्या पर्वतांचलांत किरात लोकांची वस्ती असल्याचा उल्लेख आहे. जुन्या काळीं यांची वस्ती गंगेच्या कांठावर मध्यभारत, राजस्थान, सिंध वगैरे ठिकाणीं होती. आज ती फक्त आसाम, भूतान, नेपाळ व हिमालयाजवळचा प्रदेश या भागांत

आहे. किरात भाषांतील नांवें बहुतकरून नद्यांना वगैरे दिलेलीं उत्तर भारतांत आढळतात. प्राचीन संस्कृत व पाली ग्रंथांत किरात व आर्यभाषी लोकांचा संयोग झाल्याचा आभास दिसून येतो. शूलगव्यासारखी यज्ञक्रिया वैदिक धर्मीयांनीं त्यांच्याकडून घेतली असणें शक्य आहे. नंतरच्या कालांत शाक्ततंत्रावर या जातीचा प्रभाव पडला. या जातीनें चीनमध्यें एका विराट संस्कृतीची सृष्टि निर्माण केली. परंतु भारतांत या जातीचा प्रभाव उत्तर भारत व त्यांतल्या त्यांत हिमालय, आसाम वगैरे सीमाप्रदेश इतक्यापुरताच मर्यादित राहिला. भारताच्या इतर भागांत व विशेषतः दक्षिणेंत या जातीचा प्रभाव कांहींच पडूं शकला नाहीं.' डॉ. सुनीतिकुमार चटर्जी यांचें 'किरात जनकृति' हें पुस्तक या विषयाबद्दलच्या माहितीनें परिपूर्ण आहे असें म्हणतात.

यानंतर आलेले लोक द्रविड ऊर्फ मेडिटेरेनियन हे होत. डॉ. गुहा यांनीं यांचे खालील तीन पोटभेद दाखविले आहेत. हे सर्व लांब डोक्याचे होते.

१ पेलिओ-मेडिटेरेनियन–यांची उंची मध्यम, कातडी काळसर व बांधा सडपातळ असून यांचें अस्तित्व कानडी, तामिळ व मल्याळी प्रदेशांत आहे.

२ अस्सल मेडिटेरेनियन अगर युरोपियन पोटभेद–हे लोक वरील लोकांपेक्षां उंच व गोऱ्या कातडीचे होते. यांचें अस्तित्व पंजाब व गंगेच्या कांठाचा वरील भाग या प्रदेशांत असल्याचें आढळतें. हे उत्तर भारतांतील आर्यपूर्व सुसंस्कृत द्रविड असून आर्यांची भाषा स्वीकारून ते पुढें आर्यसदृश बनले आणि उत्तर भारतांतील हिंदूंच्या सांस्कृतिक व अन्य विकासास त्यांनीं बराच मोठा हातभार लावला, असें समजलें जातें.

३ मेडिटेरेनियन स्ट्रेन — (तथाकथित 'ओरिएंटल' पोटभेद – ज्याला सामान्यतः 'सेमिटिक' असें चुकीनें संबोधण्यांत येतें तो) हे विशेष लांब नाक असलेले गौरवर्णी लोक पंजाब, सिंध, राजपुताना आणि उत्तरप्रदेशाचा पश्चिम भाग येथें आढळतात.[२]

साधारणतः आपण या लोकांना द्रविड असेंच म्हणतों. दक्षिणेंतच या लोकांची बहुसंख्या आढळून येते. हे ऑस्ट्रिक लोकांपेक्षां सांधिक दृष्ट्या जास्त बळकट होते. यांच्यांत गोपालन होतें आणि गहूं व जव हीं यांचीं मुख्य अन्नधान्यें होतीं. भारतीय संस्कृतींत यांचा फार मोठा वांटा आहे. नगरनिर्माणकला ही यांची होती. आर्यांच्या आणि यांच्या आचारविचारांत फार अंतर होतें. हे कर्मठ, भावनायुक्त, रहस्यवादी आध्यात्मिक विश्वास बाळगणारे, शिल्पकलाभिज्ञ व संघटित होते.[३] आजच्या हिंदु संस्कृतींतील बरींचशीं मुख्य दैवतें द्रविड लोकांचीं आहेत. शिव, उमा, गणेश, हनुमान,

---

१. भारतमें आर्य और अनार्य. डॉ. सुनीतिकुमार चटर्जी. पृ. १३.
२. The Vedic Age. प्र. भारतीय विद्याभवन. पृ. १४३.
३. जाति, संस्कृति ओ साहित्य. डॉ. सुनीतिकुमार चटर्जी. पृ. १६.

विष्णु वगैरे दैवतें मूळचीं यांचीं आहेत. द्रविड भाषेंत 'शिवन' या शब्दाचा अर्थ तांबडा असा होतो. आमच्या पूर्वीच्या आर्य भाषेंत नील लोहित असें नांव आहे. डॉ. चटर्जीच्या मतें विष्णु ही देवता कांहींशी आर्यांची तर कांहींशी द्रविडांची आहे.[1] इष्टदेव कल्पून त्याची भक्ति करणें या धार्मिक आचाराला द्रविडांत फार महत्त्व होतें. सुंदर वस्त्रांनीं मूर्तीला वेष्टित करून तिची पुष्पधूपदीपांनीं पूजा करणें, नैवेद्य दाखविणें वगैरे विधि त्यांचे होत. पूजा करण्यास पुष्पाची जरुरी असते. द्रविड भाषेंत पू याचा अर्थ फूल आणि ज याचा अर्थ करणें असा आहे.[2] भारतांत पूर्वकालीन होम मागें पडून नंतर पूजेला महत्त्व आलें. हा आचार द्रविडांचा आहे.

कांहीं वर्षांपूर्वी हराप्पा, मोहेंजोदरो (सिंध) येथें उत्खननांत एका प्रगत संस्कृतीचे अवशेष आढळून आले. अद्याप ही संस्कृति कोणत्या जातीची, हें निश्चित रीत्या सिद्ध झालेलें नाहीं. बहुसंख्य विद्वान ती द्राविड संस्कृति असून तिचा नाश नंतर आलेल्या आर्यांकडून झाला असें मानतात.

द्रविडांच्या साधारणतः दक्षिणेंत तेलगू, कानडी, तामिळ व मल्याळी या चार मुख्य भाषा आहेत. याशिवाय तुळू, कोडगु, कोलमी, टोडा वगैरे त्यांच्यांतील अल्पसंख्यांच्या साहित्यिक प्रतिष्ठा नसलेल्या भाषा आहेत. मध्यभारतांतील गोंड भाषा ही द्रविड असून या भाषेलाही साहित्यिक प्रतिष्ठा नाहीं. साधारणतः या भाषांचें आजचें प्रमाण २०–२१ टक्के असून आर्यभाषांनंतर या द्रविड भाषांचा क्रम लागतो. आदिवासी भाषांचें प्रमाण अल्प आहे. द्रविडांत आठ संख्येला महत्त्व आहे. आर्यांत १० ला होतें. पुढें आर्यांचे दहा व द्रविडांचे आठ यांचा संगम होऊन अठराला महत्त्व आलें. आमच्या मुख्य वाङ्मयांत अठरा पर्वें आहेत, हें सर्वांना माहीत आहेच.

यानंतर डॉ. गुहा यांच्या पांचव्या क्रमांकाच्या वर्गाकडे वळूं. याला त्यांनीं पाश्चात्य ह्रस्वकपाल (Western Brachycephals) असें नांव दिलें असून The Alpinoid, the Dinaric आणि The Armenoid असे तीन पोटभेद दिले आहेत. त्यांच्या मतें हे शरीरशास्त्रदृष्ट्या एकाच वर्गाचे पोटभेद आहेत. ह्यांची वाढ मध्य आशियांतील डोंगरपठारावर झाली. आल्पिनॉइड व दिनारिक हे लोक भारतांतील बऱ्याच भागांत पसरले. दिनारिक नमुना हा मुख्यत्वें बंगाल व ओरिसा येथें दिसतो. तसेच काठेवाडांत आणि कानडी व तामिळ मुलखांतहि तो उपलब्ध आहे. कुर्गमध्यें तो निर्भेळ स्वरूपांत आढळून येतो. गुजरातेंत आल्पिनॉइड्सचें अधिक प्राबल्य दिसतें. यांतील रुंद डोक्याचे लोक भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर आढळतात. मात्र याला मलबारचा अपवाद आहे. तेलगूच्या प्रदेशांत हे सांपडत नाहींत.

---

१. The Vedic Age. भारतीय विद्याभवन. पृ. १६२.
२. तत्रैव. पृ. १६०.

मुंबईचे पारशी म्हणजे अलीकडे भारतांत आलेला आर्मेनॉइडशीं संलग्न असा आंखूड डोक्याचा गट होय. इराणमध्यें अजून राहात असलेल्या लांब डोक्याच्या झोरोआस्ट्रियनशीं यांचा साम्याऐवजीं विरोधच असल्याचें डोळ्यांत भरतें.[१]

आल्पिनॉइड पोटभेदाबद्दल आणखी माहिती अशी कीं, हे लोक इंडो-युरोपियन भाषा बोलत होते. याची खूण आर्यभाषांतर्गत जी दरद भाषा आहे व जी चित्राळ-निवासी रुंद डोक्याचे लोक बोलतात, तिच्यांत मिळते. नंतर आलेल्या वैदिक आर्यांनीं हुसकावून लावल्यामुळें गंगेच्या अंतर्वेदींतून ते बंगालपर्यंत गेले.[२]

या वर्गातील आर्मेनॉइड यांचा जास्त संबंध द्रविडांशीं आला होता, असें आढळून आलें आहे. सुमेरची जनता भूमध्यसागरीय लांब डोक्याचे लोक व आर्मेनिया येथील रुंद डोक्याचे लोक यांच्या मिश्रणानें बनली.[३] भारतांत विशेषतः तामीळ लोकांत उपरिवर्णित भूमध्यसागरीय व आर्मेनियन या दोन समूहांचें मिश्रण आहे.[४]

डॉ. राजबली पांडेय या इतिहासज्ञाचें मत असें कीं, आल्पिनॉइड व दिनारिक जातींमुळें प्राग्वैदिक व वैदिक आर्य यांचा विकास झाला तर आर्मेनॉइडमुळें भारतांतील कांहीं द्रविड जाती उत्पन्न झाल्या.[५]

आतां शेवटीं आर्य वंशाची माहिती देऊन हा विषय पुरा करूं. ऋग्वेदादि वैदिक साहित्याची रचना करणारे, इंद्र, अग्नि, मरुत्, सोम इ. देवतांची उपासना करणारे, पितृप्रधान कुटुंबपद्धति चालविणारे, भारताबाहेरून येऊन प्रथम सप्तसिंधु (पंजाब) या प्रदेशांत वास्तव्य करणारे व तेथून गंगायमुनेच्या प्रदेशांत पुढें सरकणारे असे जे लोक त्यांना आर्य असें म्हणतात. भृगु, भरद्वाज, अंगिरा, वशिष्ठ, अत्रि इ. पुरुष हे आर्यांतील मंत्रकर्ते असून सुदास, दिवोदास, भरत इ. पुरुष आर्यांतले वीर योद्धे होत.

आर्यांच्या मूलस्थानाबद्दल मोठमोठ्या विद्वानांत इतकी विपुल चर्चा झाली आहे कीं, तिचा परामर्ष घेणेंसुद्धां फार कठीण काम आहे. आजसुद्धां, आर्य हे मूळ हिंदु-स्थानांतीलच असून इकडून ते बाहेर गेले असें प्रतिपादन करणारे कांहीं अभ्यासक आहेत. परंतु हें त्यांचें मत विद्वानांच्या मान्यतेला पात्र झालेलें नाहीं, याचा उल्लेख

---

१. The Vedic Age पृ. १४४. Racial Elements in the Population. Dr. B. S. Guha. पृ. २२.

२. हिंदु सभ्यता. डॉ. राधाकुमुद मुकर्जी. पृ. ४०.

३. तत्रैव. पृ. ३९.

४. तत्रैव. पृ. ४०.

५. भारतमें जातीय मिश्रण की समस्या. डॉ. राजबली पांडे. ना. प्र. पत्रिका - वर्ष ६०, अंक १.

मी वर केलाच आहे. वेगवेगळ्या ग्रंथांतून याबद्दलचें जें विवेचन माझ्या वाचनांत आलें आहे, त्यांपैकीं सुस्पष्ट असें विवेचन डॉ. सुनीतिकुमार चटर्जी यांचें वाटल्यामुळें सारांशतः तें येथें देत आहें.

सन १९३६ सालीं जर्मन पंडित W. Brandenstein यांनीं आदिम इंडो-युरोपियन लोकांच्या पितृभूमीविषयीं जें संशोधन प्रकाशित केलें तें या बाबतींत शेवटचें सत्य असें समजण्यास हरकत नाहीं. त्यांनीं भाषातात्त्विक विचारावर अवलंबून असें दाखवून दिलें कीं, इंडो-युरोपियन लोक प्रथमतः उराल पर्वताच्या (जो आशिया व युरोप यांच्या सरहद्दीवर आहे) दक्षिणेकडील युरोप व आशियाच्या समतल व कोरड्या हवेच्या प्रदेशांत राहात होते. हे लोक उंच अंगकाठीचे, लांब डोकें, सरळ नाक व पिंगट केस असलेले व गौरवर्णी होते. यांना Nordic अगर उत्तरदेशीय अशी संज्ञा आजच्या विद्वानांनीं दिली आहे. यांनीं आपला धर्म, भाषा, आचारविचार यांची बांधणी केली होती. साधारणतः सनपूर्व ३ हजार वर्षें हे लोक आपल्या अविभक्त स्थितींत राहात होते. ज्या देवतांची ते उपासना करीत त्यांचें वर्णन त्यांच्या सूक्तांवरून मिळतें. उराल पर्वताच्या दक्षिणेकडील आपल्या पितृभूमींतून कांहीं टोळ्या पश्चिमेला पोलंडच्या पाणथळ प्रदेशांत गेल्या व तेथें त्यांच्या संस्कृतींत कांहींसा बदल झाला व त्यांच्या प्राचीन भाषेंत फरक पडला. येथून आणखी पश्चिमेस सरकत मध्य, उत्तर, पश्चिम तसेंच दक्षिण युरोपमध्यें इंडो-युरोपियनांच्या आणखी टोळ्या पोंचल्या. युरोपांतील सर्व भागांत मूळ इंडो-युरोपियन नॉर्डिक जातीच्या लोकांशीं तेथें राहणाऱ्या लोकांचें मिश्रण झालें व यांतून जर्मन, ट्यूटॉनिक, केल्टिक, इटालिक, हेलेनिक किंवा ग्रीक यांचा उगम झाला. यामुळें मूळ इंडो-युरोपियन भाषा कांहींशी रूपांतरित झाली. पोलंड व त्याच्या आसपास जे इंडो-युरोपियन लोक राहात होते त्यांच्या वंशजांमध्यें आतां स्लाव व बाल्टिक लोक आहेत. आर्य लोक भारतांत कोणत्या मार्गानें आले याविषयीं दोन मतें आहेत. अलीकडचा नवा शोध असा आहे कीं, ते उराल पर्वताच्या दक्षिणेकडील आपल्या पितृभूमींतून निघून कॉकेशस पर्वतांचें उल्लंघन करून उत्तर इराकमध्यें पोंचले. साधारणतः २२०० वर्षांपूर्वी येथें कांहीं शतकें वास करून पूर्वेकडे पहिल्यांदां इराणमध्यें आले व इराणमधून भारतांत आले. उत्तर इराकमध्यें व त्याच्या आसपास ज्यावेळीं आर्यांचे गट (भृगु, भारद्वाज, कुरु, शक वगैरे गोत्रांचे) राहात होते, त्यावेळीं ते तिकडील व्यापारांत अंशतः भाग घेत होते, तसेंच कांहीं ठिकाणीं त्यांनीं राज्याधिकारहि प्राप्त करून घेतला होता. तिकडील आसुर व बाबिलोन तसेंच हिती यांच्या संस्कृतीनें ते प्रभावित झाले आणि त्यांचा धर्म व देवतावाद यांच्यांत आणखी परिवर्तन झालें. तसेंच त्यांची भाषा अशा अवस्थेला पोंचली कीं, जिला वैदिक संस्कृत व प्राचीन पारसिक व अवस्ता भाषेचें एक जुनें रूप म्हणतां येतें. उत्तर व दक्षिण इराक आणि पूर्व आशिया मायनरमध्यें रहात असतां आर्यभाषी लोकांचा तेथील स्थानिक लोकांशीं जो संयोग झाला त्याचें प्रमाण असीरिया व बाबिलोनिया

वगैरे ठिकाणच्या जुन्या भाषेंत व लिपींत मिळालें आहे. विद्वानांनीं यासंबंधींच्या प्रमाणभूत लेखांची ऐतिहासिक दृष्ट्या तपासणी केली आहे. त्या लेखांत प्राग्वैदिक व प्राग् इराणी भाषेचे कांहीं शब्द – त्यांत माणसांचीं व देवतांचीं नांवेंहि आहेत – मिळाले असून त्यांचा काल अंदाजें सनपूर्व २००० ते २४०० आहे. या लेखांमुळें आर्य भाषेची कांहीं माहिती आम्हांला मिळूं शकते.

नॉर्डिक जातीचे आर्यभाषी लोक इराक व इराणमध्यें येऊन पोंचले. कांहीं प्रमाणांवरून असें कळून येतें कीं, आर्य लोक इराक व पूर्व आशिया मायनरमधील जातीच्या लोकांशीं मिश्र होत होते. यांतील कांहीं आखूड डोक्याचे (Brachycephals) –आल्पाइन (आल्पपर्वताश्रयी) असें ज्यांना अभ्यासकांनीं नांव दिलें आहे ते लोक होत. भारतांत आर्य आल्यानंतर आर्यभाषी लोकांत दोन प्रकारच्या आकृतिमानाचे लोक दिसून आले. एक Nordic अर्थात् लांब डोक्याचे व खरे आर्यभाषी होते. यांत भारतांतील जाट, रजपूत व कांहीं ब्राह्मण दिसतात. दुसरे रुंद म्हणजे आखूड डोक्याचे. यांत दरद भाषा बोलणारे पश्चिम हिमालयाकडील आर्यभाषी व काश्मिरी यांचा समावेश होतो. आर्यांच्या भिन्न गोत्रांचे लोक भिन्न आर्य बोली बोलत होते. यांच्या आधारावर काव्य व साहित्य यांची आर्यभाषा बनली ती ऋग्वेदांत दिसते.[1]

साधारणतः आर्यांचें मूलस्थान कोणतें व ते भारतांत कोणत्या मार्गानें आले, याबद्दलची तज्ज्ञ अभ्यासकांना मान्य असलेली विचारसरणी वर दिली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पुष्कळदां नवीन शोधामुळें अभ्यासकांनाहि आपले निष्कर्ष बदलावे लागतात, यांची मात्र आपण दखल घेतली पाहिजे.

आर्यांतील Nordic हे लांब डोक्याचे, उंचेपुरे व गोरे असून पिंगट केस व घारे डोळे या लक्षणांनीं युक्त असे होते. डॉ. गुहा वगैरेंचें म्हणणें असें कीं, आजच्या चित्पावन ब्राह्मणांत हीं चिन्हें मुख्यत्वेंकरून दिसून येतात. ते असेंहि सांगतात कीं, चित्पावन ब्राह्मण हे पालेस्टाइनहून आले नसून बहुतकरून ते उत्तरेकडून जे स्वारी करणारे आले त्यांतील असावे व दक्षिणेंतील भ्रमंतीच्या वेळीं तिकडे वेगळे पडले असावे. हें म्हणणें अर्थात् एका अभ्यासकाचें आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे.[2]

साधारणपणें अशी एक कल्पना आहे कीं, गोमंतकांतील सारस्वत हे पूर्णपणें आर्य आहेत. याशिवाय दुसरा एक प्रवाद असाहि आहे कीं, त्यांचा व बंगाली लोकांचा संबंध असावा व ते बंगालमधून आले असावे. या बाबतींत मी केलेल्या संशोधनावरून, या दुसऱ्या प्रवादाला पोषक असा पुरावा नाहीं, तर उलट ते पंजाब-काश्मीरमधून आले यालाच जास्त पुष्टी मिळते, असें मला दिसून आलें आहे व हें मी या पुस्तकांत

---

१. भारतमें आर्य और अनार्य. डॉ. सुनीतिकुमार चटर्जी. पृ. १८-२०-२१.

२. Racial Elements in the Population. Dr. B. S. Guha. पृ. २६.

वसुक्रमांक २५ ७५६२५ वि: त्रिवेंद्र
2732 तो: वि: २२३१८७

अन्यत्र दाखवून दिलें आहे. जुन्या गोव्याचे कै. डॉ. वैकुंठ कामत यांनीं वैद्यकीय शिक्षण घेतांना अखेरच्या परीक्षेसाठीं सादर केलेला प्रबंध 'गोमंतकांतील सारस्वत ब्राह्मण' या विषयावर लिहिला होता. त्यांनीं मस्तिष्कमापनदृष्ट्या पृथक्करण करून असा निष्कर्ष काढला होता कीं, "पंजाबचे लोक लांब डोक्याचे (Dolichocephalic) व सरळ नाकाचे (Leptorrhine) आहेत, तर उलट गोव्याचे सारस्वत आखूड डोक्याचे (Brachycephalic) व मध्यमाकृति नाकाचे (Mesorrhine) असून त्यांचें बंगाली ब्राह्मणांशीं अधिक साम्य दिसतें."[1]

डॉ. कामत यांचें मापन यथातथ्य असल्याचें गृहीत धरलें तर गोमंतकांतील सारस्वतांचा पूर्ण आर्य किंवा नॉर्डिक यांपेक्षां आर्यभाषी अल्पाइनांशीं अधिक संबंध असावा, असें म्हणावें लागेल. अल्पाइन हे काश्मीरमध्यें होते व त्यांचें भ्रमण बंगालपर्यंत झालें होतें. पण डॉ. कामत यांनीं केलेलें मापन कितपत शास्त्रशुद्ध व कितपत प्रातिनिधिक स्वरूपाचें झालें आहे, हा प्रश्न आहे. केवळ गोमंतकांत झालेल्या मस्तिष्कमापनाच्या एका प्रयत्नाची नोंद करावी, या दृष्टीनें ही माहिती दिली आहे.

आर्यांचे धार्मिक आचारविचार व भाषा यांच्याबद्दलची माहिती साधारणतः सर्वांना आहेच. आर्यांचा मुख्य धार्मिक विधि होम हा होय. वेदी बनवून तिच्यांत अग्नि प्रज्वलित करणें व त्यांत इंद्र, वरुण, पूषा, अग्नि, मरुद्गण वगैरे देवतांना उद्देशून दूध, तूप, जवाची रोटी, मांस, सोमरस इत्यादींची आहुति देणें हाच त्यांचा मुख्य विधि होता. यामुळें त्या देवता प्रसन्न होतात असें ते मानीत. आर्यांचा आणि आजच्या युरोपियनांचा संबंध होता, व भाषेचें स्वरूपहि जुळतें होतें, याचें प्रत्यंतर म्हणजे जर्मन भाषेंत परमात्मावाचक 'गॉड' याचा अर्थ तूप वगैरे हवनसामुग्री असा होता, असें तज्ज्ञांचें म्हणणें आहे. आर्य प्राथमिक अवस्थेंत पशुपालक होते. पुढें त्यांनीं कृषीचा स्वीकार केला. त्यामुळें गाईला त्यांच्यांत फार महत्त्व होतें. त्यांनीं भारतांत येऊन लहानलहान तुकड्यांत विभागल्या गेलेल्या व अनेक धर्माचारांनीं गजबजलेल्या या भूभागांतील लोकांना एका भाषेच्या आणि एका संस्कृतीच्या माळेंत गोवलें. फार दूरवर दृष्टि ठेवून सर्वांत एकात्मता निर्माण व्हावी, या उद्देशानें त्यांनीं असे प्रयत्न केले. हें करतांना सर्वांचे योग्य आचारविचार घेऊन एक संस्कृति बनविली. त्याकरतां वाङ्मय निर्माण करून प्रचार केला. डॉ. सुनीतिकुमार चटर्जी यांसारखे विद्वान असें सांगतात कीं, आजच्या हिंदु अगर भारतीय संस्कृतींत बारा आणे भाग अनार्य आहे.[2]

---

१. Os Brâmanes Sarasvatas de Goa. Dr. Voicunta Camotim. पृ. ६३.

२. Indo-Aryan and Hindi. Dr. S. Chatterjee. पृ. १६४.

भारतांत वस्ती केलेल्या सर्व जातींत मिश्रण झालें असून एकसंध भारत कसा बनला याचें संपूर्ण चित्र महाभारतांत पहावयास मिळतें. वनपर्वांत युधिष्ठिर अजगराला उत्तर करतो कीं, "हे महासर्पा, सर्व वर्णांचा संकर झाल्यामुळें जातीचा निश्चय कठीण आहे. पुरुष सर्व जातींच्या स्त्रियांच्या द्वारा संतती निर्माण करतात. यास्तव मनुष्यांत शीलच मुख्य आहे."[१]

भारताची परंपराच अशी आहे कीं, येथें कांहीं वंश अगर जाती आपले भिन्न आचार, भिन्न दैवतें, भिन्न भाषा घेऊन आल्या. 'सर्वे भद्राणि पश्यन्तु' या हेतूनें आर्यांनीं फार मोठी दूरदृष्टि ठेवून सर्वांना आपापल्या पद्धतीनुसार व विचारानुसार राहण्यास परवानगी दिली. हिंदुस्थानांत असंख्य जाती उत्पन्न होण्याचें हें एक कारण असावें, हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे. भूगोलावरील इतर भागांत म्हणजे अमेरिका, ऑस्ट्रेलिया वगैरे ठिकाणीं हें घडलें नाहीं. तेथें वरिष्ठ जातीनें कनिष्ठ जात नष्ट करण्याचा प्रयत्न केला. आर्यांनीं हिंदुस्थानांत हें धोरण ठेवलें नाहीं, तर सर्वांना आपापल्या समजुतीनुसार जीवन जगण्याची संधी दिली. हें करतांना एकमेकांचीं मनें जिंकण्याकरतां सर्वांच्या आचाराचें व संस्कृतीचें शक्य तसें मीलन केलें. याचप्रमाणें सर्वांचें मन जिंकून एक भाषाहि त्यांना स्वीकारावयास लावली. आजच्या भारतांत आर्य भाषेचें प्रमाण सत्तर बहात्तर टक्के आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे.

भारताच्या वांशिक घडणीचा इतिहास हा असा आहे.

---

१. महाभारत. वनपर्व. अध्याय १-८०.

२

गोमंतकाची संस्कृति : उद्गम आणि विकास

गोमंतक हा भारताचा एक भाग. अर्थातच भारतांत झालेल्या अनेक सांस्कृतिक घडामोडींचे परिणाम त्याच्यावर होणें साहजिक आहे. जीवनाच्या अनेकविध प्रगत स्वरूपांचा समुच्चय म्हणजेच संस्कृति. मानवांतील मानवतेचा उद्भव त्याच्या संस्कृतींत होत असतो. भारतीय अगर हिंदी संस्कृति ही भारतांत आलेल्या कांहीं जातींच्या संमिश्रणांतून बनलेली आहे. आर्य, द्रविड अगर त्यापूर्वी इकडे आलेल्या आणखी जाती या सर्वांचाच या संस्कृतींत कमीअधिक प्रमाणांत भाग आहे. देवदैवतें, आचार-विचार, तत्त्वज्ञान वगैरे बाबतींत या सर्वांचाच इतका एकजीव झालेला आहे कीं, यांतील पुष्कळशा गोष्टी आर्येतर आहेत हें मान्य करणें पुष्कळांना जड जातें. परंतु या गोष्टी सत्य आहेत. आधुनिक संशोधनानें त्याला पुष्टी मिळालेली आहे. जागतिक कीर्तीच्या एका विद्वान संशोधकांनीं या बाबतींत असे उद्गार काढलेले आहेत कीं, "आजच्या हिंदु संस्कृतीत बारा आण्यांपेक्षां जास्त भाग आर्येतरांचा आहे.[१]" वस्तुस्थिति अशी असली तरीहि त्या काळच्या आर्य समाजधुरीणांनीं या सर्व गोष्टींवर आर्य संस्कृतीचें पुट इतकें बेमालूम चढविलें आहे कीं, या संस्कृतींत अनेक गोष्टी आर्येतर आहेत हें सहजपणें दिसून येत नाही.

आज भारत एकाच संस्कृतीखालीं नांदत आहे. व्यास, वाल्मीकि, राम, कृष्ण, मनु, बुद्ध, महावीर, शंकराचार्य ह्यांच्याविषयीं सर्वांनाच आदर आहे. महाभारत, गीता, रामायण, तसेंच भागवतादि ग्रंथांचीं पारायणें हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत व पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत सारख्याच श्रद्धेनें होत असतात. पवित्र गंगा व इतर नद्या यांबद्दलची पूज्यबुद्धि सर्वांच्या अंतःकरणांत सारखीच वसत आहे.

असें जरी असलें तरी या विशाल संस्कृतीच्या पोटांत कांहीं प्रादेशिक वैशिष्ट्येंहि आहेत. बंगालमध्यें जुन्या काळांत शैव विवाहांत वधूच्या जातीचा विचार होत नसे. या शैव विवाहाच्या प्रभावामुळेंच बंगालांत नाना जातींचें संमीलन झालेलें दिसत आहे. यांत आराकानी, भूटिया, तिवेटी, पठाण स्त्रिया बंगाली शाक्त ब्राम्हणांच्या बायका झाल्या होत्या.[२] तेथील काली देवता ही इतर ठिकाणच्या दैवतांपेक्षां बरीच भिन्न व क्रूर स्वरूपाची आहे. बंगालमध्यें नवरात्रांत इतर ठिकाणीं आहे तसें नवरात्राला महत्त्व नसून दुर्गा-पूजेलाच अधिक महत्त्व आहे. बंगालमध्यें रामायणाचे पाठ वगैरे होत असले तरी मंदिरांतून राममूर्तीऐवजी कृष्णमूर्तीच बहुतेक पूजली जाते. बंगालमध्यें तसेंच दक्षिण

---

१. The Vedic Age. Dr. S. K. Chatterjee. पृ. १६४.

२. पांचकडि बंद्योपाध्याय रचनावली भाग १ (बंगाली) प्र. बंगीय सा. परिषद. पृ. ८.

भारतांत जुन्या काळीं विधवांचें केशवपन केलें जात असे, पण उत्तर भारतांत ही गोष्ट आवश्यक मानली जात नसे. अशा रीतीनें भारताची संस्कृति ही एक असली तरी त्यांत प्रादेशिक भिन्नत्वहि बऱ्याच प्रमाणांत दिसतें. याचें कारण जुन्या काळीं ज्या कांहीं मुख्य जाती व त्यांचे विभाग यांनीं या ठिकाणीं येऊन वसती केली त्यांचा प्रभाव कमी-अधिक प्रमाणांत त्या त्या भागावर पडलेला आहे हें होय. यामुळें प्रत्येक ठिकाणीं लोकांच्या आचारविचारांतहि थोडेंफार भिन्नत्व आलेलें आहे व याच गोष्टी मागील सांस्कृतिक इतिहासाचे धागेदोरे जुळविण्याचीं साधनें ठरलेलीं आहेत.

गोमंतकाची संस्कृति ही भारतीय अगर हिंदु संस्कृतीपासून भिन्न नाहीं. मात्र इतर ठिकाणांप्रमाणें गोमंतकाचेंहि एक प्रादेशिक वैशिष्ट्य आहे व या वैशिष्ट्याच्याच-मार्गें त्याच्या याबद्दलच्या इतिहासाचे धागेदोरे सांपडण्याचा संभव आहे.

यांतील कांहीं अनुमानें जरी एकादेवेळीं चुकीचीं ठरलीं तरी गोमंतकाच्या बऱ्याचशा अज्ञात अशा सांस्कृतिक इतिहासाचा विशिष्ट दिशेनें अभ्यास करण्याची दृष्टी त्यामुळें प्राप्त होईल अशी आशा आहे व हाच या लेखाचा हेतु आहे.

गोमंतकाच्या संस्कृतीची सुरुवात आर्यांकडून झाली व तिचा जनक परशुराम ऋषी असावा, अशी आजपर्यंतची प्रचलित समजूत आहे. नुसत्या गोमंतकाबद्दलच नसून भृगुकच्छ (भरुकच्छ=भडोच) पासून कन्याकुमारीपर्यंतच्या प्रदेशाबद्दल आहे. गोमंतकाच्या बाबतींत या कल्पनेला आधार सह्याद्रिखंड नांवाच्या एका संस्कृत ग्रंथाचा आहे. परंतु ही गोष्ट खरी मानली तर आर्यांच्या येथील आगमनाचा काल सनपूर्व अडीच हजार वर्षें इतका मागें जातो. इतक्या पूर्वकालीं या भागांत आर्यांची वसती झाली याबद्दलचा ऐतिहासिक पुरावा अद्याप कोणालाहि दाखवितां आलेला नाहीं. महाराष्ट्रांतील एका लेखकानेंहि "परशुराम व कोंकण यांचा एकमेव जो संबंध दाखवतात तो तितकासा खरा नाहीं"[१] असेंच मत दिलें आहे. याबद्दलचें दुसरें मत Filipe Nery Xavier या गोमंतकीय लेखकाचें. तो म्हणतो, "असें दिसतें कीं, गोमंतकाची वसाहत ही कुणबी लोकांकडून जुन्या काळीं झाली. यानंतर शूद्रवर्गीय लोक आले. त्यानंतर बराच कालावधि गेल्यावर क्षत्रिय व ब्राम्हण आले व नंतर त्यांचेंच प्रभुत्व येथें झालें."[२]

---

१. कोंकणची संस्कृति. कै. चिं. ग. कर्वे. चित्रमय जगत्. जून १९५४.

२. "Supõe-se que a população de Goa teve por base os Curumbins, habitantes mais antigos, seguindo uma massa de Sudras. Em épocas muito posteriores vieram e tornaram-se predominantes os Maratas e Brâmanes." – Bosquejo Historico das Comunidades – F. N. Xavier आवृत्ति २ री. पृ. ७८.

"हे कुणबी लोक शेती करणारे, रंगानें काळे, अंगावर केस नसलेले तसेंच दाढी नसलेले लोक होते."[१]

आपल्याकडे कुणबी व गावडा असे शब्द बहुजनसमाजांतील या वर्गाकरतां वापरतात. गावडा हा शब्द गांवांत वस्ती करून रहाणारा या अर्थानें आलेला दिसतो. गौड (बंगाल व उत्तरप्रदेश) या देशनामावरून आलेला नाहीं. कै. चिं. ग. कर्वे यांनींहि कोंकणचे वसाहतकार मराठे व कुणबी असल्याचें आपलें मत 'कोंकणची संस्कृति' या लेखांत व्यक्त केलें आहे. (चित्रमय जगत्, जून १९५४.)

आजच्या इतिहासज्ञांचें नवीन संशोधनावरून असें मत झालें आहे कीं, हिंदुस्थानांत ज्या जातींची वस्ती आहे, त्यांतील कोणतीहि जात खुद्द हिंदुस्थानांतील नसून येथील मूळ मुख्य जाती आपापल्या विभिन्न भाषा आणि पृथक् संस्कृति घेऊन निरनिराळ्या काळीं येथें एकामागून एक आल्या असाव्या व त्यांतील कांहीं जातींचें आपापसांत मिश्रण होऊन त्यापासून कांहीं नवीन जाती निपजल्या असाव्या. (या मूळ जातींची विस्तृत माहिती पहिल्या लेखांत दिली आहे.)

बंगाली भाषेंत अलीकडे एक विद्वन्मान्य इतिहासग्रंथ प्रसिद्ध झाला असून त्याचे लेखक कलकत्ता विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. निहाररंजन राय हे आहेत. या ग्रंथाला डॉ. यदुनाथ सरकार यांनीं 'परिचयपत्र' या नांवानें छोटी प्रस्तावना लिहिली आहे. ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे. लेखक म्हणतात, "भारतवर्ष कृषिप्रधान देश. शेतीपिकें हीच आमची उत्पादन करावयाची मुख्य संपत्ति. १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत या देशांतील संस्कृतीला कृषि संस्कृति असें नांव दिल्यास फारसा अन्याय होईल असें वाटत नाहीं. पावसाचें आधिक्य असलेल्या बंगालच्या सपाट भूमींत उत्तर भारतांतील अन्य प्रदेशांपेक्षां कृषीचें एक समृद्ध असें रूप पहावयास मिळतें. ही शेती ऑस्ट्रिक भाषिक आदिम ऑस्ट्रेलियन लोकांनींच बंगालमध्यें प्रचलित केली असें अनुमान करण्यास कारण आहे. पिशुलॅस्की यांनीं असें सिद्ध केलें आहे कीं, लांगल (नांगर) हा शब्द ऑस्ट्रिक भाषिक लोकांचा आहे..... आनामी भाषेंत लांगल या शब्दाचा मूळ अर्थ 'शेती करण्याचें यंत्र' असा आहे. फार प्राचीन काळीं हा शब्द आर्य भाषेंत आला. यावरून असें दिसतें कीं, आर्यभाषी लोकांना शेतकीची माहिती नव्हती. या गोष्टी त्यांनीं ऑस्ट्रिक लोकांकडून घेतल्या. ऑस्ट्रिक लोक टोकदार काष्ठदंडानें शेती करून जीं पिकें काढीत त्यांत भात (तांदूळ) हें होतें. हेंच त्यांचें मुख्य अन्न होतें. हे लोक सपाट जमिनींत व डोंगराच्या उतरणीवरील खालच्या भागांतली जमीन सुधारून तिची पद्धतशीर मशागत करून शेती करीत. ऑस्ट्रिक लोकांची वस्ती ज्या ज्या ठिकाणीं झाली, त्या त्या ठिकाणीं भाताची निपज होऊं लागली. पाऊसपाण्याचें जास्त प्रमाण

---

१. Bosquejo Histórico das Comunidades. F. N. Xavier. पृ. ७८.

असलेल्या भूमींत हें पीक अधिक प्रमाणांत पिके. त्यामुळें आसाम, बंगाल, ओरिसा, दक्षिण भारत वगैरे समुद्राजवळच्या सपाट भूप्रदेशांत याचें उत्पादन जास्त होई. यानंतर द्रविडभाषिक लांब डोक्याच्या (बंगाली शब्द 'दीर्घमुंड') लोकांनीं भारतांत जव (सातू) व गहूं यांची निपज उत्तरपश्चिम सीमेपासून बिहारपर्यंत सुरू केली. या पिकांना तांदळाप्रमाणें भरपूर पावसाची गरज नव्हती. उत्तर भारतांत यांची जास्त निपज याच कारणामुळें होते. उत्तर भारतांतील लोक चपाती खाणारे कां व बंगाल, आसाम, ओरिसा व दक्षिण भारत येथील लोक तांदूळ खाणारे कां, याचें उत्तर यांत आहे."

"याशिवाय हे लोक केळीं, वांगीं, भोपळा, लिंबू, पान (खाण्याचें), नारळ, हळद, सुपारी, डाळिंब, जांब (सफेत फळ) वगैरेची निपज करीत. या सर्व जिनसांचीं नांवें मूळ ऑस्ट्रिक लोकांच्या भाषेंतील, तसेंच हे सगळे जिन्नस बंगालच्या खाद्यवस्तु. या सर्व जिनसांच्या मूळ नांवांचे संस्कृत प्राकृत अपभ्रंश व बंगाली रूपें याबद्दल जें संशोधन झालें आहे त्यांत इतिहासाचें इंगित स्पष्ट झालें आहे."

"कृषि ही जरी त्यांची मुख्य साधनसंपत्ति असली तरी त्यांना गोपालन माहीत होतें असें दिसत नाहीं. व आजहि या जातींत गाई बाळगण्याची पद्धत विशेष नाहीं."[1]

याच बहुतेक सर्व पिकांची निपज आपल्या गोमंतकांत होते. सारस्वत ब्राह्मणांनीं बंगालमधून येतांना हीं शेतीपिकें आणलीं असें म्हणावें तर मुळांतच हीं पिकें आर्येतर आहेत. अर्थात् बंगालप्रमाणें येथेंहि ही ऑस्ट्रिक जात अगर या जातीच्या मिश्रणापासून उत्पन्न झालेली दुसरी कोणती तरी आदिवासी म्हणविणारी जात भारताच्या इतर भागांतून कोठल्या तरी बाजूनें सर्वांआधीं आपल्या गोमंतकांत आली व त्यांनी या या वसाहतीचा मूळ पाया घातला असें अनुमान केल्यास चूक होणार नाहीं. हिंदुस्थानांत ही ऑस्ट्रिक जात आल्यानंतर तिचें इतर जातींशीं मिश्रण होऊन तिच्या अनेक शाखा झाल्या. कोल, मुंडा, संथाल वगैरे या शाखा असून या जातींची मुख्य वस्ती बंगाल व बिहारमध्यें आहे. गोमंतक व बंगाल यांचा संबंध अशा एखाद्या शाखेमुळें तर जोडला गेला नसेल? गोमंतकांत गावडे व कुणबी यांना बहुजनसमाजांतील मूळचे रहिवासी असें आम्ही समजतों. यांचा समावेश आज हिंदु व खिस्ती या दोन धर्मांत झाला आहे. या जातीपैकीं कोणाचा संबंध या ऑस्ट्रिक जातीशीं अगर त्याच्या कोणत्या शाखेशीं असेल याचें पद्धतशीर संशोधन झालें पाहिजे.[2]

---

१. बांगालीर इतिहास (बंगाली) डॉ. निहाररंजन राय. पृ. ६६.

२. ता. १५-२-१९६७ रोजीं गोमंतकांतील दैनिकांतून पुढील बातमी प्रसिद्ध झाली. "गोव्यांतील कांहीं जंगलांत दगडाचीं शस्त्रें सांपडलीं असून तीं इतिहासपूर्वकालीन मानण्यांत येतें. सर्वे ऑफ इंडियानें उत्खननासाठीं गोव्यांतील कांहीं जागा निवडल्या आहेत. प्राथमिक अवस्थेंतील मानवानें आपली वसाहत करण्यासाठीं समुद्रानजीक ज्या जागा निवडल्या त्यांत गोव्याचा समावेश असावा असें मानण्यांत येतें." ही बातमी माझ्या विधानांना पुष्टी देणारी आहे.

भारत सरकारच्या मानववंशशास्त्र विभागाचे माजी अध्यक्ष डॉ. बी. एन. गुहा यांची एक पुस्तिका[१] प्रसिद्ध झाली आहे. या पुस्तिकेंत भारतांतील प्रमुख जातींचे अगर वंशांचे तोंडवळे दिलेले आहेत. त्यांत ऑस्ट्रिक जातीचाहि तोंडवळा आहे. हा तोंडवळा खिश्चन गावड्यांत विशेषतः सासष्टींत दिसतो.

गोमंतकांतील एक वैशिष्ट्य म्हणजे ग्रामसंस्था होत. पोर्तुगीज इतिहासकार Barros हा म्हणतो कीं, 'इकडे कांही लोक घाटावरून येऊन वसाहत करून राहिले. ते शेती वगैरे करून रहात. पुढें एका राजपुत्रानें त्यांना जिंकल्यासारखें करून त्यांना कांहीं खंडणी देण्यास भाग पाडलें.' यावरून सहकारित्वानें शेती करण्याची पद्धत यांची ठरते. पोर्तुगालमध्यें रहात असलेले गोमंतकीय कायदेपंडित दोतोर कून्या गॉसाल्हिश हे असें मत व्यक्त करतात कीं, याचें श्रेय कुणबी लोकांना देणें ही मोठी चूक आहे.[२] परंतु आमच्या मतें याचें श्रेय आर्यपूर्व जातीकडेच जातें. डॉ. निहाररंजन राय यांच्या ग्रंथांत याची माहिती मिळते. ते म्हणतात, "मुंडा जातीमध्यें कित्येक गांवांचा एक संघ बनलेला दिसून येतो. श्री. शरत्कुमार राय यांनीं आम्हांला असें सांगितलें कीं, पंचायत प्रथा संभवतः भारतांत यांनींच सुरू केली. पंचायतीचे निकाल हे लोक धर्मनियम समजून पाळतात. आतांसुद्धां कोर्टांत साक्ष देण्याच्यापूर्वी मुंडा जातीचा साक्षीदार त्यांच्या जातीच्या चालीला अनुसरून पंचायतीचें नांव घेऊन अशी शपथ घेतो कीं, "शिर मोरे सिंग-सेंगा ओतेर पंच" म्हणजे 'आकाशांत सूर्यदेवता, पृथ्वीवर पंच.' यांच्या कांहीं जातींत अशा दंतकथा आहेत कीं, यांचीं कांहीं लहानमोठीं गणराज्यें होतीं.[३] या राजशक्तीचें प्रतीक म्हणून मुंडा, ओरांव इत्यादि जातींतील ग्रामसंघांकडे कांहीं पताका आहेत. त्या त्यांनीं फार जपून ठेवल्या आहेत.[४] यामुळें आर्येतर जातींत ही प्रथा होती असें ठरतें. डॉ. देवसहाय त्रिवेद यांच्या मतें "मुंड शब्दाचा अर्थ श्रेष्ठ असा असून गांवच्या मुख्याला मुंड असें म्हणतात. संस्कृतांत मुंड म्हणजे ज्याचें डोकें मुंडित झालें आहे तो. महाभारतामध्यें पश्चिमोत्तर प्रदेशांतील जातीला मुंड शब्द लावलेला आहे. आर्य लोक डोक्यावर शेंडी ठेवीत असत. व ती नसलेल्या जातींना आपल्याहून कनिष्ठ लेखीत असत."[५] गोमंतकांत मात्र मुंडकार शब्द जो प्रचलित आहे, तो कनिष्ठ दर्जा दाखविण्यासाठीं वापरला जातो. एखाद्या जमीनदाराच्या जमिनींत अगर बागायतींत स्वतःच्या अगर जमीनदारानें बांधून दिलेल्या घरांत राहणारा म्हणजे एक प्रकारें त्याचा तावेदार या अर्थी तो शब्द वापरला जातो.

---

१. Racial Elements in the Population.
२. Direito Hindu e Maometano. Dr. Luis Cunha Gonsalves. पृ. ६८.
३. बांगालीर इतिहास. डॉ. निहाररंजन राय.
४. बांगालीर इतिहास. डॉ. निहाररंजन राय. पृ. ६८.
५. प्राङ्मौर्य बिहार. डॉ. देवसहाय त्रिवेद.

गोमंतकांतील मागील काळचें वाहन माचील हें होय. याचे वाहक कुणबी असतात. या वाहकांना कांहीं अभ्यास असावा लागतो. त्यांपैकीं प्रमुख असेल तो पुढें राहून मार्गदर्शन करतो. मेणा (माचील) घेऊन जातांना तो 'डावो; उजवो; उदक; फातर; सावकाश; वेगीन' अशा सूचक कोंकणी शब्दांनीं मार्गदर्शन करतो. संथाळ जातीमध्यें याच पद्धतीचें पालखी वाहन असून सुप्रसिद्ध समाजसेवक फादर एल्विन यांनी 'मार्च ऑफ इंडिया' मासिकाच्या नोव्हेंबर–डिसेंबर १९५३ च्या अंकांत त्याचें चित्र दिलें आहे.

आमच्या आर्यांचें वाहन रथ होतें व सारथ्याला समाजांत मानाचें स्थान असे.

ऑस्ट्रिक जातींत गणनेची कमाल संख्या वीस होती. गोमंतकांतील बहुजन-समाजाच्या जातींत साठ अगर ऐशीं म्हणावयाचें झाल्यास तीन अगर चार विसा असें म्हणत. या अनेक कारणांवरून या गटांतील कोणत्यातरी शाखेचें आगमन गोमंतकांत होऊन तिनें येथील संस्कृतीचा पाया घातला, असें अनुमान करण्यास बरीच जागा आहे. हें आगमन कोणत्या मार्गानें झालें हा प्रश्न महत्त्वाचा नाहीं.

डॉ. इरावती कर्वे म्हणतात, "दुसरा मार्ग छत्तिसगडच्या पठारावरून वैनगंगा व वर्धा यांच्या दोआबांत पोंचतो. मगध (बिहार), वंग (बंगाल) व कलिंग (ओरिसा) या तिन्ही देशांतून ह्या मार्गें महाराष्ट्रांत शिरतां येतें किंवा पूर्व महाराष्ट्रांतून उत्तरेकडे जातां येतें. ह्याच मार्गानें संताळ, मुंड अथवा हो, कोरकु वगैरे मॉनख्मेर गटांतील भाषा बोलणारे लोक हिंदुस्थानांतच नव्हे तर महाराष्ट्रांत येऊन राहिले आहेत.[1]"

अर्थात् या प्रदेशाची त्यांना माहिती होतीच. महाराष्ट्रापूर्वी त्यांची गोमंतकांत वस्ती झाली असावी. कारण समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेश सर्व बाजूंनीं जास्त सोइस्कर असतो. कोंकणांत आर्यांपूर्वी वस्ती झाली होती व ती समुद्रमार्गानें झाली असावी, हेंच मत जास्त सयुक्तिक वाटतें.[2] डॉ. श्री. व्यं. केतकर यांचेंहि मत असेंच आहे.[3]

गोमंतकाच्या संस्कृतीच्या उभारणींत नाग जातीचाहि भाग आहे. ही जात सर्प-पूजक असावी. सर्पपूजेचीं चिन्हें गोमंतकांत पुष्कळच ठिकाणीं मुबलक अशीं आढळतात. ह्या जातीचा संबंध ऑस्ट्रिक जातीशीं आहे कीं द्रविड जातीशीं, याबद्दल मतभेद आहे. मुंडा जातींतील एक शाखा आपणास नागवंशीय म्हणविते. हस्तिनापुराला एक नांव नागाव्हय होतें. गोमंतकांत नागवें गांव आहे. सह्याद्रिखंडांत त्याला नागाव्हय

---

१. मराठी लोकांची संस्कृति. डॉ. इरावती कर्वे. पृ. ५५.

२. गोमंतकांतील जंगलांत हल्लींच जीं हाडें मिळालीं, त्यावरून समुद्रानजीक आर्यां-पूर्वी वस्ती झाली असावी, असें जें अनुमान आम्ही १२ वर्षांपूर्वी काढलें होतें, त्याला पुष्टी मिळत आहे.

३. विद्यासेवक, वर्ष ५, अंक ४.

असें संस्कृत नांव दिलें आहे.[१] गोमंतकांतील कित्येक झऱ्यांना नागझरी असें नांव आहे.[२] बऱ्याच लिंगदेवतांच्या देवस्थानांत नागाच्या पाषाणी प्रतिमा आढळतात.

"ज्यांचा नाग म्हणून पुराणांत उल्लेख आहे ते लोक पूर्वेकडून आले होते कीं काय अशी शंका वाटते. दक्षिणेकडील दाक्षिणात्य, विशेषतः पूर्व किनाऱ्यावरील दाक्षिणात्य पूर्व समुद्राच्या मार्गानें जावा, सुमात्रा, बोर्निओ प्रांतांत गेल्याचे थोडे थोडे उल्लेख सांपडतात. पण बाहेरून आंत आलेल्या लोकांचे उल्लेख मुळींच आढळत नाहींत. आपल्या संस्कृतीचा इतिहास या संशोधनाच्या अभावीं अपुरा व कोता राहिला आहे,[३]" असें डॉ. इरावती कर्वे म्हणतात.

गोमंतकाच्या संस्कृतींत यानंतरची भर गोप जातीकडून पडली असावी. गोमंतक हें नांव गो-वाचक आहे. गुरांनीं भरलेला प्रदेश या अर्थानें हें नांव पडलें असावें. 'गोमन्ता' हा शब्द भीष्मपर्वाच्या ९ व्या अध्यायाच्या ४२ व्या श्लोकांत आहे.[४] महाभारताचें चालू संस्करण सनपूर्व अडीचशें वर्षें या सुमारास झालें असें कै. चिंतामणराव वैद्य यांचें मत असून तें शकपूर्व पांचशें वर्षें या कालांत झाल्याचें लोकमान्य टिळकांचें मत आहे. या कालांत या प्रदेशाची माहिती लोकांना होती असें म्हणतां येतें. हरिवंशांतहि या नांवाचा उल्लेख आहे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्रीकृष्ण व जरासंध यांचें युद्ध ही होय. याची माहिती हरिवंशांत दिलेली आहे.[५] हें युद्ध कुवेशी घाटाच्या पायथ्याशीं सोनावळी, शिरगाळी आणि कुळें या गांवांच्या आजूबाजूला झालें असावें.[६]

हिंदुस्थानांत आभीर नांवाची जात जुन्या काळच्या इतिहासांत इसवी सनाच्या अंदाजें पहिल्या-दुसऱ्या शतकांत आढळते. दक्षिणेंत येण्यापूर्वी उत्तर सिंध प्रदेशांत यांची वस्ती होती. पुढें ते जलमार्गानें सिंधमधून कोंकणांत उतरले असावे. हे परद्वीपस्थ असून पुढें ते हिंदुस्थानांतील चातुर्वर्ण्यांत सामील झाले असें कांहीं समाजशास्त्रज्ञांचें मत आहे. हे वृत्तीनें पशुपाल किंवा गवळी होते. श्रीकृष्णाचें बालरूप हें आभीरांचें उपास्य होय.[७] यादव हेच गोप किंवा आभीर असें एक मत आहे.[८] परंतु त्याला इतिहासज्ञांची मान्यता नाहीं.

---

१. सह्याद्रिखंड (संस्कृत) डॉ. जर्सन द कून्या प्रत. पृ. ५०६.

२. In Goa too springs are often known as Nagzaris. The Mother Goddess. S. K. Diksbit M. A. पृ. ४१.

३. मराठी लोकांची संस्कृति. डॉ. इरावती कर्वे. पृ. ५३-५४.

४. गोमन्ता मंदकाः सण्डा विदर्भा रूपवाहिकाः। संस्कृत महाभारत. चित्रशाळा प्रकाशन.

५. हरिवंश. चिपळूणकर मंडळी प्रकाशन. विष्णुपर्व अध्याय ४०-४१.

६. गोंयकारांची गोंयाभायली वसणूक. शणै वा. र. वर्दे वालावलीकार. पृ. ४.

७. भारतीय संस्कृति-कोश. खंड १ ला. 'आभीर' शब्द पहा.

८. खानदेश व खानदेशी भाषा. पां. मा. चांदोरकर. भा. इ. सं. मं. पत्रिका. व. ७.

यादव वंश हा यदुपासून झाला. याची वेगळी माहिती देण्याची गरज नाहीं. श्रीकृष्ण गोपांतच वाढले. त्यांचें नांवच गोपालकृष्ण पडलें. अर्जुनानें सुभद्रेचें हरण केल्यानंतर तिला गोपालकृष्णाच्या संबंधामुळें गोपालिकेचा वेष देऊन द्रौपदीकडे पाठविलें. यदु यादव यांबद्दल यदु हे गोपालक असून ही जात आर्येतर असण्याचा संभव आहे, असें एक मत आहे.'

गोमंतकांतील खिस्ती लोकांत चारडे अगर चाड्डी असें नांव असणारा एक वर्ग आहे. तो आपणास क्षत्रिय मराठे असें समजतो. हा खिस्ती वर्ग पोर्तुगिजांनीं जिथें जुन्या काळीं बाटवाबाटवी चालविली होती, त्या जुन्या काबिजादींतच म्हणजे सासष्टी, मुरगांव, तिसवाडी व बार्देश येथेंच दिसतो. आपले जुने इतिहासज्ञ खि. फिलीप नेरि शाव्हियेर आपल्या Bosquejo Histórico das Comunidades या ग्रंथांत गांवकर Chardós असें नांव देतात. हिंदु लोकांतील क्षत्रिय मराठ्यांत हें नांव लावलेलें आज तरी दिसत नाहीं. पण जुन्या काळीं तें होतें असे पुरावे मिळतात. सत्तरी येथील पयें गांवांतील देवळांत सांतेरी, माउली, म्हाळसा या देवतांबरोबर एक कलश पुजतात. त्याला चाड्डो असें म्हणतात. सत्तरीचे पिसुर्ले गांवचे गांवकर आपण चाड्डे वंशाचे म्हणून गाऱ्हाणें घालतात.[२] परंतु या वर्गाचा हिंदु समाज आपणास क्षत्रिय मराठे असेंच म्हणवितो. चारडे हें नांव मराठ्यांना लावलेलें फक्त गोमंतकाच्या बाजूलाच आढळतें. चारडे या शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल एकमत नाहीं. कै. शणै गोंयबाब हे 'चतुरथी' यावरून हा शब्द आला असें म्हणतात. तर डॉ. पिसुर्लेकर यांच्या मतें तो शब्द 'चारभट' म्हणजे लढवय्या शिपाई हा आहे. फि. ने. शाव्हियेर यांच्या वर उल्लेखिलेल्या Bosquejo या ग्रंथांत या शब्दाबद्दल एक टीप दिली आहे. तींत चार म्हणजे गवत यावरून कदाचित् हा शब्द आला असावा असें मत दिलें आहे.[३] आमच्या मतें ही व्याख्या विचार करण्यासारखी नाहीं असें नाहीं.

गोमंतकाला गोमंतक हें नांव गोपजातीवरून मिळालें असावें. एक गोमंतकीय इतिहासज्ञ म्हणतो, "गोवा हा शब्द परशुराम क्षेत्राच्या सात विभागांपैकीं एक असें जें दक्षिण कोंकण त्याच्या गोवराष्ट्र या प्राचीन नांवावरून आला असावा. प्रो. विल्सन

---

१. मऱ्हाटी संस्कृति. शं. बा. जोशी. पृ. ५७-५८.

२. येवकार अध्यक्षांलें उलोवप. शणै गोंयबाब. पृ. १३५.

मांडवी मासिक - फेब्रुवारी १९६७ चा अंक. डॉ. पिसुर्लेकर यांचा 'गोवेंकर कॅथोलिकांतील जातिभेद' हा लेख. यांत याबद्दलची आणखी माहिती मिळेल.

३ E' possivel que de *char*, pasto, derive esta palavra significando pastor. (B. H. C. आ. २ री. पृ. ८१.)

यांच्या मतें हें गोवराष्ट्र म्हणजेच गोपालांचा अर्थात भटक्या जमातींचा प्रदेश असलेलें गोपराष्ट्र असावें." [४]

आपल्या गोमंतकांत माशेल येथें देवकीकृष्णाचें देऊळ आहे व त्यांतील दैवताला देवकीकृष्ण हेंच नांव आहे. सर्व हिंदुस्थानांत हें नांव असलेलें देऊळ हेंच एकुलतें एक आहे. या देवळांतील मूर्ती पाषाणाची असून देवकीच्या कडेवर लहान कृष्णाची मूर्ती आहे. देवकीकृष्ण हें नांव मातृसत्ताप्रधान आहे हें सांगण्याची जरुरी नाहीं. यादवांतील ही अशा नांवांची रूढी मातृप्रधान कुटुंबाचा अवशेष दिसते.

गोमंतकांत आदिवासी म्हणविणाऱ्या जातींनंतर आर्यांतील मराठ्यांची वसती झाली. कदाचित् यांच्याबरोबर आणखी कांहीं जाती आल्या असण्याचा संभव आहे. यानंतर सारस्वत ब्राह्मणांचें आगमन झालें असावें. या सर्वांचा भाग कमीअधिक प्रमाणांत येथील संस्कृतीच्या उभारणींत आहे. सोळाव्या शतकांत पोर्तुगिजांचा प्रवेश झाला. त्यांनीं बरीचशी प्रजा बळजबरीनें ख्रिस्तीधर्मीय बनविली व तिला पाश्चात्य संस्कृतींत ओढलें. या बाबतींत त्यांना संपूर्ण यश मिळालें नाहीं. तथापि त्या संस्कृतीचा धर्मांतरितांवर पडलेला प्रभाव नाकारतां येणार नाहीं. या लेखाची विषयमर्यादा जुन्या सांस्कृतिक घडामोडींच्या विवेचनापुरतीच असल्यानें येथेंच थांबणें भाग आहे.

(दीपावली वार्षिक १९५४ मधील लेख — थोडीफार सुधारणा करून.)

---

४. An Historical and Archaeological Sketch of the City of Goa. José Nicolau de Fonseca. पृ. १४४.

३
गोमंतकाची ऐतिहासिक परंपरा

महाराष्ट्र हें अनेक राष्ट्रांचें एक राष्ट्र असून विदर्भ, अश्मक व अपरान्त हीं तीन त्यांतील प्रमुख अशीं घटक राष्ट्रें होत.[१] यांतील अश्मक हा औरंगाबाद जिल्हा म्हणतां येईल.[२] प्राचीन काळीं निश्चित सीमा कोणत्याहि विभागाच्या नव्हत्या.[३] वेळीं हे विभाग बदलत असत. कोंकण हें दोन भागांत विभागलें जाई. दमणगंगेपासून कुंडलिका नदीपर्यंत १४०० गांवांचें उत्तर कोंकण व त्याच्या अलीकडील गंगावलीपर्यंतचें ९०० गांवांचें दक्षिण कोंकण[४] असें मानलें जात होतें.

कोंकणच्या भागांत मानवाची वस्ती केव्हां सुरू झाली याबद्दलचें उत्खनन अद्यापपर्यंत झालेलें नाहीं. "गेल्या दहा वर्षांच्या संशोधनानें महाराष्ट्रांतील बऱ्याच नद्यांच्या कांठीं प्राचीन अश्मयुगांत मानवाची वसती होती हें सिद्ध झालें आहे. या मानवाचीं हत्यारें बनावटीच्या तंत्राच्या दृष्टीनें कर्नाटक आणि नर्मदाकांठच्या समकालीन मानवाच्या हत्यारांशीं जुळतीं आहेत.[५] महाभारतांतील भीष्मपर्व अ. ९ मध्यें 'गोमंत'प्रमाणें गोपराष्ट्र नांव आहे. हें गोपराष्ट्र म्हणजेच गोवें व त्याच्या आसपासचा मुलूख असावा.[६]

यादव गोमंतकापर्यंत पोंचले होते.[७] पुण्याचे कै. स. आ. जोगळेकर यांचेंहि मत "ययातीनें यदूला राज्यभ्रष्ट केल्यामुळें यदूच्या कृष्णादि वंशजांना गवळी म्हणत. कारण यादवजन गोपालन करीत. यादवजन यमुनेच्या परिसरांत मथुरेपासून प्रयागपर्यंत स्थिरावले आणि कृष्णाच्या नेतृत्वाखालीं सौराष्ट्रांत व गोमंत पर्वताच्या परिसरांत..."[८] असें आहे.

गोमंतकाच्या शेजारच्या प्रदेशांतहि महाभारतकालीं पांडवांचें आगमन झाल्याचा उल्लेख मिळतो. पांडव आपल्या तीर्थयात्रेच्या १३ व्या वर्षी रत्नागिरी जिल्ह्याजवळच्या भूप्रदेशांत राहिले होते. कौरवपांडवांत कुरुक्षेत्रावर झालेल्या युद्धांत या प्रदेशाचा राजा विराटराय यानें पांडवांच्या बाजूनें त्यांत भाग घेतला होता. पुढें, विदूर येथें ज्या राजांची

---

१. महाराष्ट्र सारस्वत–पुरवणी. डॉ. शं. गो. पुळपुळे, एम्. ए. पीएच.डी. पृ. ८३४.
२. महाराष्ट्राचा प्रा. इतिहास व संस्कृति. प्रा. द. बा. डिसकळकर एम्. ए. पृ. १८.
३. तत्रैव. पृ. १७.
४. गोंयकारांची गोंयाभायली वसणूक. शणै वा. र. वर्दे वालावलीकार. पृ. २.
५. महाराष्ट्रांतील उत्खननें. डॉ. शा. भा. देव, एम्. ए. पीएच. डी. पृ. ८३.
६. प्राचीन महाराष्ट्र. डॉ. श्री. व्यं. केतकर. पृ. ३५.
७. तत्रैव पृ. ५.
८. गाथासप्तशती. स. आ. जोगळेकर बी. ए. एल् एल. बी. पृ. १६४.

राजधानी होती, त्यांच्या मोठ्या साम्राज्याच्या तीन विभागांपैकीं हा प्रदेश एक विभाग बनला. राजा भीमसेन हा या कुलांतील एक नामांकित राजा होऊन गेला. त्याची कन्या आणि माळव्याचा नलराजा यांच्या प्रेमाची कथा तर सुविख्यात आहे.[१]

आतां गोमंतकाच्या इतिहासाबद्दल लेखी पुरावे काय मिळतात तें पाहूं. कांहीं वर्षांपूर्वी शिरोडें (फोंडा) येथें एक ताम्रपट मिळाला. हा चौथ्या शतकांतील भोज वंशाचा राजा देवराज याचा असून तो संस्कृत ब्राम्ही दाक्षिणात्य लिपींतील आहे. हा चांदर येथून दिला असून भारद्वाज गोत्री गोविंदस्वामी आणि इंद्रस्वामी यांस टाणीयार्क कोट्टिकाय (कुठाळ ठाणें) येथील कांहीं जमीन दान दिल्याबद्दलचा तो लेख आहे. या ताम्रपटांत उल्लेखिलेला देवराज हा भोज राजवटींतील हें आतां नक्की ठरलें आहे. "पुराणाप्रमाणें भोज हे हैहय शाखेंतील यदु अगर यादव कुळाचे असून बहुतकरून मथुरेंतील होते. हैहय ह्यांनीं नर्मदेजवळ व भोज यांनीं विदर्भाजवळ वसती केली. अशोकाच्या आणि खारवेलच्या लेखांत ज्यांचें नांव आहे ते भोजकटहि बहुतकरून विदर्भांत स्थायिक झालेल्या भोजांहून वेगळे नसावे. यांतील एक शाखा कोंकणांतील गोव्यांत गेली असें दिसतें. कुंतलच्या चुटु सातकर्णींशीं संबंध असलेले म्हणून जे ओळखले जातात, ते महाभोज बहुतकरून गोवा प्रांतांतील भोज होत.[२]" हा ताम्रपट या राजानें आपल्या कारकिर्दीच्या बाराव्या वर्षी दिला.-

यानंतर या भोजवंशीय राजांचे आणखी दोन ताम्रपट बांदिवडें येथें सांपडले आहेत. पहिला भोज पृथ्वीमल्लवर्मन (काल सहाव्या शतकाची अखेर किंवा ७ व्या शतकाची सुरुवात) याचा असून भागलपल्लिका खेड्यांतील वृषभिणीखेत ही जमीन अग्निवेश्य गोत्राच्या माधवार्य या ब्राह्मणाला दिल्याचा त्यांत उल्लेख आहे. याच राजाचा दुसरा एक ताम्रपट साधारणपणें वरील कालांतलाच उपलब्ध झाला असून पृथ्वी पर्वत किंवा आजचा पारोडें (सासष्टी) नजीकचा चंद्रेश्वर पर्वत येथून तें दानपत्र दिलें आहे. भारद्वाज किंवा अग्निवेश्य गोत्राच्या दामार्य नांवाच्या ब्राह्मणाला मालार खेड्यांतलें कापोती खाजन नांवाचें शेत दान दिल्याची त्यांत नोंद आहे.[३]

---

१. Ratnagiri District Gazetteer. २ री आवृत्ती, १९६२. पृ. ९८.

२. A section of these Bhojas appears to have migrated to the Goa Region of Konkan. The Mahabhojas who are known to have been associated with the Chutu Saatkarnis of Kuntala were very probably the same as the Bhojas of the Goa Region. The Classical Age. पृ. १९१. The History and Culture of the Indian People. पृ. १९१.

३ Ancient Records of Goa. Dr. V. T Gune. New Era, Vol. II No. 8.

आणखी एका भोज राजाच्या ताम्रपटाची माहिती गोव्याशेजारच्या भागांत मिळालेली आहे. त्याबद्दल कै. प्रा. द. बा. डिकसळकर आपल्या लेखांत असें लिहितात कीं, "बुद्धधर्माचा प्रसार इसवी सनाच्या सहाव्या शतकांत गोव्यांत व त्यापलीकडे दक्षिणेंत झाला होता हें हिरेगुत्ती (उत्तर कानडा जिल्हा) येथें सांपडलेल्या ताम्रपटावरून सिद्ध होत आहे. या ताम्रपटांत गोव्याचा भोज राजा अशंकित यानें एका बौद्ध विहाराला दान दिल्याची नोंद आहे.[१] "

या हिरेगुत्ती ताम्रपटाची व भोज अशंकित राजाची माहिती कर्नाटकीय इतिहासज्ञ पांडुरंग देसाई यांनींहि दिली आहे. यांतील मुख्य विषय म्हणजे भोजवंशीय अशंकित नांवाच्या, राजानें एका बौद्ध विहाराच्या उपभोगार्थ सुंदरिका नांवाचा गांव दान दिला. याचा काल सहावें शतक होय.[२]

याशिवाय या भोज राजवंशांतील अंदाजें याच कालखंडांतील आणखी एक राजा कपालीवर्मन याचा ताम्रपट सांपडल्याचें डॉ. पिसुर्लेकर यांनीं आपल्या एका लेखांत सांगितलें आहे. हा ताम्रपट म्हणजे शिवपुर विषय (आजचें शिरोडें) येथील स्थानिक अधिकाऱ्यांना राजाज्ञेवरून लिहिलेलें एक पत्र होय. एका कौंडिण्यगोत्री ब्राह्मणाला एक जमीन दान दिल्याची त्यांत नोंद आहे.[३]

याप्रमाणें भोज राजांची सत्ता गोमंतकांत चौथ्या शतकापूर्वी होती. ही राजवट चांदरहून चालत होती. यांत अंशातिवर्मन या राजाचें आणखी एक नांव मिळतें.[४]

गोव्यांत बुद्धधर्माचा प्रवेश झाला होता. खि. फादर हेरास यांना कोळवाळ (बार्देश) येथें एक बुद्धमूर्ति मागें मिळाली आहे. ती अंदाजें तिसऱ्या शतकांतील असावी.[५] याच कालांतील मार्य [मौर्य?] या राजवटीचे आणखी दोन ताम्रपट अनुक्रमें शिरोडें व बांदोडें [फोंडा] येथें सांपडले आहेत. यांचा काल अनुक्रमें पांचवें-सहावें व सहावेंसातवें शतक असून यांची लिपी वरीलप्रमाणेंच संस्कृत ब्राह्मी आहे. यांतील पहिला ताम्रपट चंद्रवर्मन राजाचा असून शिवपुर शिरोडें येथील एका महाविहाराला जमीन दिल्याचें तें दानपत्र आहे. हा ताम्रपट डॉ. दिनेशचंद्र सरकार यांनीं भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टि. सिल्व्हर ज्युबिली व्हॉल्यूम १९४२ मध्यें प्रसिद्ध केला आहे. दुसरा ताम्रपट मार्य अनिर्जितवर्मन याचा असून कुमारद्वीप (कुंभारजुवें) येथून दिलेल्या दानाचा त्यांत उल्लेख आहे. तेथें एक राष्ट्रकूट रहात होता. त्याचें एक शेत, घर व बाग होती. तो निघून गेल्यावर त्या जागेचें दान हस्तार्य नांवाच्या सामवेदी

---

१. 2500 Years of Buddhism. D. B. Diksalkar. p. ३३५.
२ साधना, बुद्ध विशेषांक, सन १९५६.
३. O Heraldo. डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर. १९५७.
४. गो. सां. प. ऐ. उपपत्ति. डॉ. वि. त्र्यं. गुणे.
५. Ancient Shrines of Goa. Dr. V. T. Gune. p. १.

ब्राह्मणास दिल्याचें त्या ताम्रपटावरून समजतें.[1] या राजांचा संबंध भोजांशीं आहे कीं काय, हें निश्चित सांगतां येत नाहीं, असें डॉ. सरकार यांचें मत आहे.[2]

यावरून इसवी सनाच्या चौथ्या शतकापासून कांहीं शतकें भोज तसेंच मार्य (मौर्य?) या राजवटींचें राज्य गोव्यावर होतें असें दिसतें. यांतील भोज हे कोण याबद्दल मिळणारी माहिती पाहूं.

'सात्वत' नामक मानव समाजांतील राजे भोजत्व प्राप्त होण्यासाठीं आपल्यापैकीं श्रेष्ठ अशा एका राजाला अभिषेक करीत असतात व अशा प्रकारच्या अभिषिक्त चक्रवर्तीला 'भोज' पदवी लावण्यांत येत असते असें ऐतरेय ब्राह्मणांत सांगितलें आहे.[3] "कुरु पांचालाच्या दक्षिणेस जो मथुरा प्रांत आहे तो या सात्वत लोकांच्या भोज नांवाच्या राजाचा देश होय. हे भोज लोक दक्षिणापथांतील विदर्भ देशांत वसाहत करून राहिले. म्हणजे विदर्भीतील भोज लोक मथुरावृंदावनाकडील उत्तर हिंदुस्थानांतील लोक होत.[4]"

डॉ. केतकर यांनीं आपल्या 'प्राचीन महाराष्ट्र' या ग्रंथांत या भोजांबद्दल बरीच माहिती दिली आहे. ते म्हणतात :–

"ऐतरेय ब्राह्मणांतील वाक्याच्या कालाच्या अगोदरचा उल्लेख ऋग्वेदाच्या तिसऱ्या मंडलांतील होय.[5] तो उल्लेख भोजांचें स्थान पंजाब आहे असें दाखवितो."

"या भोजांचा दक्षिणेंत येण्याचा मार्ग पुढीलप्रमाणें दिसतो. भोज हे पंजाबांतून राजपुतान्यांत, नंतर माळवा आणि गुजरात आणि त्यानंतर महाराष्ट्र आणि विदर्भ या प्रदेशांत आले असा त्यांचा प्रसारक्रम असावा."

"महाभोज आणि कुंतिभोज हीं घराणीं महाभारतकालीं होतीं. यांनींच कृष्णाच्या वृष्णिकुलास द्वारकेपर्यंत हटविलें."

"भोजकट हें गांव रुक्मीनें वसविलें होतें. भोज वऱ्हाडाकडे त्याप्रमाणें द्वारकेकडेदेखील होते."

"भोजपुर या नांवाचीं गांवें अनेक आहेत. (१) वेळगांव जिल्ह्यांतील भोजपुर, (२) नाशिक जिल्ह्यांतील भोजपुर, (३) मध्य हिंदुस्थानांतील भोजपुर. तिन्ही ठिकाणीं कांहींतरी अवशेष सांपडतात."

---

१ Ancient Records of Goa. Dr. V. T. Gune.
२. The Classical Age पृ. १९१.
३. ऐतरेय ब्राह्मण. अष्टम पञ्चिका. द्वितीय अध्याय
४. राधामाधवविलास चंपू. वि. का. राजवाडे. पृ. १६६.
५. इमे भोजाः अंगिरसो विरूपाः दिवस्पुत्रासो असुरस्यः वीराः। ऋग्वेद, ३।५३।७.

"ज्यावेळेस 'गोपाळ'कृष्ण द्वारका आणि शूरसेन येथें सत्ता गाजवीत होता, तेव्हां तेथील जाती मुख्यत्वेंकरून खालील असाव्यात. (१) वृष्णी, (२) अंधक, (३) भोज, (४) आभीर, (५) शूर. या सर्व जातींपैकीं आज एकाचा पगडा, तर उद्यां दुसऱ्याचा, आज एका जातीचें नांव प्रदेशास लागलें तर उद्यां दुसऱ्याचें असें होत होत मथुरेस शूरसेन, काठेवाडास शूरराष्ट्र अशीं नांवें पडलीं असावींत.[१]"

यानंतर डॉ. केतकर यांनीं यांची संस्कृति मत्स्योपजीवी होती व त्यांचें भ्रमण नदीकांठानें होई, तसेंच ते नदीकांठाजवळच्या प्रदेशांत शेतकीहि करीत वगैरे माहिती याच लेखांत दिली आहे.

मराठ्यांत मामाच्या मुलीशीं लग्न करण्याची चाल आहे, ती यादवांत होती. अर्जुन व सुभद्रा यांचा विवाह हें याचें उदाहरण होय. गोमंतकांत सारस्वत ब्राह्मणांत ही चाल सर्रास आहे. "मातुलकन्यापरिणयाची चाल उत्तरेंत नाहीं. बौद्धायनाखेरीज सर्व धर्मशास्त्रकारांनीं तिचा निषेध केला आहे. ही चाल कर्नाटक व तेलंगण प्रांतांत आहे. तेव्हां दुष्काळानंतर शेजारच्या प्रांतांतील लोक महाराष्ट्रांत स्थायिक झाले असतील आणि त्यांच्या संपर्कानें ही चाल ऋग्वेदी देशस्थ आणि कृष्ण यजुर्वेदी व इतर कांहीं शाखांत शिरली असावी. अपरार्क आणि हेमाद्रीसारख्या धर्मशास्त्रकारांनीं या चालीचा निषेध केला आहे. त्यामुळें शुक्ल यजुर्वेदी, माध्यंदिन आणि चित्तपावन या दोन पोट-जातींनीं या चालीचा स्वीकार केला नाहीं.[२]" सारस्वतांतील या चालीचें अनुकरण भोज जातीच्या संपर्कामुळें तर झालें नसेल ना?

याप्रमाणें भोजांची माहिती मिळते. महाभारताच्या भीष्मपर्वांत अ. ९ मध्यें 'गोमन्ता मन्दकाः सण्डा विदर्भा रूपवाहिकाः' असा श्लोक आहे. त्यांत 'गोमंत' जवळ विदर्भ हा शब्द आला आहे. डॉ. भांडारकर यांनीं आपल्या दक्षिणच्या इतिहासांत महाराष्ट्रांतील भोज व राष्ट्रिक यांचा उल्लेख केलाच आहे. गोव्यांतील अनिर्जितवर्मन यांच्या लेखांत एका राष्ट्रकूटाचा उल्लेख आहे. याप्रमाणें महाराष्ट्र व गोमंतक यांचा संबंध पूर्वापार दिसून येत आहे.

भोजांपूर्वी इकडे कोण होते याबद्दलचे लेख अद्याप उजेडांत आलेले नाहींत. गोमंतकांत पांचव्या शतकांतील एक सूर्याची मूर्ति मिळालेली आहे. "कदाचित् हे परकीय राजे सूर्योपासक पारसिक अगर मग असतील.[३]" सातवाहन राजांनीं पारसिकांना कोंकणांतून घालवून दिल्याची माहिती आहे. ह्याबद्दलचा इतिहास अुजेडांत येणें जरूर आहे.

---

१. प्राचीन महाराष्ट्र. प्रकरण ४१.
२. यादवकालीन महाराष्ट्र. प्रा. र. म. भुसारी. (नवभारत, बांई. जून १९५७.)
३. गो. सां. प. ऐ. उपपत्ति. डॉ. वि. च्यं. गुणे.

भोजांबद्दल राजवाडे लिहितात, "भोज या संस्कृत शब्दाला ल प्रत्यय लागून मराठी भोजले – भोसले हा शब्द झाला.[१] ... मथुरावृंदावन प्रांतांतील भोज ज्या सत्वत लोकांचे राजे त्या सत्वत लोकांपासून सत्वत्पुत्रांची ऊर्फ सतियपुतांची उत्पत्ति झाली. या सतियपुतांची वसती सावंतवाडी म्हणजे सत्वद्राटिका प्रांतांत होती.[२]"

गोमंतकांतील खिश्चनांत बायकांना आरे या शब्दानें संबोधतात. वि. रा. शिंदे सांगतात कीं, "दक्षिण देशांत मराठ्यांना आरे आणि बर्गे अशीं दोन जातिवाचक नांवें आहेत.[३]"

भोजांची संस्कृति मत्स्योपजीवी होती, त्यांची वसती नदीकांठानें होई व ते शेतकीहि करीत असें डॉ. केतकर यांचें मत वर दिलेंच आहे. गोमंतकांत सर्वांत आधीं आर्यांची, त्यांतहि मराठ्यांची वसाहत सासष्टी तालुक्यांत झाली असावी. कारण जुन्या काळांत तोच भाग भरभराटींत होता. देवळांची संख्याहि त्याच भागांत जास्त होती. या तालुक्यांतील बेतूलखाडीपासून मुरगांवपर्यंतच्या समुद्रकांठचीं एकूण एक गांवें चारडी ऊर्फ क्षत्रिय या जातीच्या बहुसंख्य वस्तीचीं आहेत.[४] ग्रामसंस्थांतील गांवकर [गांव वसविणारे] चारडी अशी नोंद आहे. इतर जातींच्या लोकांची येथें वस्ती होती, पण बहुसंख्य मराठे असावे. आजसुद्धां आपल्यांत हे चारड्यांचे गांव असें म्हणण्याची पद्धत आहे.

गोमंतकांतील चांदर राजधानी

उपलब्ध माहितीवरून इसवी सनाच्या चौथ्या शतकापासून चांदर येथें राजधानी असल्याचा पुरावा मिळतो. कदंब जयकेशी पहिला यानें अकराव्या शतकांत गोपकपट्टण (थोरलें गोवें, आगशी) येथें राजधानी नेईपर्यंत तरी निदान या गांवच्या या राजधानीचें स्थान टिकलें. म्हणजे निदान सातआठ शतकें तरी या गांवानें राजधानीचें वैभव मिरविलें. या गांवांत उत्खनन वगैरे होऊन याचा इतिहास अुजेडांत येणें जरूर आहे.

येथून जवळच चंद्रेश्वर देवालय पर्वतावर आहे. कदाचित् चंद्रपुर हें गांव व हें देवालय यांची निर्मिती एकाच राजवटीकडून झालेली असेल. भोज हे यदु जातींतील व चंद्रवंशी होते, याची या ठिकाणीं आठवण होते. या भोजवंशीयांचीं भ्रमणें विदर्भ व महाराष्ट्र येथेंहि झालेलीं होतीं. या दोन्ही ठिकाणीं चंद्रपुर गांव आहे. विदर्भांत

---

१. राधामाधवविलास चंपू. वि. का. राजवाडे. पृ. १६६.
२. तत्रैव. पृ. १६७.
३. शिंदे लेखसंग्रह. वि. रा. शिंदे. पृ. ७०.
४. किनाऱ्यावर वसाहत करण्याची पद्धत मराठ्यांत होती. पहा 'कोंकणी मराठी', लेख. शिंदे लेखसंग्रह. पृ. १३९.

आज चांदा नांवाचा जिल्हा आहे, त्याचें पूर्वीचें नांव चंद्रपुर असें आहे. नागपूरच्या इतिहासावरून चंद्रपुर जिल्हा म्हणजे अरण्याचा भाग असून गोंड राजा बल्लाळ शहा (काल मोंगलांचा) यानें या चंद्रपुर शहराची स्थापना केली, असें कळून येतें. याबद्दलची दंतकथा अशी कीं, या ठिकाणीं एका सशानें कुत्र्यावर हल्ला केल्याचें पाहून राजाला आश्चर्य वाटलें. या सशाच्या डोक्यावर चंद्रासारखा ठिपका होता. त्यामुळें हें नांव ठेवण्यांत आलें. परंतु या दंतकथेंत सत्य दिसत नाहीं. कारण वाकाटक राजा द्वितीय प्रवरसेन (काल सन ४१०–१५) याच्या दुदिया ताम्रपटांत चंद्रपुरचा उल्लेख आहे.[1] याशिवाय महाराष्ट्रांत नाशिक जिल्ह्यांत चंद्रादित्यपुर म्हणजेच चांदोर नांवाचें गांव आहे. नवव्या शतकाच्या पहिल्या अर्धांत चंद्रपुरच्या किल्ल्यावर दृढप्रहाराची राजधानी होती. हें चंद्रादित्यपुर म्हणजेच नाशिकचें चांदोर. दृढप्रहाराचा मुलगा सेऊणचंद्र यानें सेऊणपुर नांवाचें एक नवें शहर वसवून राजधानी चांदोर येथून तेथें हलविली.[2] Oxford School Atlas मध्यें याचें आजचें नांव Chandor असेंच दिलें आहे. अर्थात् या तिन्हींचा कांहीं संबंध नसेल ना, असें मनांत येतें.

गोमंतकाच्या ऐतिहासिक परंपरेचा मागोवा असा दिसतो. पोर्तुगीज अमदानींत या परंपरेचा शोध घेण्याचे कांहींच प्रयत्न झाले नाहींत. आतां भारतीय गोव्यांत या बाबतींत विशेष प्रयत्न होऊन या विषयावर अधिक प्रकाश पडेल यांत शंका नाहीं. आपल्या लोकांचें, विशेषतः तरुणांचें या विषयाकडे लक्ष लागावें, हीच इच्छा या लेखकाची आहे.

(अर्चना, मुंबई - फेब्रुवारी १९६४ च्या अंकांतील लेख – कांहीं सुधारणा करून)

---

१. वाकाटक नृपती व त्यांचा काल. डॉ. वा. वि. मिराशी. पृ. २५५.

२. यादवकालीन महाराष्ट्र. डॉ. मु. ग. पानसे. पृ. २५.
दक्षिणेचा प्रा. इतिहास. डॉ. रा. गो. भांडारकर. पृ. २०९.

४

बुद्धशिष्य पूर्ण (पुण्ण) गोमंतकीय ?

आपले कै. वा. र. वर्दे वालावलीकर ऊर्फ शणै गोंयबाब हे एक गोमंतकीय इतिहासज्ञ तसेंच विद्वान व अनेक दृष्टींनीं थोर गृहस्थ होते. त्यांनीं गोमंतकाच्या जुन्या इतिहासावर प्रकाश पाडण्याचा प्रयत्न केला आहे. हा आपला अभ्यास त्यांनीं "गोंयकारांची गोंयाभायली वसणूक" या पुस्तकांत सन १९२८ सालीं प्रसिद्ध केला. बुद्धशिष्य पूर्ण हा गोमंतकीय होता, राष्ट्रकूट सम्राट् ह्यांचें मूलस्थान गोमंतकांतील लोटली हें गांव होय, सीताबर्डी नागपूर येथील लेखांत उल्लेखिलेले श्रीधाडियदेव राणक ऊर्फ धाडिभडक तसेंच त्यांचे दंडनायक वासुदेव हे गोमंतकीय होते, असें आपल्या दृष्टीनें पुरावे सादर करून त्यांनी या पुस्तकांत प्रसिद्ध केलें होतें. हें पुस्तक कोंकणी बोलींत लिहिलें असल्यानें तें विद्वानांसमोर येणें शक्य नव्हतें. वस्तुतः अशीं नवीं मतें पूर्वी इंग्रजींतून प्रसिद्ध झाल्यास त्यांच्याकडे भारतीय विद्वानांचें लक्ष जातें व त्यावर साधकबाधक लिखाण प्रसिद्ध होतें. कारण हे प्रश्न भावनेचे नसतात तर ऐतिहासिक सत्याचे असतात.

त्यांचें वरील पुस्तकांतील एक महत्वाचें विधान म्हणजे बुद्धशिष्य पूर्ण हा गोमंतकीय असून त्यानें बांधलेला सुनापरांतांतील चंदनमंडल विहार हा चंद्रवाडींतील मुळें (आतांचें पारडें सासष्टी-जवळील पर्वताच्या पायथ्याशीं असलेलें मुळें खेडेगांव) येथील होय. हें विधान त्यांनीं सिंहली पुस्तकें अमावतुर व सद्धर्मरत्नकारे यांतील माहितीवरून केलेलें आहे. त्यांच्या मतें ह्या सिंहली पुस्तकांचा काळ इसवी सनाचें पहिलें अगर दुसरें शतक होय.[१] या पुस्तकांचें विस्तृत परीक्षण विद्वान प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी केलें[२] व कै. वर्दे वालावलीकर यांनीं पूर्णाबद्दलचे आधार ज्या सिंहली पुस्तकावरून घेतले तीं पुस्तकें कै. वर्दे वालावलीकर हे म्हणतात त्याप्रमाणें पहिल्या व दुसऱ्या शतकांतील नसून "ह्यांचा काल चौदाव्या शतकाच्या जवळपास असावा[३]" हें दाखवून दिलें. त्याचप्रमाणें या दोन्ही पुस्तकांबद्दल स्पेन्स हार्डी या ग्रंथकारानें जें आपलें मत दिलें आहे त्याचेहि उतारे प्रा. प्रियोळकर यांनी आपल्या दुसऱ्या लेखांकांत दिले आहेत. जिज्ञासूंनीं त्यांचे हे लेखांक अवश्य वाचावे.[४]

प्रा. प्रियोळकर यांच्या परीक्षणानंतर कै. वर्दे वालावलीकर यांच्या पूर्णाबद्दलच्या या विधानाकडे गोमंतकीयांनीं दुर्लक्षच केलेलें होतें. परंतु आपले आजचे गोवा हिस्टॉरिकल आर्काइव्हजचे डायरेक्टर माननीय डॉ. गुणे यांनीं गोवा सरकारमार्फत प्रसिद्ध

---

१. गोंयकारांची गोंयाभायली वसणूक. कै. वा. र. वर्दे वालावलीकर. पृ. ९–११.
२. विविधज्ञानविस्तार मासिक. वर्ष ६०, अंक ८ व ११.
३. ,, ,, ,, अंक ११, पृ. ४१२.
४. ,, ,, ,, ,, पृ. ४०७.

केलेल्या पुस्तकांत याबद्दलचा उल्लेख' करण्यांत आला असल्यामुळें त्याला मान्यता दिल्यासारखी होत आहे. त्यामुळें हा विषय पुन्हा चर्चेला घेणें भाग पडत आहे.

प्रथम कै. वर्दे वालावलीकर यांच्या 'वसणुकीं' तील माहितीकडे वळूं. ते म्हणतात, "सिंहली पुस्तकांत असें म्हटलें आहे कीं, पूर्ण आणि त्याचा भाऊ हे सुनापरांत येथील व्यापारी होते. त्यांच्या पांचशें गाड्या होत्या. पूर्ण व त्याचा धाकटा भाऊ हे आळीपाळीनें या गाड्यांत माल भरून नेत असत. एकदां पूर्ण अयोध्येच्या उत्तरेस कोसलांत श्रावस्ती येथें गेल्या वेळीं त्यानें जेतवन विहाराजवळ मुक्काम केला. त्यावेळीं गांवांतील लोक बुद्धाकरतां कांहीं भेटी घेऊन विहारांत जात असल्याचें त्यांना दिसून आलें. तें पाहून तेहि विहारांत गेले व तेथें बुद्धाचा उपदेश ऐकून त्यानें श्रमण म्हणजे संन्यासी होण्याचें ठरविलें. सुनापरांतांतील लोकांस बौद्धधर्म शिकविण्याचा त्याला इच्छा झाली व त्यानें बुद्धांना आपला मनोदय कळविला. सुनापरान्तातील लोकांचा स्वभावगुण बुद्धांना माहीत होता. त्यांनीं पूर्णाला म्हटलें कीं, तेथील लोक अतिशय क्रूर व चालरीत न पाळणारे आहेत. पण पूर्णानें दिलेल्या उत्तरांनीं त्यांना संतोष होऊन ते पूर्णाला म्हणाले, शाबास, तुझ्यांत जो इतका सोशिकपणा आहे, त्यामुळें श्रोणापरान्तांत राहण्यासच नव्हे तर घरदार करण्यासहि तूं पात्र आहेस." यानंतर पूर्णानें बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन तो श्रमण झाला. "अमावतुरांत म्हटलें आहे कीं, श्रावस्तीहून आल्यानंतर पूर्ण कांहीं दिवस आपल्या धाकट्या भावापाशीं जाऊन राहिले व नंतर मुडगिरीला गेले. परंतु ही जागा समुद्राजवळ असल्यानें त्यांना त्रास होऊन तेथून ते मैलगिरीला गेले. पण तेथेंहि त्यांना त्रास झाल्यामुळें ते आपल्या धाकट्या बंधूजवळ मुलु आरामांत जाऊन राहिले. तेथें ते अर्हत् झाले. पुढें एकदां त्यांचा भाऊ व्यापारानिमित्त आणखी तीनशें व्यापाऱ्यांसह जहाजांतून दूरच्या प्रवासाला निघाला. वाटेंत वादळ होऊन त्यांचें जहाज एका बेटाला लागलें. तें बेट रक्तचंदन वृक्षांनीं भरलेलें होतें. त्यांतील कांहीं वृक्ष कापून त्यांनीं जहाजांत भरले व पुन्हा आपला प्रवास सुरू केला. परंतु पुढेंहि बरेंच मोठें वादळ झालें. त्यावेळीं नावाड्यांनीं देवाचा धांवा केला व पूर्णाच्या भावानें पूर्णाला आळवलें. त्यानंतर वादळ शांत झालें व त्यांचें जहाज सुरक्षित तडीला लागलें. पूर्णाच्या या उपकारामुळें भारावून जाऊन व्यापाऱ्यांनीं रक्तचंदनाचें कांहीं लाकूड त्याला देऊं केलें. पण त्यानें या लाकडाचा उपयोग बुद्धाकरतां एक विहार बांधण्यासाठीं करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तो बांधला गेला. पुढें पूर्णानें बुद्धाला सुनापरान्त येथें येण्याचें आमंत्रण दिलें. बुद्धानें तें मान्य केलें. त्याची ही दक्षिणेंतील आणि लंकेंतील तिसरी खेप होती. पूर्णाच्या आमंत्रणाला मान देऊन बुद्ध सोन्याच्या पालखींत बसून पांचशें भिक्षूंसहित सुनापरान्तांतील मुलु आरामांत बांधलेल्या चंदनमंडल नांवाच्या विहारांत आला. तेथें तो बरेच दिवस राहिला. नंतर पूर्णाच्या विनंतीला मान देऊन बुद्ध सुप्पारक

---

१. Ancient Shrines of Goa. पृ. २.

शहरांत गेला. तेथून नागराजाच्या आमंत्रणावरून नर्मदा नदीवर जाऊन नागांस उपदेश केला व तेथून लंकेला गेला.[१]"

प्रा. अ. का. प्रियोळकर यांनीं बुद्धघोषाच्या अट्ठकथेंतील (बुद्धघोषाचा काल इ. स. चें पांचवें शतक आहे) पूर्णाची माहिती दिली आहे. ती सारांशतः अशी आहे :– "सुनापरांत नांवाच्या राष्ट्रांत एका वाण्याच्या गांवीं दोन भाऊ राहात असत. त्यांचे पांचशें गाडे होते व ते व्यापार करीत. एकदां थोरला भाऊ व्यापाराकरतां फिरत असतां श्रावस्ती येथें जेतवनाजवळ गेला. तेथें त्याला बुद्धाची माहिती मिळाली. त्या ठिकाणीं जाऊन बुद्धाचा उपदेश ऐकल्यावर त्यानें प्रव्रज्या घेण्याचा विचार निश्चित करून तो समाधिपरायण झाला आणि व्यापाराची सर्व संपत्ति त्यानें धाकट्या भावाकडे पाठवून दिली. प्रव्रज्या घेतल्यावर त्यानें अम्बहट्ट पर्वत, समुद्रगिरी विहार, मातुलगिरी व मलुकाराम विहार या ठिकाणीं निवास केला. पुढें पांचशें वाणी व पूर्णाचा भाऊ व्यापाराकरतां परदेशीं जहाजावरून निघाले. वाटेंत समुद्रांत भयंकर वादळ झालें. वाणी भयभीत होऊन देवतांचा धांवा करूं लागले. पण पूर्णाचा धाकटा भाऊ चुल्लपुण्ण यानें वडील भाऊ पूर्ण याचा धांवा केला. त्यानंतर वादळ शांत झालें व नावा सुरक्षित स्वदेशीं आल्या. त्यावेळीं गेलेल्या व्यापाऱ्यांनीं त्यांतील लाकडाचा एक भाग बुद्धशिष्य पूर्णाला देऊं केला. परंतु त्यानें तो स्वतः न घेतां गुरूसाठीं एक मंडलमाल (सभामंटप अगर अग्रशाला) तयार करण्यास सांगितलें. पुढें पांचशें भिक्षूंसह बुद्ध मंडलमालांत येऊन राहिला. तेथील लोकांस उपदेश करून बुद्ध कांहीं दिवसांनीं श्रावस्तीला जाण्यास निघाला. वाटेंत नर्मदा नदीच्या तीरीं राहणाऱ्या नागराजाला उपदेश करून तो श्रावस्तीला गेला."

प्रसिद्ध दिवंगत बौद्ध पंडित राहुल सांकृत्यायन हे बौद्ध धर्मावरील अधिकारी विद्वान समजले जातात. त्यांनीं आपल्या बुद्धचरित्रांत पूर्णानें प्रव्रज्या घेतल्यावर ज्या ठिकाणीं विहार केला त्यांचीं नांवें बुद्धघोषाच्या वरील अट्ठकथेप्रमाणेंच अनुक्रमें अम्बहट्ट पर्वत, समुद्रगिरी विहार, मातुलगिरी व मंकुलकाराम हींच आहेत.[२] सद्धर्मरत्नकारे व अमावतुर यांतील चंदनमंडल व अट्ठकथेंतील मंडलमाल अगर मंडणमाल हींच तेवढीं त्यांत नाहींत. कै. वर्दे वालावलीकर यांनीं मात्र 'वसणुकीं' त त्यांच्याऐवजीं मुडगिरी, मैलगिरी व मुलु आराम अशीं नांवें दिलेलीं आहेत. हीं नांवें अर्थात् बरींच वेगळीं आहेत.

याशिवाय 'दिव्यावदान' नांवाच्या बौद्ध ग्रंथांत याच पूर्णाची कथा थोड्या वेगळ्या स्वरूपांत दिली आहे ती अशीः– "सुपारा येथील एका सधन व्यापाऱ्याला तीन बायका व तीन मुलगे होते. म्हातारपणीं कुटुंबांत आपला तिरस्कार केला जात

---

१. गोंयकारांची गोंयाभायली वसणूक. कै. वा. र. वर्दे वालावलीकर. पृ. ९–११.
२. बुद्धचर्य्या (हिंदी). पं. राहुल सांकृत्यायन. पृ. ४०३.

आहे हें पाहून त्यानें एका दासीकडे लग्न केलें व तिच्यापासून त्याला पूर्ण हा मुलगा झाला. या पूर्णाचें मन लहान वयांतच व्यापाराकडे होतें. आपले सावत्र भाऊ जहाजांतून दूरदेशीं व्यापाराला जात असलेले तो पहात असे. आपणहि असेंच व्यापाराकरता जावें अशी त्याला इच्छा होई. पण बापानें त्याला त्यासाठीं अनुमति न देतां इकडील व्यापारांतच ठेवलें. पित्याची आज्ञा मान्य करून तो गांवांतच व्यापार करूं लागला व त्यांत त्याला फायदाहि होऊं लागला. भावांनाहि तो आपल्या नफ्याचा भाग देत असे. पुढें भावांना त्याच्याबद्दल ईर्ष्या उत्पन्न झाली व त्यांनीं त्याला बंदरच्या व्यापारांत घातलें. तेथेंहि त्यानें नांव मिळविलें. पुढें तो व्यापाऱ्यांच्या श्रेणीचा मुख्य झाला. व त्यानें व्यापाराकरतां समुद्रप्रवासाला जाण्याचें ठरविलें. अशा प्रकारें त्याच्या सहा खेपा झाल्या. सातव्या खेपेस व्यापाऱ्यांनीं समुद्रपर्यटनास जाण्याविषयीं त्याला सांगितलें तेव्हां त्यांत जोखीम असल्याचें पाहून प्रथम त्यानें तें नाकारलें, पण शेवटीं त्याला व्यापाऱ्यांचें म्हणणें मान्य करावें लागलें. या खेपेच्या प्रवासांत त्याला इतर व्यापाऱ्यांकडून बुद्धाविषयीं माहिती मिळाली. या सफरीवरून परतल्यानंतर त्याच्या भावांनीं त्याचें लग्न करण्याचें ठरविलें. परंतु त्याच्या मनांत भिक्षु होण्याचें असल्यानें त्यानें या गोष्टीला मान्यता दिली नाहीं. पुढें एका व्यापाऱ्याबरोबर तो श्रावस्तीला गेला व तेथील सुप्रसिद्ध व्यापारी अनाथपिंडक याची भेट घेऊन त्याच्यामार्फत त्यानें बुद्धधर्माची दीक्षा घेतली.[1]"

या कथेंत थोडा फरक असला तरी ती स्वाभाविक अशी दिसत आहे. या सर्व कथांतील मुख्य आशय एकच आहे. आणि या मुख्य गोष्टीच्या सत्यतेबद्दलचा एक निःसंदिग्ध पुरावा म्हणजे अजंठा येथील लेण्यांतील १५ व्या क्रमांकाचें चित्र. पूर्ण बुद्धाची भेट घेतो व बौद्धधर्मांत प्रवेश करतो, असें या चित्रांत दाखविलें आहे.[2] अजंठ्याच्या या लेण्यांचा काल तज्ज्ञांच्या मतें सनपूर्व दोन शतकांपासून सनाच्या सातव्या शतकापर्यंत असावा.

बौद्ध धर्माचे वाङ्मय

याबद्दल महामहोपाध्याय कै. हरप्रसाद शास्त्री म्हणतात, "सगळ्या बौद्ध धर्माचा एक पुरा इतिहास लिहिणें अति कठीण काम आहे. त्यांत पुन्हा भाषेबाबत गोंधळ आहे. बुद्धाचीं वचनें त्यानें कोणत्या भाषेंत सांगितलीं हें समजणें कठीण. त्याचें रहाण्याचें ठिकाण होतें उत्तर कोसल तर त्यानें धर्मप्रचार केला कोसल व मगध या भागांत. या प्रदेशांतील लोकांना माहीत असलेल्या भाषेतून त्यानें धर्मप्रचार केला असला पाहिजे. त्यानें संस्कृत भाषेंत हा प्रचार केला नाहीं. जे अतिप्राचीन बौद्ध ग्रंथ मिळाले आहेत त्यांची भाषा पाहिली तर ती संस्कृत, मागधी किंवा कोसली यांपैकीं कोणतीहि दिसत

---

१. सार्थवाह (हिंदी). डॉ. मोतीचंद. पृ. १४४.

२. तत्रैव. पृ. १४५.

नाहीं. संस्कृत पंडितांनी तिला मिश्र भाषा असें नांव दिलें आहे. एका युरोपियन पंडितानें तिला Mixed Sanskrit हें नांव दिलें आहे."

कै. वर्दे वालावलीकर यांनीं मूळ 'अमावतुर' व 'सद्धर्मरत्नकारे' या पुस्तकांपेक्षां Hardy या पाश्चात्य ग्रंथकाराच्या तद्विषयक Manual चाच संदर्भ म्हणून अधिक उपयोग केला आहे असें दिसतें. हार्डीचीं मतें प्रा. प्रियोळकर यांनीं आपल्या लेखांत दिलीं आहेत.

'अमावतुर' या ग्रंथासंबंधीं प्रा. प्रियोळकर यांनी उद्धृत केलेलें हार्डीचें मत खालीलप्रमाणें:—

I have not been able to ascertain in what age this work was written. Its style is very different from any other work I have read. But this appears to arise from its antiquity. .... It was written by Gurulogowin and contains 256 pages.

त्याचप्रमाणें 'सद्धर्मरत्नकारे' या पुस्तकासंबंधींचें हार्डीचें मत त्यांनीं दिलें आहे तें असें:—

This work is of similar description to the one last mentioned but contains a greater portion of matter relative to the rites of Budhism and the meaning of the Budhistical terms. Its style is very unequal. It has 360 pages. But I do not know by whom it is written.[1]

या पुस्तकांबद्दल प्रा. प्रियोळकर म्हणतात, "महाभारतांतील कथांमध्यें मालमसाला भरून ज्याप्रमाणें विकृत स्वरूपांत पद्मपुराणादि ग्रंथ रचण्यांत आले त्याचप्रमाणें अट्ठकथादि जुन्या ग्रंथांतील माहितीवरून अमावतुर व सद्धर्मरत्नकारे हे ग्रंथ लिहिण्यांत आले हें सहज दिसून येणार आहे. हार्डी साहेबांनीं सद्धर्मालंकार याचा काल इ. स. १४१० असा देऊन रा. वालावलीकर यांचा एक प्रमाणग्रंथ हा त्याच्यासारखाच असल्याचें लिहिलें आहे. अर्थात् अमावतुर व सद्धर्मरत्नकारे यांचाहि काल चौदाव्या शतकाच्या जवळपास असावा.[2]"

एक फरक

कै. वर्दे वालावलीकर यांनीं ज्या दोन सिंहली ग्रंथांच्या आधारें पूर्णाची माहिती दिली त्यांत " पूर्णाच्या आमंत्रणाला मान देऊन बुद्ध पांचशें भिक्षूंसह मुलु आरामांत

---

१. विविधज्ञानविस्तार. व. ६०, अं. ११. प्रा. अ. का. प्रियोळकर. पृ. ४०७.
२. तत्रैव पृ. ४१२.

बांधलेल्या चंदनमंडळ विहारांत येऊन राहिले व पुढें नागराजाच्या आमंत्रणावरून नर्मदा नदीभागावर जाऊन तेथून लंकेला गेले" असें आहे, तर अट्ठकथेमध्यें नर्मदा नदीतीरावर येऊन नागराजाला उपदेश करून तेथून श्रावस्तीला गेल्याचा उल्लेख असून लंकेस गेल्याचा उल्लेख नाहीं. दोन ठिकाणच्या ग्रंथांत हा महत्वाचा फरक आहे.

दक्षिणेंत बुद्धाचें आगमन

आतां मुख्य प्रश्न म्हणजे गौतम बुद्धाचें दक्षिणेंत आगमन झालें होतें कीं काय हा होय. प्रथम एक गोष्ट लक्षांत घेणें जरूर आहे ती ही कीं, गोमंतकाच्या अभिमान्यांनीं गोमंतकाच्या व दक्षिण कोंकणाच्या इतिहासकालांतील महत्वाबद्दल कितीहि सांगितलें तरी आजपर्यंत पुढें आलेल्या पुराव्यावरून दक्षिण कोंकणापेक्षां उत्तर कोंकण व त्यांतील शूर्पारक (सोपारें) जास्त प्रसिद्ध होतें, असें दिसून येतें. नर्मदा नदी ही मध्यप्रांतांतील अमरकंटक पर्वतांत उगम पावून भडोच व सुरतजवळ समुद्रास मिळते. तेथून उत्तरेंत जाण्याचे मार्ग होते व यानंतर येथील एक मार्ग सुरतपासून सोपारें येथें व तेथून पुढें कन्याकुमारीपर्यंत जात होता. सोपारें हें समुद्रमार्गावरील ठाणें होतें. गलबतांतील माल येथें उतरविला जाऊन उत्तरेंत श्रावस्तीला पाठविण्यांत येत असे. येथील व्यापाऱ्यांच्या जाण्यायेण्यामुळें उत्तरेंतील घडामोडींची माहिती मिळत असे. त्यामुळें पूर्ण हा श्रावस्तीला जाऊन बुद्ध भिक्षु झाला यांत असंभाव्य असें कांहीं नाहीं. परंतु त्याच्या विनंतीवरून गौतमबुद्ध हे दक्षिणेंत तसेंच कोंकणांत सोपारें येथें व तेथून गोव्यांतील मुळें गांवांत येऊन राहिले, हें तसा पुरावा मिळाल्याशिवाय सत्य मानतां येणार नाहीं. रत्नागिरी गॅझेटियरमध्यें Gautama almost certainly never left Northern India (आ. २ पृ. ९९) असें म्हटलें आहे. यावरून गोव्यांत गौतम बुद्धाचें आगमन झालें होतें या म्हणण्यांत ऐतिहासिक सत्य दिसत नाहीं.

गौतम बुद्धाचें लंकागमन

आतां बुद्धाच्या लंकागमनाबद्दल विचार करूं. वर्दे वालावलीकर यांनीं गौतमबुद्धाची ही दक्षिणेतील व लंकेतील तिसरी खेप होय, असें लिहिलें आहे. 'सद्धर्मरत्नकारे' या पुस्तकांत हा लंकेतील प्रवास गौतमांना बुद्धत्व प्राप्त झाल्यावर आठव्या वर्षी केला असें आहे. परंतु इतिहासज्ञांच्या मतें लंकेंत बौद्ध धर्माचा प्रवेश अशोकाचा पुत्र कुमार महेंद्र (याला कांहींजण अशोकाचा बंधु म्हणतात) याजकडून झाला. याचा काल सनपूर्व तिसरें शतक होय. अनेक पुस्तकांतून याच्याबद्दल माहिती मिळते. Dr. M. Winternitz हे जर्मन असून भारतीय साहित्याचे प्राध्यापक होते. ते म्हणतात, "सिलोनी बखरींत पुढें असें सांगितलें आहे कीं, तिसऱ्या संगीतीचा (परिषदेचा) अध्यक्ष तिस्स यानेंच प्रथम श्रुत्तरेंत व दक्षिणेंत बुद्धधर्मप्रसाराचा मार्ग मोकळा केला. तिस्स यांचा शिष्य कुमार महेंद्र यानेंच सिलोनमध्यें बौद्ध तत्त्वज्ञान व बौद्ध ग्रंथ प्रथम नेले. सुरवातीस या धर्माच्या तत्वांचा प्रचार तोंडी झाला. परंतु सनपूर्व पहिल्या शतकांत

सिंहली राजा वट्टगामणीनें त्याचें लेखन करून घेतलें, ही गोष्ट विश्वासार्ह वाटते. कुमार महेंद्रानें जीं तत्त्वें प्रचारित केलीं तीं सिलोनी बुद्धधर्मीयांच्या मताप्रमाणें तिसऱ्या धर्म-परिषदेंत पास झालीं होतीं.[१]"

दुसरे एक बुद्धकालाचा विशेष अभ्यास केलेले पाश्चात्य पंडित मि. रिहस डेव्हिड म्हणतात, "सिलोनमधील वसाहतीच्या कालनिर्णयावर या भौगोलिक पुराव्यानें चांगलाच प्रकाश पडतो. निकायाच्या रचनेच्या पूर्वी फार काळ या वसाहती झाल्या असणें शक्य नाहीं. हें अशोकाच्या काळांत झालें होतें हें आपणास माहीत आहे.[२]"

यावरून अशोकाच्या कालापूर्वी सिलोनमध्यें बुद्धधर्माचा प्रवेश व प्रसार झालेला नाहीं, हें कळून येतें. याबद्दल आपल्याकडील माहिती अशी आहे :– "गौतमबुद्धाच्या धर्माचा प्रसार हिंदुस्थानच्या बाहेर झाला नव्हता. लंकेंतील प्राचीन माहितींत बुद्ध लंकेंत अनेक वेळां गेल्याची माहिती मिळते. पण ती विश्वासार्ह मानीत नाहींत. बुद्धाच्या वेळीं किंवा बुद्धानंतर शंभर वर्षें बुद्ध धर्माचा हिंदुस्थानाबाहेर प्रचार झाला नाहीं. उलट हिंदुस्थानांत अंतस्थ कलहानें या धर्माची अधोगति होत चालली होती. त्यामुळें अनेक पोटसांप्रदायाना जन्म मिळाला.[३]" बुद्धाच्या निर्याणानंतर पहिली महासभा भरली. दुसरी त्याच्या निर्याणानंतर शंभर वर्षांनी वैशाली येथें भरली. त्यानंतर तिसरी व अत्यंत मोठी तसेंच महत्वाची अशी अशोकाच्या वेळीं (सनपूर्व तिसरें शतक) मोगलीपुत्र तिस्स याच्या अध्यक्षतेखालीं भरली. यावेळीं या धर्माला राजाश्रय मिळाला होता. या काळींच या धर्माचा आंतबाहेर बऱ्याच ठिकाणीं प्रसार झाला. चौथी परिषद् कनिष्क राजाच्या काळीं (सनपूर्व पहिलें शतक) भरली.

सारांश गौतम बुद्ध लंकेंत म्हणजे सिलोनमध्यें गेल्याचें व दक्षिणेंत आल्याचें इतिहाससिद्ध नाहीं. त्यामुळें त्याचें लंकागमन आणि दक्षिणेंतील आगमन या गोष्टी त्याच्या चरित्रांत मागाहून जोडल्या गेल्या असाव्या, असें स्पष्ट दिसतें.

सुनापरान्त

बुद्धघोषाच्या अट्ठकथेंतील तसेंच अमावतुर व सद्धर्मरत्नकारे या सिंहली ग्रंथांतहि पूर्ण हा सुनापरान्त येथील होता, असेंच सांगितलें आहे. वर्दे वालावलीकर यांचें स्पष्ट मत असें आहे कीं, "सुनापरान्त हा देश आतांचा ठाणें जिल्हा अगर पूर्वीचा शूर्पारक देश याहून वेगळा असून गोमंत देशाचें तें दुसरें नांव होतें हें सिद्ध होतें.[४]" "मुळ

---

१ History of Indian Literature. Dr. M. Winternitz. Vol. 2. पृ. ७-८.

२ Buddhist India. Mr. Rhys David. पृ २४

३. मध्ययुगीन चरित्रकोश. विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव. 'अशोक' शब्द पहा.

४. गोंयकारांची गोंयाभायली वसणूक. कै. वा. र. वर्दे वालावलीकर. पृ. १४.

म्हणजे गोव्यांतील चंद्रवाडींतील मुळें[1]" असेंहि ते सांगतात. हें मुळें खेडेगांव पारडें (सासष्टी) नजीकच्या चंद्रेश्वर पर्वताच्या पायथ्याशीं आहे. आज त्या गांवाला लांबी-रुंदीहि नाहीं.

आतां सुनापरान्तावद्दल अन्यत्र विद्वानांचीं काय मतें व्यक्त झालीं आहेत तें पाहूं. पूर्ण ही व्यक्ति ऐतिहासिक दिसते. कारण अनेक ग्रंथांत त्याच्याबद्दलचीं वर्णनें असून अजंठ्याच्या गुहेंतहि त्याचें चित्र आहे. रत्नागिरी गॅझेटीयरमध्यें त्याच्याबद्दल पुढील मजकूर आढळतोः– The story of Purna, chief of the merchants of this port, being affected by hearing the Buddhist hymns sung by monks in Shrivasti near Benares determined to become the follower of Gautam. On presenting himself as disciple he was received with honour at Shrivasti by Gautam. He soon rose to high place among Gautam's followers and asked leave of his master to preach Buddhism in the country of Shonaparant, apparently the Konkan (Aparant, according to Bhandarkar and Pandit Bhagwanlal, was the western coast below the Sahyadri corresponding to modern Konkan). Goutam reminded him how fierce and cruel the people were, but Purna persisted and promising to overcome violence by patience was allowed to make an attempt.

— Gazetteer, Ratnagiri District, आ. २. पृ. ९९-१००.

अर्थात् डॉ. भांडारकर व पंडित भगवानलाल यांच्या मतें सुनापरान्त हें अपरान्त म्हणजे उत्तर कोंकणमधील होय. बौद्ध पंडित राहुल सांकृत्यायन यांच्या मतें सुनापरांत म्हणजे आजचा ठाणें व सुरत जिल्ह्याच्या आसपासचा भाग असून, समुद्रगिरी विहार, मातुलगिरी, मंकुलका आराम ह्या जागा सुनापरांतांतील आहेत.[2]

प्रा. प्रियोळकर यांचें मतहि वरीलप्रमाणेंच आहे. ते म्हणतात, "कल्याण खाडीच्या दक्षिणेस सोनावळी म्हणून गांव आहे. त्यांत जुने मोठमोठाले शिलाखंड आहेत.... या सोनावळीच्या प्राचीन महत्त्वावरून अपरान्ताला सुनापरान्त असें अभिधान प्राप्त झालें असण्याचा संभव आहे.[3]"

---

१ गों. गों. वसणूक. वा. र. वर्दे वालावलीकर. पृ. १२.

२. बुद्धचर्य्या. महापंडित राहुल सांकृत्यायन. पृ. ४०३ व नामानुक्रमणिका पहा.

३. विविधज्ञानविस्तार. व. ६०, अं. ११. 'वसणूक' पुस्तकाचें परीक्षण – प्रा. अ. का. प्रियोळकर.

५१ पवुक्रम ७५१२८ वि: नि.१९
क्रम 2132 दि: 22.5.5

बुद्धाला जेव्हां पूर्ण हा सुनापरान्तांतील व तेथेंच तो धर्मप्रचार करू इच्छितो हें कळलें तेव्हां त्यानें "तेथील लोक अतिशय क्रूर व चालरीत न पाळणारे आहेत" असें पूर्णाला सांगितलें वगैरे बौद्ध ग्रंथांतील हकीगत वर दिलीच आहे. आतां सुनापरान्त म्हणजे गोवा हें वर्दे वालावलीकर यांचें मत मान्य केलें तर गोव्यांतील लोकांचा स्वभाव बुद्धानें केलेल्या वर्णनास साजेसा आहे अशी कबुली दिल्यासारखें होईल. पण गोव्यांतील किंवा कोंकणांतील लोक आज तसे आहेत किंवा पूर्वी कधींकाळीं तसे होते असें आढळून येत नाहीं, ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. या दृष्टीनें पाहतां डॉ. मोतीचंद यांनीं आपल्या 'सार्थवाह' या पुस्तकांत 'श्रोणापरान्त' अथवा बर्मा (ब्रह्मदेश) असें जें म्हटलें आहे तें लक्ष वेधून घेतें. रक्तचंदनाचीं झाडें तिमोर या पोर्तुगीज वसाहतींत मिळतात, या गोष्टीचाहि त्यांनीं उल्लेख केला आहे.[1] सामान्यतः मनुष्यस्वभावाचें जें वर्णन गौतमबुद्धानें केलें तें गोमंतक अगर कोंकण या प्रदेशांना लागू होत नाहीं. ब्रह्मदेशाला साधारणपणें लागू पडतें असें म्हणतां येईल. परंतु या बाबतींत प्रा. प्रियोळकर हे म्हणतात कीं, "ब्रह्मदेशामध्यें सुनापुरांत नांवाचा भूप्रांत आहे. परंतु हें नांव हिंदुस्थानावरून घेतलेलें आहे असें Burnouf या ग्रंथकाराचें मत आहे.[2]" अर्थातच जुन्या ग्रंथांतील कांहीं गोष्टी नंतर घुसडल्या गेल्या असण्याची शक्यता आहे हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. एकंदरींत सुनापुरांत म्हणजे अपरांत अथवा उत्तर कोंकण असेंच बहुतेकांचें मत असल्याचें दिसून येतें.

प्रस्तुत लेखांतील मुख्य मुद्दा असा कीं, गौतम बुद्ध हा दक्षिणेंत आला होता किंवा लंकेला गेला होता, ही गोष्ट इतिहाससिद्ध नाहीं. त्याचें लंकागमन हें त्याच्या जीवनकथेला नंतर जोडण्यांत आलें. त्याचें मुळें येथील आगमनहि तशाच प्रकारचें ठरतें. के. वर्दे वालावलीकर यांनीं ज्या ग्रंथांवरून हीं विधानें केलीं ते ग्रंथच मुळीं हार्डीच्या मताप्रमाणें ऐतिहासिक पायावर रचलेले दिसत नाहींत. बुद्धघोषाची अट्ठकथा हासुद्धां गौतमबुद्धाच्या जन्मानंतर हजार वर्षांनीं रचला गेलेला ग्रंथ होय. त्यामुळें पूर्णाची गोष्ट मुळांत सत्य असली तरी तिला कांहीं काल्पनिक भाग नंतर जोडले गेलेले दिसतात.

गोमंतकांत बुद्धमूर्ति मिळाली आहे. तिचा काल शिल्पपद्धतीप्रमाणें दुसऱ्या अगर तिसऱ्या शतकाचा आहे. अर्थात् बुद्धकाल व ही मूर्ति यांच्या मधला काल सुमारें आठशेंनऊशें वर्षांचा भरतो. अशोकाच्या कालांत बौद्धधर्मप्रसाराला चालना मिळाली. अर्थात् त्यानंतर गोमंतकापर्यंत त्या धर्माचा प्रसार झाला असणें शक्य आहे. कसेंहि असलें तरी उत्तर कोंकणांत बौद्ध धर्माच्या खुणा जास्त आढळतात. आपले गोमंतकीय

---

१. सार्थवाह (हिंदी). डॉ. मोतीचंद. पृ. १४४–१४५.

२. विविधज्ञानविस्तार. व. ६०, अं. ११. प्रा. अ. का. प्रियोळकर कृत 'वसणूक' चें परीक्षण. पृ. ४१५

मराठी ग्रंथ संग्रहालय

विद्वान डॉ. दामोदर कोसंबी यांनीं आपल्या ग्रंथांत[1] Buddhist cave च्या दक्षिणेंत जेथें खाणाखुणा मिळतात त्या ठिकाणांचा नकाशा दिला असून सोपारा कण्हेरीपासून महाडपर्यंत बऱ्याच गुहा सांपडल्या असल्याचें दाखविलें आहे. मात्र गोव्यांत अशी एकहि गुहा असल्याचें चिन्ह दाखविलेलें नाहीं. तेव्हां अपरांतांत या धर्माचा प्रसार प्रथम झाला व त्यानंतर केव्हांतरी तो गोमंतकापर्यंत पोंचला, असाच निष्कर्ष काढावा लागतो.

मुख्य प्रश्न पूर्णाच्या आमंत्रणावरून गौतमबुद्ध मुळें येथील आरामांत येऊन राहिला होता कीं काय, हा आहे. या बाबतींत वर केलेल्या सांगोपांग विचारानंतर असें म्हणावें लागतें कीं, जोंपर्यंत अशा कांहीं खाणाखुणा गोमंतकांत किंवा मुळेंच्या परिसरांत मिळालेल्या नाहींत तोपर्यंत तें ऐतिहासिक सत्य मानतां येणार नाहीं. पुढेंमागें त्याला आधार मिळून तें सत्य ठरलें तर मला समाधानच वाटेल. पण केवळ भावनेच्या भरांत ठिसूळ पायावर इमारत उभारणें योग्य नव्हे. प्रा. प्रियोळकर यांनीं या बाबतींत मुद्देसूद उत्तर पूर्वी दिलेंच होतें. पण नवीन पिढीच्या नजरेसमोर हा विषय यावा, म्हणून माझा हा प्रयत्न आहे.

(मांडवी–गोवा, मे १९३६ च्या अंकांतील लेख — थोडा फेरफार करून)

---

१. The Culture & Civilisation of Ancient India. Dr. D. D. Kosambi. पृ. १६९ (नकाशा पहा).

५

वैदिक नदी सरस्वती

अम्बितमे नदीतमे देवितमे सरस्वती

— ऋग्वेद २×४१×१६.

"... the country of the Saraswati, the centre of Indo-Aryan civilisation in the age of the Rigveda."

E. J. Rapson, M. A.
The Cambridge History of India
Vol. I, P. 52.

आर्य लोक भारतांत बाहेरून आले, हेंच मत आतां बहुमान्य आहे. इ. स. १९०७ सालीं जर्मन संशोधक ह्यूगो विंक्लेर यांनी आशिया मायनरमध्यें बोगाझकोई (Boghazkoi) येथें उत्खनन केलें, त्यांत कांहीं मातीच्या विटा मिळाल्या. त्यांवर सनपूर्व चौदाव्या शतकांत हिटीट (Hittite) लोकांचा राजा आणि मिटानी (Mitani) लोकांचा राजा यांच्यामध्यें झालेल्या तहाच्या अटी कोरलेल्या आहेत. मिटानीच्या देवतांमध्यें मित्र, वरुण, इंद्र आणि नासत्या हीं नांवें आहेत. त्यावरून भारतीय आर्यांप्रमाणेंच आर्यांची ती एक शाखा होती असें कित्येकांचें मत आहे.[1]

आर्य हे अगदीं पूर्वकाळीं भटके व पशुपाल होते. नंतर त्यांनीं शेतीचा स्वीकार केला, व त्यामुळें त्यांना स्थायिक होणें क्रमप्राप्त झालें. भारतांत त्यांचा प्रवेश अफगाणिस्थान मार्गानें होऊन सप्तसिंधु म्हणजे आजचा पंजाब व काश्मीर या भागांत ते स्थिर झाले व तेथून इतर भागांत पसरत गेले.

सप्तसिंधु हें नांव जुन्या वाङ्मयांत अनेक ठिकाणीं आलें असून ऋग्वेदांत मात्र तें एकदांच आलें आहे असें तज्ज्ञांचें मत आहे. सप्तसिंधु हें नांव सात सिंधु म्हणजे नद्या या अर्थानें पडलें. या सात नद्या कोणत्या याबद्दल मात्र विद्वानांत मतभेद आहे. आर्य हे मूळचे हिंदुस्थानांतीलच व त्यांचें मूळ स्थान सप्तसिंधु होय (आर्य सप्तसिंधव के निवासी थे [2]) असें कांहीं भारतीय विद्वानांचें मत आहे. बाबू संपूर्णानंद हे त्यांपैकीं एक होत. त्यांच्या मतें या सात नद्या सिंधु, वितस्ता ऊर्फ झेलम, सरस्वती, सुतुद्री ऊर्फ सतलज, पुरुष्णी ऊर्फ रावी, अक्सिनी ऊर्फ चनाब आणि विपासा ऊर्फ बियास या होत.[3]

---

१. ऋग्वेदकालीन सां. इतिहास. चिं. ग. काशीकर. पृ. ६९.
Ancient History of Western Asia, India and Crete. Bedrich Hrozny Ph. D. इंग्रजी भाषांतर. पृ. ११०.

२. आर्योंका आदिदेश. बाबू संपूर्णानंद. पृ. ४.

३. तत्रैव. पृ. ३३.

सायणाचार्यांच्या मतें त्या सात नद्यांचीं नांवें अशीं:– गंगा, यमुना, सरस्वती, सुतुद्रि ऊर्फ सतलज, परुष्णी ऊर्फ रावी, वितस्ता ऊर्फ झेलम व असिक्नी (हें अक्सिनी असावें). मॅक्स मुल्लर यांच्या मतें पंजाबमधील पांच नद्या (नांवें पुढें येणार आहेत) आणि सिंधु व सरस्वती या त्या सात नद्या होत.[1]

सायणाचार्यांनी या सात नद्यांचीं नांवें ऋग्वेदावरून घेतलेलीं दिसतात.[2] ही ऋचा पहा :– "हे गंगे, हे यमुने, हे सरस्वती, हे शतुद्रि, हे परुष्णि, तुम्ही हें माझें कवन मान्य करून घ्या. मरुतविषे नदी, तूं असिक्निसह आणि हे अर्जिकिय वितस्ता, सुषोमा नदीसह तूं माझी विनंती ऐक."

इंग्रजी कोशकार John Dowson यांनीं आपल्या Hindu Mythology या कोशांत हींच नांवें घेतलीं आहेत.[3] असें जरी असलें तरीदेखील बाबू संपूर्णानंद यांचेंच मत ग्राह्य दिसतें. गंगा नदीला आज जें महत्त्व आलेलें आहे तें वैदिक काळीं तिला प्राप्त झालें नव्हतें. ऋग्वेदांत चौथ्या व दहाव्या मंडलांत मिळून दोनदां या नदीचा उल्लेख आला आहे. पुढें वैदिक लोक ज्यावेळीं पूर्वेकडील गंगेच्या खोऱ्यांत पसरत चालले त्यावेळीं त्यांनी गंगा व यमुना या नद्यांमधील प्रदेश आपल्या उपजीविकेसाठीं निवडून तेथें ते स्थायिक झाले. त्यावेळीं या नदीला महत्त्व आलें. महाभारतकाळीं तर हिला अपरिमित महत्त्व प्राप्त झालें आणि तिच्या माहात्म्याबद्दल अनेक कथा निर्माण झाल्या. हें तिचें माहात्म्य आजतागायत वृद्धिंगत होत आलें आहे.[4] आज गंगा ही भारतांतील आबालवृद्धांच्या माहितीची झाली आहे. गंगेचा उगम हिमालयांत दक्षिण उतरणीवर होतो. तेथून हा प्रवाह अलाहाबादेजवळ पूर्वदिशेला वळतो. हिचा संबंध आजच्या पंजाबशीं येत नसून यमुनेचा मात्र तसा येतो.

पंजाबांत आर्यांची प्रथम वसती झाली. पंजाब हें नांव पांच नद्यांचा देश म्हणून पडलें.[5] त्या नद्या या:– वितस्ता (झेलम), अक्सिनी (चिनाब), परुष्णी (रावी), विपासा (बियास), सुतुद्रि (सतलज).

यावरून आर्यांच्या प्रथम वसाहतींतील नद्यांची माहिती वाचकांना मिळेल. या नद्यांपैकीं सरस्वतीचा उल्लेख जुन्या वाङ्मयांत सांपडत असला तरी आज तिचें अस्तित्व नाहीं. ही नदी कालौघांत लुप्त झाल्यानें तिचें दर्शन फक्त इतिहासांत घडतें. नदीतमा

---

१. सुलभ विश्वकोश. श्री. दाते, कर्वे. 'सप्तसिंधु' पहा.
२. ऋग्वेद १०×७५×५– मराठी भाषांतर– रा. वि. पटवर्धन.
३. Hindu Mythology. John Dowson.
४. ज्ञानकोश. 'गंगा' शब्द पहा.
५. Cambridge History of India. Vol. I. p. ७१.
सुलभ विश्वकोश. 'पंजाब' शब्द पहा.

म्हणजे सर्व नद्यांत श्रेष्ठ असा जिचा महिमा ऋग्वेदसूक्तांत गाइला गेला आहे त्या सरस्वती नदीविषयींच्या माहितीकडे आतां वळूं.

या नदीचें महत्त्व ऋग्वेदकालांत बरेंच होतें. डॉ. दिनेशचंद्र सरकार म्हणतात:- The Saraswati rises in the Sirmur hills of the Sivalik range in the Himalayas and emerges into the plains at Ad Badoi in the Ambala District, Punjab.[1]

सिमल्यापासून साठ मैलांवर तिचा उगम होता व अंबाल्याच्या दक्षिण दिशेनें ती वहात होती.[2]

ऋग्वेदांतील सूक्तांत ऋषी म्हणतात, "आपल्या सर्व पोषक प्रवाहानें ही सरस्वती नदी वहात आहे. तिचा सर्वांना आधार आहे. कीं जणू लोखंडाची तटबंदी. बाकीच्या इतर नद्यांमध्यें हीच श्रेष्ठपणांत वरचढ आहे. ती एखाद्या राजरस्त्याप्रमाणें सरळ वहाते. सिंधु म्हणतात ती हीच."

"पर्वतराजीपासून थेट समुद्राला जाऊन भिडणाऱ्या नद्यांमध्यें (एका अचेतत् सरस्वती नदीना शुचिः यती गिरिऽभ्य आसमुद्रात्) पवित्र तेजस्कर आणि सोज्वळ अशी एक सरस्वतीच ढळढळीत दिसते. ह्या अवाढव्य जगाचें वैभव हीच स्पष्टपणें निदर्शनास आणते. आणि भक्तजनांसाठीं घृत व पाणी यांचें दोहन करून समृद्धी देते."[3]

सरस्वती नदी समुद्राला जाऊन मिळते याचा उल्लेखहि बलरामाच्या तीर्थयात्रेच्या वेळच्या हकीकतींत सांपडतो. महाभारताच्या शल्यपर्वात असें वर्णन आहे कीं, दक्षानें चंद्राला समुद्राकडे जाऊन सरस्वतीचा समुद्राशीं जेथें संगम झाला त्या प्रभासतीर्थावर (सौराष्ट्र) आराधना करण्यास सांगितलें.[4] बलरामाला भारतीय युद्ध टळत नाहीं व यांत दोघांचाहि संहार होईल याची कल्पना आली. त्याला वैताग उत्पन्न झाला व तो तीर्थयात्रेस गेला. ही तीर्थयात्रा त्यानें प्रभास क्षेत्रावर जेथें सरस्वतीचा संगम समुद्राशीं होतो तेथून सुरू केली.

महाभारताच्या याच अध्यायांत सरस्वती गुप्त झाल्याचेंहि लिहिलें आहे. त्यामुळें महाभारताचें नवें संस्करण ज्या काळीं झालें त्या काळांत ती गुप्त झाली असें दिसतें.

---

१. The Geography of Ancient and Modern India. Dr. D. Sarkar. पृ. ४०.
२. ऋग्वेदकालीन सां. इतिहास. चिं. ग. काशीकर. पृ. ८०.
३. ऋग्वेद ७×९५×१ व २.
४. महाभारत, शल्यपर्व, अ. ३५. कर्नाटक प्रेस, मराठी भाषांतर.

सरस्वती व दृषद्वती या दोन नद्यांमधील देश म्हणजेच ब्रह्मावर्त असें मनु आपल्या स्मृतींत सांगतात.[१]

ऋग्वेदकालांत सरस्वती नदीला अत्यंत महत्त्व होतें. 'अम्बितमे नदीतमे' (हे श्रेष्ठ माते, हे श्रेष्ठ नदी, हे श्रेष्ठ देवते) हा सरस्वतीस्तवनपर ऋचेचा एक भाग या लेखाच्या आरंभीं दिला आहे. त्याच्यापुढें ऋषी म्हणतात, आम्ही जवळजवळ सांदींतच पडल्यासारखे झालों आहोंत, तर हे माते, तूं आमची प्रख्याती कर.[२]

सरस्वती नदीचा प्रवाह

सरस्वती नदीचा प्रवाह त्या काळीं फारच जोरदार असावा हें खालील ऋचांवरून समजून येईल. ऋषी म्हणतात,

"तिचा सामर्थ्योदधि अमर्याद, अनिर्बंध, खळबळून उसळणारा आणि मोठा भयंकर आहे. तो गर्जना करीत चोहोंकडे पसरतो."

"महत्त्वानें आणि महिम्यानें आणि वैभवानें जी दुसऱ्या सर्व नद्यांत श्रेष्ठ आणि स्पष्टपणें दृग्गोचर होते, इतर सर्व प्रवाहांमध्यें जिच्या प्रवाहाचा वेग फारच जलद असतो, परमेश्वरा(च्या सेवे)करतां (जिचें पात्र) रथाप्रमाणें प्रशस्त झालें ती ज्ञानशालिनी सरस्वती खरोखरच स्तुत्य होय."[३]

यावरून तिच्या प्रवाहाची कल्पना येईल.

नदीची महती

ऋग्वेदांत ठिकठिकाणीं या नदीची महती गाइलेली दिसते. खालील थोडीं सूक्तें पहा.

"सरस्वती ही सर्व नद्यांमध्यें दैवी सामर्थ्यानें मंडित आहे. तर तिच्याप्रीत्यर्थ मी बृहत्स्तोत्राचें गायन करतों. हे स्तोत्या, तूं भक्तियुक्त स्तुतींनीं सरस्वतीची महती वर्णन कर व शिष्टा, तूंहि रोदसीप्रीत्यर्थ स्तोत्रप्रबंधाद्वारा घोष कर."

"द्युलोकांतून श्रेष्ठ पर्वताच्या शिखरावरून परमपूज्य सरस्वती आमच्या यज्ञसमारंभास आगमन करो. घृताप्रमाणें उज्ज्वल कांतीनें युक्त अशी देवी आमच्या हवीचा स्वीकार करून मोठ्या उत्सुकतेनें आमची भक्तिरसपूर्ण वाणी श्रवण करो."[४]

सरस्वती नदीच्या तीरावरील राजे व पौरजन

ऋषी म्हणतात, "हे शुभ्रतेजस्विते, हे पौरजन तुझ्या महिम्याच्या प्रभावानें इहपरत्र अशा दोन्ही लोकांत वास्तव्य करतात. तूं आमची रक्षणकर्त्री आहेस. मरुत्सखा (इंद्र) तूंच आहेस. तर तूंच आम्हांला प्रबुद्ध कर आणि दानशालि यजमानाकडे तुझा कृपाप्रसाद येऊं दे."

---

१. मनुस्मृति, अध्याय २×१७. चित्रशाळा प्रकाशन.
२. ऋग्वेद २×४१×१६.
३. ,, ६×६१×८ व १३.
४. ,, ७×९६×१ व ५×४३×११.

"राजा असा एक चित्र हाच होऊन गेला. इतर दुसरे राजे नांवाचेच. दुसरें काय ? पर्जन्यानें वृष्टी करावी त्याप्रमाणें सरस्वती नदीच्या तीरावर त्यानें पैसा ओतला. हजारोंनीच काय पण लाखांनी त्यानें द्रव्य दिलें.[१]"

पाश्चात्यांचें मत

रॉथ झिमर, ग्रिफिथ आणि लुडविग यांचें असें मत आहे कीं, ऋग्वेदांत पुष्कळ ठिकाणीं सिंधु या शब्दाचा अर्थ सरस्वती असा होतो.[२]

प्रो. लासेन व मॅक्स मुल्लर यांच्या मतें उत्तरकालीन वाङ्मयांत उल्लेख असलेली सरस्वती व ऋग्वेदांतील सरस्वती या एकच होत; तसेंच सरस्वती नदीचा प्रवाह सतलज-प्रमाणें मोठा होता, सतलज व यमुना यांच्यामध्यें ती वहात होती आणि ती स्वतंत्रपणे किंवा सिंधु नदींत मीलन पावून अरबी समुद्रास मिळत होती. प्रो. मॅकडोनेल व कीथ यांना हें मत मान्य आहे.[३]

ऋग्वेदाची जन्मभूमी

मॅक्स मुल्लर, वेबेर, म्यूर व आणखी कांहीं विद्वान संस्कृतज्ञ, यांच्या मतें पंजाब हीच ऋग्वेदाची जन्मभूमि होय. पण ब्रुनहॉफेर, हर्टेल, हुस्सिंग यांच्या मतें ऋग्वेदसूक्तें, अफगाणिस्तान व इराण येथें निर्माण झालीं. पण हॉपकिन्स व कीथ यांचें मत मात्र असें आहे कीं, ऋग्वेदाची जन्मभूमी मुख्यतः आसांच्या दक्षिण अंबाल्याजवळ पूर्व-काळीं असलेली सरस्वती नदी व तिचा परिसर होय.[४]

आजची स्थिति

मराठी ज्ञानकोशांत 'सरस्वती' या नांवाच्या पुढील दोन नद्यांचा उल्लेख आहे:—

१. पंजाब इलाख्यांतील ही नदी अंबाला जिल्ह्याच्या सरहद्दीवरील सिरमूर संस्थानांत उगम पावून कनोळधून मनैऋत्येस वाहात जाते. नंतर उगमापासून ११० मैल असलेल्या पतियाळा संस्थानांतील घग्गर नदीस मिळते.

२. अरवलींतून निघून कच्छच्या रणांत पडणारी दुसरी एक याच नांवाची नदी आहे.

एक गुजराती विद्वान आजच्या खालील तीन नद्यांचा उल्लेख करतात :—

१. काश्मीरच्या डोंगरांतून निघून पतियाळाच्या रणांत अदृश्य होणारी.

२. गुजरातच्या अंबाभवानीजवळ कोटेश्वरनजीक निघून कच्छच्या रणांत मिळणारी.

---

१. ऋग्वेद, ७ × ९६ × २ व ८ × २१ × १८.

२. The Vedic Age. पृ. २४२. भारतीय विद्याभवन प्रकाशन.

३. ऋग्वेदकालीन सांस्कृतिक इतिहास. चिं. ग. काशीकर. पृ. ८०.

४. The Vedic Age. पृ. २४४.

३. गीरच्या जंगलामधून निघून प्रभास क्षेत्रांत ज्या ठिकाणीं श्रीकृष्णाचा देहोत्सर्ग झाला त्याजवळच्या तीर्थांत मिळणारी.

मॅकडोनेल वगैरे पाश्चात्य विद्वान मूळ वैदिक सरस्वती जी पतियाळाच्या रणांत विनशन तीथाजवळ लुप्त झाली तीच मानतात. दुसऱ्या या नांवाच्या नद्या म्हणजे मूळ सरस्वतीचें नांव ज्यांना देण्यांत आलें अशा दुसऱ्या लहान नद्या होत, असें त्यांचें मत आहे.[१]

कांहीं युरोपियन विद्वान सिंधु हीच सरस्वती मानतात. ऋग्वेदांतील एका ऋचेंत 'सिंधु म्हणतात ती हीच' असें म्हटलें आहे. परंतु ऋचांचा अर्थ पुष्कळदां गूढ असतो. त्यामुळें त्याचा बोध होणें कठीण होतें. खुद्द ऋग्वेदांतील खालील ऋचांत या दोन्ही नद्या वेगळ्या असल्याचा स्पष्ट निर्देश आहे.

"सरस्वती, शरयू आणि कल्लोलांनी विभूषित अशी सिंधु इत्यादि विशालांतील विशाल सरिता आपल्या कृपाकटाक्षासह आगमन करोत."

"हे सिंधु, बालकाकडे त्याच्या माता त्वरेनें जातात त्याप्रमाणें धेनु दुधाचा पान्हा सोडीतच हंबरत तुझ्याकडे धांवतात."

"हे गंगे, हे यमुने, हे सरस्वती, हे शुतुद्रि, हे परुष्णी, तुम्ही हें माझें कवन मान्य करून घ्या. मरुतविधे नदी, तूं असिक्निसह आणि हे अर्जिकिये, वितस्ता नदी आणि सुषोमा नदीसह येऊन तूं माझी विनंती ऐक.[२]"

यावरून सिंधु व सरस्वती वेगळ्या असें स्पष्ट होतें.

आतां वर ज्या आजच्या सरस्वती नांवाच्या लहान नद्यांचा उल्लेख आला, त्यांच्याबद्दल पाहूं.

मूळची सरस्वती नदी ही प्रभास क्षेत्राजवळ (गुजरात, सौराष्ट्र) समुद्रास मिळत होती. त्यामुळें त्या नदीचा व गुजरातचा संबंध होता. एका गुजराती संशोधकानें या विषयाचा चांगला अभ्यास करून तो आपल्या एका पुस्तकांत दिला आहे. त्याचें तात्पर्य असें:—

"वेदांतील सरस्वतीचें वर्णन वाचतां ती या तिन्ही नद्यांपैकीं एकहि नाहीं हें स्पष्ट आहे. मूळ वर्णनावरून सरस्वती मूळची एकच नदी असून ती आज लुप्त झालेली आहे, हें कळून येतें. पश्चिम हिंदुस्थान व गुजरात या भागांत प्राचीन काळीं वारंवार धरणीकंप होत असत. यामुळें तसेंच अतिवृष्टी व जलप्रलय या कारणांनीं बहुतकरून रेताड प्रदेशांत नद्यांच्या प्रवाहावर परिणाम झाले आहेत. पंजाब, सिंध, राजपुताना व

१. खंबायतचा इतिहास (गुजराती) रत्नमणि भीमराव जोटे. परिशिष्ट आ. पृ. १७४–१७५.

२. ऋग्वेद १०×६४×९, १०×७५×४, १०×७५×५.

गुजरात येथें या कारणांनीं अनेक फेरफार झाले. ज्वालामुखी व धरणीकंप तसेंच अतिवृष्टी या कारणांमुळें पश्चिम हिंदुस्थानच्या नद्यांमध्यें मोठे फेरफार झालेले आहेत. कांहीं नद्यांचे प्रवाह बदलले तर कांहींचे तुकडे झाले. सरस्वती नदी लुप्त झाल्यामुळें तिला मिळणाऱ्या कांहीं नद्या सिंधु व गंगा यांना मिळाल्या. व खालच्या रेताड प्रदेशांत तिचे तुकडे झाले व गुजरातमध्यें बनासपाटणची सरस्वती तसेंच साबरमती वगैरे नद्या झाल्या. त्यामुळें जुन्या काळांतील सरस्वती नदीच्या ज्या परंपरा होत्या त्या या भागांतील नद्यांना लागू झाल्या व तिच्यावरील तीर्थें यांच्यावर आलीं. आणि तिचें पावनत्व गंगेकडे गेलें. गुजरात व काठेवाड या प्रदेशांतील कांहीं भागांचें रणप्रदेशांत रूपांतर झालें. यामुळें व इतर कारणांनीं प्राचीन परंपरा ध्यानांत ठेवून पुराणकारांना सरस्वतीला विनशन (पतियाळा) मध्यें गुप्त करावी लागली, मधील भागांत एका लहान नदीला अर्बुदारण्यांतून काढून सरस्वती म्हणून संबोधावें लागलें, व प्रभासजवळ गीरच्या जंगलांतून वाहणाऱ्या नदीलाहि सरस्वती म्हणावें लागलें.

खगोलाचार्य वराहमिहिर 'आनर्तार्बुद पुष्कर सौराष्ट्राभीर शूद्र रैवतका। नष्टा यस्मिन् देशे सरस्वती पश्चिमो देशे॥' या गीतींत सरस्वतीचा सर्व प्रदेश स्पष्ट करीत आहे. सारांश हिमालयांतून निघून खंबायतच्या आखातांत समुद्रास मिळत होती ती सरस्वती लुप्त झाली हेंच खरें.[१]"

मूळ सरस्वती नदीबद्दलची माहिती अशी आहे. एवढी मोठी नदी कालाच्या ओघांत नष्ट होते, यासारख्या घटना पाहूनच प्राचीन ऋषींनीं कालाय तस्मै नमः असे उद्गार काढले असावे. परंतु मानवी मनाचें सामर्थ्य असें कीं, तें कालावरहि मात करण्याचे प्रयत्न करतें व त्याचे ते प्रयत्न कांहीं अंशीं साध्यहि होतात.

(मांडवी – गोवा. सप्टेंबर १९६६ च्या अंकांतील लेख — कांहीं फेरफार करून)

---

१. खंबायतचा इतिहास. र. भी. जोटे. परिशिष्ट आ.

६

भार्गव परशुराम व गोमंतक

सह्याद्रिखंडांत खालील श्लोक आहेत :–

आनीता भार्गवेणैव गोमांताख्येच पर्वते ॥
मांगिरीशो महादेवो महालक्ष्मी च म्हाळसा ॥ ५२ ॥
शांतादुर्गा च नागेशः सप्तकोटीश्वरः शुभः ॥
तथा च बहुला देवा भार्गवेण तु आनीताः ॥ ५३ ॥

(स. उत्तररहस्य, अध्याय १)

या श्लोकांचा सारांश असा कीं, मांगिरीश, महालक्ष्मी, म्हाळसा, शांतादुर्गा वगैरे येथील देवता श्रीपरशुरामानें येथें आणून स्थापन केल्या.

साधारणतः सुरतेजवळच्या समुद्रकिनाऱ्याच्या भागापासून खालीं कन्याकुमारी-पर्यंतची किनारपट्टी म्हणजे परशुराम क्षेत्र असें मानलें जातें. या पश्चिम किनाऱ्या-वरील अनेक भागांतील ब्राह्मण आपल्याला परशुरामानें तेथें आणून स्थापन केलें असें मानतात. कांहीं कालापूर्वी याला पुष्टी देणारे ग्रंथहि संस्कृतांत निर्माण झालेले आहेत. संस्कृत भाषेंत असलेला कोणताहि मजकूर सामान्यतः जुन्या काळचा असावा, असें मानण्याची प्रवृत्ती हिंदु मनांत आहे. आणि यामुळें तें ऐतिहासिक सत्य आहे असा अनेकांचा समज आहे. या बाबतींत सत्य जाणून घेणें आवश्यक आहे. प्रस्तुत लेखांत यासंबंधींच विचार करण्याचें योजिलें आहे.

याकरतां प्रथमतः परशुरामचरित्राकडे वळणें भाग आहे. परशुराम हा जमदग्नि ऋषी व रेणुका या आईबापांचा पांचवा मुलगा. रेणुका ही इक्ष्वाकु वंशांतील रेणु नांवाच्या राजाची मुलगी. हिला कामली रेणुका असेंहि नांव होतें. परशुरामाचें मुख्य अस्त्र परशु (कुऱ्हाड) हें होतें. परंतु त्याला आणखी ४१ अस्त्रांची माहिती होती असें विष्णुधर्मोत्तर ग्रंथावरून कळतें.[1]

याच सुमाराला कृतवीर्याचा पुत्र हैहय देशाचा राजा अर्जुन (याला सहस्रार्जुन असेंहि म्हणत) याच्या उन्मत्त मुलांनीं अर्जुनाला नकळत जमदग्नीच्या धेनूचें वासरूं आणलें. त्यामुळें परशुराम व कार्तवीर्य या दोघांत मोठें युद्ध होऊन परशुरामानें अर्जुनाचे बाहु छेदून टाकले व त्याच्या मुलांच्या अंतःपुरांत फिरत असलेल्या त्या गोवत्सास आपल्या आश्रमांत आणलें. पुढें परशुराम हा समिधा आणण्याकरतां बाहेर गेला असतां अर्जुनाचे मुलगे एकत्र होऊन जमदग्नीच्या आश्रमांत गेले व त्यांनीं जमदग्नीचा वध केला. परशुराम आश्रमांत आल्यावर पित्याचा असा वध झालेला पाहून अत्यंत क्रोधायमान

१. प्राचीन चरित्रकोश. विद्यानिधी चित्रावशास्त्री. 'परशुराम' पहा.

झाला व त्यानें कार्तवीर्याचे पुत्रपौत्र आदिकरून सर्व हैहयवंशीयांचा नाश केला. तसेंच इतर क्षत्रियांचाहि नाश करून पृथ्वी निःक्षत्रिय केली. पुढें अश्वमेध यज्ञाच्या वेळीं पृथ्वीचा निःक्षत्रिय केलेला हा भाग परशुरामानें कश्यप ब्राह्मणाला दान दिला. त्यावेळीं कश्यपमुनीनें त्याला सांगितलें कीं, ज्या अर्थी मला हा भाग दान दिला आहे त्याअर्थी आतां तूं येथें मुळींच राहतां कामा नये. पुढें परशुरामानें शूर्पारक नांवाचा देश दुसऱ्या तीरावर निर्माण केला व तो तेथें राहण्यास गेला.[1]

ही परशुरामाची कथा. कित्येक पुराणांत कांहीं प्रसंग वेगळ्या रीतीनें चित्रित केले आहेत. कांहीं ठिकाणीं जमदग्नीचा कार्तवीर्य यानेंच अगर त्याच्या चंद्रगुप्त नांवाच्या प्रधानानें वध केला असें आहे,[2] तर कांहीं ठिकाणीं त्याची कामधेनु अगर तिचीं वासरें कार्तवीर्याच्या लोकांनीं नेलीं, असें सांगितलें आहे. पण महाभारतांतच दुसऱ्या ठिकाणीं एक कथा दिलेली आहे ती पाहतां या विरोधाचें कारण निराळें दिसतें. डॉ. सुखटणकर यांनीं आपल्या लेखांत दिलेली ही कथा अशी :– "कृतवीर्य नांवाच्या राजानें सोमयागाच्या शेवटीं पुरोहितांना विपुल धन दिलें. त्याचे पुरोहित भृगु ब्राह्मण होते. पुढें त्याच्या मुलांनीं हें धन परत मागितलें. भृगूंनी कांहीं धन दिलें; सर्व दिलें नाहीं. हें धन भृगूंनीं जाणूनबुजून जमिनींत पुरून ठेवलें आहे असा क्षत्रियांस संशय येऊन त्यांनीं प्रचिती पाहण्याकरतां कांहीं ठिकाणीं खणलें असतां तेथें त्यांना धन मिळालें. व या कारणानें क्षत्रिय व भृगु ऋषी यांमधील वितुष्टास सुरुवात झाली.[3]" (महाभारत, आदिपर्व १७-९). हें कारण वास्तव दिसतें.

भृगु ऋषीच्या संततीचेंच भार्गव हें पुराणकालांतील संबोधन. या कुलांत बरेच थोर ऋषी होऊन गेले. दधीचि ऋषी व त्याचा पुत्र सारस्वत, तसेंच असुरांचा गुरु शुक्राचार्य हे याच कुलांतील होत. यांचा दरारा फार मोठा होता. महाभारताच्या संशोधित आवृत्तीचे एक संपादक कै. विद्वद्वर्य डॉ. सुखटणकर यांनीं फार दिवसांपूर्वी "भृगुवंश व भारत (महाभारत)" या मथळ्याखालीं एक विद्वत्तापूर्ण लेख लिहिला होता. त्यांतील प्रस्तुत विषयाच्या संदर्भात आवश्यक असलेली माहिती अशी :–

महाभारताच्या अगदीं पहिल्याच अध्यायाच्या ११ व्या श्लोकांत सौती ऋषी म्हणतात :– वैशंपायनानें कृष्ण द्वैपायन व्यास ऋषीनें सांगितलेल्या पवित्र कथा लोकांना ऐकविल्या. त्यावेळीं मीहि तेथें हजर होतों. पुढें अनेक तीर्थांचें दर्शन घेऊन शेवटीं समंतपंचक या नांवाच्या पवित्र स्थानीं आलों. पूर्वी कौरव पांडव व इतर राजे यांचें याच ठिकाणीं महायुद्ध झालें.[4]

---

१. महाभारत (मराठी भाषांतर). शांतिपर्व अ. ४९. प्र. कर्नाटक मुद्रणालय.

२. प्राचीन चरित्रकोश. चित्रावशास्त्री. 'परशुराम' पहा.

३. भृगुवंश और भारत. डॉ. वि. स. सुखटणकर. (अनुवाद - नागरी प्र. पत्रिका. वर्ष ४५, अं. २.)

४. महाभारत (मराठी अनुवाद) आदिपर्व, अ. १. कर्नाटक मुद्रणालय.

त्रेता व द्वापर या दोन युगांच्या संधिकालीं सर्व शस्त्रें धारण करणाऱ्यांत श्रेष्ठ अशा जामदग्न्य रामानें क्षत्रियांचा नाश करून समंतपंचकांत रक्ताचे डोह निर्माण केले. त्या रक्तपूर्ण डोहासमीप असलेल्या प्रदेशालाच पवित्र समंतपंचक असें म्हणतात.[१] कुरुक्षेत्र असें ज्याला आम्ही म्हणतों, त्यालाच पूर्वकालीं समंतपंचक असें नांव होतें. पुढें या नांवाचा लोप होऊन कुरुक्षेत्र हेंच नांव प्रचलित झालें. ज्यावेळीं भारतीय युद्धांत एकूणएक सर्वांचा नाश झाला त्यावेळीं लगेच श्रीकृष्ण पार्थाला घेऊन या रणभूमीवर आला. त्यावेळीं त्यानेंहि, ते पहा येथून दूर पांच रामह्रद आहेत. परशुरामानें येथेंच या रक्तानें पितरांस तर्पण केलें,[२] असें सांगितल्याचा उल्लेख महाभारतांत आहे.

डॉ. सुखटणकर म्हणतात, "महाभारतांतील कथांवरून पाहतां भार्गव हे ब्राह्मण असले तरी त्यांचा वास्तविक क्षत्रिय कुलांशीं जास्त संबंध होता. राजा शर्याति याच्या सुकन्या या मुलीशीं च्यवन ऋषीचा विवाह झाला होता. कान्यकुब्ज राजा गाधी याच्या मुलीचें पाणिग्रहण ऋषीकानें केलें होतें. जमदग्नीची पत्नी रेणुका ही अयोध्येच्या राजाची कन्या होती. शुक्रकन्या देवयानी हिचा विवाह ययाति राजाशीं झाला होता. (हें एक प्रतिलोम विवाहाचें उदाहरण आहे.) राजा वीतिहव्य याला एका भृगु ऋषीनें ब्राह्मण बनविलें व त्याची संतती भार्गव ठरविली."[३] अशा रीतीनें या भार्गव कुलाचा अनेक क्षत्रिय कुलांशीं नात्याचा संबंध होता. तेव्हां वर वर्णिलेला विरोध येण्याला तसेंच कारण घडलें असलें पाहिजे.

शेवटीं डॉ. सुखटणकर म्हणतात, "महाभारताचें एक महत्त्वपूर्ण संस्करण भार्गवांच्या प्रबल व साक्षात् प्रभावाखालीं तयार झालें."[४]

लेखणीचा प्रभावच असा आहे कीं, ज्या लोकांच्या हातांत ती जाते ते आपल्याला पाहिजे तो इतिहास बनवूं शकतात, याचें हें उदाहरण आहे. वास्तविक ब्राह्मण-क्षत्रिय लढा हा आपसांतील लढा असून कारण कोणतेंहि असलें तरी त्यामागें स्वार्थ ही प्रेरक शक्ति असावी. लढाई ही केव्हांहि झाली तरी संहाराला कारण होते. परशुराम व क्षत्रिय यांतील लढाई ही वर वर्णन केलेल्या अतिरंजित स्वरूपांत किंवा सौम्य स्वरूपांत, कशीहि घडली असो, तिच्यांत मानवी संहार झाला असणारच. ज्या ठिकाणीं हें घडलें त्याला पवित्र तीर्थस्थान बनविणें हें आजच्या कालांत विस्मयजनक वाटतें.

---

१. महाभारत (मराठी) आदिपर्व, अ. २. प्र. कर्नाटक मुद्रणालय.
२. ,, (,,) शांतिपर्व, अ. ४८. ,, ,,
३. भृगुवंश और भारत. डॉ. सुखटणकर. (नागरी प्र. पत्रिका, वर्ष ४५, अं. २. पृ. १५०).
४. तत्रैव. पृ. १६०.

भृगु कुलाचें अर्थात् भार्गव ब्राह्मणांचें महत्त्व

ऋग्वेद मंडल १ यांतील १४३ पासून १५० पर्यंतचीं सूक्तें अग्नीवर आहेत. यांतील १४३ व्या सूक्तांतील ४ थ्या ऋचेंत "सकल ऐश्वर्याचा स्वामी अशा ज्या अग्नीला भृगु ऋषींनीं त्रिभुवनाच्या प्रयत्नाचें बळ खर्च करून (स्वर्गातून) आणून पृथ्वीच्या मध्यभागीं (वेदीवर) प्रस्थापित केलें तो अग्नि स्वस्थानीं विराजमान झाला असतां त्यास आपल्या स्तवनांनीं आपलासा कर. कारण वरुणाप्रमाणें हा अग्नी (दैवी) संपत्तीचा एकटाच प्रभु होय." असें म्हटलें आहे. यावरून अग्नीपासून होणाऱ्या फायद्यांच्या प्रसाराला हें कुळ कारण झालें असावें. त्या काळीं हा एक मोठा शोध होता. मानव समाजाला मिळालेली ही एक मोठी देणगी होती.

परशुरामचरित्रांतील अद्‌भुत वर्णनें

परशुराम ही व्यक्ति वास्तव होय. परंतु त्याचें चित्रण विस्मयकारक गोष्टींनीं केलें आहे. ही आमची जुनी सनातनी परंपरा म्हणतां येते.

परशुराम हा दाशरथी रामाच्या काळांत दिसतो. रामानें मिथिलेंत धनुर्भंग केल्यानंतर त्याचा सीतेशीं विवाह झाला. स्वयंवराहून परततांना त्याची व परशुरामाची भेट होते. आपण आणलेल्या धनुष्याला बाण लावण्याची परशुराम त्याला आज्ञा करतो व त्याप्रमाणें रामानें बाण लावून सोडल्यावर रामाच्या सामर्थ्याबद्दल त्याची खात्री होते आणि आपण आतां महेंद्र पर्वतावर जातों असें तो सांगतो.[1]

महाभारतकालांत पांडवांच्या तीर्थयात्रेच्या वेळीं तो त्यांना महेंद्र पर्वतावर दर्शन देतो. सर्व पांडव एक रात्र महेंद्र पर्वतावर राहून पुढें जातात.[2]

हरिवंशांत त्याच्याबद्दल पुढील वर्णन आहे :- "(बलराम आणि कृष्ण) सह्याद्रीच्या सान्निध्यानें शोभिवंत दिसणाऱ्या व यदुवंशीयांनीं अलंकृत केलेल्या करवीर नगरापाशीं येऊन पोंचले. तेथें गेल्यावर वेणुनदीच्या तीरावर वटवृक्षाच्या खालीं बसलेला परशुराम त्यांच्या दृष्टीस पडला. व त्यानें त्यांना गोमंत पर्वतावर जाण्यास सांगितलें."[3]

परंतु परशुरामाचा काल, दाशरथी रामाचा काल व श्रीकृष्णाचा काल हे एक नाहींत. ऐतिहासिक दृष्ट्या त्यांत बरेंच अंतर आहे. आपल्याकडील जुन्या वर्णनांची दृष्टी वेगळी असते. ती इतिहासाला धरून नसते. परशुरामाबद्दल अनेक वर्णनें अतिरंजित आहेत. परशुरामाचें मुख्य शस्त्र परशु. याला आज कुऱ्हाड ही संज्ञा आहे. हें शस्त्र जुन्या काळांत जो शस्त्रास्त्रांचा विकास होत गेला त्याचें दर्शक आहे. कुऱ्हाड

---

१. वाल्मीकिरामायण (मराठी). ग. वि. चिपळूणकर. बालकांड, सर्ग ७५–७६.
२. महाभारत (मराठी). वनपर्व, अ. ११७. कर्नाटक मुद्रणालय.
३. हरिवंश (मराठी). ग. वि. चिपळूणकर. अ. ३९ विष्णुपर्व.

अगर तलवार हें शस्त्र शत्रूवर तो जवळ आल्यानंतर वार करावयाला उपयोगी होतें. धनुष्य तसेंच नंतरची बंदूक हीं अस्त्रें लांब पल्ल्याचीं आहेत व तीं जास्त परिणामकारक आहेत. परशुरामाला अनेक अस्त्रांची व धनुष्यबाणाची वगैरे माहिती होती अशीं वर्णनें आहेत. असें असतां परशूला त्यानें महत्त्व कां दिलें याचा खुलासा होत नाहीं. त्याचा पिता जमदग्नि याच्याबद्दल पुराणांत सांपडणारी एक कथा अशी :– "जमदग्नि हा धनुष्याचें शरसंधान लावण्याचा अभ्यास करीत असतांना लांब पडलेला बाण आणण्याचें काम त्याची पत्नी रेणुका ही करीत असे. पण भर दुपारीं डोक्यावर उन्हाचा कडाका असह्य होई व पायाखालची जमीन तापल्यामुळें पायहि पोळून निघत. म्हणून जमदग्नीनें सूर्याला आवाहन करून त्याला शाप देण्याची तयारी दाखविली. तेन्हां सूर्यानें त्याला खडावा व छत्री यांचा वापर करण्यास सांगितलें." याचा अर्थ असें केल्यानें उन्हाचा त्रास कमी होतो असा शोध मानवाला या काळीं लागला असा असावा. याहिमुळें हा काल मानव-सुधारणेच्या सुरवातीचा दिसतो. साधारणतः जुन्या वर्णनांत (इतर बाहेरील धर्मांतहि) सत्ययुगाची कल्पना आहे. त्यामुळें मानव सत्ययुगांतून कलियुगांत आला अशी कल्पना होते. पण तें खरें नसून वस्तुतः अखिल मानवजात अज्ञानयुगांतून ज्ञानयुगाकडे जात आहे. परशुरामाची क्षत्रियांशीं झालेली लढाई हीसुद्धां अतिरंजित वाटते. एकटा परशुराम हजारों क्षत्रियांचा नाश करूं शकतो हें वर्णनहि आश्चर्यकारक वाटतें.' परंतु प्रस्तुत लेखाशीं त्याचा विशेष संबंध नाहीं. या लेखाचा मुख्य विषय परशुरामाचा कोंकणाशीं संबंध आला होता कीं काय, हें ऐतिहासिक दृष्टीनें पाहण्याचा आहे. याकरतां इतिहासज्ञांनीं त्याचा काल कोणता ठरविलेला आहे तें पाहूं.

अलीकडे 'भारतीय विद्याभवन' या संस्थेनें भारतीयांच्या दृष्टिकोनांतून भारताचा इतिहास संशोधून प्रसिद्ध करण्याचें कार्य चालविलें असून त्याचे ८ भाग प्रसिद्ध झालेले आहेत. पहिल्या भागांत सुप्रसिद्ध इतिहासज्ञ डॉ. पुसाळकर यांनीं Historical

---

१. भार्गवांकडे असलेलें धन परत मागितल्यामुळें हैहय व भार्गव यांच्यांत वितुष्ट उत्पन्न झालें, ही महाभारतांतील कथा मागें दिलीच आहे. डॉ. ह. रा. दिवेकर यांनीं पुणें विद्यापीठाच्या विद्यमानें 'आमचा महाभारतपूर्व राजकीय व सांस्कृतिक इतिहास' या विषयावर व्याख्यानें दिलीं होतीं. या व्याख्यानांचें पुस्तक प्रसिद्ध झालेलें आहे. त्यांत 'पुरोहितांचे प्रयत्न' या सदराखालीं त्यांनीं भार्गव आणि हैहय यांची आपल्या दृष्टीनें माहिती दिली आहे. तिचा सारांश असा कीं, "हैहयांचे गण लूटमार करीत व लूट आणून भार्गव पुरोहितांकडे ठेवीत. पुढें कृतवीर्याच्या भाऊबंदांनीं भार्गव वर्गाजवळ धन मागितलें. पण त्या भाऊबंदांवर विश्वास नसल्यानें भृगु पुरोहितांनीं धन देण्याचें नाकारलें. या भार्गवांतील और्व नामक ऋषीला धनुर्विद्येची माहिती मिळाली व त्यानें या विद्येंत पारंगतता मिळविली. जमदग्नि हा धनुर्विद्येंत प्रवीण होता. या विद्येनेंच भार्गवांनीं हैहयांवर विजय मिळविला. हैहयांना धनुर्विद्या माहीत नव्हती."

Traditions या सदरांत प्राचीनकालांतील प्रमुख व्यक्तींचे व घटनांचे काल त्याबद्दल विचार करून दिले आहेत ते असे :–

ययाति (देवयानीचा पति. यदुवंशी) काल इ. सनपूर्व		३०००–२७५०
परशुराम	,,	२५५०–२३५०
दाशरथी राम	,,	२३५०–१९५०
श्रीकृष्ण	,,	१९५०–१४००
भारतीय युद्ध	,,	१४००[१]

अर्थात् परशुरामाचा काल इतिहासदृष्ट्या सनपूर्व अडीच हजार वर्षे म्हणजे आजपासून साडेचार हजार वर्षांपूर्वीचा ठरतो. तेव्हां इतक्या पूर्वी आर्य लोक व त्यांतील ब्राह्मण (सारस्वत) गोव्यांत आले असतील कीं काय, हें वाचकांनीच ठरवावें.

परशुरामाचा भारतांतील ब्राह्मणांशीं संबंध

प्रथमतः वर्णाश्रम होता. त्यानंतर जाती झाल्या. जुन्या काळीं वर्णांत बदल होत असे. क्षत्रियांचे ब्राह्मण व ब्राह्मणांचे क्षत्रिय झाल्याचीं उदाहरणें आहेत. यांना जातींचें स्वरूप नंतर आलें.

ब्राह्मणांत आज कितीतरी पोटजाती आहेत. त्यांपैकीं चित्पावन-कोंकणस्थ, गुजरात-मधील भार्गव ब्राह्मण, केरळमधील नंबुद्री ब्राह्मण, गोमंतकांतील सारस्वत ब्राह्मण हे आपला संबंध परशुरामाशीं जोडतात. यासंबंधींची थोडी माहिती येथें देणें अप्रस्तुत होणार नाहीं.

गुजरातमध्यें भडोचला भार्गव ब्राह्मणांची वस्ती आहे. सुरत जिल्हा व नवसारी प्रांताचा बराच मोठा प्रदेश परशुराम क्षेत्र या नांवानें ओळखला जातो. कर्मकांडांत संकल्पाच्या वेळीं परशुराम क्षेत्र असा याचा उल्लेख होतो.[२] सुप्रसिद्ध गुजराती लेखक व कायदेपंडित श्री. क. मा. मुनशी हे 'आम्ही भृगु ऋषीपासून जन्माला आलों असें मानतात' असें आपल्या आत्मचरित्रांत लिहितात.[३] भडोच जिल्ह्यांत भृगूचें देऊळ सहाव्या शतकांतील आहे. शिवाय लुहारा येथें परशुरामाचें देऊळ आहे.[४] भडोच हें कांहीं काळ पेशव्यांच्या हातांत होतें. त्यावेळीं तेथील सुभेदार भास्करराव नांवाचे कोंकणस्थ ब्राह्मण होते. भडोचमधील भार्गव ब्राह्मण व दक्षिणी चित्पावन ब्राह्मण यांच्यांत लग्नसंबंध होत होते.[५] इतर सर्व ब्राह्मणांत मामेभावंडांत लग्नें होतात. फक्त चित्पावनांत

---

१. The Vedic Age. भारतीय विद्याभवन. Dr. A. D. Pusalker. पृ.२७३ व ३०१.

२. पुरातन दक्षिण गुजरात. (गुजराती). श्री. मनुभाई द्विवेदी. पृ. १२९.

३. अडधे रस्ते. (गुजराती). श्री. क. मा. मुनशी. पृ. ७.

४. चित्तपावन. श्री. ना. गो. चापेकर. पृ. ९

५. अडधे रस्ते. श्री. क. मा. मुनशी. पृ. ६

होत नाहींत. भार्गव ब्राह्मणांत मामेआतेभावंडांत लग्नें होत नाहींत.[१] साधारणतः भडोच हा शब्द भृगुकच्छ या नांवावरून आला असें मानीत व भृगु या शब्दाचा संबंध भृगु ऋषीकडे जोडीत असत. पण अलीकडे भाषाशास्त्रज्ञांच्या संशोधनांतून डॉ. सांकळिया यांनी मूळ शब्द भरुकच्छ हा आहे व तो संस्कृत नसून ऑस्ट्रो-आशियाटिक आहे असें मत दिलें आहे.[२]

केरळमधील नंबुद्री ब्राह्मण आपणास परशुरामानें आणलें असें समजतात, हें वर नमूद केलेंच आहे. त्रावणकोरमध्यें परशुरामाचें देऊळ आहे. त्याचें चित्र 'सह्याद्रि' या ग्रंथांत प्रसिद्ध झालें आहे.[३] तेथें परशुराम शक आहे. वास्तविक हा कोल्लम नांवाचा शक आहे. याची सुरुवात इ. स. ८२४-२५ त होते.[४] हें लक्षांत घेतां त्याच्या परशुराम शक या नांवांत कांहीं तथ्य दिसत नाहीं. फक्त परंपरेनें याला परशुराम शक म्हणतात, असें वाटतें. चित्पावनांमध्येंहि अशीच परंपरागत समजूत आहे. पण "परशुरामाचा आणि चित्पावनांचा निकट संबंध आहे ही गोष्ट गृहीत धरली जाते. परंतु आमच्या मतें ज्या प्रकारचा संबंध आहे अशी समजूत आहे त्या प्रकारचा संबंध असल्याचा यत्किंचितहि पुरावा नाहीं" असें श्री. ना. गो. चापेकर सांगतात.[५] आतां सारस्वत ब्राह्मणांबद्दल सांगावयाचें झाल्यास, भृगूचा पुत्र च्यवन, त्याचा पुत्र दधीचि व त्याचा पुत्र सारस्वत आणि च्यवनाचा वंशज परशुराम अशी भृगुवंशाबद्दल माहिती मिळते आणि दधीचि व सारस्वत हे सारस्वत गणले जातात, ही गोष्ट लक्षांत घेतल्यास सारस्वतांचा संबंध परशुरामाकडे आहे असें मानलें जातें तें सकारण आहे, असें दिसून येतें.[६]

आतां परशुरामाच्या वसाहतकालाबद्दल विचार करून हा विषय पुरा करूं. परशुराम ही ऐतिहासिक व्यक्ति आहे यांत वाद नाहीं. ज्या कुलांत त्याचा जन्म झाला तें कुलहि अनेक दृष्टींनीं श्रेष्ठ व प्रभावी होतें. भार्गवांचा व क्षत्रियांचा जो झगडा झाला तो आजच्या दृष्टीनें पाहतां इष्ट वाटत नाहीं. तथापि कोणत्याहि कालांत जी विशिष्ट परिस्थिति उद्भवते तिच्यामागें त्या कालांतलीं कारणें असतात हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. आमच्यापुढील मुख्य प्रश्न परशुरामाचा व गोमंतकाचा संबंध आलेला आहे कीं काय हा आहे. वरील एकंदर माहितीवरून परशुरामाचा जो काल ठरतो, तो लक्षांत घेतां त्याचा व गोमंतकाचा संबंध हें ऐतिहासिक सत्य मानतां येत नाहीं. कारण तसें मानल्यास हा संबंध साडेचार हजार वर्षांमागें आला असें गृहीत धरावें लागतें व या गोष्टीचा

---

१. चित्तपावन. ना. गो. चापेकर. पृ. २९७.
२. भारतीय संस्कारो (गुजराती). दु. के. शास्त्री. पृ. २०८.
३. सह्याद्रि. स. आ. जोगळेकर, एम्. ए. एल्. एल्. बी., पृ. १.
४. हिंदुस्थानमां जुदा जुदा शक (गुजराती). म. स. दवे.
५. चित्तपावन. ना. गो. चापेकर. पृ. ८.
६. भृगूची पृ. ६८ वरील वंशवेल पहा.

इतर उपलब्ध माहितीशीं मेळ पडत नाहीं. ह्या वसाहतींबद्दल आजच्या काळीं दंतकथा प्रचलित आहेत त्या वसाहती मूळ परशुरामानें केल्या नाहींत, असें कै. श्री. म. माटे यांनीहि आपलें मत दिलें आहे.[१] परशुरामाचा पिता जमदग्नि याचा आश्रम नर्मदा नदीच्या तीरावर होता.[२] नर्मदा नदी ही मध्यप्रांतांतील मंडला जिल्ह्यांत अमरकंटक पर्वतांत उगम पावते व ८०१ मैल वाहात जाऊन भडोचजवळ समुद्राला मिळते. नर्मदा ही उत्तर व दक्षिण यांची सीमा आहे.[३] त्यावेळीं आर्य उत्तरेच्या अखेरच्या सीमेवर पोंचले होते, व त्यानंतर केव्हांतरी परशुराम कुलांतील वंशजांचा पश्चिम समुद्राच्या तीरावर प्रवेश झाला असावा. येथें एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, महाभारतांत परशुराम शूर्पारक (सोपारा, उत्तर कोंकण) येथें रहावयास आला, असें आहे. तो गोमंतकांत आल्याचा उल्लेख सांपडत नाहीं.

तेव्हां गोमंतकांतील सारस्वतांच्या पूर्वजांना परशुरामानें आपल्यासोबत इथें आणलें, या म्हणण्यांत तथ्य असल्याचें दिसून येत नाहीं. केवळ बऱ्याच काळापासून चालत आलेली एक दंतकथा, इतकेंच या गोष्टीचें महत्त्व.

---

१. परशुराम चरित्र. श्री. म. माटे. पृ. ७४.
२. प्राचीन चरित्रकोश. विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव. 'परशुराम' पहा.
३. सुलभ विश्वकोश. दाते व कर्वे. 'नर्मदा' शब्द पहा.

भृगुवंश



(डॉ. सुखटणकर - भृगुवंश व भारत).



(स. आ. जोगळेकर - सह्याद्रि, पृ. ४०३)

७

दक्षिण कोंकणांतील सारस्वत ब्राह्मण

आर्य लोकांची वसती प्रथमतः पंजाब व काश्मीर या भागांत, विशेषतः तेथील सरस्वती नदीच्या परिसरांत झाली. त्या काळीं वर्णभेद होता. व्यक्ति आपल्या जीवनांत ज्या मुख्य कर्माचा चरितार्थाचें साधन म्हणून उपयोग करीत असे त्यावरून हा वर्ण ठरत असे. वर्णांत बदलहि होत असे. आजची जातिस्थिरतेची परिस्थिति त्या काळीं नव्हती.

ब्राह्मण शब्दाचा अर्थ ब्रह्मकर्म करणारा असा आहे. ब्रह्मन् म्हणजे बृह (=स्तुति करणें) + मन् या अर्थी याज्ञिक वाङ्मयांत हा मूळ शब्द रूढ झाला. हिंदु धर्मांतील पुरोहित, उपाध्याय हा ब्राह्मणवर्ग पर्शुभारतीय कालांत अथर्वन् किंवा अश्वन् या नांवानें ज्ञात होता. पुरुषसूक्तांत चार वर्णांची उत्पत्ति दिली आहे.[१]

ब्राह्मणांतील एका वर्गाला पुढें सारस्वत असें नांव प्राप्त झालें. या नांवाची उपपत्ति दोन प्रकारें लावण्यांत येते. पहिली उपपत्ति महाभारतांतील कथेवर आधारलेली आहे. ही कथा अशी :– दधीचि नांवाचा एक ऋषी सरस्वतीतीरावर होता. त्याला भुलविण्याकरतां इंद्रानें अलंबुषा नांवाची अप्सरा पाठविली. त्या प्रसंगीं त्याचें रेत नदींत पडलें, त्यापासून पुढें पुत्र झाला तो सारस्वत होय. या दधीचि ऋषीच्या अस्थींची गरज देवांना वृत्रवधासाठीं पडली. त्यानें प्राणत्याग करून अस्थी दिल्या. पुढें याचा पुत्र सारस्वत याच्या काळीं त्या भागांत अवर्षणाची आपत्ति ओढवली. लोक दुसरीकडे निघून गेले. परंतु सारस्वत ऋषीनें मत्स्याहारावर राहून तो काळ काढला आणि वेदाध्ययन चालू ठेवलें. पुढें पाऊसपाणी झाल्यावर बाहेर गेलेले लोक परत आले. जे वेद विसरले होते त्यांनीं सारस्वत ऋषीकडे पुन्हा शिक्षण घेतलें.[२] या ऋषीच्या वंशजांना तसेंच शिष्यांना 'सारस्वत' हें नांव पडलें. दुसरी उपपत्ति अशी कीं, पूर्व पंजाबमधील सरस्वती नदीच्या खोऱ्यांत राहणारे लोक म्हणजे सारस्वत.[३] या दोहोंपैकीं दुसरी उपपत्ति जास्त ऐतिहासिक वाटते. सरस्वती नदीची माहिती या पुस्तकांत एका स्वतंत्र लेखाच्या द्वारें आम्ही दिलीच आहे. मनुस्मृतींत "सरस्वती व दृशद्वती या दोन देवनद्यांमधील प्रदेश तो ब्रह्मावर्त. या देशांत विद्वान लोक राहतात. तसेंच कुरुदेश, मत्स्यदेश, पांचालदेश (कान्यकुब्ज), शूरसेन (मथुरा) यांना ब्रह्मर्षिदेश अशी संज्ञा देऊन हा प्रदेश ब्रह्मावर्तापेक्षां थोडा कमी समजला जातो,[४]" असें म्हटलें आहे.

---

१. सुलभ विश्वकोश. य. रा. दाते व चिं. ग. कर्वे. 'ब्राह्मण' शब्द.

२. महाभारत (मराठी). शल्यपर्व, अ. ५१. कर्नाटक मुद्रणालय.

३. Saraswat = People of the Saraswati (Sarasuti) Valley in the Eastern Punjab. Geography of Ancient and Medieval India. Dr. D. C. Sarkar. पृ. ३३.

४. मनुस्मृति (मराठी भाषांतर). अ. २ – १७।१८।१९. चित्रशाळा प्रकाशन.

वर्ण मुळांत बदलत असे. पुढें याला जातीचें स्वरूप आलें. व ह्या जातींना स्थिर स्वरूप प्राप्त झालें. ब्राह्मणांत पुढें पंचगौड व पंचद्राविड असे भेद झाले. विन्ध्य पर्वताच्या उत्तरेस राहणारे ते गौड व दक्षिणेस राहणारे ते द्राविड[१] अशा संज्ञा ठरल्या. पंच-गौडांत सारस्वत (सरस्वतीचा परिसर), कान्यकुब्ज (कनोज), गौड (उत्तर कौशिकचा भाग , मैथिल (विहार) व उत्कल (ओरिसा) यांचा समावेश होतो.

पंचगौड शब्द केव्हां तयार झाला ?

पांचगौड असा शब्द प्रथमतः कल्हणाच्या राजतरंगिणी या ग्रंथांत मिळतो. त्यांत "काश्मीरचा राजा जयापीड हा (काल अंदाजें आठवें शतक) गौड राजा जयंत पौंड्रवर्धन (बंगाल) याजकडे गेल्यावर व त्याचा जांवई झाल्यावर विशेष सहाय्य सामुग्रीची अपेक्षा न ठेवतांच त्यानें पांचगौड राजाचा पराभव केला व त्याला जयंत राजाचा मांडलीक बनविलें."[२] असा उल्लेख केलेला आहे. या बाबतींत एका बंगाली इतिहास-ज्ञाचें मत असें कीं, " पंचगौड हा शब्द राजतरंगिणी ग्रंथांत प्रथम आढळतो. पाल सम्राट् (बंगाल) धर्मपाल व देवपाल यांच्या कालांत गौडेश्वराच्या राष्ट्रीय प्रभुत्वविस्ताराचा इतिहास या नांवांत मिळतो, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं."[३] या पाल राजाचें प्रधानपद कांहीं पिढ्या मिश्र आडनांवाच्या ब्राह्मणाकडे होतें. धर्मपाल या बंगालमधील राजाच्या कारकिर्दीची सुरुवात नवव्या शतकाच्या आरंभीं झाली.[४] या कालांत हा शब्द तयार झाला असणें शक्य आहे. आपले कै. शणै गोंयबाब (वर्दे वालावलीकर) यांचें मत "पंचगौड व पंचद्राविड ही विभागणी भागवतपुराणाच्या पूर्वी एक शतक झाली असावी. ही ९ व्या शतकाच्या सुमारास झाली असली पाहिजे."[५] असेंच आहे.

सारस्वतांतील नामभेद

या नामभेदांचें ग्रंथांतून मिळणारी नोंद अशी :–

सारस्वतभूषण (मठस्थ गणेश रा. शर्मा) पृ. ७२ :– सासष्टकर, बारदेशकर, कुडाळदेशकर, पेडणेकर, लोटलीकर, भालावलीकर.

कोंकणाख्यान (शके १६४३ – सन १७२१) :– गौडांतर्गत सारस्वत, पेडणेकर, कुडाळदेशकर, बारदेशकर, शणवैपैकी, राजापुरी, भालावलीकर, अवसरे, नरवणे.

---

१. मुंबई इलाख्यांतील जाती (मराठी अनुवाद). मि. एन्थोवेन. स. साहित्यमाला. पृ. १४१.
२. राजतरंगिणी (मराठी अनुवाद). मा. व्यं. लेले, बी. ए. एल्एल. बी. पृ. ९८.
३. बांगालीर इतिहास (बंगाली). डॉ. निहाररंजन राय. पृ. १५३.
४. गौड देश – पाल साम्राज्य. का. दा. नायक. भारतमित्र, रिवण.
५. कांहीं मराठी लेख. शणै गोंयबाब. पृ. ३००.

Etnographia da India Portuguesa (Dr. A. B. de Bragança Pereira) Vol. 2, P. 4 :- स्मार्त, साष्टीकर, बारदेशकर, पेडणेकर, कुडाळदेशकर.

The Indian Caste (मंगळूरचे खिस्ती गृहस्थ J. S. B.) पृ. ५८-५९ :- १ गौड सारस्वत a. शेणवी b. साष्टीकर किंवा कोंकणी c कोचीकर, २ पेडणेकर, ३ बारदेशकर, ४ भाल्वाल्कर, ५ राजापुरकर, ६ कुडाळदेशकर, ७ लोटलीकर, ८ कुडपेखजुले, ९ दिवाडकर, १० नरवणकर, ११ कुशस्थळी अगर केळोशीकर (स्मार्त चित्रापुर मठाचे).

मुंबई इलाख्यांतील जाती (मे. आर. इ. एन्थोवेन आय. सी. एस.) पृ. १७० :- सारस्वतांत बारदेशकर, भालावल्कर, दिवाडकर, गौडसारस्वत, लोटलीकर, पेडणेकर आणि सारस्वत अथवा कुशस्थली, कजुले, खडपे, किर्लोस्कर, नर्वाणकर, राजापुरकर असे बारा पोटभेद आहेत.

वरील नांवें त्या त्या पुस्तकांतील दिलेलीं असून जिज्ञासूंनीं तीं पुस्तकें पहावीं.

आज स्पष्टपणें सांगावयाचें झाल्यास स्मार्त, वैष्णव (वैष्णव संप्रदायांत बारदेशकर यांचा समावेश होतो, पण आज तो वर्ग त्यांत मिसळून गेल्यासारखा आहे.), पेडणेकर, कुडाळदेशकर व शणैपैकीं असेच भेद दिसतात. यांतील पेडणेकरांशिवाय इतरांचे स्वतंत्र मठ किंवा धर्मसंस्थानें आहेत.

धर्मपीठें किंवा धर्मसंस्थानें

१. पर्तगाळी-गोकर्णमठ- हा शके १३७८ पासून चालू असून विद्यमान मठाधिपति श्रीमद्द्वारकानाथतीर्थ स्वामी हे आहेत. येथपर्यंत २३ परंपरा झाल्या असून नुकतीच श्रीस्वामींनी नवीन शिष्यांना दीक्षा दिली आहे. यांचें नांव श्रीमद्विद्याधिराजतीर्थ असें आहे. या श्रीसंस्थानचें आराध्यदैवत तिसरी वीरविष्ठलप्रतिमा असून नित्यपूजनांत तिचा समावेश होतो, व त्याच नामानें रायसपत्रांवर व संस्थानच्या कागदपत्रांवर शिक्कामोर्तब होतें. या पीठाचे अनेक मठ आहेत. शिष्यसंप्रदाय मुख्यतः गोमंतक आणि दक्षिण व उत्तर कानडा येथें असून शिवाय मुंबईत व कर्नाटकांतहि आहे.

२. धर्मसंस्थान कोची ऊर्फ काशीमठ (वैष्णव संप्रदाय) - या पीठाचा शिष्यवर्ग दक्षिण कर्नाटक, उडुपी पासून थेट मलबार कोचीन ते त्रावणकोरपर्यंत आहे. याचें आराध्यदैवत श्रीव्यास रघुपति असून याचेहि अनेक मठ आहेत.

संप्रदायाच्या दृष्टीनें आचारविचारांत या दोन पीठांत विशेष फरक नाहीं.

३. श्रीसंस्थान गौडपादाचार्य कवळें मठ — श्रीमच्छंकराचार्य यांना उपदेश देणारे श्रीमद्गौडपादाचार्य हेच कवळें मठाचे आदिपुरुष मानले जातात. विद्यमान मठाधिपति श्रीसच्चिदानंद सरस्वती हे ७७ वे आहेत. या पीठाचे अनेक ठिकाणीं मठ असून श्रीस्वामींचें वास्तव्य मुख्यतः कवळें व खानापूर येथेंच असतें.

४. चित्रापूर मठ – या मठाचा शिष्यवर्ग प्रमुखतः मंगळूर येथें तसेंच इतर ठिकाणीं स्थायिक झालेल्या शणैपैकीं अगर शेणवीपैकीं वर्गाचा आहे. हा मठ भटकळ बंदरापासून कांहीं मैलांवर शिराळी गांवालगत चित्रापूर येथें आहे. याची स्थापना शके १६४० च्या सुमारास झाली असावी.

५. दाभोळी मठ – हा वेंगुर्ल्यानजीक दोन डोंगरांच्या मध्यें दाभोली खेडेगांवांत आहे. याचा शिष्यवर्ग कुडाळदेशस्थांचा म्हणजे जे आपणास आज आद्यगौड म्हणवितात त्यांचा आहे.[1]

दक्षिणी सारस्वतांचे वेद

अखिल दाक्षिणात्य सारस्वत ऋग्वेदी व आश्वलायनसूत्र शाकल शाखाध्यायी आहेत.[2] उत्तरेकडील सारस्वतांत इतर वेद व शाखा बऱ्याच प्रमाणांत आढळून येतात.

देवदैवतें

सह्याद्रिखंड नांवाच्या नंतरच्या कालांतील संस्कृत ग्रंथांत असे श्लोक आहेत :–

आनीता भार्गवेणैव गोमांताख्ये च पर्वते ।
मांगिरीशो महादेवो महालक्ष्मी च म्हालसा ॥५२॥
शांतादुर्गा च नागेशः सप्तकोटीश्वरः शुभः
तथा च बहुला देवा भार्गवेण तु आनीताः ॥५३॥

उत्तररहस्य, प्रथमाध्याय.

भार्गवराम अर्थात् परशुराम याचा काल किती मागें जातो हें आम्ही 'भार्गव परशुराम व गोमंतक' या लेखांत दाखवून दिलेंच आहे. परशुरामाच्या कालीं आर्यांच्या देवता कोणत्या होत्या हें आज जुन्या इतिहासाची ओळख असलेल्यांना सांगावयास पाहिजे असें नाहीं. अनुलोम विवाह भारतांत आलेल्या आर्यांनीं मान्य केला व तसे धर्मनियम केले. साधारणतः यावेळीं त्यांना त्या स्त्रीवर्गाचीं दैवतें मान्य करावीं लागलीं. लिंगाला दैवत मानण्याची पद्धत मानवी संस्कृतीच्या आरंभींची दिसते. हिंदुस्थानांतच नव्हे तर जगांत अनेक ठिकाणीं ही पूर्वकाळीं होती. डॉ. पेंडसे म्हणतात, "याविषयीं एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे ती ही कीं, सजीव अशा बालकाचा जन्म मनुष्याला नेहमींच आश्चर्यकारक वाटत आला असला पाहिजे. मानवी जीवांत देहाचा प्रवेश कसा होतो, हें आजहि गूढच आहे. याचा मानव जेव्हां विचार करूं लागला तेव्हां अगदीं नजीकचें दृश्य कारण म्हणजे पुरुष व स्त्रियांचीं जननेंद्रियें आहेत

---

१. सविस्तर माहितीकरतां 'सारस्वतभूषण', 'श्रीशांतादुर्गा चतुःशताब्दि ग्रंथ' आणि 'गुरुपरंपरामृत' हे ग्रंथ पहावे.

२. सारस्वतभूषण. मठस्थ गणेश रा. शर्मा. पृ. १७०.

असें त्याला वाटूं लागलें व त्यांनाच तो देव मानूं लागला."[१] प्रथमतः असें मानतांना त्याला अवघडल्यासारखें वाटत नव्हतें. कारण तें उघडें सत्य होतें. पुढें सुधारलेल्या मानवी मनांत अश्लीलतेचा विचार आला. त्यामुळें त्या देवतेबद्दल श्रद्धा निर्माण होण्याकरतां चमत्कारांच्या दंतकथा त्यानें मुद्दाम निर्माण केल्या. लिंगावर गाय दुधाची धार सोडते ही दंतकथा श्रीमंगेशाबद्दल आहे.[२] अशा दंतकथा सबंध भारतीय वाङ्मयांत सांपडतात. अशा सातआठ दंतकथांची नोंद माझ्याकडे आहे.

दुसरें म्हाळसेचें उदाहरण घेऊं. हेंहि दैवत परशुरामानें आणल्याचें सह्याद्रिखंड सांगतें. पण ही देवता महाराष्ट्रांत म्हाळसा आणि कर्नाटकांत माळव्य या नांवानें लोकप्रिय होती.[३] "म्हाळसा ही खंडोबाची पत्नी म्हणून आज नांदत असली तरी ती स्वतंत्र देवता होती. स्थानपोथींत भोगावती (पैठण), वालसेंग (जि. औरंगाबाद), नांदुरा (जि. बीड) आणि नेवासें (जि. नगर) या चार स्थानीं म्हाळसेचीं मंदिरें असल्याचा उल्लेख आहे."[४] नेवासें येथील देवतेला मोहिनीराज असें लोकप्रिय नांव असून तो विष्णूचा अर्धनारीनटेश्वर अवतार आहे अशी लोकांची कल्पना आहे.[५] गोमंतकांतील म्हाळसेबद्दल सुरा आणि अमृत यांसंबंधींचा देवदैत्यांतील खटका मिटविण्याकरतां श्रीविष्णु सुंदर स्त्रीरूप धारण करून मोहिनी बनला,[६] अशी कथा आहे. तेव्हां हीं येथील म्हाळसेचीं दैवतें कशीं आलीं, हा प्रश्न उपस्थित होतो. त्याचें उत्तर "अकराव्या शतकांतील शिलालेख आणि देवीभागवत यानुसार माळचिदेवी (म्हाळसा) ही ग्रामदेवतेच्या स्वरूपाचा त्याग करून शक्तिस्वरूप पावली"[७] यांत मिळतें. नेवासें येथें उत्खननांत इतिहासपूर्व काळांतील संस्कृतीचे अनेक स्तर सांपडले आहेत. तेव्हां जुनें म्हाडदोळ म्हणजे आजचें वेर्णे येथें ज्या डोंगरावर ही देवता होती तेथें उत्खनन झाल्यास तेथेंहि इतिहासपूर्वकालीन कांहींतरी अवशेष सांपडतील व या दैवताच्या इतिहासावर जास्त प्रकाश पडेल, अशी खात्री वाटते.

अर्थातच यांतील बरींचशीं दैवतें आर्यपूर्व कालीं येथें असलेल्या लोकांचीं होतीं. म्हाळसेचा पुजारी गुरव होता हें याचें एक प्रत्यंतर आहे. आपल्या गोमंतकांत लिंगदेवता सांतेर व रवळनाथ वगैरे आहेत. या द्रविड व इतर आर्येतरांच्या आहेत.

---

१. भागवतधर्माचा विकास. डॉ. शं. दा. पेंडसे. पृ. ९४.
२. गौड सारस्वत ब्राह्मणांचे कुलदेव. वि. रं. शेळडेकर. पृ. ४२.
३. खंडोबा. रा. चिं. ढेरे. पृ. ६२.
४. तत्रैव. पृ. ६६.
५. ,, पृ. १४१.
६. गौड सा. ब्रा. कुलदेव. वि. रं. शेळडेकर. पृ. ५६.
७. खंडोबा. रा. चिं. ढेरे. पृ. ६२.

सांतेरीचें मूळ स्वरूप वारूळ होय. ही मुळांत सर्पदेवी म्हणून पुजली जात असावी.[१] वारूळ वाढतें कसें याची पूर्वी मानवाला नीट कल्पना नव्हती. त्यामुळें त्याला त्यांत दैविक कारण दिसलें. कांहींच्या मतें 'शांतिकारी' या संस्कृत शब्दावरून 'सांतेरी' हें कोंकणी रूप झालें.[२] पण यांत कोंकणी बोलीचा अभिमान दिसतो. आम्हांला सांतेर हा शब्दच मूळ दिसतो. सान्तर अगर सांतर हा शब्द मराठींत असून त्याचा अर्थ अंतरांनीं युक्त असा आहे. बंगालींतहि सांतर शब्दाचा अर्थ भोकें असलेला असाच आहे. यावरून सांतेर हा शब्द मूळच्या वारूळ या अर्थानें युक्त असून मग त्याचें संस्कृत रूप 'शांतिकारी' झालें, हें दिसून येतें. गोव्यांत वारुळाचीं देवळें आहेत. कित्येकांत वारुळापुढें मूर्ती ठेवलेल्या आहेत. गोमंतकांतील एक कवळें येथील शांतादुर्गा सोडली तर बहुतेक शांतादुर्गा या महिषासुरमर्दिनी रूपाच्या आहेत.[३] त्यामुळें मूळची सांतेर नंतर दुर्गा झाली व दुर्गेचीं उग्र व शांत रूपें जीं सप्तशतींत दिलेलीं आहेत त्यामुळें कित्येकांनीं शांतादुर्गा असें नांव दिलें. असो.

गोमंतकांतील दैवतांबद्दल लिहावयाचें झाल्यास त्यावर स्वतंत्र पुस्तक लिहावें लागेल. लोकांना तो इतिहास आवडेलच असें सांगतां येणार नाहीं. कारण त्यामुळें श्रद्धेला तडा बसण्याचा संभव आहे. पण इतिहासाच्या अभ्यासकाला श्रद्धेचाच विचार घेऊन बसतां येणार नाहीं. या ठिकाणीं या विषयाचें सविस्तर विवेचन करणें शक्य नसल्यानें इतक्यावरच थांबणें भाग आहे.

सारस्वतांचीं देवस्थानें

गोमंतकांत देवस्थानें अनेक असलीं तरी संपन्न अशीं थोडींच आहेत. या सर्व देवस्थानांचा महाजनवर्ग आज कायदेशीर रीत्या ठरलेला आहे व त्यालाच त्या देवस्थानच्या अंतर्गत कारभारांत हक्क असतो. साधारणतः ढोबळ मान असें कीं, एखाद्या दैवताला कुलदैवत मानणाऱ्या कुटुंबांनाच त्या दैवताच्या देवस्थानांत महाजनकीचा हक्क प्राप्त होतो. गोमंतकांतील कांहीं देवस्थानें ठराविक जातीचीं ठरलीं असून बरींचशीं संमिश्रहि आहेत. यांत फक्त सारस्वतांचीं अशीं कांहीं देवस्थानें आहेत.

एक प्रश्न

या बाबतींत एक प्रश्न उपस्थित होतो तो असा कीं, कांहीं कऱ्हाडे ब्राह्मण कुटुंबें श्रीशांतादुर्गा-कवळें तसेंच म्हाळसा-म्हाडदोळ या दैवतांना आपली कुलदेवी मानतात.[४]

---

१. प्राचीन महाराष्ट्र. भाग २. डॉ. श्री. व्यं. केतकर. पृ. २५४.

२. ऐन वेळार. शणै गोंयबा.ब. पृ. १३८.

३. श्रीकामाक्षा, शिरोडें, ह्या देवीची मूर्ति महिषासुरमर्दिनीचेंच रूप दिसते. पहा शेळडेकरकृत "गौड सा. ब्रा. कुलदेव." पृ. १२७.

४. सारस्वत ब्राह्मण आणि त्यांचें सारस्वत. श्रीशांतादुर्गा चतुःशताब्दि ग्रंथ. प्रा. अ. का. प्रियोळकर. पृ. १६.

पण हीं देवस्थानें सारस्तांचींच समजलीं जातात व कोयद्यानेंहि तेच महाजन ठरलेले आहेत.

वास्तविक कुलदेवी मानल्यानंतर साधारणतः ढोबळ मानानें तें कुटुंब त्या देवस्थानचें हक्कदार गणलें जातें. यांतील कांहीं सारस्वत कुटुंबें जुन्या काळीं गोव्याबाहेर गेलीं. त्यावेळीं तीं कुटुंबें बाहेर राहात असल्यामुळें जरी त्यांना अंतर्गत कारभारांत भाग घेणें शक्य नव्हतें तरी त्यांचा हक्क गेला नव्हता. तीं कुटुंबें स्वतःला महाजनच समजत असत. तेव्हां कांहीं कऱ्हाडे ब्राह्मणांनीं आपलीं कांहीं कुलदैवतें मानलीं असतांहि आपण त्या देवस्थानचे महाजन आहोंत ही भावना त्यांच्यांत नसावी, यांचा नीट उलगडा होत नाहीं. हे भजकच होते कीं काय, अशी शंका येते. कित्येकांचें मत या बाबतींत असें कीं, मूळचे सर्व भजकच होते आणि पुढें केव्हांतरी हा हक्कदार महाजन वर्ग उत्पन्न झाला असावा.

'शेणवी' उपनांवाबद्दल विचार

आतां मी ज्यांच्याविषयीं कांहीं मतभेद आहेत अशा प्रश्नांकडे वळतों. यांपैकीं एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे शेणवी या उपनांवाच्या उपपत्तीबद्दलचा होय.

शेणवी शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल खालीलप्रमाणें मतें आढळून येतात :–

(१) मराठी व्युत्पत्तिकोश :– शेणवई-वी–सारस्वत समाजापैकीं एक पोटविभाग (सं. सेना. पा. सेना, प्रा. सेणा, का. सीना, हिं. सेन. सं. सेनापति, पा. सेनापति, प्रा. सेणावई. कांहीं नांवांच्या शेवटीं 'सेन' उपपद असतें.)[१]

(२) डॉ. रा. गो. भांडारकर यांचें मत :– M. शेणवई or य – Name of caste. Pr. शेणावई. Skr. सेनापति. M. शेणवी.[२]

(३) वि. का. राजवाडे यांचें मत :– १ श्रेणीपति – सेणीवइ – सेणीवी – सेणवी. श्रेणी म्हणजे व्यापाऱ्यांचा किंवा कारागिरांचा संघ. त्याचा मुख्य म्हणजे श्रेणीपति.

२. सैन्यपति-सेण्णवइ-सेणवी-सेनापति म्हणजे शेणवी.

राजवाडे म्हणतात, "ह्या दोनहि व्युत्पत्ति येथें कारकून किंवा कुळकरणी या अर्थी लागू पडत नाहींत. तेव्हां शणवइ, शेणोई या शब्दांचें आणीक कांहीं तरी मूळ आहे. सेनापति व श्रेणीपति हे तर दोन अर्थ आहेतच, परंतु कारकून असा तिसराहि एक अर्थ आहे यांत संदेह नाहीं."[३]

शिलालेखांतील उल्लेख

नुकताच 'प्राचीन मराठी कोरीव लेख' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. त्यांत सेणवै सेणवैया शब्द आहेत. प्रस्तावनेंत संपादक शं. गो. तुळपुळे म्हणतात :—

---

१. मराठी व्युत्पत्तिकोश. कृ. पां. कुळकर्णी. पृ. ६९३.

२. Wilson Philological Lectures. Sir R. G. Bhandarkar. पृ. ४१९.

३. आपलीं नावें आणि आडनांवें. प्रिय आणि अप्रिय. प्रा. अ. का. प्रियोळकर. पृ. ५६.

" क्षत्रिय जातींतील 'सेणवी' या उपजातीचा निर्देश कांहीं लेखांतून असावा असें वाटतें. कांहीं ठिकाणीं हा शब्द लेखकवाचक आहे. (उदा० 'लिषातं सेणवै हरिदेवें' ३६-७४; 'लिहित सेणवि' ५३-२८) कांहीं ठिकाणीं तो कुलनामदर्शक वाटतो. (उदा० 'सांघोलि याचा सेणवैया' ३४-१-३; 'माइं सेणवैया' ५८-४; 'पुरुष सेणवैया' ५९-५ इ.). क्वचित् तो सेनापतित्व सुचवितो असें वाटतें. (उदा० 'आठागार आधिकारिआ कृतनाकु हासणनाकाचा सेणवै देउप्रो' ५५-५). अक्षीच्या लेखांतील भइर्जु हा शिलाहार केशिदेवाचा महाप्रधान व तसेंच 'सेणुई'हि आहे. (१-४). सारांश सेणवि किंवा सेणवै किंवा सेणवैया हें पद प्रस्तुत लेखसंग्रहांत निरनिराळ्या अर्थांनीं येतें.

याच पृष्ठावर अशी टीप आहे :– 'सेणवी किंवा शेणवी हा शब्द सामान्यतः सं. सेनापति या शब्दापासून व्युत्पादिला जातो. परंतु त्याचें मूळ सं. श्रेणि(मान) या शब्दांतहि असूं शकेल. श्रेणिमान म्हणजे संघनायक. श्रेणीचे उल्लेख कलचुरीच्या लेखांत येतात. पंढरपूरच्या चौऱ्यार्शीच्या लेखांतील 'सेणवैया' चे निरनिराळे उल्लेख वरील अर्थानें असण्याची शक्यता आहे.'"

शेणवी या शब्दाचा अर्थ लिहिणारा असा ज्या ताम्रपटांवरील लेखांत आहे ते असे :–

"रमणस मंडलिक व जाखण मंडलिक त्यांचा कशेळी (जि. रत्नागिरी) ताम्रपट. काल इ. स. १२७९. क्र. नं. ३६. आशय– शिलाहार वंशांतील श्रीहरिपालदेव राज्य करीत असतांना त्याचा सेवक श्रीनारायण मंडलिकाचा पौत्र आणि त्यानंतरच्या श्री वैजु नायकाचा पुत्र (विद्यमान) रमणस मंडलिक यानें व ग्रामदेव कंकेश्वराच्या कृपेनें त्याचा भाऊ कांदेवसुत श्रीमहामंडलेश्वर जाषण मंडलिक यानें देवळाचा जीर्णोद्धार केला. हें (शासनपत्र) लिहिणारा सेणवी हरिदेव हा असून कोंतापुरीच्या वज्यन सोनारानें तें 'उतकरित' केलें म्हणजे ताम्रपटावर कोरलें."

मूळ :– लिषातं सेणवै हरिदेवें उतकरित कोंतापुरीचेन वज्यन सोनारें.

डॉ. मो. ग. दीक्षित यांनीं हा लेख मराठी संशोधन पत्रिका वर्ष ६ अंक ४ मध्यें प्रकाशित केला असून त्यांत 'लिषा(खि)तं सेणवै हरिदेवें' असें दिलें आहे.

दुसरा खाटेग्रामचा ताम्रपट. इ. स. १३४८, क्र. नं. ५३ :–

मल्लिकबहादुर राज्य करीत असतांना विमानमंत्री याचे अग्रहार खाटेग्राम (खांडेपार-गोवा) श्रीगणनाथ देवळाच्या प्राकारांत (भरलेल्या) बैठकींत समस्त नगराचा मेळावा भरला.

---

१. प्राचीन मराठी कोरीव लेख. सं. शं. गो. तुळपुळे. पृ. ९६.

गोवें प्रांतांतील खाटेग्रामचे वाणी व सोनार यांत तंटा झाला. त्या प्रसंगीं वेरें गांवांतील वाणी आपल्या ज्ञातिबांधवांच्या सहाय्यास धावून आले व त्यांनीं समयाचा मान राखला.

मूळ लेख 'लिहित सेणवि कुळतळि ग्रामे सारांतु मांग सेणवि'[1] यांत 'लिहित सेणवि' असें स्पष्ट आहे. हा ताम्रपट डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर यांनीं Inscriçõoes pre-portuguesas de Goa या पुस्तकांतहि प्रसिद्ध केला आहे.

यावरून असें दिसून येते कीं, मूळ व्युत्पत्तिदृष्ट्या या शब्दाचा अर्थ सेनापति असा असला तरी पुढें त्याला लेखक, शिक्षक असा बौद्धिक श्रेष्ठत्वदर्शक अर्थ प्राप्त झाला. यामुळें जे हें काम करीत त्यांना तो लागू झाला. बहुसंख्य कुटुंबांना हें उपनांव लावलें जाण्याचें हें कारण दिसतें.

आतां कोशांत या शब्दाचा अर्थ काय दिला आहे तें पाहूं. मोल्स्वर्थच्या कोशांत दिलेला अर्थ असा :– शेणवी A division or distinction or an individual of it, among Brahmans. They have the अधिकार or right of त्रिकर्म or one half of the appropriate षट्कर्म; i. e. they may observe अध्ययन sacred study, दान giving of alms or gifts, याजन procuring or effecting sacrifice through another; whilst they are precluded from अध्यापन teaching the sacred books, प्रतिग्रह Accepting of donations; यजन offering sacrifice in and for ones own person. Their use of fish is amongst the original grounds of their degradation and preclusion.[2]

महाराष्ट्र शब्दकोशांत दिलेला अर्थ पुढीलप्रमाणें :– शेणवी पु. एक ब्राह्मणजात; सारस्वत; मुख्यतः लेखनव्यवसाय करणारी एक जात. इतर रूपें :– शणै, शानई, शणई (सं. सेनापती, प्रा. सेणावई, शाण्णवी).

'शेणवी' उपनांवाबद्दल आणखी कांहीं मतें

या उपनांवाबद्दल आणखीहि वेगवेगळीं मतें व्यक्त झालीं आहेत, तीं खालीं देत आहें :–

कै. रामचंद्र भि. गुंजीकर यांनीं शर्मन् आर्य=शण्वाय, शेणवई, तसेंच शेणवी= शोहणे ब्रह्मणो (शुचिर्भूत ब्राह्मण)[3] अशी दोन प्रकारांनीं या शब्दाची व्युत्पत्ति लावली आहे.

---

१. प्राचान मराठी कोरीव लेख. प्र. पुणें विद्यापीठ.

२. Dictionary Marathi and English. 1857. Second Edition. J. T. Molesworth.

३. सरस्वतीमंडल. रा. भि. गुंजीकर. पृ. ४८-५०.

श्रेणयः यांचेंच प्राकृत रूप शेणय, शेणवी किंवा शेणवई, असें कै. वामन मं. दुभाषी यांचें मत आहे.

प्रा. अ. का. प्रियोळकर यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, "शिक्षाज्ञपति किंवा शिक्षापणपति असा शेणवी शब्दाचा उगम असणें अशक्य नाहीं."[२]

कै. तालमकी यांचें मत असें कीं, " ... the word is derived from 'shahana' which in the Konkani has the form 'shano' and means learned .... *Shenai mam* in Goa in olden times meant and even now means a school master of the old type. "[३]

आणखी एक मत असें व्यक्त केलें जातें कीं, सारस्वतांची वसाहत पहिल्याप्रथम गोमंतकांतील सासष्टी व तिसवाडी या तालुक्यांत झाली. या दोन्ही तालुक्यांतील गांवांची संख्या ९६ भरते. या संख्येवरून शाण्णवी हें नांव तयार होऊन त्याचेंच पुढें शेणवी झालें. पण या उपपत्तींत तथ्य दिसत नाहीं. कारण सासष्टी व तिसवाडी या दोन्ही तालुक्यांतील थोडेच गांव ब्राह्मणांचे असून बरेचसे क्षत्रियांचे व इतरांचे आहेत. ते सारे गांव ब्राह्मणांचे असते तर या मतांत कांहीं अर्थ आहे असें म्हणतां आलें असतें. परंतु तसें नसल्यानें तें विचारांत घेतां येत नाहीं.

प्रा. स. गं. मालशे यांनीं 'मेस्तक शाणोपणाची पद्धती' हें जुनें काव्य 'मराठी सं. पत्रिका' त्रैमासिकांत प्रसिद्ध करून त्याला प्रास्ताविक लिहिलें आहे. त्यांत शेणवी या शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल चर्चा केली आहे. त्यांत आम्ही वर दिलेल्या माहितीपैकीं कांहीं असून नवीन अशी खालील आहे :–

"प. कृ. गोडे यांनीं आपल्या "दि ॲटिक्विटी ऑफ रिकास्ट नेम 'सेणवी'" या लेखांत याबद्दलची चर्चा केली आहे. त्यांनीं एस. एस. तालमकी यांच्या 'सारस्वत फॅमिलीज' या ग्रंथांतील प्रस्तुत शब्दासंबंधींची चर्चा उद्धृत केली आहे. तिचा आशय असाः– (अ) शेणवी हा शब्द उत्तर हिंदुस्थानांत 'श्रेणी' या शब्दापासून व्युत्पादिला जातो. (आ) त्याचें मूळ शर्मन् किंवा शर्मन् आर्य यांत शोधलें जातें. (इ) हा शब्द 'शाहाणा' शब्दापासून आला आहे. कोंकणींत त्याचें रूप 'शाणो' असें असून त्याचा अर्थ 'विद्वान' असा होतो. त्यांनीं काढलेला निष्कर्ष असा :–

It seems probable that in the 13th century the term सेणवै may have been used more as a caste name than as a

---

१. श्रीशांतादुर्गा चतुःशताब्दि ग्रंथ. पृ. ८९.

२. आम्लीं नांवें आणि आडनांवें. प्रिय आणि अप्रिय. पृ. ५६.

३. Saraswat Families Part I. S. S. Talmaki, B. A., LL. B. पृ. १९.

mark of respectability. It appears to me that it may have been used exactly in the same sense in which the term शेणवी is used at present as a caste name. "

शेवटीं प्रा. माळशे हे आपला निष्कर्ष असा देतात :– " प्रस्तुत मेस्तकाच्या 'शाणो' 'शाहणवै' 'शाणोपणा' इ. शब्दांमध्यें कारकून किंवा कुलकरणी असा व्यवसायदर्शक अर्थच अभिप्रेत असल्याचें दिसून येतें. एकंदरींत शिक्षा=साहा + ज्ञ=ण + पति = वई हीच व्युत्पत्ति युक्तिसंगत दिसते. " [१]

'शेणवी' पदवी एका पोटभेदाची कीं सर्वांची ?

याबद्दल जी माहिती अनेक ठिकाणीं उपलब्ध झाली ती पुढें देत आहें.

गोमंतकीय इतिहासज्ञ 'शणै गोंयबाब' म्हणतात, " शणै ही पदवी अमक्याच एका पोटभेदाच्या मालकीची नसून सर्व कोंकण ब्राह्मणांचा तिच्यावर हक्क आहे. ती केळोशीकुडाळकर, साष्टीकर, बारदेशकर व पेडणेकर या चारहि भेदांत पुरातन काळापासून आजपावेतों चालत आली आहे. " [२] त्यांच्या मतें गोमंतकांतील सर्व गौड सारस्वत ब्राह्मणांची ही पदवी आहे.

कोंकणाख्यान सांगतें,

एक राजसेवा लेखनवृत्ती । शणै ऐसें त्यास म्हणती ॥
केळोशी कुडथाळे मुख्य असती । कुशाग्रबुद्धि बहुत जे ॥ [३]

Ratnagiri District Gazetteer सांगतें कीं,

" Senavis who claim to be Gaud Saraswat Brahmins of the Panch Gaud order are found all over the district but chiefly in Malwan and Vengurla. " [४]

कै. एस्. एस्. तालमकी म्हणतात :– The word *Shenvi* — As a matter of fact it is applied generally to those of the second batch known also as Trivargas who originally occupied only two villages, Kelosbi and Kushasthali. ते पुढें म्हणतात, The term *Shenvi* or *Shenai* came to be applied to the whole class of Trivargas and later on they themselves began to apply the affix *Shenai* to their names as

---

१. मेस्तक : शाणोपणाची पद्धति. स. गं. माळशे. म. सं. पत्रिका. वर्ष १३, अंक २.
२. कांहीं मराठी लेख. शणै गोंयबाब. पृ. १४६.
३. कोंकणाख्यान. पूर्वार्ध, अध्याय ४.
४. Ratnagiri District Gazetteer. आ. २ री. पृ. २०२.

a mark of respectability or as a distinguishing feature of their class. The term is applied by some Sashtikars to their names. This may be partly due to the fact of some shenvis having espoused Vaishnavism.[1]

मंगळूरच्या बाजूचे जुन्या पिढींतले एक विश्वन गृहस्थ J. A. S. (Saldanha ?) यांनीं The Indian Caste या नांवाचें पुस्तक लिहून सन १९०४ मध्यें प्रसिद्ध केलें आहे. या पुस्तकांत 'गौड सारस्वत ब्राह्मण' या नांवाचें एक प्रकरण असून त्यांत बरीच माहिती आहे. शेणवी नांवाबद्दल त्यांनीं दिलेली माहिती अशी :- The Kushasthalis, Kudaldeshker and the literary class of Sastikars (called Shenvis) adhered to Sankaracharya religion. ते पुढें म्हणतात, The Sastikar and Cochikar form one caste but in Kanara the Smarta portion of the community are called Shenvins and the Vaishnavites go by the name of Konkanis.

त्यांनीं पृ. ५८ वर तक्ता दिलेला आहे तो असा आहे :-

1 Partly (Shenvins generally) Smartas or Shaivites having their Swamy at Chitkal Khanapur (Belgaum), Kavle (Goa) and Nasik and

2 Partly (Sasastikars & Cochikars generally) Vaishnavites, the Swamy of the Sasastikars being the Gokarna Swamy residing at Partagal in Goa and that of the Cochikars the Swamy Kashimath in Cochin.[2]

आतां एका जातिविषयक पुस्तकांतील एक उतारा सादर करीत आहें. लेखकानें शेणवी सारस्वतांची माहिती देतांना परशुरामानें पंचगौडांतर्गत दहा ब्राह्मणांचीं सासष्ट कुलें गोमंतकांत आणलीं होतीं यांत "साष्टीकर पहिला भेद आणि शेणवी दुसरा भेद आहे. तिसरा भेद —" असें सांगून पुढील संस्कृत श्लोक दिला आहे.

प्रथमस्तेष्वयं भेदः साष्टीकर इतीरितः ।
साणवीति द्वितीयस्तु भेदस्तेषामुदाहृतः ॥
तथाच कोंकणा इत्थं भेदाः सन्ति ह्यनेकशः ।[3]

---

१. The Saraswat Families. Part I. S. S. Talmaki, B. A. LL. B. पृ. १९.

२. The Indian Caste. J. A. S. पृ. ५८–५९.

३. जातिभास्कर (हिंदी) विद्यानिधी स्व. पं. ज्वालाप्रसाद मिश्र. पृ. ४१.

बॉंबे गेझेटियरच्या कॅनरा व्हॉल्यूममध्यें पुढील माहिती मिळतेः–"गोव्यांतील कुशस्थळी या गांवावरून त्यांना त्यांचें नांव पडलें आहे. त्यांना सामान्यतः शणैपैकीं म्हणतात, पण हें नांव त्यांना आवडत नाहीं. सारस्वत हेंच सर्व गौड ब्राह्मणांना लागू पडणारें नांव त्यांना अधिक पसंत पडतें. सन १५८० मध्यें गोव्यांत इंक्विझीशनची स्थापना झाल्यानंतर ते कर्नाटकांत आले असें म्हणतात, पण ते किंवा निदान त्यांपैकीं कांहीं लोक तरी त्याहून आधी १५१० सालीं गोवें पोर्तुगिजांनीं घेतलें तेव्हां किंवा १४६९ सालीं तें दक्षिणेच्या मुसल्मानांनीं घेतलें तेव्हां आले असावे. त्यांच्याच सांगण्याप्रमाणें, ते कर्नाटकांत आल्यानंतर बऱ्याच काळानें शेणव्यांपासून वेगळे झाले. त्याचें कारण कित्येकांच्या म्हणण्याप्रमाणें दोन प्रमुख कुटुंबांतील मालमत्तेबद्दलचा तंटा होय. दुसरे कित्येक असें सांगतात कीं, ही दुफळी सुमारें १५० वर्षांपूर्वी धर्मगुरूंच्या निवडीबाबत उद्भवलेल्या वादामुळें झाली. (The Indian Caste— J. A. S. p. ६२.)"

यावरून एक गोष्ट दिसून येईल कीं, शेणवी या शब्दाचें मूळ व्युत्पत्तिदृष्ट्या सेनापति असावें असें म्हणतां येत असलें तरी शेणवी या पदवीचा अर्थ पुढें लेखनिक, कारकून, कुळकर्णी तसेंच शिक्षक असा बौद्धिक वैशिष्ट्यवाचक ठरला. व ज्यांनीं हा पेशा स्वीकारला त्यांना ही पदवी लागू करण्यांत आली. या पेशांत केळशीकुठ्ठाळकर प्रामुख्यानें होते. बऱ्याच वर्षांपासून ही स्थिती होती. Oriente Conquistado हा ग्रंथ १७१० मध्यें प्रसिद्ध झला. त्याचे लेखक म्हणतात, Todos (Bramanes de Cortalim) tem titulo de xenens, isto é, mestres, porque nas terras de Concão elles mesmos são os que ensinam aos mais Bramanes a ler, escrever e contar.[1]

जे आज वैष्णव म्हणून संबोधले जातात, त्यांच्यापैकींहि ज्यांनीं हा पेशा स्वीकारला, त्यांनाहि ही संज्ञा लागू झाली असें दिसतें. खुद्द शणै गोंयबाब, जे ही पदवी सेनापतित्ववाचक व सर्व गोमंतकीय सारस्वतांची असें म्हणतात तेसुद्धां त्याच ठिकाणीं "केळोशी–कुठ्ठाळकार बामण शणै पदवीला कधींच विसंबत नसत" असें सांगतात. त्यांच्या मतें जर ही पदवी सर्वांची तर या दोनच गांवकरांना तिचा जास्त मोह कां, असा प्रश्न उपस्थित होतो. प्रा. प्रियोळकर यांनींसुद्धां आपल्या एका लेखांत "शेणवी किंवा कुठ्ठाळकर व केळोशीकर" असें म्हटलें आहे.

आतां सेनापति या पदवीबद्दल विचार करून हें शेणवी प्रकरण पुरें करूं.

शेणवी = सेनापति

सेनापति म्हटल्यावर सर्वसाधारण रीत्या एका अफाट अशा सैन्यावर सर्व प्रकारचा ताबा ठेवणारा अशी साहजिकच कल्पना होते. भारतीय युद्धाच्या वेळीं पांडवांकडे

---

१. गोंयकाराचो मुंबैकार. शणै गोंयबाब. पृ. ३९.

सात अक्षौहिणी सेना होती. आणि त्यांचे प्रत्येक अक्षौहिणीचा एक असे सात सेनापति होते. ते म्हणजे द्रुपद, विराट्, धृष्टद्युम्न, शिखंडी, सात्यकी, चेकितान आणि भीमसेन हे होत. या सातहि सैन्यांचे विभाग जाणणारा सेनाध्यक्ष कोण नेमावा याची चर्चा झाली आणि शेवटीं अर्जुन व कृष्ण यांनीं या पदासाठीं धृष्टद्युम्नच योग्य असें सांगितलें व तें सर्वांनीं मान्य केलें.[१]

कौरवांचे भीष्म, द्रोण यांसारखे सेनापति सोडले तर त्यांच्यानंतर कर्ण व शल्य यांच्याकडे हें पद गेलें. कौरवांनीं प्रथमतः कर्णाला सेनापतिपद दिलें आणि त्यावेळीं कांहीं मंगलाचार केले.[२] कर्णाच्या निधनानंतर हें पद शल्याकडे गेलें. तें देतेवेळीं अभिषेक वगैरे विधि करण्यांत आले.[३] त्यावरून हें पद विशेष गौरवाचें होतें, तसेंच आगळें युद्धकौशल्य अंगीं असणाराचीच त्या पदावर निवड होत होती, असें दिसून येतें. कौटिलीय अर्थशास्त्रानुसार मात्र सेनापति म्हणजे प्रत्यक्ष समरभूमीवर जाणारा नसून युद्धमंत्री (War Minister) होय. कौटिलीय अर्थशास्त्रांत चतुरंग दळासह समरभूवर जाणाऱ्या अधिकाऱ्यास नायक म्हणजे Generalissimo असें स्वतंत्र नांव आहे.[४] व हेंच मत हिंदींतील एक इतिहासज्ञ सत्यकेतु विद्यालंकार यांनाहि मान्य आहे. ते म्हणतात, "सेनापति संपूर्ण युद्धविद्या तथा अस्त्रशस्त्र विद्यामें पारंगत हो। हाथी घोडे तथा रथ संचालन में समर्थ हो। वह चतुरंग सेना के कार्य तथा स्थान का निरीक्षण करे; युद्ध का समय; शत्रु की सेना; सुदृढ व्यूह का भेदन; टूटे हुए व्यूह का फिरसे निर्माण; एकत्रित सेनाका तितरबितर करना; तितरबितर हो जानेपर सेना सेनाका संहार करना, किले को तोडना, युद्धयात्रा का समय आदि बातों का हर समय ध्यान रखे। .....ध्यान रहे कि यह युद्धमंत्री है, न कि युद्ध करनेवाला।"[५]

सासष्टीकर अगर साष्टीकर

कोंकणाख्यानांत पुढील ओव्या आढळतात :–

दुसरी आणखी आहे रीती। नाना व्यवसाय उदीम करिती॥
सासष्टीकर त्या म्हणती। बोलण्याचा परिपाठ हा॥३५॥

---

१. श्रीमन्महाभारतार्थ, उद्योगपर्व, अ. १५१. कर्नाटक मुद्रणालय.
२. तत्रैव. कर्णपर्व अ. १
३. तत्रैव. शल्यपर्व.
४. कौटिलीय अर्थशास्त्र. ज. स. करंदीकर व ब. रा. हिवरगांवकर. उत्तरार्ध. प्रस्तावना. पृ. ४१.
५. चंद्रगुप्तकालीन भारत (हिंदी). सत्यकेतु विद्यालंकार. पृ. १९३.
"सेनापति' शब्दाचा मोल्स्वर्थच्या मराठी–इंग्रजी कोशांत दिलेला अर्थ :–
The Commander of army; The Generalissimo or General.

सासष्टी आणि तिसवाडींत । जे असती ग्राम समस्त ॥
त्यांसी सासष्टीकरचि म्हणत । पूर्वापार आले कीं ॥३६॥ [१]

गोमंतकीय इतिहासज्ञ डॉ. ब्रागांस परैर गोव्यांतील जातींत गौड सारस्वतांत स्मार्त, सासष्टीकर, बारदेशकर, पेडणेकर, कुडाळदेशकर असे भेद दाखवितात.[२]

रत्नागिरी गॅझेटीयरमध्यें शेणवी यांची माहिती देतांना Beside Senavi proper who are of two sects, Smart and Vaishnavas (the latter known as Sasastikar) असा वैष्णवांना सासष्टीकर शब्द लावलेला आहे.

याशिवाय मागें शेणवी या शब्दाची माहिती देतांना वर्दे वालावलीकर, J. A. S. व पंडित ज्वालाप्रसाद मिश्र यांचीं मतें दिलीं आहेत, त्यांत वैष्णवांना सासष्टीकर असा शब्द लावलेला आहे, हें दाखविलेंच आहे.

यावरून हा शब्द वैष्णवांना लावीत असत असें म्हणतां येतें. वास्तविक यांत आणखी एक ऐतिहासिक सत्य आहे तें असें कीं, मूळ सारस्वतांचा जो गट आला तो मडगांव, वेरणें, कुडतरी, बाणावली, सांखवाळ, राय-रायतूर, लोटली व नागवें या आठ गांवांत राहिला. या गटांतील लोकांना अष्टग्रामवासी असें म्हणत. या अष्टग्रामवासीयांना राजदरबारीं मान होता. कोंकणाख्यान सांगतें कीं, " देशींच्या घ्यावया राज्यभारासि । मुख्यत्व दिधलें अष्टग्रामियांसि ॥" [३] शिवाय "गोमंतक शिरस्थान । सासष्टी म्हणती॥" [४] तसेंच " सर्वांगीं शिर प्रधान । तैसें मध्य कोंकणीं सासष्टी जाण ॥ " [५] असा सासष्टीचा दर्जा होता. वास्तविक केळशी व कुठाळी हे गांव त्या काळच्या सासष्टी म्हणजे सहासष्ट गांवांतीलच व यामुळें तेथें वास्तव्य करणाऱ्यांनाहि तो शब्द लागू होतो. पण एक वेगळेपणा दाखविण्यासाठीं मूळ अष्टग्रामांतील सारस्वतांना – जे पुढें वैष्णवपंथांत गेले त्यांनाच तो लावीत असत, असें दिसून येतें.

मूळ सारस्वतांतील गट

केळशी व कुठाळी या गांवांत जी ब्राह्मणांची वस्ती झाली ती नंतर झाली असें कांहीं प्रमाणांवरून दिसून येतें. सन १९२४ सालीं बौद्ध पंडित धर्मानंद कोसंबी यांनीं 'दक्षिणी सारस्वत' या मथळ्याखालीं एक लेख लिहिला आहे. त्यांत ते म्हणतात, " त्यांनीं (सारस्वतांनीं) साष्टी प्रांतांतील आठ गांवीं वस्ती केली. नंतर लोटलीचा कांहीं

---

१. कोंकणाख्यान, पूर्वार्ध, अ. ४
२. Ethnographia da India Portuguesa. Dr. A. B. de Bragança Pereira. Vol. 2, P. 24.
३. कोंकणाख्यान उ. अ. ५
४. तत्रैव. पूर्वार्ध अ. ३
५. तत्रैव. पू. अ. २

भाग निराळा काढून केळशी हा गांव तयार केला व नागवें आणि सांकवाळ यांतील भाग एकत्र करून कुडथाळी हा गांव बनविला." [१] या त्यांच्या विधानामुळें माझ्या वरील विधानाला बळकटी येते. 'कोंकणाख्यान' सांगतें,

देवशर्मा नामें गौड ब्राह्मण । तो तीर्थाटन पैं करी ॥
तो कान्यकुब्ज गौड देशीं । सांगितलें वत्स गोत्र तयाशी ॥
वाराणशी रामेश्वराशी । जावोनि सासष्टीशीं पातला ॥५२॥

कोंकणाख्यानानें ही गोष्ट कल्पनेंतील दिली नसून "जें मंगेशमहात्मिचें कथन । तें ऐक तुज सांगेन ॥" असें म्हणून तिला श्रीमंगेशमहात्म्य या त्या काळच्या संस्कृत पुस्तिकेचा आधार असल्याचें नमूद केलें आहे.

Dr. Bragança Pereira म्हणतात, "Consoante o Manguesh Mahatmia, a segunda colónia de Gaud Saraswat veio de Kanauj a Goa, tendo for chefes Devasharmá de Gotra Vatsa, Lomasharmá de Gotra Coundinia e Shivasharmá de Gotra Cauxica. Os grupos dos primeiros dois se fixaram em Cushasthali e o terceiro em Quelossim." [२]

अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या श्रीशांतादुर्गा चतुःशताब्दि ग्रंथांत श्रीमंगेश देवस्थानाची माहिती दिली आहे. त्यांत "कान्यकुब्जाहून गौड सारस्वतांची शेवटची वसाहत गोमंतकांत येऊन कुशस्थळी (कुठाळी) व केळोशी येथें स्थाईक झाली" [३] असें सांगितलें आहे. म्हणजे तेथील वसाहतकार कान्यकुब्ज येथून आले हें मान्य केलें आहे.

आतां गोमंतकीय इतिहासज्ञ शणै गोंयबाब यांचें या बाबतींत काय मत आहे तें पाहूं. ते म्हणतात, " ती (कुठाळ) वसैणो देवशर्मा म्हळ्ळो वत्सगोत्री बामण कान्यकुब्जी आसलो अशें जें मांगीशमहात्म्यकार म्हणटा तें ध्यानांत घेवक जाय." [४] ते पुढें म्हणतात, " कुठाळकार बामणांत कनोजी बामणांले गुण आनी अवगुण अजून घसघशीत दिसतात..... चित्रापुर मठाच्या कुठाळ्यांनीं मात ही जुनाट वेदीक चाल मोडून ते शिवराक जाल्यात खैं. कनोजी बामणांनीं ही पुर्विल्ली चाल अजून चलैल्या. ते उकतेपणान झळकें (मासळी) खातात... हेरांपरस आपुण उंच आनी मोठे समजुपाचो हो कनोजी

१. दक्षिणी सारस्वत. धर्मानंद कोसंबी. विविधज्ञानविस्तार, वर्ष ५५, अंक २.
२. Ethnographia da India Portuguesa. Dr. A. B. de Bragança Pereira. Vol. 2, P. 28.
३. श्रीमंगेश दे. सं. माहिती. (श्रीशां. च. म. ग्रंथ) अ. रा. घुमे. पृ. १२३.
४. वत्सगोत्रे तदुत्पन्ने कान्यकुब्जोच यो द्विज : । देवशर्मेति विख्यात (श्रीमांगीशमहात्म्य. अ. ६-१). ऐन वेळार. शणै गोंयबाब. पृ. १२२.

सभावगुण कुठाळ्यांच्या आंगांत उपाट भल्ला. तांकां तोखेणो "Oriente Conquistado" कार पाद्री अडेचशीं वर्सांफाटी म्हणटा कि 'तांगले म्हणणेभाशेन हेर सगळे बामण आपणामुखार रानवट आनी गावडे आसात.' ...निमाणें सार घेवचेलें हें किं, शतपथ ब्राह्मण रचल्या उप्रांत श्वेताश्वतरांतली जुवळ्या लिंगाची चाल घोळचे आदीं आनी कान्यकुब्जांचें कुशस्थळ हें नांव चलतालें तेन्नां देवशर्मा म्हळ्ळ्या वत्सगोत्री कान्यकुब्ज बामणान कोंकणांत सास्ट म्हालांत जुवारी न्हंयेवेल्या एका थळाक कुशस्थळ हें नांव दिवन थैं मांगिरीशाचें पुरुशलिंग थापलें. ह्या कामाक ताका दुसरो कान्यकुब्जी कौंडिण्यगोत्री बामण शिवशर्मा हाणें पालव दिलो."[१]

यावरून हा दुसरा गट कान्यकुब्जी होता, हें स्पष्ट होतें. याचा पहिल्या गटाशीं नेहमीं मतभेद असे. याबद्दलची माहिती कोंकणाख्यानांत सांपडते.

चित्रापुरमठानुयायी शेणवीपैकीं ऊर्फ शणैपैकीं

यांच्याबद्दल कै. एस्. एस्. तालमकी आपल्या पुस्तकांत अशी माहिती देतात:–

"आम्ही चित्रापूर सारस्वत गोमंतकांतील इतर सारस्वतांप्रमाणेंच गोमंतकांतील देवतांना आपले कुलदेव म्हणून भजतों, आणि त्यांच्याप्रमाणेंच कांहीं देवतांना पालवी देव म्हणून भजतों. आमच्या पूर्वजांनीं आमच्या स्वामींना सादर केलेल्या कागदपत्रांत व त्याचप्रमाणें आमच्या स्वामींच्या रायसपत्रांत आजतागायत आमचा उल्लेख गौड सारस्वत असाच करण्यांत येतो. गोमंतकांतील सारस्वतांशिवाय हिंदुस्थानांतील इतर कुठल्याहि सारस्वतांचें असें वर्णन करण्यांत येत नाहीं. आमचीं गोत्रेंहि गोमंतकांतील आमच्या शेणवी बंधूंच्या गोत्रांपैकींच आहेत. आमच्या पूर्वजांनीं सुमारें अडीचशें वर्षांपूर्वी आमच्या धर्मगुरूंना सादर केलेल्या कागदपत्रांत आपण मूळचे केळोशी व कुशस्थळी येथले असल्याचें नमूद केलें आहे. हीं गांवें गोव्यांतील सासष्टीमधील असून तेथें शांतादुर्गा आणि मंगेश यांचीं देवालयें होतीं. कवळें येथील स्वामींच्या रायसपत्रांत सर्वसाधारण रीत्या शिष्यांचा उल्लेख 'केलोशी कुशस्थलादशेष शिष्यवर्ग' असाच करण्यांत येतो."

तालमकी यांचें स्पष्ट मत असें कीं, चित्रापुर मठाचे अनुयायी हे इतर सारस्वतांप्रमाणें गोव्यांतूनच दक्षिण व उत्तर कानडामध्यें गेले.

जुन्या काळची सामाजिक परिस्थितीच अशी होती कीं, आचारविचाराच्या बाबतींत चाकोरीबाहेर किंचितहि पाऊल पडलें कीं ती गोष्ट बहिष्कृतपणास किंवा वेगळेपणास कारणीभूत होई.

शेणवीपैकीं यांच्या बाबतींत कोंकणाख्यान सांगतें कीं,

---

१. ऐन वेळार. शणै गोंयबाब. पृ. १२४-१२६.

मग सासष्टीकरिं काय केलें । शक्तिपूजनीं सांपडविले ॥
बहुतां ज्ञातींसि मेळविलें । निमित्त लाविलें पैं तेथें ॥३६॥
राजसभेसि गेली मात । मग त्यांहि केले त्यांसि वाळित ॥
शेणवैपैकीं वेगळाले तेथ । या प्रसंगापासोनि ॥३७॥
शक्तिपूजेचें करोनी निमित्त । त्यांसी त्या जनीं केलें वाळित ॥
परि हें त्यासि नव्हे उचित । तोहि अर्थ सांगेन ॥३८॥ [१]

याप्रमाणें कांहींतरी निमित्तकारण होऊन शणैपैकीं हे वेगळे पडले. जुन्या काळीं सर्वच जातींत ही ग्रामण्यांची परंपरा होती. कनोजी ब्राह्मणांच्या बाबतींतहि 'आठ कनोजे और नव चूला' अशी एक म्हण आहे.

वर सांगितल्याप्रमाणें शेणवीपैकीं हे मूळचे गोव्यांतील केळशीकुष्टाळकर होत असें कै. तालमकी वगैरेचें स्पष्ट मत असलें तरी त्यांच्यांतसुद्धां आपण एक वेगळा गट आहों असें म्हणणारे लोक आहेत. अलीकडे चित्रापूर मठाचे तूर्तचे स्वामी श्रीमत् आनंदाश्रम स्वामीजी यांच्या धर्माध्यक्षपदग्रहणाला पन्नास वर्षें झाल्यामुळें सुवर्णमहोत्सव साजरा करण्यांत आला, त्यावेळीं एक ग्रंथ प्रकाशित झाला. त्यांत आपल्या समाजाच्या इतिहासावर लिखाण आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं, "चित्रापूर शिराळी मठांतील कांहीं कागदपत्रांत उल्लेखिलेल्या गौड सारस्वत या पारिभाषिक संज्ञेचा संबंध सांतलिगच्या १० हजार गौड अग्रहारांच्या बारसांकडेच अधिक मानला पाहिजे. या अग्रहारांचे पूर्वज नैर्ऋत्य काश्मीरकडील दर्वाभिसारांतून आले. त्यांचा संबंध कोंकणांतील गौड सारस्वतांकडे लावणें बरोबर होणार नाहीं. चित्रापूर सारस्वतांचा व त्यांचा वस्तुतः कांहींहि संबंध नाहीं." [२]

अर्थात् या लेखांत ही कल्पना आधीं गृहीत धरून त्याला आधार म्हणून इतिहासांतील कांहीं गोष्टींकडे निर्देश केला आहे व अशा रीतीनें त्या मताचें समर्थन केलें आहे. आमच्या दृष्टीनें ही विचारसरणी योग्य नसून कै. तालमकी यांचेंच मत बरोबर आहे.

कुडाळदेशकर व पेडणेकर

हीं नांवें गांवावरून आलीं हें कुणाच्याहि लक्षांत सहज येण्यासारखें आहे. पेडणें महाल पूर्वी कुडाळांत मोडत असे. [३] कुडाळदेशकरांबद्दल दोन मतें आहेत. कांहींजण त्यांना सारस्वतांचा एक पोटभेद मानतात. [४] कोंकणाख्यानकारांचेंहि मत असेंच दिसतें. कांहीं तरी तत्कालीन कारणांमुळें कुडाळदेशकर, पेडणेकर हे भेद झाल्याचें सांगून तीं

---

१. कोंकणाख्यान. उत्तरार्ध अ. २.
२. Fifty years of bliss. Dr. G. S. Hattiangadi. पृ. २७०-२७१.
३. महाराष्ट्रीय ज्ञानकोश. 'कुडाळदेशकर ब्राह्मण' पहा.
४. कुडाळदेशकर ब्राह्मण. टीप पहा. मुंबई इ. जाती. एन्थोवेन. पृ. १७१.

कारणें त्यांनीं दिलीं आहेत.[१] परंतु कुडाळदेशकरांपैकीं बऱ्याच जणांना हें मत मान्य नसून आपण स्वतंत्र गट आहों म्हणजे मूळचे आद्य गौड ब्राह्मण आहों असें त्यांचें म्हणणें आहे. मूळ सर्व सारस्वत एक असून नंतर पंचगौड असे भेद झाले हें बहुतेकांना मान्य आहेच.

कुडाळदेशकरांचें कोंकणांत आगमन केव्हां झालें याबद्दलहि दोन मतें आहेत. इ. सनाच्या पहिल्या शतकांत उत्तर भारतांतील आद्य गौड ब्राह्मण समुद्रमार्गें कोंकणांत आले[२] असें एक मत आहे. ते प्रथम ज्या ठिकाणीं राहिले तें ठिकाण देवगड असून कुणकेश्वर हें देवस्थान त्यांचें होय. दुसरें मत असें कीं, महमूद गिझनीच्या (इ. स. १०१७) स्वाऱ्यांच्या वेळीं गंगाकिनाऱ्याच्या प्रदेशावर गौडेश्वर पाल राजांचें साम्राज्य होतें. त्या भागांत 'सामंत' नांवाचे एक ब्राह्मण संस्थानिक होते. हें घराणें तेथून महमुदाच्या स्वारीच्या वेळीं कोंकणांत आलें व कदंबांच्या आश्रयास राहिलें.[३] यांनीं यादवांच्या राजवटींत सावंतवाडी भागावरहि राजसत्ता उपभोगिली होती.[४] हे मूळचे गौड व शुक्ल यजुर्वेदी. परंतु क्षात्रवृत्तीमुळें यांचे पुरोहित असलेल्या कऱ्हाड्यांचा ऋग्वेद या ज्ञातीनें स्वीकारला. हे स्मार्त व अद्वैतमतानुयायी.[५]

पेडणेकर

ज्ञानकोशकारांच्या मतें कुडाळदेशकर "या जातींत पूर्वी १४ गोत्रें होतीं. परंतु त्यांपैकीं चार नाहींशीं झालीं. बाकीच्या दहा गोत्रांतीलहि कित्येक घराणीं जीं बाहेर गेलीं त्यांच्या दोन जाती बनल्याची माहिती जुनीच आहे. पैकीं एक पेडणेकर ही होय. अर्थातच ते आपणास गौड ब्राह्मणच म्हणवितात. यांची वसाहत पेडणें महालांत आहे. हा महाल पूर्वी कुडाळ प्रांतांत मोडत असे."[६]

समारोप

प्रथमतः या विषयांतील ठराविक मुद्दे घेऊन त्या मर्यादेंतच लिहावें, असा माझा विचार होता. सारस्वतांच्या बाबतींत, त्यांचें येथील आगमन हें साधारणतः कोणत्या कालांत झालें असावें व हें आगमन उत्तरेंतून बंगालमध्यें गेलेल्या सारस्वतांमधून झालें कीं काय, हेच माझ्यासमोर महत्त्वाचे मुद्दे होते. परंतु त्यानंतर या विषयाचा अभ्यास करतांना जें वाचन झालें त्यांतून नजरेपुढें आलेले विविध मुद्दे व दृष्टिकोन वाचकांसमोर ठेवणें उचित असें मला वाटलें व म्हणून त्यासंबंधींच्या विवेचनाची लेखाला

---

१. कोंकणाख्यान. उत्तरार्ध, अ. १
२. कुडाळदेशकर ब्राह्मण. भारतीय संस्कृतिकोश.
३. ,, ,, म. ज्ञानकोश.
४. आद्यगौड ब्राह्मण. भा. सं. कोश.
५. तत्रैव.
६. महाराष्ट्रीय ज्ञानकोश. 'कुडाळदेशकर ब्राह्मण' पहा.

जोड दिली. या शेवटच्या भागांतील विवेचनाबद्दल कित्येकांचा मतभेद असूं शकेल. परंतु वेगवेगळे दृष्टिकोन लक्षांत घेऊन निर्विकारपणें विचार केल्यावर जें सत्य मला प्रतीत झालें, तेंच मी वाचकांपुढें मांडलें आहे. या बाबतींत ज्यांचे कांहीं पूर्वग्रह किंवा ठाम मतें आहेत, त्यांनासुद्धां ही माहिती उद्बोधक ठरेल असा मला विश्वास वाटतो. माझ्या मतें येथील सारस्वतांत तीन गट दिसतात. ते म्हणजे सासष्टीच्या आठ गांवांत वसती केलेला पहिला, केळशी-कुडाळींत वसती केलेला दुसरा आणि कुडाळ-पेडणें येथें वसती केलेला तिसरा हे होत, असें मिळालेल्या माहितीवरून दिसतें. याशिवाय कांहीं कुटुंबें एकेकटें पृथक्‌पणें अशीं आलीं असण्याची शक्यता आहे. उदाहरणार्थ प्रस्तुत लेखकाचें गोत्र शंख-पिंग-कुत्स हें असून कुलदैवत श्रीलक्ष्मीनृसिंह-वेलिंग हें अहे. या दैवताच्या महाजनांचें हें एकच गोत्र आहे. याबद्दल दंतकथा अशी आहे कीं, मूळ पुरुष कर्नाटक प्रांतस्थ गौडसारस्वत असून तो देशपर्यटन करीत सांखवाळ येथें आला व तेथें स्थायिक झाला. श्रीलक्ष्मीनृसिंह दैवत हें देशस्थांत आहे. ज्या पद्धतीची मूर्ति वेलिंग येथें आहे, तशाच कांहींशा पद्धतीची मूर्ति मद्रास म्यूझियममध्यें आहे. कांहीं दिवसांमागें चित्रकार दलाल यांनीं आपल्याकडील एक मूर्ति दाखविली तीहि अशाच पद्धतीची असून अशा मूर्ति मुंबईतील जुन्या बाजारांत आजहि मिळतात. अशीं अनेक कुटुंबें स्वतंत्रपणें आलीं असूं शकतील.

पोटभेद व उपनांवें यांबद्दल जें विवेचन या लेखांत केलें आहे त्या बाबतींत मतभेद असूं शकतील. पण मी त्यासंबंधीं मिळेल तितकी माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला व मिळालेल्या माहितीवरून निघणारीं जीं अनुमानें मला वस्तुस्थितिदर्शक वाटलीं तींच मीं दिलीं आहेत. असें करतांना मी मनांत कोणताहि पूर्वग्रह बाळगलेला नाहीं. आपल्यांत आज अशी एक प्रथा पडलेली आहे कीं, आपला जो एक पूर्वग्रह बनलेला असेल त्याला अनुकूल होतील तीं साधनें गोळा करून त्याचें समर्थन करावयाचें. मी हा प्रकार टाळून माझ्या दृष्टीनें प्रत्येक गोष्टीचा निःपक्षपातीपणानें विचार केला आहे. याहून अधिक माहिती ज्या कुणाकडे असेल त्यानें ती अवश्य वाचकांपुढें मांडावी. इतिहासाला तिची जरुरी आहे.

कुडाळदेशकर व पेडणेकर यांच्याबद्दल मी जास्त माहिती मिळवूं शकलों नाहीं. साधारणतः कोशवाङ्मयांत जी मिळाली तिचाच उपयोग केला आहे. आपल्याकडे संदर्भग्रंथालयें नाहींत. त्यामुळें जुनें वाङ्मय मिळणें फारच कठीण जातें. वर्तमानपत्राचा अगर मासिकाचाहि एखादा अंक प्रसंगीं फार महत्त्वाचा ठरतो. पण ते जपून ठेवणें सामान्य लोकांना शक्य नसतें. त्याला ग्रंथालयाची—व त्यांतहि संदर्भग्रंथालयाची—आवश्यकता असते. त्याला तसेंच द्रव्यबळ पाहिजे. जगांतील प्रगत देशांत याबद्दल उत्कृष्ट व्यवस्था केलेली असते. हिंदुस्थानांत व त्यांतल्या त्यांत गोव्यांत याला अडचणी पुष्कळच आहेत.

संशोधनाबद्दल प्रा. प्रियोळकर म्हणतात, "संशोधनप्रवृत्ति ही एक धर्मप्रवृत्तीच आहे. तिचा लोप कधीं होणार नाहीं. ही प्रवृत्ति शुद्ध राखण्याचा मात्र आपला प्रयत्न पाहिजे. संशोधनांत एकादा सिद्धांत स्थापन करण्यांत चूक होणें किंवा त्यांत अपयश येणें हें कमीपणाचें नसून अप्रामाणिकपणें एकादा सिद्धांत स्थापन करूं पाहणें हेंच लाजिरवाणें आहे." मी या बाबतींत माझ्या दृष्टीनें शुद्ध प्रयत्न केला आहे.

८

गौड सारस्वत ब्राह्मणांचें गोमंतकांतील आगमन

गौड सारस्वतांच्या गोमंतकांतील पूर्वकालीन आगमनाबद्दल निरनिराळीं मतें आहेत. कांहींजण तो काल पुराणकालांतील परशुरामापर्यंत नेतात. तर कांहीं अगदीं अलीकडे दहाव्या अगर अकराव्या शतकापर्यंत आणतात. आपले माननीय धर्मानंद कोसंबी यांनीं मागें 'दक्षिणी सारस्वत' या मथळ्याखालीं एक लेख प्रसिद्ध केला होता.[१] त्यांत "दक्षिणी सारस्वत पंजाबांतून निघाल्याचा काळ अद्याप निश्चित झालेला नाहीं. तथापि तो काळ अकराव्या शतकाच्या मध्यानंतरचा असावा" व "आमचे पूर्वज पंजाबांतून बंगालमध्यें व बंगालमधून गोमंतकांत गेले" असें मत मांडलें होतें. गोमंतकीय ब्राह्मणांचें आगमन बंगालमधून येथें झालेलें नाहीं, हें आम्ही यापुढील लेखांत दाखवून दिलें असल्यानें या लेखांत फक्त गोमंतकांतील त्यांच्या आगमनाचा काल कोणता, याचाच विचार करणार आहों.

या कालाबद्दलचें दुसरें मत जुन्या काळांतील एक विद्वान संशोधक डॉ. भाऊ दाजी यांचें होय. त्यांच्या मतें गौड सारस्वतांचें गोमंतकांतील आगमन सहाव्या अगर सातव्या शतकापूर्वी झालेलें नाहीं.[२] वरील दोन्ही मतें सारस्वत ज्ञातींत जन्मलेल्यांचीं असल्यामुळें साहजिकच त्यांचा आधार इतरांना मिळतो व कित्येकजण आपल्या विशिष्ट हेतूकरतां हे आधार घेऊन त्यांच्यावर आपलें भाष्य करतात. उदाहरणादाखल अशांपैकीं कांहीं आम्ही येथें देत आहोंत.

पुण्याचे वा. के. भावे (आज दिवंगत) हे आपल्या 'मुसलमानपूर्व महाराष्ट्र' या पुस्तकांत म्हणतात, "गोवें प्रांतांतील सारस्वत ब्राह्मण दहाव्या-अकराव्या शतकापासून काश्मीरांतून दक्षिणेकडे धांव घेऊं लागले."[३] याला ते आधार प. वा. राववहादुर तालमकी यांच्या पुस्तकाचा देतात. पण पृष्ठांक ते देत नाहींत. आपल्या त्याच पुस्तकांत ते कदंब राजा सदाशिव (?) (काल सन १००५-५०)[४] या राजाच्या प्रधानपदावर पै आडनांवाचे सारस्वत ज्ञातीचे अधिकारी होते असें लिहितात.[५]

---

१. विविधज्ञानविस्तार. वर्ष ५५, अंक २.
२. Indian Caste. J. A. S. पृ. ५४.
३. मुसलमानपूर्व महाराष्ट्र, भाग २. वा. कृ. भावे. पृ. १७८.
४. हा कदंबराजा सदाशिव नसून गुहलदेव आहे. याच्या ताम्रपटाची माहिती याच लेखांत पुढें आली आहे.
५. मुसलमानपूर्व महाराष्ट्र, भाग २. वा. कृ. भावे. पृ. १७८.

प. वा. वामनराव खळप हे गोमंतकीय लेखक आपल्या 'गो. सा. मा. ग्रामसंस्था पद्धति' या पुस्तकांत "शिवाल्यें सारस्वत गोमंतकांत बारा तेरा शतकांत येण्यापूर्वी होतीं" असें मत देतात. मात्र याला आधार म्हणून जो उतारा त्यांनीं दिला आहे त्याचा अर्थ मात्र असा आहे कीं, "मंगेश व इतर दैवतें हीं सारस्वत ब्राह्मणांनीं पूर्वी आलेल्या लोकांचीं घेतलीं असतील हेंहि शक्य आहे."[१] कालाचा उल्लेख त्या उताऱ्यांत नाहीं.

आतां आपण प्रथमतः सारस्वत ब्राह्मणांच्या गोमंतकांतील अस्तित्वाचे जुने पुरावे काय मिळतात तें पाहूं. जुन्या दंतकथांकरून सह्याद्रिखंड म्हणतें कीं, भार्गव परशुराम दक्षिणेंत आल्यानंतर त्यानें यज्ञाकरतां पंचगौडांतर्गत त्रिहोत्रपुर देशाहून भारद्वाज, कौशिक, वत्स, कौंडिण्य, काश्यप, वशिष्ठ, जमदग्नि, विश्वामित्र, गौतम आणि अत्रि या गोत्रांचे ब्राह्मण गोमंतकांत आणून त्यांना अग्रहार देऊन स्थापन केलें.[२]

आतां उजेडांत आलेल्या जुन्या लेखांतून याबद्दल काय पुरावे मिळतात तें पाहूं.

गोमंतकाच्या जुन्या इतिहासाबाबत आतांपर्यंत मिळालेल्या ताम्रपटांत शिरोडें येथें मिळालेला ताम्रपट सर्वांत जुना आहे. हा देवराज नामक राजाचा असून याचा काल तज्ज्ञांच्या मतें चौथ्या शतकाची अखेर हा होय. याची राजधानी चांदर (सासष्टी) येथें होती. हा राजा भोज वंशांतील होता, असें आतां ठरलें आहे.[३] या ताम्रपटांत राजाच्या आज्ञेवरून त्याच्या अधिकाऱ्यानें भारद्वाज गोत्री गोविंदस्वामी व इंद्रस्वामी या ब्राह्मणांना कुठाळमधील ठाणें वाड्यावरील कांहीं भूमि घरें बांधण्याकरतां व गुरचराईकरतां दिली असा उल्लेख आहे.[४] त्यावरून त्या काळीं स्वामी नांवाचे ब्राह्मण होते असें सिद्ध होतें.

यानंतरचा ताम्रपट चालुक्य राजा मंगलिश (काल इ. स. ५७८) याचा होय. यांत कोंकणांतील कुण्डिवाटक हा गांव काश्यप गोत्री सुमति स्वामीचा मुलगा प्रिय स्वामी याला दान दिल्याचा उल्लेख आहे. शणै गोंयबाब यांच्या मतें हा गांव सांखळी महालांतील हरवळें गांवानजीकचा कुडणें[५] हा होय.[६]

---

१. गोमंतकांतील सा. मा. ग्रामसंस्था पद्धती. वा. अ. खळप. पृ. २.

२. सारस्वत भूषण. मठस्थ गणेश रा. शर्मा पृ. १९१.
सह्याद्रिखंड, उत्तररहस्य. अध्याय १, श्लोक ४७ ते ५०.

३. The Classical Age. भारतीय विद्याभवन. पृ. १९१.

४. Inscriçõeş Pre-Portuguesas. Dr. P. Pissurlekar. Oriente Português. N.° 22.

५. हा ताम्रपट ज्याअर्थी कुडाळमधील नेरूर गांवांत मिळालेला आहे त्याअर्थी हें गांव कुडाळमधील कुंदें हें असून हा प्रियस्वामी कुडाळदेशकर होय असें एक मत आहे. (कुडाळदेशकर. ग. म. परुळेकर. पृ. ५३-५४).

६. कांहीं मराठी लेख. शणै गोंयबाब. पृ. १७०-१७१.

याशिवाय चालुक्य राजवटींतील गोमंतक व आजूबाजूच्या सन सातशेंपर्यंतच्या इतर ताम्रपटांतून स्वामी, दीक्षित, आर्य वगैरे नांवें व उपनांवें धारण करणाऱ्या ब्राह्मणांचा उल्लेख आहे.[१]

दक्षिण कोंकणांतील चालुक्य राजवटीनंतरच्या राजवटी शिलाहार व कदंब या होत. यांच्या कांहीं ताम्रपटांतून मात्र पुढीलप्रमाणें स्पष्ट पुरावा मिळतो.

दक्षिण शिलाहार राजवटीचा शेवटचा राजा रट्टराज (काल इ. स. १०१०) याच्या ताम्रपटांत ब्राह्मण सेणावई (शेणवी) हें नांव प्रथमतः मिळत.[२] हा पुरावा स्पष्ट आहे हें सांगण्याची गरज नाहीं.

यापुढें गोवा कदंब राजा गुहलदेव (काल शके ९६०–सन १०३८) याच्या ताम्रपटांत सावयवेरें हा गांव पट्टवर्धन कुलांतील गोवर्धनाचा धाकटा भाऊ व अपला उपाध्याय नारायणभट्ट यास दान दिल्याचा उल्लेख आढळतो. या लेखांत कांहीं अधिकाऱ्यांचीं नांवें दिलीं आहेत. त्यांपैकीं दाम पै (प्रधान), महल्ल पै (अंतःपुरावरील अधिकारी), भल्ल पै (संधिविग्राहक) हीं नांवें गौड सारस्वतांचीं आहेत[३] याबद्दल शंका घेण्याचें कांहींच कारण नाहीं.

यानंतरचा गोवा कदंब राजा त्रिभुवनमल्ल (विजयादित्य?) याचा शके १०२८ (सन १०९६) चा ताम्रपट उपलब्ध झाला आहे. त्यांत शंख, भारद्वाज, कौशिक, भरद्वाज, वत्स, शांडिल्य, अत्रि आणि भालंदन या गोत्रांच्या, आर्य, धैसास, भट्ट वगैरे उपनांवांच्या बारा ब्राह्मणांना केलिम नांवाच्या गृहस्थानें पणजी, आमोणें, प्रियोळ, कुडाळ, कवळें, नेवरें, करंजाळी, कुडतरी, राय, मडगांव वगैरे गांवांतील (आजच्या तिसवाडी, अंत्रूज, सासष्टी, भतग्राम या तालुक्यांतील) शेतें दान दिल्याची नोंद आहे. मडगांवचा उल्लेख मठग्राम[४] अशा रूपांत या लेखांत केलेला आढळतो. या ताम्रपटांत दिलेली अन्य माहिती महत्त्वाची आहे. ती अशी कीं, "दान देणाऱ्यानें यानंतर एक भारती किंवा सरस्वतीमंदिर उभारलें व त्याच्या खर्चासाठीं मठग्रामनजीकचें शोलेघ्री नांवाचें शेत खरेदी करून दिलें व त्याच्या उत्पन्नांतून या सारस्वतीमंदिरांत नेहमीं प्रवचन व पुराण व्हावें असें ठरविलें. तसेंच लेखक, आचार्य व वाग्देवी यांना तीन घरें बांधून दिलीं आणि यांपैकीं जो करार मोडील त्याला राजानें दंड करावा अशी इच्छा प्रदर्शित केली."[५]

---

१. कांहीं मराठी लेख. शणै गोंयबाब. पृ. १७० व १८०.

२. Goa Pre-Portuguesa. Dr. P. Pissurlekar.
समस्त राजावली समलंकृत श्रीरट्टराजेन स्वहस्तेन हस्तोदकं कृत्वा ब्राह्मण सेणावइ नागभैयसुत सकभैयस्य कल्वाल भक्त ग्रामाद वाइंगण क्षेत्र··· (कांहीं मराठी लेख. शणै गोंयबाब. पृ. १४१).

३. महाराष्ट्रांतील प्राचीन ताम्रपट व शिलालेख. डॉ. मो. ग. दीक्षित. पृ. ४६.

४. शोलेघ्रीति मठग्रामा(त्) क्षेत्र क्रीत्वा ददावसौ.

५. दक्षिण म. इ. साधनें, खंड ४ था. गो. ह. खरे. पृ. ४५–४६.

ज्याअर्थी या विद्यामंदिराला मडगांवनजीकचें शेत घेऊन दिलें असें या लेखांत नमूद आहे त्याअर्थी हें विद्यामंदिर मडगांवमध्येंच होतें असें एक अनुमान निघतें व यामुळें मठग्रामच्या बौद्धिक परंपरेला पुष्टी मिळते.

याशिवाय उत्तर कोंकणच्या शिलाहार राजवटींत (काल सन ८२५ ते १२६५) बऱ्याच अधिकाऱ्यांचीं नांवें गौड सारस्वतांचीं मिळतात.[1] विस्तारभयास्तव त्यांचा ओझरता उल्लेख करून पुढें जाणें भाग आहे. याच बाबतींत दहाव्या शतकांतील एक महत्त्वाचा पुरावा उपलब्ध झाला आहे. महामहोपाध्याय डॉ. मिराशी यांनीं राष्ट्रकूटांचा कोंकणांतील अरब मांडलीक सुगतिप याचा एक ताम्रपट प्रसिद्ध केला असून त्यांतील माहिती त्यांच्याच शब्दांत येथें देतों. ते म्हणतात, "प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेलें भगवतीचें देवालय मैत्रायणीय शाखी भारद्वाज गोत्री अन्नभैय यानें बांधलें होतें तरी त्याची व्यवस्था संजानच्या पंचगौडीय महापरिषदेकडे सोंपविली होती. पंचगौडीय महापरिषदेचा प्रस्तुत उल्लेख अत्यंत महत्त्वाचा आहे. सांप्रत ब्राह्मणांचे पंचगौड व पंचद्राविड असे दोन विभाग करण्यांत येतात. इ. सनाच्या दहाव्या शतकांत संजान (दमणच्या खालीं व उंबरगांवच्या वर) येथें नऊ सभासदांची पंचगौडीय महापरिषद् होती व तिच्याकडे धार्मिक व्यवस्थेचें कार्य होतें, ही प्रस्तुत ताम्रपटांत मिळणारी माहिती महत्त्वाची आहे. कोंकणांत विशेषतः संजान येथें गौड ब्राह्मणांची पुष्कळच वसती होती व तेथील धार्मिक व्यवस्थेंत त्यांचें प्राबल्य होतें असें दिसतें. अद्यापिहि कोंकणांत गौड सारस्वतांची बरीच वसती आहे."[2]

प्रस्तुत ताम्रपट राष्ट्रकूट तृतीय इंद्र याच्या काळीं म्हणजे शके ८४८ (सन ९२६) मध्यें देण्यांत आला होता.[3]

वरील माहितीवरून कोंकणांत तसेंच गोव्यांत दहाव्या शतकाच्या आसपास गौड सारस्वतांचें अस्तित्व असल्याचें निर्विवादपणें दिसून येतें. आतां आपण त्या कालापूर्वीच्या पुराव्याबद्दल विचार करूं.

इसवी सनाच्या चौथ्या शतकापासून आठव्या शतकापर्यंतच्या अगर त्यानंतरच्या लेखांत स्वामी, दीक्षित, आर्य वगैरे नांवें अगर उपनांवें मिळतात. तसेंच गोत्रेंहि मिळतात. परंतु बरींच गोत्रें पंचगौड व पंचद्राविड यांत समान आहेत. कांहीं उपनांवेंसुद्धां दोघांतहि आढळतात. त्यावरून निश्चित असें कांहीं सांगतां येत नाहीं. पंचगौड व पंचद्राविड हे भेदहि नंतरचे आहेत असें तज्ज्ञांचें मत आहे. त्यामुळें इतर मार्गांनीं याविषयीं अनुमान काढणें भाग आहे.

---

१. कोंकणी भाषेचें जैत. शणै गोंयबाब. पृ. ७४.
विविधज्ञानविस्तार. वर्ष ५७ अंक ९.

२. संशोधन मुक्तावली, सर ३. डॉ. वा. वि. मिराशी. पृ. १६०

३. तत्रैव. पृ. १५८.

स्वामी हें उपनांव द्रविड गणल्या गेलेल्या तामीळ आंध्रमध्यें प्रचलित आहे. परंतु पूर्वीच्या काळांत बहुतेक सर्व हिंदुस्थानांत तें प्रचलित होतें असें म्हणतां येतें. या स्वामी नांवाबद्दल प्रो. निहाररंजन राय हे बंगाली इतिहाससंशोधक म्हणतात, "बंगालमध्यें ब्राह्मणांची शर्मा पदवी आज चालू आहे. स्वामी पदवी मध्ययुगानंतर बंद झाली. निधनपूर लिपीमध्यें स्वामी ही पदवी धारण करणाऱ्या बऱ्याच जणांचीं नांवें मिळतात. हे सर्व बंगालमध्यें पश्चिम व दक्षिणमधून आलेले होते. दक्षिणेंत आजहि स्वामी पदवी चालू आहे. उत्तर भारतांत प्राचीन काळीं ती होती हें गुप्तकालांतील लेखांवरून दिसून येतें." [१]

मध्यभारतांत स्वामी पदवी होती हें हस्ति नांवाच्या राजाच्या ताम्रपटांतून (काल सन ४९०) दिसून येतें. हे राजे गुप्तांचे सामंत होते. [२]

या कालांतील दुसरीं उपनांवें म्हणजे दीक्षित व आर्य हीं होत.[३] गौड सारस्वतांतील प्रसिद्ध संस्कृत व्याकरणकार भट्टोजी दीक्षित हे होते. दुसरें नांव आर्य हेंहि सारस्वतांत मिळतें. गौड सारस्वतांत सागर रामाचार्य नांवाचे पंडित १७ व्या शतकांत होऊन गेले. यांचें श्रीमत्सुनीतिभागवत हें पुस्तक ब्रह्मीभूत स्वामीमहाराज श्रीमत् इंदिराकान्त यांनीं संपादिलें होतें व तें खानापूरच्या 'लोकमित्र' मासिकाचे संपादक सडेकर यांनीं प्रसिद्ध केलें होतें. हे पंडित भारद्वाज गोत्री आश्वलायन सूत्री शाकलशाखी ऋग्वेदी माध्व ब्राह्मण असून कुडतरी (सासष्टी) अग्रहाराचे वांटेकरी व तेथील श्रीशांतादुर्गेचे महाजन होते. [४]

स्वामी हें उपनांव ज्याअर्थी उत्तरेंत होतें, त्याअर्थी येथील जुन्या काळच्या ताम्रपटांतून उल्लेखिलेले स्वामी उपनांवाचे ब्राह्मण गौड सारस्वत असणें शक्य आहे. त्याकाळीं हें उपनांव ब्राह्मणांत सार्वत्रिक दिसतें. शणै गोंयबाब यांचेंहि मत असेंच आहे. त्यांच्या

---

१. बांगलार इतिहास. (बंगाली). प्रो. निहाररंजन राय. पृ. २७२.

२. खोजकी पगडंडिया (हिंदी). मुनि कांतिसागर. पृ. १४६.

डॉ. रामकृष्ण गो. भांडारकर 'महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासांतील कांहीं ठळक गोष्टी' या आपल्या लेखांत सांगतात, "चालुक्य वंशाच्या राजांच्या कारकिर्दीत ब्राह्मणांना पुष्कळ दानें दिलेलीं आढळतात. त्या ब्राह्मणांच्या नांवाला स्वामी हें पद जोडलेलें आढळतें. हीं नांवें कर्कस्वामी, देवस्वामी, रेवास्वामी दीक्षित, यज्ञस्वामी अशा प्रकारचीं होतीं. स्वामी हें पद श्रौत म्हणजे यज्ञयागादि कर्मे करण्यामध्यें कुशल आणि या विषयावर ग्रंथ लिहिणारे यांस लावण्याचा प्रघात होता. तेव्हां चालुक्यांच्या वेळेस श्रौतकर्माचा बराच प्रसार झाला असावा असें अनुमान येतें. (मनोरंजन मासिक, बेळगांव अंक १९०९, पृ. ४३).

३. सारस्वत रत्नमाला. मठस्थ गणेश रा. शर्मा. पृ. ७

४. श्रीमत्सुनीतिभागवत. प्रकाशक–द. गो. सडेकर, खानापूर. १९२२.

मतें कोंकणांत साष्टीच्या बौद्ध विहारांतील लेण्यांत तेथें दर्शनास गेलेल्या ब्राह्मणांचीं नांवें मिळतात त्यांतील चेल्लदेव, बोपइ हीं नांवें गोमंतकीय ब्राह्मणांचीं असावीं.[1]

गोव्यांतील ग्रामसंस्थांत गौड सारस्वतांचा भाग

गोमंतकाच्या जुन्या इतिहासांत ग्रामसंस्थांना फार महत्त्व आहे. येथील ग्रामसंस्था व येथील दैवतें हीं गोमंतकाच्या जुन्या इतिहासाचीं महत्त्वाचीं साधनें आहेत. गोमंतकाबाहेर मध्यकाळींसुद्धां कांहीं ठिकाणीं तुरळक ग्रामसंस्थांचें अस्तित्व आढळतें. परंतु मुसलमानी व युरोपियन अंमलांत त्या संपूर्णतः नष्ट झाल्या असें म्हणतां येतें. पण आपल्या गोमंतकांत या दोन्ही राजवटींचा अंमल येऊनहि त्या टिकून राहिल्या व आजहि त्यांचें बदलल्या स्वरूपांत का होईना अस्तित्व आहे. गोमंतकांतील ग्रामसंस्थांचें मालकी स्वरूप म्हणजे गांवकारी हक्क. कांहीं ग्रामसंस्था संपूर्णपणें एकेका जातीच्या तर कांहीं भिन्न जातींचा समावेश असलेल्या अशा होत्या. जुन्या काळांत भूमि हेंच उत्पादनाचें मुख्य साधन होतें. त्यामुळें कांहीं गांव एकेका जातीच्या लोकांकडून वसविण्यांत आले होते व अर्थात् तेथील ग्रामसंस्थांचे मूळचे हक्कदार पूर्णपणें ब्राह्मण किंवा क्षत्रिय असल्याचें आढळून येतें. उलट कांहीं ग्रामसंस्थांच्या हक्कदारांत भिन्न जातींचा अंतर्भाव झालेला आहे. परशुरामाची दंतकथा जर सोडली तर गोमंतकांतील गांव (तुरळक अपवाद वगळून) कोणत्याहि राजानें दिलेले नसून कांहीं गांव स्वतः ब्राह्मण वांगडांनीं तर कांहीं क्षत्रिय वांगडांनीं असे वसविले होते. गोमंतकांत ज्याला आपण जुनी काबिजाद (पोर्तुगिजांनीं प्रथम जिंकलेले, मुरगांवसह सासष्टी, तिसवाडी व बारदेश हे तालुके) म्हणतों तोच हा भाग होय. आज एकंदर गोमंतकांत हीच बाजू कांहीं अंशीं महत्त्वाची व समुद्राला लागून आहे. जुन्या काळांतसुद्धां हाच भाग महत्त्वाचा असावा, असें दिसतें. पूर्वकाळांत समुद्रमार्गें आर्यांनीं याच भागांत वसती केली असावी. ह्या भागांत जुन्या काळांतील ग्रामसंस्थांची एकंदर संख्या १३५ असून त्यांत सर्वस्वी ब्राह्मणांच्या ३४ मिळतात. यांची तालुकेवार संख्या सासष्टी–मुरगांव १५, तिसवाडी ९, बारदेश १० अशी आहे. सासष्टींतील मुरगांव धरून ब्राह्मणांच्या ग्रामसंस्थांचे गांव बाणावली, मडगांव, कुडतरी, लोटली, राय, वेर्णे, सांखवाळ, केळोशी, कुठाळी, चिखली, दामोळी, गिरडोली, माखजन, नागर्वे व वाडें हे होत.

कोंकणाख्यान ब्राह्मणांच्या गांवांबद्दल म्हणतें :–

"मठग्राम दुजा गांव वेरणें पुढती असे
कुडतरी लोटली शंखावलीहि नागर्वे
बाणावलीपुढें जाण केळोशी कुडथाळी तसें
आकें वाडें रय ग्राम महाखाजन चिखली

---

१. कोंकणी भाषेचें जैत. शणै गोंयबाब. पृ. ८५.

वाडें खेडेंहि गिर्डोली षोडश ग्रामपंगती
सासष्ट देशीं महालीं वर्णिली मागील स्थिती

(कोंकणाख्यान, पूर्वार्ध अ. २)

यांत सोळा गांव दिले आहेत. यांतील आकें हा गांव मडगांवला लागून आहे. Bosquejo Historico das Comunidades या ग्रंथांत येथील ग्रामसंस्थेंत ३ वांगड (हक्कदारांचे समूह) असून त्यांपैकीं दोन समूह ब्राह्मणांचे व एक चारडे (क्षत्रिय) यांचा अशी नोंद आतां मिळते. पूर्वी हा ब्राह्मणांचा गांव असावा व नंतर क्षत्रिय हक्कदार झाले असावे अगर ब्राह्मणांच्या संख्याधिक्याचा हा गांव असावा.[1]

या ग्रामसंस्था मूळ वसती केलेल्या लोकांनीं निर्माण केलेल्या आहेत. ब्राह्मणांनीं जुन्या काळीं सासष्टी (मुरगांव धरून), तिसवाडी व बारदेश या तिन्ही तालुक्यांत जे गांव निवडले ते सर्व पीकपाण्याच्या व राहणीच्या दृष्टीनें चांगले होते. व आजहि बहुतेक हीच स्थिति दिसून येते. सासष्टी तालुक्याच्या नकाशाकडे जर नजर दिली तर बाणावली-मडगांवपासून कुड्डाळपर्यंतचा सर्व भाग ब्राह्मण वसतीचा होता, असें दिसून येतें. यावरून एक निवडक सलग भूमि त्यांनीं वसविली, हें सिद्ध होतें.[2]

ज्यांनीं ही सलग बाजू वसविली त्यांचें आगमन सर्वांनंतर अगर उशिरां झालें असें म्हटल्यास, तोंपर्यंत हे गांव न वसवितां राहिले होते कीं काय व इतकी चांगली

---

१. दौतोर लुईश द कून्य गॉसाल्हिश हे ब्राह्मणांच्या ग्रामसंस्था व त्यांची संख्या याबद्दल असें सांगतात :- " Assim é que na India Portuguesa ou seja no districto de Goa se encontram várias comunidades de aldeia cujos membros ou gâocares são ou eram exclusivamente Brahamanes, por exemplo no concelho das Ilhas 10, Salcete 14, Bardez 12. (Direito Hindu e Maometano. पृ. ६७ - ६८).

ब्राह्मणांच्या ग्रामसंस्थांची संख्या सासष्टी १४, तिसवाडी ९ व बारदेश १० अशी आणखी एका ठिकाणीं दिली आहे. (Chatrias. Bacharel J. P. Z. Santos Pereira. पृ. १३ व १६.)

२. Escolheram os bramanes para a sua habitação principalmente os terrenos ou lugares nas margens dos rios, em especial na Ilha de Goa e nos actuais concelhos de Salcete e Bardez, terrenos alem de serem mais fácil a cultura eram os mais apropriados para o seu estabelecimento de Tirtas ou lugares santos. (Direito Hindu e Maometano. Doutor Luis da Cunha Gonsalves. P. 60)

भूमि पूर्वी आलेल्यांकडून कां वसविली गेली नाहीं असे प्रश्न साहजिकच उपस्थित होतात आणि विचारान्तीं त्यांचें उत्तर असें येतें कीं, ज्यावेळीं हे गांव वसविले गेले त्यावेळीं मूळची कांहीं वसती असली तर ती अगदींच तुरळक अशी असली पाहिजे. त्यामुळेंच त्यांना हे गांव असे सलगपणें वसवितां आले. अर्थात् त्यांच्या आगमनाचा काळ बराच मागचा असला पाहिजे, असें साहजिकपणें अनुमान निघतें.

सारस्वतांच्या बाबतींत आणखी एक मुद्दा विचारांत घेण्यासारखा आहे. तो म्हणजे पंचगौडांतील बहुतेक भेदांत नंतरच्या कालांत कुलीन प्रथा (उच्चनीच श्रेणी) उत्पन्न झाली. याबद्दलची सविस्तर माहिती आमच्या यापुढील बंगालच्यरच्या लेखांत येणार आहे. पंजाबी सारस्वतांत उत्तम श्रेणी व मध्यम श्रेणी निर्माण झाली.[१] कान्यकुब्जांत सोळा गोत्रांत सहा उच्च श्रेणी व दहा कनिष्ठ श्रेणी[२] असा भेद होऊन वैवाहिक बाबतींत अधोगति झाली. मैथिल ब्राह्मणांतहि बंगालप्रमाणेंच स्थिति प्राप्त झाली.[३] उत्कल ब्राह्मणांतहि या प्रथेचा शिरकाव झाला असावा.[४] बंगालची माहिती तर पुढील लेखांत येणार आहे. ही प्रथा अकराव्या बाराव्या शतकाच्या नंतर किंवा आगेमागें उत्पन्न झाली असावी. परंतु गोव्यांतील सारस्वतांत या प्रथेचा मागमूस दिसत नाहीं. यावरून या प्रथेचा उद्भव होण्यापूर्वी त्यांचें गोमंतकांत आगमन झालें असावें व त्या आगमनाचा निश्चित काल जरी सांगतां आला नाहीं तरी तो निःसंशय बराच मागें जातो, असें अनुमान काढतां येतें. रावबहादुर तालमकी ह्यांचें अनुमान असें कीं हें आगमन सनपूर्व तिसऱ्या शतकांत झालें असावें.[५] व येण्याचें कारण त्यांच्या मतें असेंहि असूं शकेल कीं, गोव्याची माहिती उत्तरेंत होती. त्यामुळें कांहीं कुटुंबें गोव्यांत धनार्जनाकरतां म्हणजे व्यापाराकरतां आलीं असावीं.[६] प. वा. वामन मंगेश दुभाषी यांचेंहि मत असेंच आहे.[७]

---

१. जातिभास्कर. पं ज्वालाप्रसाद मिश्र. पृ. ४५.
भारतीय साम्राज्य, पु. ८ वें. ना. भ. पावगी. पृ. ४१.

२. जातिभास्कर. पं. ज्वा. मिश्र. पृ. ४५.

३. Bihar, Heart of India. Sir J. Houlton. पृ. ९४.

४. भारतीय साम्राज्य, पु. ८ वें. ना. भ. पावगी. पृ. ९१.

५. Saraswat Families, P. I. रावबहादुर तालमकी, बी. ए. एलएल. बी. पृ. ६.

६. तत्रैव.

७. It is quite possible that this श्रेणी community of Saraswat came and resided as traders in Goa.(Saraswat Colony in Deccan, V. M. Dubhashi. The All India Saraswat. Vol. I, No. 2.)

येण्याचे त्या काळचे मार्ग

आर्य लोकांची पहिली वसाहत पंजाबमध्यें झाली व त्यानंतर हिंदुस्थानच्या इतर भागांत त्यांचा हळूहळू प्रवेश झाला. भारताच्या दक्षिण भागांत प्रथमतः अगस्ति ऋषीचें आगमन झालें अशी जी दंतकथा आहे तिच्यांत तथ्य असावें. रामायणकालापेक्षां महाभारतकालांत म्हणजे पांडवांच्या कालांत आर्यांना दक्षिण व इतर भागांची बरीच माहिती झाली होती असें दिसून येतें.

भागवतांत श्रीकृष्ण हस्तिनापुराहून द्वारकेस आला तो मार्ग सांगितला आहे. तो असा कीं, कुरुदेश, जांगलदेश, पांचालदेश, यमुनेच्या कांठीं असणाऱ्या देशांसह शूरसेन देश, ब्रह्मावर्त, कुरुक्षेत्र, मत्स्यदेश व नंतर सारस्वत देश हे सर्व देश व मारवाड प्रांत ओलांडून तो द्वारकेला आला.[1] तसेंच तो द्वारकेहून इंद्रप्रस्थाला निघाला तेव्हां तो आनर्त, सौविर, मरु व कुरु या देशांतून गेला व त्यानंतर लागणाऱ्या दृषद्वती व सरस्वती या नद्या ओलांडून वाटेंत पांचाल व मत्स्यदेश टाकून परत इंद्रप्रस्थाला आला,[2] असें वर्णन आहे. महाभारतांत सभापर्वांत सहदेवाचा दक्षिणदिग्विजय वर्णन केला आहे त्यांत मथुरा, माळवा, महिष्मतीवरून तो पैठणला गेला व तेथून शूर्पारकाला पोंचला, असें सांगितलें आहे. येथून त्याची यात्रा पुढें समुद्रमार्गानें झाली असणें शक्य आहे. याप्रमाणें उत्तरेंतून दक्षिणेस येण्याचे, विशेषतः गुजरात व शूर्पारक (सोपारें) पर्यंत येण्याचे जे मार्ग होते तेथून सारस्वत गोव्यापर्यंत आले असावे.[3]

---

१. श्रीमद्भागवत, १×१०×३४ व ३५. दामोदर सां. यंदे प्रकाशन.

२. तत्रैव, १०×७१×२१ व २२.

३. प्राचीन महापथकी एक शाखा भरुकच्छ और सुप्पारक के प्राचीन बंदरगाहोंसे होती हुई उज्जैन के रास्ते मथुरा पहुंचती थी. — सार्थवाह (हिंदी). डॉ. मोतीचंद. पृ. २४.

It may be safely said that the colonisers at Goa came via Cutch and resided at Goa.

Saraswat Colony in Deccan (V. M. Dubhashi). All India Saraswat, Vol. I, No. 2

सारस्वत बाहेरून भारतांतल्या काठेवाडांत (सौराष्ट्र) आले आणि तेथून समुद्र-मार्गें गोमंतकांत आले. म्हणूनच समुद्राजवळ असलेल्या अशा भागांत त्यांची वसती आहे. — डॉ. पां. पिसुर्लेकर – 'गोमंतकाचा इतिहास' या विषयावर गो. वि. निकेतन-मध्यें झालेलें व्याख्यान. ('गोमंतवाणी' दैनिक, मडगांव, ता. १३-७-६४).

गोमंतकीय सारस्वत ब्राह्मण बंगालमधून आले काय?

साधारणतः असा एक जबरदस्त प्रवाद आहे कीं, गोमंतकांतील सारस्वत ब्राह्मण हे बंगालमधून येथें आले म्हणजे बंगालमध्यें स्थिरस्थावर झालेल्या ब्राह्मणांपैकीं इकडे आलेल्या लोकांचे ते वंशज होत. कित्येकांना "ही कल्पना अनैतिहासिक असून मान्य करण्यासारखी नाहीं"[१] असें वाटतें तर कित्येकांना "गौड सारस्वत ब्राह्मण हे मूळचे बंगालीच"[२] असें वाटतें. गोमंतकीयांच्या मनावर या कल्पनेचा इतका परिणाम झाला आहे कीं, आगशी येथील कै. डॉ. वैकुंठ कामत यांनीं सन १९२९ सालीं आपल्या वैद्यकीय निबंधासाठीं (Tese) विषय Os Brâmanes Sarasvatas de Goa हा निवडला व त्यांत या प्रश्नाची चर्चा करून शरीरमापन शास्त्राच्या आधारें त्या कल्पनेला बळकटी मिळते असें सांगितलें.[३] आपल्याकडील लोक सोडाच, पण बंगालमधील विश्वभारतीचे आचार्य डॉ. क्षितिमोहन सेन हेहि असें म्हणतात कीं, "(बंगालमधील) गौडमधून सारस्वतांनीं महाराष्ट्रांत व कर्नाटकांत जाऊन वसती केली. ते आपणाला गौड सारस्वत म्हणवितात. मासळी खातात. दुर्गादेवीची पूजा करतात. भाषेंतहि कांहीं गौडीय चिन्ह आहे."[४] कित्येकांना गोमंतकांतील 'बाब' हें बंगालांतील 'बाबू'चें अनुकरण होय असें वाटतें. असे अनेक प्रवाद आणि कल्पना या बाबतींत प्रचलित आहेत. त्यांत सत्य कितपत आहे हें जाणून घेण्याची इच्छा कोणालाहि होणें साहजिक आहे. बंगाली भाषा व वाङ्मय यांचा थोडाफार परिचय असल्यानें या बाबतींतील माझा अभ्यास मी पुढें मांडीत आहें.

प्रथमतः बंगालमधील ब्राह्मण ज्ञातीविषयीं काय माहिती मिळते ती पाहूं. 'संबंधनिर्णय' या जातिविषयक पुस्तकांत मिळणारी माहिती अशी[५]:– "अशोक राजाच्या कालापासून आदिशूर राजाच्या पूर्वकालापर्यंत बंगालांत बौद्ध धर्माचा प्रभाव होता. त्यामुळें या देशांत कर्मकांडाचा लोप झाला. त्यावेळीं बंगालमध्यें सातशती (सातशें घरें) या नांवाचे ब्राह्मण होते. पण बौद्ध प्रभावामुळं ते निस्तेज झाले होते. महाराजा आदिशूर[६]

---

१. विविधज्ञानविस्तार, वर्ष ५७, अं. १. चिं. वि. वैद्य.
२. तत्रैव. ,, अं. २. गं. दे. खानोलकर.
३. हिंदु, मडगांव. व. ६, अं. ३.
४. हिंदु संस्कृतिर स्वरूप (बंगाली). आचार्य क्षितिमोहन सेन.
५. संबंधनिर्णय (बंगाली). लालमोहन विद्यानिधि.
६. आदिशूर या राजाचें नांव बंगालच्या इतिहासांत मिळत नाहीं. इतिहासज्ञ चिंतामण वि. वैद्य यांचें मत तो सेन राजवटीचा पहिला राजा असावा असें आहे. (विविधज्ञानविस्तार, वर्ष ५७, अं. १). (बंगालमधील सेन राजवटीची सुरुवात

यानें पुत्रेष्टि यज्ञ करण्याच्या कामीं देशांत असलेले ब्राह्मण अज्ञानी असल्यावरून संवत् ९९९ मध्यें कान्यकुब्ज राजाला पांच गोत्रांचे सच्चरित व यज्ञनिपुण विद्वान् ब्राह्मण पाठविण्याची विनंती केली व त्याप्रमाणें हे पांच ब्राह्मण विक्रमपुर शहरांत आले. त्यांच्या आगमनाची वार्ता द्वाररक्षकाकडून राजाला समजली, तेव्हां त्यानें त्यांना आपल्याजवळ बोलावलें. त्या ब्राह्मणांना पाहून राजाच्या मनांत त्यांच्या आचारशुद्धते-बद्दल संशय उत्पन्न झाला. कारण ते आपापल्या स्त्रिया व मुलें यांसह बैलगाडींत किंवा घोड्यावर बसून आले होते, आणि सर्वांगवस्त्र परिधान केलेलें, पायांत चर्मपादुका व तोंडांत तांबूल अशा स्थितींत ते होते. तथापि त्यांनीं दाखविलेल्या कांहीं प्रकारामुळें राजाच्या संशयाचें निरा.करण झालें व त्यांनीं केलेल्या यज्ञामुळें राणी गर्भवती झाली. त्यामुळें राजानें या ब्राह्मणांना आपल्या देशांत रहाण्यास सांगितलें व ब्राह्मणांनीं तें मान्य केलें."

या पांच ब्राह्मणांचीं नांवें व गोत्रें अशीं :– १ भट्टनारायण (शांडिल्य), २ श्रीहर्ष (भारद्वाज), ३ दक्ष (काश्यप), ४ वेदगर्भ (सावर्णिक), ५ छांदड (वत्स). या ब्राह्मणांना छप्पन्न मुलें झालीं. राजानें पूर्वी यांना गांव दिले होते. नंतर त्यांच्या मुलांनाहि दिले. यांच्याबद्दल बंगालमध्यें 'पंच गोत्र छपन्न गाई (गांवें) ताळाडा ब्राह्मण नाई जदि दु एक घर सातशती आर पाराशर' (पांच गोत्रें छप्पन्न गांवें हे सोडून ब्राह्मण आणखी नाहींत. जर असलेच तर सातशती व पाराशर) अशी म्हण आहे.

अकराव्या शतकाच्या मध्यकालानंतर झाली. – का. दा. ना.)

आदिशूर या राजाचा प्रश्न हा बंगालच्या इतिहासांतील एक कोडें आहे. – बंगा-लांतील ब्राह्मणांची वसाहत. प्रमोदलाल गुप्त (इंडियन हिस्टरी कॉंग्रेस ३ री, कलकत्ता. पृ. ५७५.)

पांच ब्राह्मण बंगालांत आदिशूराच्या काळांत आले. या आदिशूर राजाचा कोण-ताहि लेख अद्यापपर्यंत मिळालेला नाहीं. आदिशूर हा राजा होता किंवा नव्हता या दोहोंपैकीं कोणताहि पर्याय खरा ठरला तरीदेखील पांच ब्राह्मण जे बंगालमध्यें आले त्यांचे वंशज राढी व बारेंद्र (हीं मुळांत गांवांचीं नांवें आहेत) हे होत यांत संशय नाहीं. प्राचीन कुलवंशावळीच्या पोथ्यांमध्यें बाणांग शक ६५४ अर्थात् सन ७३२ मध्यें ते बंगालमध्यें आल्याचें नमूद आहे. या कालाबद्दल अवि-श्वास बाळगण्याचें कारण नाहीं. यावेळीं सगळ्या भारतांत आंदोलन चालू होतें. कुमारिलभट्ट मीमांसासूत्राची टीका लिहून पुन्हा वैदिक धर्मप्रस्थापनेचे प्रयत्न करीत होते. महाकवि भवभूति हे त्यांचेच शिष्य. हे कान्यकुब्जमधील ब्राह्मणांचे नेते. कान्यकुब्ज त्यावेळीं ब्राह्मण राजाची राजधानी होती, तेव्हां त्या ठिकाणचे कांहीं ब्राह्मण येऊन अब्राह्मण बंगालमध्यें त्यांनीं ब्राह्मणधर्माचा प्रसार केला यांत आश्चर्य कोणतें? – महामहोध्याय हरप्रसाद रचनावली, भाग १ ला. पृ. ४१९.

१०१ क्रमांक ७५९२६ वि: निंबाळ...
क्रमांक 2932 नों: दि: 2.2.31

या कान्यकुब्ज ब्राह्मणांमध्यें दोन भेद आहेत. ते म्हणजे राढी व बारेंद्र हे होत. ते या गांवांत राहिले व त्या गांवांच्याच नांवानें त्यांना ओळखण्यांत येऊं लागलें.

राढी — यांच्यांत कुलीन प्रथा आहे. मात्र कुलीन संज्ञेचें घर वंशज संज्ञेंत गेलें तर परत कुलीन या श्रेष्ठ दर्ज्यांत येतां येत नाहीं.

बारेंद्र — यांच्यांत तीन भेद आहेत. ते म्हणजे कुलीन, श्रोत्रिय व वंशज ऊर्फ काप हे होत. पण काप संज्ञेच्या कुटुंबांनीं उत्तम वर्तन ठेवलें तर त्यांना वरच्या दर्ज्यांत जातां येतें.

यांच्यांत अन्यपूर्वा (एकाद्या मुलीचा एकाद्या मुलाशीं विवाह ठरला पण त्या मुलाला लग्न होण्यापूर्वी मृत्यु आला तर शब्दानें ठरलेली मुलगी अन्यपूर्वा समजली जाते.) मुलीचा विवाह होतो. मात्र यांना समाज खालच्या दर्जाचें कुटुंब मानतो. यांच्यांत दुसरी एक प्रथा अशी आहे कीं, कुलीन वराशीं मुलीचा संबंध फक्त नांवापुरता ठरविल्यावर कुलरक्षण होतें. नंतर ही मुलगी श्रोत्रिय अगर काप या संज्ञेच्या मुलाला देतां येते. मात्र दर्जा कमी होतो.[1]

वैदिक श्रेणी ब्राह्मण.— यांच्यांत दाक्षिणात्य व पाश्चात्य असे दोन भेद आहेत. साधारणतः दक्षिण देशांतून जे आले त्यांना दक्षिण वैदिक व नंतरच्या कालांत पश्चिम अगर द्रविड देशांतून जे आले त्यांना पाश्चात्य वैदिक असें म्हणतात. वैदिक दाक्षिणात्यांमध्यें कुलीन, मौलिक व वंशज असे भेद आहेत. या वैदिक ब्राह्मणांची संख्या कान्यकुब्ज राढी व बारेंद्र यांच्याशीं तुलना करतां अल्प आहे. यांना राजानें गांव वगैरे दिलेले नाहींत. यांचें म्हणणें असें कीं, नंतर आलेल्या कान्यकुब्जांतहि वैदिक कर्मकांडाचा लोप झाल्यामुळें आम्ही प्रथम ओरिसामध्यें व नंतर बंगालमध्यें आलों व येथें सर्व सुखसोई मिळाल्यानें राहिलों. वैदिक श्रेणी ब्राह्मण हे वेदविद्येंत प्रथमतः निष्णात होते. बंगालमध्यें आल्यावर यांनीं वेदांचें अध्यापन सुरू केलें. त्यांना तेथें पुरोहित पदहि मिळालें. पण त्या कालांत बंगालमध्यें तांत्रिक मताचा प्रभाव फार असल्यानें त्यांना हें तांत्रिक मतहि स्वीकारणें भाग पडलें. पुढें हे नाममात्र राहिले. त्यामुळें राढी व बारेंद्र यांनीं पाश्चात्य वैदिकांना आणलें.[2]

वैदिक श्रेणी पाश्चात्य – तंत्रशास्त्राप्रमाणें शिष्याला मंत्रदान करणाऱ्या गुरूवर शिष्याच्या पातकाची जबाबदारी येते. यामुळें राढी व बारेंद्र हे मंत्रदान करीत नसत. परंतु त्यामुळें समाजांत मान्यता प्राप्त होत असल्यामुळें त्यांनीं वैदिक शास्त्राशीं तंत्रशास्त्राचा

---

१. आज या दोन्ही भेदांची स्थिति पाहिल्यानंतर हे दोन्ही भेद मूळ एका वर्गाचे होते हें दिसून येत नाहीं. – जातिभास्कर. ज्वालाप्रसाद मिश्र. पृ. १४४.

२. वैदिक श्रेणींत दोन भेद आहेत. दाक्षिणात्य वैदिक हे द्रविड व दक्षिणदेशवासी होत. आणि जे वाराणसी (काशी) वगैरे पश्चिम देशाहून आले त्यांना पाश्चात्य वैदिक असें म्हटलें जातें. – जातिभास्कर. पं. ज्वालाप्रसाद मिश्र. पृ. १४४.

९६७०

ज्या गोष्टींत मेळ पडत होता अशाच गोष्टी अंमलांत आणल्या. यांच्यांत ऋग्वेद, सामवेद व यजुर्वेद या तीन वेदांची परंपरा आढळते. यांच्याबद्दल एक दंतकथा अशी आहे कीं, शके १००१ मध्यें शामलवर्मा राजानें यांना बंगालमध्यें आणलें.

सातशती — हे ब्राह्मण सर्वांत जुने. यांच्यांत वैदिक कर्मकांडाचा लोप झाल्यामुळें कान्यकुब्ज ब्राह्मण आले. यांची कान्यकुब्जांतील पंचगोत्राबद्दल श्रद्धा अधिक. हे असें सांगतात कीं, "महाराष्ट्रीयांच्या ज्या वेळीं मुसलमानांशीं लढाया होत त्यावेळीं येथील लोकांना बाहेर जातां येत नसे. महाराष्ट्रीयांची अशी इच्छा होती कीं, इकडील ब्राह्मणांतील सर्व भेद नष्ट व्हावे व सर्वांनींच आपणास वैदिक म्हणवून घ्यावें. त्यावेळीं असे प्रयत्न झाले व महाराष्ट्रीयांचा येथील प्रभाव जर टिकला असता तर सर्वांनींच आपणाला वैदिक म्हणवून घेतलें असतें."

उपनिवेशिक गौड ब्राह्मण — यांना पश्चिमा असें म्हणतात. यांचे आहार संबंध येथील ब्राह्मणांशीं नाहींत. हे आपल्या कुटुंबांत अगर जातीच्या व्यक्तीशीं हिंदी भाषा बोलतात. यांचा पेहराव हिंदी व बंगाली यां दोन्ही पद्धतींचा मध्य साधणारा आहे. गायत्री मंत्राचा उपदेश श्रेष्ठ आहे व ज्यांना हा मंत्र घेण्याचा अधिकार नाहीं अशा स्त्रीशूद्रांकरतां तंत्र निर्माण झालें, असें यांचें मत आहे. हे बंगालांत केव्हां आले हें सांगतां येत नाहीं. आल्यावर त्यांचा जम बसला, हवापाणी मानवलें व ते स्थायिक झाले."

बंगालमधील ब्राह्मणांतील भेदांची साधारण माहिती वर दिली आहे. आतां तेथील कुलीन प्रथेची माहिती थोडक्यांत देतों.

कुलीन प्रथा

मूल गर्भावस्थेंत असतांना अगर जन्माला आल्यानंतर लगेच त्याच्या लग्नाचा संबंध ठरविणें हें श्रेष्ठपणाचें लक्षण मानलें जात असे. याला संबंध प्रथा म्हणतात. लग्नापूर्वी जर मुलाला मृत्यु आला तर ही मुलगी अन्यपूर्वा म्हणजे दोनदां विवाह करणारी ठरते. तिला विवाह करतां येतो, पण दोष चिकटतो. या मुलीशीं ज्या मुलाचा विवाह होतो, त्याच्या कुटुंबाला मौलिक ही संज्ञा दिली जाते. मौलिक कुटुंबांतील मुलाला मौलिक अगर वंशज घराण्याच्या मुलीशीं विवाह करतां येतो. पण ज्याच्याकडून निबंध पाळले गेले त्याचें समाजांतील स्थान श्रेष्ठ प्रतीचें असतें.[1]

मौलिक — यांच्यांत संबंध प्रथा नाहीं. आपल्या संज्ञेतील किंवा कुलीनांतील अन्यपूर्वा मुलीशीं यांना विवाह करतां येतो. जे कुलीनांतील अन्यपूर्वा मुलगी करीत नाहींत त्यांना सन्मौलिक व जे कन्याविक्रय करतात त्यांना पचा मौलिक म्हणतात.

---

१. प्रसूतिमात्रे कन्यायाः वाग्दानं कुललक्षणम् (कन्या जन्माला येतांच तिच्या लग्नाचा संबंध पक्का करणें हें श्रेष्ठ कुलाचें लक्षण आहे.)– सारस्वतसर्वस्व (गुजराती भाषांतर). नं. गो. शर्मा, कलकत्ता. पृ. ८९–९०.

वंशज — यांच्यांतहि संबंध प्रथा नाहीं. मुलींना कुलीनांतील द्वितीय पात्राला देतात. मुलाला भार्यावियोग झाला तर परत मौलिक संज्ञेच्या घराण्यांतील मुलीशीं विवाह करतां येतो.

अशी प्रथा जुन्या बंगालमधील ब्राह्मण जातींत होती. आतां ही प्रथा नष्ट होत आली असून कुलीन, मौलिक, वंशज वगैरेची संतती त्याच वर्गाची समजली जाते.[१]

या जुन्या प्रथेची संक्षिप्त माहिती अशी आहे. या बंगालमधील प्रथेचा संबंध अनेक पुस्तकांत राजा बल्लाळ सेन याच्याकडे लावलेला आढळतो. पण हें सर्वस्वी खरें नसावें. प्रवाद मात्र असा आहे कीं, "राजा बल्लाळ सेन यानें गुणांचा विचार करून तेथील (बंगालमधील) ब्राह्मणांचे तीन विभाग केले. त्यामुळें कुलीनांची मानमर्यादा वाढली. कन्यादान कुलीनांशिवाय अन्यत्र करीत नव्हते. श्रोत्रियांना जर कुलीनांकडे कन्या द्यावयाची झाली तर पुष्कळ धन देणें भाग पडे. या परिस्थितींत एकेकटा कुलीन शेंदोनशें विवाह करी व आळीपाळीनें सासरीं जात असे. अशी फेरी अनेक वर्षांनीं होत असे. यामुळें बायकोची नवऱ्याला व नवऱ्याची बायकोला अंधुक ओळख असे. एक व्यक्ती दिवंगत होतांच अनेक बायकांना वैधव्य प्राप्त होत असे."[२]

ऐतिहासिक माहिती

आर्यीकरणास सुरुवात होण्यापूर्वी बंगाल ऑस्ट्रिक व द्रविड भाषिक होता. त्यावेळीं ऑस्ट्रिक भाषिक बहुसंख्य व अन्यभाषिक अल्पसंख्य होते. कृषिजीवी व मृगयाजीवी, गृहवासी व अरण्यचारी अशा अनेक जातींत तो विभागला गेला होता.[३] तेथें आर्य ब्राह्मण संस्कृतीचा प्रभाव सर्वांत शेवटीं पडला. शिवाय हा विजयसुद्धां संघर्षाविना झाला नाहीं. कित्येक शतकें हा संघर्ष चालला होता.[४] पुढें मौर्य व शुंग या राजवटींखालीं गेल्यावर बंगाली समाज आर्य ब्राह्मण व्यवस्थेंत अंतर्भूत होण्यास सुरुवात झाली.[५] पांचव्या शतकांत उत्तर बंगालनें ब्राह्मण धर्माचा स्वीकार केला. यावेळीं या धर्माच्या देवदेवतांची पूजा होऊं लागली व ब्राह्मणांची बरीच वसती झाली. या काळांत ब्राह्मणेतर ब्राह्मणांना बाहेरून आणून बंगालांत ठेवून घेत व त्यांना भूमिदान करीत. अयोध्येचे रहिवासी बंगालांत देवळें बांधण्याकरतां भूमी विकत घेत. यांत वेदविद् छांदोग्य ब्राह्मण होते. उत्तर बंगालांत कामरूप (आसाम)चा राजा भास्करवर्मा याच्या निधनपूर्वच्या ताम्रपटांत (सातवें शतक) दान दिलेल्या भूमीचें नमूद झालेलें क्षेत्र चंद्रपुरी मयूरशाल्मला अग्रहार हें आहे. हें भूमिदान वस्तुतः तीन पिढ्यांपूर्वी राजाचा प्रपितामह

---

१. संबंध निर्णय (बंगाली). लालमोहन विद्यानिधि.
२. जातिभास्कर (हिंदी). पं. ज्वालाप्रसाद मिश्र. पृ. १४५.
३. बांगालीर इतिहास (बंगाली). डॉ. निहाररंजन राय. पृ. २६६.
४. तत्रैव. पृ. २६७.
५. तत्रैव. पृ. २७०.

भूतिवर्मा (अंदाजें सहावें शतक) यानें पूर्वीच केलें होतें. हें ठिकाण नक्की कोणतें याचा निर्णय अद्याप झालेला नाहीं. पण तें उत्तर बंगालच्या पूर्व भागांत (रंगपूर जिल्हा) किंवा श्रीहट्ट जिल्ह्यांतील पंचखंड (ताम्रपट मिळाला तें ठिकाण) असणें अधिक शक्य आहे. या ताम्रपटांत असें नमूद आहे कीं, भूतिवर्मा यानें वेगवेगळ्या भेदांचे व वेगवेगळ्या ५६ गोत्रांचे २०५ वैदिक सांप्रदायिक ब्राह्मण आणून त्यांची वसती करविली होती. हे सगळे ब्राह्मण वाजसनेयी, छांदोग्य, बाहवृच्य, चारक्य व तैत्तिरीय या शाखांचे असून ते सर्व वेद जाणणारे होते. यांत यजुर्वेदी वाजसनेयींची संख्या अधिक होती. चारक्य व तैत्तिरीय हे यजुर्वेदी, बाहवृच्य हे ऋग्वेदी व छांदोग्य हे सामवेदी होते. यांतील अधिकांच्या नांवापुढें स्वामी ही उपाधि होती. यावरून स्पष्ट दिसून येतें कीं, सहाव्या शतकाच्या आरंभीं ईशान्य बंगालमध्यें (कांहींच्या मतें श्रीहट्ट भागांत) ब्राह्मण समाज स्थिर झाला होता. यांचीं आडनांवें स्वामी व शर्मा अशीं होतीं.[1]

मध्य व पूर्व बंगालमध्येंहि यांचीं प्रमाणें सांपडतात. गोपचंद याच्या पट्टोलीदत्त या भूमीचें दान ग्रहण करणाऱ्या लोहित्यतीरवासी कण्वगोत्री ब्राह्मणाचें नांव भट्ट गोमीदत्तस्वामी असें होतें. तसेंच महाराजा समाचारदेव याच्या घुग्राहारी ताम्रपटातील दान घेणाऱ्या एका ब्राह्मणाचें नांव सुप्रतीक स्वामी असें असून दान घेण्याचा उद्देश बालचक्रसत्रप्रवर्तन हा आहे. त्याचप्रमाणें सहाव्या शतकांतील फरीदपूर छाडिया व सातव्या शतकांतील त्रिपुरामधील लोकनाथ येथील ताम्रपटांतहि यांचीं प्रमाणें मिळतात. यावरून असें दिसून येतें कीं, एक ब्राह्मण महासामंत प्रदोषशर्मा हे अनंतनारायण मंदिराच्या बांधणीकरतां व २११ चतुर्वेदी ब्राह्मणांची वसती करण्याकरतां वनप्रदेशांतील भूमि दान घेत आहेत. ग्रामवासी कुटुंबवत्सल गृहस्थांत शर्मा व स्वामी हीं नांवें बरींच आढळतात. याशिवाय आणखी आडनांवें म्हणजे बृह, चट्ट, भट्ट, गोमी, दत्त, बंद्य व संघमित्र अशीं आहेत.[2] ब्राह्मणांचें शर्मा हें आडनांव आजहि चालू आहे. परंतु स्वामी हें आडनांव नंतर बंद झालें. निधनपूरच्या ताम्रपटाची साक्ष व श्रीहट्ट भागांतील लोकस्मृति यावरून असें दिसून येतें कीं, या ताम्रपटांतील दोनशें स्वामी नांवाचे ब्राह्मण वैदिक ब्राह्मण म्हणून परिचित होते. हे सर्व बाहेरून बंगालमध्यें आले होते. भारताच्या दक्षिण भागांत स्वामी हें आडनांव आजहि प्रचलित आहे. प्राचीन काळांतहि तें प्रचलित होतें. तसेंच उत्तर भारतांतहि तें गुप्तयुगांतील अनेक ताम्रपटांत दिसतें. नंतरच्या काळांतील वंशावळींत वैदिक ब्राह्मणांच्या दोन शाखांचा परिचय मिळतो. त्या म्हणजे पाश्चात्य व दाक्षिणात्य या होत. हे सर्व स्वामी पदवीधारी ब्राह्मण ओरिसांतील कटक जिल्ह्यांतून आलेले होते.[3]

---

१. बांगालीर इतिहास. डॉ. निहाररंजन राय. पृ. २७१

२. चट्ट = चटर्जी अगर चट्टोपाध्याय; भट्ट=भट्टाचार्य; बंद्य=बानर्जी अगर बंद्योपाध्याय.

३. बांगालीर इतिहास. डॉ. निहाररंजन राय. पृ. २७२–२७३.

याप्रमाणें परठिकाणाहून नाना श्रेणींचे ब्राह्मण येऊन त्यांनीं बंगालमध्यें वसती केली आहे. पण वेगळाच एक वर्णस्तर निर्माण होण्याइतक्या बहुसंख्येनें ते आले होते याला मात्र प्रमाण नाहीं.[1] बंगालमध्यें वंशावळी अनेक सांपडतात. वंशावळी निर्माण करण्याची एक प्रथाच तेथें होती असें दिसतें. यांना कुलजी ग्रंथमाला (कुळाची वंशावळ) असें म्हणतात. अशा वंशावळी ध्रुवानंद मिश्राची महावंशावली, नुली पंचाननाची गोष्ठिकथा, धनंजयाचा कुलप्रदीप यांसारख्या अनेक उपलब्ध आहेत. मात्र यांच्याबद्दल इतिहासज्ञांचें मत असें आहे कीं, या सर्व अर्वाचीन असून त्यांच्या निर्मितीचा काल पंधराव्या शतकाच्या मागें जाणार नाहीं.[2]

यांतील कांहीं वंशावळींत कांहीं राजांनीं आपल्या राजवटींत बंगालांत वैदिक कर्मकांडाच्या पुनरुज्जीवनाकरतां बाहेरून ब्राह्मण आणल्याचा उल्लेख आहे. त्यामुळें बंगालच्या राजवटींचें थोडक्यांत अवलोकन करणें भाग आहे.

बंगालमध्यें गुप्तांनंतर व मुसलमानांपूर्वी ज्या कांहीं लहानमोठ्या राजवटींनीं राज्य केलें, त्यांत शशांक, चंद्रवंश, पालवंश, वर्मन व सेन या मुख्य होत. यांतील कांहीं राजवटींचें आधिपत्य सगळ्या बंगालवर तर कांहींचें थोड्या भागावर होतें. यांपैकीं शशांक नांवाच्या राजाची राजवट गुप्तांनंतर सातव्या शतकाच्या सुरुवातीस सुरू झाली. हा राजा जातीनें वैश्य व कट्टा हिंदुधर्माभिमानी होता. बौद्धांना याच्यामुळें बराच त्रास पोंचला, असें कित्येकांचें मत आहे. याच्या अधिकाराची सुरुवात गुप्त राजाचा महासामंत या स्वरूपांत झाली व नंतर हा स्वतंत्र झाला. याच्याबद्दल अशी एक दंतकथा आहे कीं, यानें स्वतःच्या मुक्तीकरतां यज्ञयाग करण्यास शाकद्वीपी अगर ग्रहविप्र नांवाचे ब्राह्मण आणले. या ग्रहविप्र ब्राह्मणांबद्दल बृहधर्मपुराण सांगतें कीं, शाकद्वीपी ब्राह्मण पिता व वैश्य माता यांची संतती ग्रहविप्र अगर गणक होय. याशिवाय वरील पुराण असेंहि म्हणतें कीं, यांना ब्राह्मण समाजांत मान नव्हता. त्यांना पतित असें मानीत असत.[3]

यानंतरची चंद्रवंशाची राजवट बंगालमधील कांहीं भागावरच होती. त्यापुढील महत्त्वाची राजवट म्हणजे पाल राजांची होय. यांचें वैशिष्ट्य असें कीं, हे जन्मानें बंगाली व धर्मानें बौद्ध होते. पण यांची हिंदु धर्माविषयीं बरीच सहानुभूति होती. यांचे मंत्री गौड ब्राह्मण होते.[4] पाल राजांनीं अनेक हिंदु मंदिरांना व ब्राह्मणांना सढळ हातानें

---

१. बांगालीर इतिहास. डॉ. निहाररंजन राय. पृ. २८०.

२. तत्रैव. पृ. २६२.

३. तत्रैव. पृ. ३०१–२.

४. पाल राजे परम सौगत म्हणजे बुद्धोपासक असले तरी त्यांचे मंत्री विष्णुपूजक गौड ब्राह्मण होते. धर्मपाल व तद्वंशीय यांच्या राज्यकारभारांत व दिग्विजयांत या मंत्र्यांचें बुद्धिकौशल्य उपयोगांत आलें होतें. शांडिल्यगोत्री गर्गदेव (गर्ग मिश्र), मुलगा दर्भपाणी,

मदत केली. याच्या गौड ब्राह्मण मंत्र्यांकडे वंशपरंपरेनें या राजवटीचें मंत्रिपद होतें.[1] या मंत्र्यांच्या सहाय्यामुळेंच या राजवटीची सुरुवात आठव्या शतकाच्या मध्याला झाली. बाराव्या शतकाच्या तिसऱ्या पर्वात या राजवटीचा शेवट झाला.

यानंतरची राजवट कांबोज यांची होय. पण हिचा इतिहासांत विशेष उल्लेख नाहीं. हे पार्वत्य (पर्वतप्रदेशांतील) असून बंगालांत आल्यावर यांनीं तेथील धर्म व संस्कृति यांचा आश्रय घेतला.[2]

यापुढें वर्मन अगर वर्मा राजवटीची माहिती इतिहासांत मिळते. हे यादववंशी असून यांचें मूलस्थान कलिंग होतें. यांचा काल अकराव्या शतकाचा मध्य होय. या राजवटींतील राजानें वैदिक ब्राह्मण बंगालांत आणल्याचा उल्लेख कुलजी वंशावळींत सांपडतो.[3]

यानंतर सेन वंशाच्या राजवटीची सुरुवात अकराव्या शतकाच्या मध्यानंतर झाली. हे जन्मानें ब्राह्मण पण पेशानें क्षत्रिय होते. ते आपल्याला कर्णाट क्षत्रिय म्हणवीत. हे सनातन हिंदु धर्म व संस्कृति यांचे पूर्ण अभिमानी होते. या वंशांतील एक राजा बल्लाळ सेन याच्या 'दानसागर' ग्रंथांत सारस्वत ब्राह्मणांचा उल्लेख आढळतो. याचा काल सन ११५८–७६ हा आहे.[4] कुलजी ग्रंथांत सारस्वत ब्राह्मण हे सरस्वतीतीरावरून आंध्र राजा शूद्रक याच्या निमंत्रणावरून आल्याचा उल्लेख आहे.[5]

याशिवाय अकराव्या शतकांत दक्षिण राढमध्यें शूर वंश राज्य करीत होता, अशी माहिती मिळते. परंतु या वंशांतील रणशूर हें एकच नांव इतिहासाला ज्ञात आहे. इतर ठिकाणीं आदिशूर, क्षितिशूर, धराशूर हीं नांवें सांपडतात, पण इतिहासाला तीं अज्ञात आहेत.[6]

नातू सोमेश्वर व पणतू केदार मिश्र व त्याचा मुलगा भट्ट गुरव मिश्र हे धर्मपाल, देवपाल व शूरपाल तसेंच नारायणपाल यांचे मंत्री होते. गुरव मिश्र हे युद्धकलेंतहि निष्णात होते. पाल सम्राट् या मंत्र्यांना केवढा मान देत हें नारायणपाल यांच्या गरुडस्तंभावरील शिलालेखावरून दिसून येतें. — प्राचीन बांगला ओ बांगाली (प्रकाशक–विश्वभारती) डॉ. सुकुमार सेन. पृ. १४.

---

१. बांगालीर इतिहास. डॉ. निहाररंजन राय. पृ. २८६.

२. तत्रैव. पृ. २९०.

३. ,, ,, ४९३.

४. बल्लाळ सेन यांनीं आपले गुरु अनिरुद्ध भट्ट यांच्याविषयीं जें लिहिलें आहे त्यावरून ते सारस्वत श्रेणीचे ब्राह्मण दिसतात. — बांगला देशेर इतिहास. डॉ. रमेशचंद्र मुजुमदार. पृ. १८३.

५. बांगालीर इतिहास. निहाररंजन राय. पृ. ३०१.

६. तत्रैव. पृ. २६३.

बंगालमधील निरनिराळ्या लिखाणांत असे पुष्कळ उल्लेख सांपडतात कीं, बंगालमध्यें वैदिक कर्मकांडाचा लोप झाल्यामुळें त्याच्या पुनरुज्जीवनाकरतां पुन्हा पुन्हा बाहेरून ब्राह्मणांना आणावें लागलें. 'हलायुध' नांवाचा एक शास्त्रकार 'ब्राह्मणसर्वस्व' ग्रंथांत म्हणतो कीं, राढी व बारेंद्र हे यथार्थ वैदिक नसून यज्ञयागानुष्ठानाच्या पद्धती त्यांना माहीत नाहींत. हलायुधाच्या पूर्वी अनिरुद्ध भट्ट आपल्या 'पितृदायिता' ग्रंथांत वेदचर्चेची बंगालमधील अवहेलना पाहून दुःख प्रदर्शित करतात.[१] याचें कारण बंगालमधील समाजपद्धति होय. एक बंगाली ब्राह्मण लेखक म्हणतात, "बंगाली हे नांवानें हिंदु, पण आचारानें अर्धे बौद्ध व अर्धे तांत्रिक."[२]

बंगालमध्यें वैदिक कर्मकांडाचा लोप होऊन पुन्हा पुन्हा बाहेरून ब्राह्मण आणावे लागण्याचें मुख्य कारण म्हणजे तेथील समाजावर असलेला तंत्रशास्त्राचा प्रभाव हें होय. आपल्यांतील अलीकडील पिढीला याबद्दल कांहीं माहिती नसल्यामुळें ती थोडक्यांत येथें देणें अवश्य वाटतें. बंगाली समाजावर या शास्त्राचा फारच प्रभाव होता. अजूनहि थोडा अन्य रीतीनें असेलच.

तंत्र म्हणजे आजच्या बहुमान्य अर्थाप्रमाणें ज्ञान व विशेषेंकरून गूढ विषयाचें यंत्र (गूढार्थपूर्ण आकृति) व मंत्र यांच्या सहाय्यानें मिळविलेलें व मोक्षप्राप्तीला सहाय्यभूत होणारें ज्ञान.[३]

या शास्त्रांत असें गृहीत धरलें जातें कीं, मनुष्यामध्यें एक दैवी शक्ति असते व तिला जागृत करून साधकाला अनेक गोष्टी साध्य करतां येतात व ब्रह्मानुभूतिहि प्राप्त करून घेतां येते. तंत्रशास्त्र मंत्रशास्त्रावर आधारलेलें आहे. या शास्त्राचें मत असें आहे कीं, बीजमंत्राचा जप करतां करतां त्यांतून एक देवतास्वरूप आविर्भूत होतें. निरनिराळ्या आकाराच्या पात्रांत पाणी घालून त्यांच्यावर आघात केल्यावर ज्याप्रमाणें त्यांतून निरनिराळे सूर उत्पन्न होतात त्याचप्रमाणें शब्दाचें आहे. तंत्राच्या मतें प्रत्येक शब्दाला एक रूप व एक आकार आहे. संगीताच्या प्रत्येक सुराला एक रूप आहे. हें रूप त्या स्वराची देवता. तंत्र सांगतें कीं, मनुष्याचा देह हा एक शब्दयंत्रविशेष आहे.[४]

---

१. बांगालीर इतिहास. डॉ. निहाररंजन राय. पृ. ३०१.

२. पांचकौडी बंद्योपाध्याय रचनावली. (बंगाली). भाग २. पृ. २२१.

३. The Age of Imperial Kanauj. N. D. Bhattacharya. भारतीय विद्याभवन. पृ. ३१४

तंत्र म्हणजे ज्याच्या द्वारें ज्ञानाचा विस्तार केला जातो तें शास्त्र. 'तन्यते विस्तार्यते इति तंत्रम्' यामुळें शैव सिद्धांताच्या कामिक आगमांत याचा व्यापक अर्थ शास्त्र, सिद्धांत, अनुष्ठान, विज्ञान व विज्ञानविषयक ग्रंथ असा आहे. — आर्य संस्कृतिके मूलाधार (हिंदी). श्रीबलदेव उपाध्याय. पृ. ३०४–५.

४. पांचकौडी बंद्योपाध्याय रचनावली. भाग २. पृ. २६२.

मंत्रयोग्यांना पहिल्यांदां अक्षरांची जरुरी लागते. या अक्षरांतील प्रत्येकाचें संशोधन करून त्याचें मूल्य व आचारांतील त्याचें स्थान निश्चित केलेलें आहे, म्हणजे अमुक अक्षराच्या जपानें अमुक सिद्धि प्राप्त करून घेतां येते, असें ठरवून ठेवलें आहे. या प्रत्येक अक्षराच्या अधिष्ठित देवदेवता त्याच्या स्वरूपाबरोबर दाखविल्या आहेत.

या मंत्राचा जप करण्याकरतां माळेची जरुरी असते. ज्या वस्तूंची माळ बनते त्यांचें संशोधन करून त्यांचें मूल्य ठरविलेलें आहे. शिवाच्या आराधनेकरतां जी माळ उपयुक्त होऊं शकते ती शक्तीच्या आराधनेला विरोधी होऊं शकेल. कांहीं माळांच्या जपानें लवकर सिद्धि मिळूं शकेल तर कांहींच्यामुळें विलंब लागेल.

या मंत्रजपाला सुरुवात मुहूर्तानें करणें जरूर आहे. त्यामुळेंच सिद्धि मिळूं शकेल. तसेंच त्याला विशेष आसनाची जरुरी आहे. सुती तसेंच सणी कापड, लाकूड, धातु, विशिष्ट पशु यांवर विशिष्ट पद्धतीनें आरूढ होणें जरूर आहे. या आसनांत सर्वांत जास्त महत्व स्मशानांतील शवाला आहे.[१] यांत हत्यारानें मृत्यु पावलेल्याचें मूल्य पहिलें, विषानें मेलेल्याचें दुसरें, रोगानें मेलेल्याचें तिसरें व राजाज्ञेनें मारलेल्याचें चौथें असा क्रम लावला जातो.[२] या शास्त्राची मुख्य गोष्ट म्हणजे याची दीक्षा गुरूकडूनच घेतली पाहिजे, तसेंच साधकानें आपली उपासना व आपले आचार कोणालाहि सांगतां कामा नयेत, ते गुप्त ठेवले पाहिजेत.[३] थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कांहीं विशिष्ट पद्धतीनें जप करून इष्टदेवतेला प्रसन्न करून आपलें इष्ट साध्य प्राप्त करून घ्यावयाचें, हा तंत्र-शास्त्राचा मार्ग आहे. गोमंतकांत आपण नवचंडी मंत्राचा जप आपल्या ईप्सितसिद्धीकरतां करवून घेतों, तो यांतीलच एक प्रकार असावा. मात्र हा प्रकार बराचसा शुद्ध स्वरूपाचा आहे.

तंत्रशास्त्रांत वाममार्ग हा एक उपासनेंत सिद्धीचें केंद्र मानलेला मार्ग सांगितला आहे.[४] वामाचाराबद्दल तंत्राच्या पुरस्कर्त्यांपैकीं एक सिद्ध तिलोपा याचें मत असें कीं, जिम विस भक्खइ विसइ पलुता। तिम भव भुंजइ भवहिण जुता।[५] (विष हें नेहमीं

---

१. युद्धांत लढतां लढतां उत्साहाच्या भरांत ज्यानें आपलें बलिदान केलें, जीवितावस्थेंत ज्याच्या चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्या त्याचें शव साधनेस योग्य समजलें जातें. हें शव निष्क्रिय शिवाचें उत्तम प्रतीक मानलें जातें. — 'शवसाधना' 'विचार व वितर्क' (हिंदी). डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी.

२. कल्याण (हिंदी मासिक). वर्ष २४, अं. ३. ले. डॉ. व्ही. भट्टाचार्य.

३. तंत्रपरिचय (बंगाली). सुखमय भट्टाचार्य सप्ततीर्थ. पृ. १–२.

उपनयनाच्या वेळीं मुलाचे वडील गायत्रीमंत्र त्याला कानांत सांगतात, हा तंत्राचाच प्रभाव असावा.

४. विश्वधर्मदर्शन (हिंदी). सांकळिया बि. वर्मा. पृ. २११.

५. सिद्ध साहित्य (हिंदी). डॉ. धर्मवीर भारती.

खात राहिल्यानें ज्याप्रमाणें विषाच्या प्रभावापासून मनुष्य मुक्त होतो, त्याचप्रमाणें संसारांतील भोग भोगल्यावर तो संसारांत लिप्त होत नाहीं.)

तंत्रशास्त्राच्या पुरस्कर्त्यांचें मत असें आहे कीं, तंत्र व वेद यांची उत्पत्ति शिवापासून झाली व हें शास्त्र श्रुतीप्रमाणेंच आहे.[१] कलकत्त्याचे एक न्यायाधीश Sir John Woodroff यांनीं Arthur Avalon या टोपण नांवाखालीं 'शक्ति व शाक्त' वगैरेसंबंधीं हजारों पानें भरतील इतकें वाङ्मय प्रसिद्ध केलें आहे. पाश्चात्त्यांच्या ज्ञानलालसेचें हें द्योतक आहे. त्यांच्या मतें तंत्र हें वैदिक आहे आणि अथर्ववेदाची शाखा रुद्रजामल हिच्यावरून असें दिसून येतें कीं, बुद्धीश्वरी देवीची उपासना करणारे वशिष्ठदेव यांनीं तारा देवीची उपासना हिमालयांतील महाचीन या ठिकाणाहून आणून भारतांत प्रसृत केली. श्रीरामकृष्ण परमहंस मठाचे एक स्वामी श्रीशंकरानंद यांच्या मतें तंत्र हें वैदिक असून तंत्रमार्ग हा आर्य संस्कृतींतील एक भाग आहे.[२]

परंतु हें मत सर्वमान्य नाहीं. इतकेंच नव्हे तर विरुद्ध बाजू याहून जोरदार आहे. बंगालमधील मागील पिढींतील एक विद्वान महामहोपाध्याय हरप्रसाद शास्त्री यांचें स्पष्ट मत असें आहे कीं, तंत्र हिंदुस्थानांत बाहेरून आलें व तें शक किंवा मागी पुरोहितांनीं इकडे आणलें असावें.[३]

वाचकांना आपलें मत बनविण्यासाठीं लामा अंगारिक गोविंद, जे जन्मानें जर्मन आहेत, त्यांच्या मताचा उपयोग होईल. ते म्हणतात, "तंत्रमार्गीय बौद्धधर्माचा हिंदु धर्मावर इतका प्रभाव पडला होता कीं, तंत्रमार्ग ही एक हिंदु धर्मांतील निर्मिती असून

---

१. तंत्रपरिचय (बंगाली). सुखमय भट्टाचार्य सप्ततीर्थ. पृ. ३.

२. श्रीदुर्गा (बंगाली). स्वामी प्रज्ञानानंद. पृ. १६.

३. या तांत्रिकांचा पंथ महाचीन अथवा तिबेट येथून हिंदुस्थानांत आला असावा, असें श्री. नगेंद्र चौधुरी म्हणतात. साधनमालेंतील आर्य नागार्जुन पौरेः भोटेषु उद्धृतम् म्हणजे नागार्जुनानें भूतानमधून ही उपासना आणली, हें त्यांनीं उद्धृत केलें आहे. या पंथांतील एका जटादेवीला महाचीन तारा असें नांव आहे. शिवाय या पंथाचा मुख्य प्रसार तिबेटनजीक आसाम, बंगाल, काश्मीर या प्रांतीं मुख्य आहे. — संस्कृतिसंगम (आ. २ री). द. के. केळकर. पृ. २८८.

The tantras (otherwise known as agamas) were perhaps the religious and literary legacy from Buddhism in Bengal although it originally came from outside, perhaps from China. — Aspects of Bengali Society. Tamosh Chandra Gupta, M. A., Ph. D. P. 182.

बुद्ध धर्माच्या पडत्या काळांत कांहीं बौद्ध पंथांनीं तिचा स्वीकार केला, असा आजघटकेपर्यंत बहुसंख्य पाश्चात्य विद्वानांचा ग्रह होऊन बसला आहे."[१]

"विनयतोष भट्टाचार्य आपल्या बुद्धधर्मीय गुह्यमार्गाच्या परिचयांत असा निष्कर्ष काढतात :— निर्विवादपण असें म्हणतां येतें की, बौद्धांनींच पहिल्याप्रथम आपल्या धर्मांत तंत्राचा अंतर्भाव केला व पुढें हिंदुधर्मीयांनीं तें घेतलें. बुद्ध धर्माचें नंतरचें स्वरूप शैव पंथांतून निष्पन्न झालें आहे असें म्हणणें निरर्थक होय."[२]

ते पुढें म्हणतात, "श्रीयुत भट्टाचार्य यांच्या पुढील विधानांशीं आम्ही पूर्ण सहमत आहोंत. बौद्ध तंत्रें हीं बाह्यतः बऱ्याच अंशीं हिंदु तंत्रांसारखीं दिसतात. पण वस्तुतः त्यांचा विषय किंवा त्यांत अंतर्भूत असलेली तात्त्विक विचारसरणी किंवा धर्मतत्त्वें यांपैकीं कोणत्याहि दृष्टीनें पाहतां त्यांत फारच थोडें साम्य आहे. आणि त्यांत फारसें नवल नाहीं. कारण बौद्धांचीं उद्दिष्टें हीं हिंदूंच्या उद्दिष्टांपासून अत्यंत भिन्न आहेत."[३]

यावरून हें तंत्रशास्त्र मुळांत बौद्धांचें असून नंतर त्यांतील कांहीं अंगांचा प्रवेश हिंदु धर्मांत झाला असें म्हणतां येतें. पुढें बौद्ध तंत्र, शैव तंत्र, वैष्णव तंत्र असे भेदहि निघाले. मात्र वामाचाराला महत्त्व बौद्धांनीं दिलें. कुलार्णव तंत्रामध्यें 'मद्यं मांसं च मत्स्यं च मुद्रा मैथुनमेव च । मकारपंचक देवीदेवतां प्रियकरम् ।'[४] म्हणजे मद्य, मांस, मत्स्य, मुद्रा व मैथुन हे पांच मकार देवतांना प्रिय आहेत, असें आहे. यांतील कांहीं प्राण्याला आवश्यक असले तरी त्यांचा अतिरेक केव्हांहि अधोगतीलाच नेणार हें उघड आहे. असें असतां कोणत्याहि धर्मानें का असेना, यांना इतकें महत्त्व कां दिलें, त्याचें बहुतेकांना कोडें पडतें. यामुळेंच कांहीं ग्रंथकार या पांच मकारांचें रहस्य गूढ आहे व यांत उच्च तात्त्विक गर्भितार्थ आहे असें मत देतात.[५]

---

१. 2500 Years of Buddhism. India Government Publication. पृ. ३६२.

२. तत्रैव. पृ. ३६३.

३. तत्रैव. पृ. ३६५.

४. तंत्रपरिचय (बंगाली). सुखमय भट्टाचार्य सप्ततीर्थ. पृ. ५६.

५. ज्यांना अशा तऱ्हेनें लावलेला अर्थ जाणून घ्यावयाचा असेल त्यांनीं श्रीबलदेव उपाध्याय कृत आर्यसंस्कृतिके मूलाधार (हिंदी) पृ. ३१५ पहावें.

या बाबतींत एका बंगाली ग्रंथकाराचें मत असें आहे :— "तंत्र सांगतें कीं, तुमचा आत्मा तुम्हांला प्रिय. तेव्हां आत्मतृप्तीकरतां तुम्ही जें कांहीं करतां तें या आत्म्याला निवेदन करून करा. मद्य, मांस, मत्स्य – ज्याचा तुम्ही उपभोग घेणार तें सर्व देवतेचा प्रसाद मानून त्याचा उपभोग घेतल्यानें उपभोगणाऱ्यांत संयम राहतो. तंत्र सांगतें कीं, तुमच्याबरोबर तुमच्या देवता असून त्या तुमच्या देहभांडारांत आहेत. तेव्हां इष्टदेव-

वामाचाराचे दुष्परिणाम दिसून आल्यावर लोकांच्या मनावर परिणाम करण्याकरतां त्याचे गूढ अर्थ लावण्याचे प्रयत्न झाले, असें दिसतें. वस्तुतः मनुष्यमात्राची स्वाभाविक प्रवृत्ति भोगाकडे असल्यानें अशा गोष्टींना धर्मशास्त्राचा आधार मिळाल्यावर त्याचे दुष्परिणाम होणारच, हें सांगण्याची गरज नाहीं.

याबाबत डॉ. एन्. दत्त म्हणतात, "तंत्रमार्गीय विधीचा बऱ्याच धर्मपंथीयांकडून जो दुरुपयोग करण्यांत आला त्यामुळें सर्वत्र अशी समजूत पसरली आहे कीं, सर्व तंत्रें मद्य, मांस, मैथुन, मत्स्य आणि मुद्रा यांचें समर्थन करीत असतात... गुह्य समाज आणि दुसरे कांहीं पूर्वीचे ग्रंथ यांत मांसाशन, स्त्रीसंग आणि मुद्रा यांचे उल्लेख आहेत. पण मद्य आणि मत्स्य यांच्या सेवनाबद्दल उल्लेख सांपडत नाहीं. यांची जोड मागाहून देण्यांत आली असावी... उच्च अद्वैतवादी तत्त्वज्ञान सांगणाऱ्या व थोर आदर्श पुढें ठेवणाऱ्या धर्मांनीं अशा मार्गाची शिफारस करावी व त्याचा आत्मोन्नतीच्या मार्गांतील साधनें म्हणून उपयोग होण्यापेक्षां दुरुपयोग अधिक व्हावा, ही खरोखर अत्यंत खेदकारक गोष्ट होय. तंत्रमार्गाला सर्वांकडून दूषण लावण्यांत आलें. तथापि अजून हिंदी मनावर, अजाणतेपणानें का होईना, त्याचा प्रभाव शिल्लक आहे."[१]

तंत्रशास्त्राचा सर्वांत जास्त प्रभाव बंगालवर होता. "गौडे प्रकाशिता विद्या मैथिले प्रकटीकृता । क्वचित् क्वचित् महाराष्ट्रे गुर्जरा प्रलयागता ॥" असें एक वचन संस्कृतांत आहे. त्याचा अर्थ असा कीं, "गौड (बंगाल) मध्यें या विद्येला सुरुवात झाली, मिथिलेंत तिचा प्रसार झाला. महाराष्ट्रांत ती क्वचित् दिसते, तर गुजरांथेंत ती निर्माल्यवत् झाली."[२] गुजरांथेंत जैनांच्या प्राबल्यामुळें तंत्रशास्त्राचा प्रसार झाला नाहीं.

तेला अर्पण करून प्रसाद कसा ग्रहण करावा, हें तंत्रांत सांगितलें आहे." — पंच मकार — पांचकौडी बानर्जी रचनावली, भाग २ रा. पृ. ३२७–२८.

---

१. The Age of Imperial Kanauj. Dr. N. Dutt. (भारतीय विद्याभवन) पृ. २६६.

२. तंत्रपरिचय (बंगाली). सु. भ. सप्ततीर्थ. पृ. ८.

लोकहितवादींच्या 'आगमप्रकाश' ग्रंथांत तांत्रिक विधींच्या नांवाखालीं करण्यांत येणारे किळसवाणे प्रकार सांगून त्यांच्यावर टीका केली आहे. "या ग्रंथांतील सौम्यतम विधींचें सौम्यतम भाषेंत वर्णन करणेंदेखील बरेंच कंटाळवाणें होईल. जें जें गलिच्छ तें तें या पंथाच्या ग्रंथांनीं तीर्थासारखें पवित्र मानलें आहे. मद्यपान व व्यभिचार हीं यांचीं महापुण्यें होत. एवढ्यानेंच समाधान न होऊन मद्यपान व व्यभिचार यांतहि त्यांनीं पुण्यप्राप्तीच्या दृष्टीनें नंबरबारी लावली आहे. साधारण मद्यास्वादाहून ओकेपर्यंत दारू पिण्याचें महत्त्व मोठें, व्यभिचारविधींत अर्थात् चांडाळ स्त्रिया व रजस्वला यांस काशीप्रयाग तीर्थाची पदवी देण्यांत आली. एवढ्या गोष्टीहि या पंथाचें किळस-

बंगाली समाजावरील तंत्रशास्त्राच्या प्रभावाबद्दलचें हें विवेचन एका बंगाली लेखकाच्या पुस्तकांतील उतारा देऊन पुरें करतों.

"बंगालमध्यें ब्राह्मण, वैद्य या श्रेष्ठ जातींत तांत्रिक धर्माचा प्रसार जास्त होता. मोठमोठे तांत्रिक साधक 'करण' म्हणजे सुरापान करीत. तंत्राच्या हिशेबानें महामांस म्हणजे गोमांस, उंटाचें व रेड्याचें मांस समजलें जाई. तांत्रिक गण महामांसाचें सेवन करीत."[1]

"यामुळें असें म्हटलें पाहिजे कीं, बंगालचा धर्म तांत्रिक व तांत्रिक साहित्य हेंच बंगालचें साहित्य. या तंत्रधर्मामुळें बंगालच्या समाजपद्धतीला एक निराळें वळण लागलेलें आहे. बंगालमध्यें वाशिष्ठ पद्धतीमुळें पीतमंगोल जातीकडे बंगालमधील आदिद्रविड जाती व मूठभर आर्य जाती यांचा वैवाहिक संबंध साधारणपणें चालू होता. वाशिष्ठ नांवाचा एक तांत्रिक साधक बंगालमध्यें होऊन गेला. तो वज्रयानी बौद्ध समाजाचा नेता होता. त्यानें अशी पद्धत सुरू केली कीं, पूर्णाभिषिक्त भारतवासी तांत्रिक बौद्धांना स्वेच्छेनें चिनी, भूटिया, आहोम (आसाम) प्रभृति तरुणींना शक्तिरूपांत स्वीकारतां येतें. अर्थात् पूर्वी त्यांना आपल्या धर्मांत घेणें जरूर असतें. इंग्रजी अंमलापूर्वी दीड हजार वर्षे ही पद्धत चालू होती. राज राममोहन राय यांनीं शैव विवाह केला होता. महाराज कृष्णचंद्र य. तंत्रसाधक ब्राह्मणाची शैवविवाहसंमत अशी एक शक्ति (स्त्री) होती. अविवाहित गृहस्थकन्या शक्ति होत नव्हती. बहुतकरून मग, आराकानी, मणिपुरी, आहोम, भूटिया, चंडाळ प्रभृति जातीच्या कन्या शक्ती होत. त्यांना मुलेंबाळें होत. त्या मुलांचा समाजांत विवाह होई. असें रक्तमिश्रण अनादिकालापासून बंगालमध्यें होत आलें आहे."[2]

साधारणतः बंगालची समाजपद्धति पूर्वकाळीं अशी होती. आतां मुख्य विषयाच्या बाबतींत कांहीं महत्त्वाच्या मुद्द्यांचा विचार करून हा लेख आटोपता घेऊं.

गोमंतकांतील सारस्वत ब्राह्मण हे बंगालमधून येथें आले असा एक जोरदार प्रवाद आहे. यांतील पहिला मुद्दा असा कीं, परशुरामानें गौड देशांतील तिरहूत येथून (त्रिहोत्रपूरहून) आपले आप्त दशगोत्री ब्राह्मण आणले. याला आधार आहे तो फक्त सह्याद्रिखंडाचा. सह्याद्रिखंडाच्या उत्तरार्धांतील चित्पावन ब्राह्मणोत्पति या प्रथमाध्यायाचा ४८ वा श्लोक असा आहे :–

त्रिहोत्रवासिनश्चैव पंचगौडांतरास्तथा ।
गोमांचले स्थापितास्ते पंचक्रोश्यां कुशस्थले ॥[3]

वाणें स्वरूप दाखविण्यास पुरेशा आहेत." — 'लोकहितवादी' – अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक, भाग २ रा. गं. दे. खानोलकर. पृ. ९६.

---

१. पांचकौडी बंद्योपाध्याय रचनावली (बंगाली). भाग २. पृ. ९९.

२. तत्रैव. भाग १. पृ. १४–१५.

३. सह्याद्रिखंड. जर्सन द कून्या प्रत.

साधारणतः जुन्या काळांत अशी एक समजूत होती कीं, संस्कृत भाषेंतलें सर्व लिखाण सत्य व आधारभूत मानतां येण्यासारखें आहे. परंतु ही गोष्ट खरी नाहीं. आपापल्या मताच्या पुष्टीकरतां कित्येकदां नवी रचना करून ती पुराणांतील कोणत्याहि भागास जोडली जात असे याबद्दलचे पुरावे अनेक आहेत. सह्याद्रिखंड हें स्कंदपुराणांतर्गत असलें तरी त्याची जोड मागाहून देण्यांत आली असावी व त्याची रचना १४ व्या शतकांत झाली असावी, असें विद्वानांचें मत आहे.

आतां यांतील तिरहूत अगर त्रिहोत्रबद्दल विचार करूं. इतिहासज्ञ जायस्वाल यांचें मत असें आहे कीं, तिरहूत शब्द त्रिहोत्रपासून आलेला नाहीं, तर तो तिर व होत यांपासून आलेला असून त्याचा अर्थ नदीखालची जमीन असा आहे.[१] हें स्थान बंगालमध्यें नसून बिहारमध्यें आहे. जुन्या काळीं याला मिथिला असें म्हणत. हें स्थान आज दोन भागांत विभक्त झालेलें आहे. पहिला भाग नेपाळच्या सत्तेखालीं असून दुसरा भारतांत आहे. भारताची मिथिला हीच तिरहूत होय. या विभागांत आज मुझफरपुर, दरभंगा, चंपारण्य व सारण हे जिल्हे येतात.[२] येथील ब्राह्मणांना मैथिल ब्राह्मण असें म्हणतात. इतिहासज्ञ जायस्वाल असें सांगतात कीं, तिरहूतमध्यें सारस्वतांची वसती कधींच नव्हती.[३]

दुसरा मुद्दा गौड शब्दाबद्दलचा. मागें आम्ही भारतमित्र (रिवण–गोवा) मासिकांत (वर्ष २३, अंक ३) उत्तरेंतील गौड देशाची माहिती दिली आहे व बंगालमध्येंच गौड नांवाचा भाग आहे असें नव्हे तर उत्तरेंतहि गौड देश होता हें दाखवून दिलें आहे. या उत्तरेंतील गौडाचा उल्लेख मत्स्यपुराणांत सांपडतो. याला कोसल जनपद म्हणत.[४] बंगालमधील इतिहासज्ञ हें मान्य करतात. पाणिनीच्या सूत्रांत पुंड्र (बंगाल) मध्यें गौडपुर असल्याचा उल्लेख आहे. पुंड्र अगर पौड देशांत गुड (गूळ) बाहेर पाठविण्याचें केंद्र असल्यामुळें त्याला गौडपुर म्हटलें असावें.[५] बंगाली इतिहासज्ञ हें मान्य करतात. पण हें स्थान नक्की कोठें होतें तेंहि त्यांना सांगतां येत नाहीं.[६] बंगालमधील मुख्य गौड देश हा वंग पुंड्रवर्धनपासून स्वतंत्र असून तो ज्याला पश्चिम बंगाल (मालदह, मुर्शिदाबाद, वीरभुम, वर्धमान याचा भाग) म्हणतात तो होय. बंगालमधील या गौड देशाचा व गोमंतकीय सारस्वतांचा एकमेकांशीं कांहीं संबंध नसून पंचगौडांतील गौड याचा संबंध उत्तरेंतील गौड देशाशीं आहे.

---

१. Saraswat Families. S S. Talmaki. भाग १. पृ. ४.
२. Jha Commemoration Volume. पृ. ३८४.
३. He further states that Tirhoot was never residence of Saraswats.—Saraswat Families. Talmaki. भाग १ पृ. ४
४. बांगालीर इतिहास. (बंगाली) डॉ. निहाररंजन राय. पृ. १५२.
५. पाणिनीकालीन भारत (हिंदी). डॉ. वासुदेवशरण अग्रवाल. पृ. ८५–८६.
६. बांगालीर इतिहास. डॉ. निहाररंजन राय. पृ. १५१.

तिसरा मुद्दा कोंकणीचें बंगाली भाषेशीं दिसणारें साम्य हा होय. याला प. वा. वामन मंगश दुभाषी यांनीं 'महाराष्ट्र सारस्वत' मासिकांत उत्तर दिल्याचें आठवतें. हें साम्य दोन्ही भाषांतील कांहीं शब्द संस्कृतमधून आलेले असल्यानें दिसतें. कोंकणीचें असेंच साम्य हिंदी वगैरेशींहि असल्याचें आढळतें.

यांचें स्पष्टीकरण होण्याकरतां मी विश्वभारतीचे आचार्य क्षितिमोहन सेन यांच्या 'जातिभेद' या बंगाली ग्रंथांतील एक उतारा कोंकणी भाषांतरासहित देत आहें. वाचकांनीं त्यांची एकमेकांशीं तुलना करून पहावी.

"राढीय ब्राह्मण समाजे एक एकजन पुरुष असंख्य विवाह करितेन। अनेक समय खाताय श्वशुरबाडीर नाम लिखिया राखितेन, स्त्रीदेर चिनितेन ना। इहाते नानाविध नैतिक अधोगति अनिवार्य। अन्यदिके बंशज ब्राह्मणेरा विवाहइ करिते पारितेन ना। ताहादेर पक्षे स्त्री दुर्लभ हओयाय नाना देशे हइते नौका भरिया लोके अनेक कन्या लइया विक्रय करिते आनित। सेइ सब कन्यादेर मध्ये केह वा विधवा केह वा नीचकुलोत्पन्ना केह वा हिंदुइ नय। सकलेर ब्राह्मण कुमारिका बलिया उपस्थित करा हइत। एवं लोके गरजेर चोटे खांज खबर ना लइयाइ अल्प मूल्ये किनिया लइया विवाह करितेन। एइ सब कन्यादेर पूर्व बंगे "भरार मेये" बलित। पूर्व बंगे विशेषतः बिक्रमपुर प्रभृति स्थाने अनेक स्थानेइ बंशजदेर घरे भरार मेयेदेर खबर मिले।"

यांचें कोंकणी भाषांतर :– "राढी बामण समाजांतलो दर एक दादलो जायतीं लग्नां करतालो. जायत्या वेळार घरचे पटयेर मांवालें नांव ठिकाण बरोवन दवरतालो; बायलेक ओळखीसुद्धां नाशिल्लो. अशें जाल्ल्यान अधोगती जावपाचीच. दुसरे वटेन वंशज बामण लग्न करूंक पावना आशिल्ले. तांका बायलो मेळना आशिल्ल्यान जायत्या गांवांतसून व्हडीं भरून चलयो विकूंक हाडताले. ह्या चलयांत कोण विधवा, कोण सकल्या जातीच्यो, कोण हिंदु पासून न्हंय, अशें आसुनूय सगल्योच बामण चलयो म्हणून सांगताले. गरजेवंत लोक चडशी खबर घेना आसतना थोड्या दुडवांक तांकां विकत्यो घेवन लग्न करताले. ह्या सगल्या चलयांक पूर्व बंगालांत 'वाडिल्ल्यो होंकलो' अशें म्हणटाले. विक्रमपुर गांवांत जायत्या वंशज बामणांच्या घरांत ह्या बायलांची खबर मेळता."

आतां यानंतर लक्षांत घेण्यासारखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे बंगालमधील ब्राह्मणांत असलेली कुलीन प्रथा होय. ही प्रथा बल्लाळ सेन यानें अंमलांत आणली, अशी माहिती अनेक ग्रंथांत आढळते. या राजाचा काळ बाराव्या शतकाचा उत्तरार्ध होय. अशी एक माहिती उपलब्ध आहे कीं, कान्यकुब्जमधील जे पांच ब्राह्मण बंगालांत आले त्यांच्याबरोबर पांच कायस्थ होते.[१] यांच्यांतहि कुलीन प्रथा दिसते. नुसत्या

१. Hindu Custom in Bengal. A. C. Bose. पृ. ३८.

बंगाली सारस्वतांतच ही प्रथा होती असें नव्हे, तर पंजाबी व बिहारी सारस्वतांतहि ती होती. तसेंच कांहीं ठिकाणीं ती इतर जातींतहि होती असे पुरावे मिळतात.[१]

अर्थात् बंगालांतील पंचगौड सारस्वत जातींतहि ही प्रथा होती. पण आपल्या गोमंतकीय सारस्वत समाजांत मात्र ही प्रथा बिलकूल दिसून येत नाहीं. गोमंतकीय सारस्वत ब्राह्मण बंगालमधून आले नाहींत याबद्दलचा हा एक जबरदस्त पुरावा होय.

राहतां राहिलेला शेवटचा मुद्दा प. वा. डॉ. वैकुंठ कामत यांचा होय. यांचें मत याच पुस्तकांतील पहिल्या लेखांत पृ. २५ वर उद्धृत केलें आहे. ते म्हणतात कीं, पंजाबमधील लोक दीर्घकपाल व सरळ सुंदर नाकाचे आहेत. उलट गोमंतकांतील सारस्वत ह्रस्वकपाल व मध्यमाकृति नाकाचे असून त्यांचीं हीं वैशिष्ट्यें बंगाली ब्राह्मणांशीं खूपच जुळतीं आहेत. (Os povos de Punjab são dolicocéfalos e leptorrinianos e os Saraswatas de Goa que são braquicéfalos e mesorrinianos aproximam-se muito dos Brâmanes de Bengal.—Os Brâmanes Saraswatas de Goa. पृ. ६३. टाय.)

सन १९२७ पासून Anthropologist to the Zoological survey of India या पदावर असलेले डॉ. बी. एस्. गुहा यांनीं लोकसंख्यागणनाच्या वृत्तांतांत Racial Affinities of the People of India या प्रबंधांत १९३१ व १९३५ मध्यें Dolicocephals व Leptorrhines (लांब डोक्याचे व सरळ सुंदर नाकाचे) आणि Brachycephals व Mesorrhines (आंखूड

---

१. In some parts of India there is hypergamy. Certain groups of families in a caste are considered higher than the rest and it is customary that women in the inferior groups should seek to marry with men in the superior groups but not vice versa. This kind of custom is confined mostly to Northern India, and is found in its worst form in Bengal. — History of Caste, Part I. Dr. S. V. Ketkar. P. 17.

गुजरातेंतील पाटीदार जातींत अजूनदेखील कुळवान कुलीन मानल्या जाणाऱ्याला कन्या देण्यांत मोठेपणा मानला जातो. त्यांच्यांत अमुक गांवें, त्यांतूनहि अमुक कुटुंबें कुळवान मानलीं जातात. इतर गांवांतील लोक मोठमोठे हुंडे देऊन व करण्या करून मोठेपणा व प्रतिष्ठा मिळविण्याकरतां आपल्या कुटुंबांतील मुली अशा कुळवान गणल्या जाणाऱ्या कुटुंबांत अगर गांवांत देण्यास उत्सुक असतात. — वयांत येणाऱ्या मुलीस. न. दा. पारीख. पृ. १०६.

डोक्याचे व मध्यमाकृति नाकाचे) वगैरे भेद केले आहेत. पहिल्या लांब डोक्याच्या वर्गात पूर्ण आर्य येतात तर दुसऱ्या आंखूड डोक्याच्या वर्गात अल्पाइन व दिनारिक या जाती येतात. यांतील अल्पाइन जात ही आर्यभाषी असली तरी पूर्ण आर्य नसून मिश्र अशी आहे. दिनारिक जात ही बंगाल व ओरिसा या भागांत सुस्पष्ट (well marked) अशी दिसते. आणि ती काठेवाडांत आणि कानडी व तामिळ प्रदेशांत Mediterranean (द्रविड) जातीशीं मिश्रित झालेली आढळते. Alpinoid ही जात गुजरातमध्यें प्रामुख्यानें आढळते. महाराष्ट्रांत ती लांब डोक्याच्या लोकांशीं मिश्रित झालेली दिसते. या दोन जातींची वसती काठेवाड, गुजरात, महाराष्ट्र, कानडी प्रदेश, तामिळनाड व सिलोन येथें सांपडते. फक्त आंध्र व मलबार येथें यांचें अस्तित्व आढळत नाहीं.[1]

प. वा. डॉ. कामत यांचें म्हणणें असें कीं, बंगाली ब्राह्मणांचीं शारीरिक मापें गोव्यांतील ब्राह्मणांच्या शारीरिक मापांशीं बरींच जुळतीं आहेत. या बाबतींत खुद्द बंगाली इतिहासज्ञ डॉ. रमेशचंद्र मुजुमदार यांनीं आपल्या पुस्तकांत दिलेलें मत या विषयावर अधिक प्रकाश टाकतें. ते म्हणतात, "शरीरमापनशास्त्राच्या आधारें जे श्रेणी विभाग कल्पिले आहेत त्यांत Dolichocephalic (दीर्घकपाल) व Brachycephalic (ह्रस्वकपाल) हे मुख्य होत. भारतांत ज्यांनीं आपलें प्राधान्य प्रस्थापित केलें ते वैदिक आर्य दीर्घकपाल होते, तर बंगालमधील सर्व जातींचे हिंदु ह्रस्वकपाल असल्याचें आढळून येतें. कोणी कोणी असें अनुमान काढतात कीं, पामीर व टोकलामापन या भागांतील अधिवासी जे होमो अल्पाइन या नांवानें संबोधिले जातात ते बंगाली लोकांचे आदिपुरुष होत व यांची भाषा आर्य असली तरी वैदिक आर्यांहून हे निराळे होत. पण हें मत सर्वमान्य नाहीं. मस्तिष्कशास्त्रानुसार नृतत्त्वविद् लोकांनीं असें सिद्ध केलें आहे कीं, बंगाली ही स्वतंत्र व विशिष्ट जात असेंच नव्हे तर बंगाली ब्राह्मणांचा भारतांतील इतर भागांतील कोणत्याहि ब्राह्मणांपेक्षां बंगालमधील कायस्थ, गोप (सद्गोप=गवळी), कैवर्त (धीवर) या जातींशीं घनिष्ठ संबंध आहे.[2]"

प. वा. डॉ. वैकुंठ कामत यांचा मुद्दा शरीरमापनशास्त्रावर आधारलेला आहे. गोव्यांतील सारस्वतांचें त्यांनीं केलेलें शरीरमापन कितपत परिपूर्ण व शास्त्रशुद्ध आहे हें त्या शास्त्राच्या तज्ज्ञांनीं ठरविलें पाहिजे. त्यावर आम्हीं मत देणें योग्य नाहीं. तथापि डॉ. मुजुमदार यांच्या वर दिलेल्या मतानुसार बंगाली ब्राह्मणांचें शारीरिक माप बंगालमधील ब्राह्मणेतर जातींशीं जुळतें आहे ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे.

---

१. Racial Elements in the Population. Dr. B. S. Guha. पृ. २२.

२. बांगला देशेर इतिहास. बांगाली जातिर उत्पत्ति प्रकरण. डॉ. र. मुजुमदार. पृ. ११.

आतांपर्यंत सर्व महत्त्वाच्या मुद्द्यांचें आमच्या मतें विवेचन झालें आहे. एका बंगाली ब्राह्मण ग्रंथकाराचें मत असें आहे कीं, "बंगाली लोक म्हणजे आर्यावर्तातील आर्यगणांपासून पूर्णपणें वेगळी अशी एक जात. वैदिक कालापासून बंगालमध्यें एक स्वतंत्र संस्कृति व मानवसमाज विद्यमान होता. ही संस्कृति वैदिक संस्कृतीची प्रतिद्वंद्वी होती.[१] स्पष्ट सांगावयाचें झाल्यास बंगालमध्यें बौद्ध कालापूर्वी वर्णाश्रम नव्हता व आजहि नाहीं.[२]"

या उताऱ्यांतील माहितीवरून वाचकांना कळून येईलच कीं, बंगाल हा अब्राह्मण प्रदेश. तेथें वैदिक कर्मकांडाच्या अनुष्ठानांसाठीं ब्राह्मण मिळत नसल्यानें पुन्हापुन्हा बाहेरून ब्राह्मण आणावे लागत, व आलेले ब्राह्मण त्या समाजपद्धतींत मिसळून गेल्यानें पुन्हा नव्या वैदिक ब्राह्मणांची गरज भासूं लागे. गोमंतकांतील स्थिति याच्या उलट होती. येथें ब्राह्मण अल्पसंख्य असले तरी वैदिक कर्मकांडाचा व वैदिक तत्वज्ञानाचा प्रभाव येथें जोरदार होता व आहे. तेव्हां अशा परिस्थितींत बंगालमधील ब्राह्मण येथें येऊन त्यांनीं येथें वैदिक धर्म प्रस्थापित केला, या म्हणण्यांत सुतराम् सत्य नाहीं, हें उघड आहे.

परिशिष्ट

बंगालचे ब्राह्मण

"आतां बऱ्याच ठिकाणीं प्रत्यक्ष ब्राह्मणांना आणूनच श्राद्ध करतात. भारताच्या पूर्व भागांत हें कार्य दर्भाच्या ब्राह्मणाकृती करून पार पाडलें जातें. तेथें दर्भाची मनुष्याकृती करतात व त्यालाच ब्राह्मण मानून पितरांना आवडणारे जिन्नस त्याला अर्पण करतात. बंगालांत बऱ्याच कालापासून श्राद्धांतील ब्राह्मण दर्भाचे असतात. प्रत्यक्ष ब्राह्मण आणावयाचे झाल्यास ब्रह्मावर्तातील ब्राह्मणच पसंत केले जातात. बंगालमधील ब्राह्मण पसंत केले जात नाहींत. याचें कारण असें कीं, बंगालमध्यें आर्येतर जाती प्रबल होत्या. या ठिकाणीं असलेल्या ब्राह्मणांची वेदज्ञ ब्राह्मणांत गणना होत नसे. धर्मग्रंथांत असें सांगितलें आहे कीं, मगधांत वसती केलेला ब्राह्मण या समाजापासून च्युत होतो. बंगाल तर त्याच्याही पुढला प्रदेश. या ठिकाणीं राहिल्यास त्याची पदच्युति जास्त होईल हें सांगण्याची गरज नाहीं."

— महामहोपाध्याय हरप्रसाद शास्त्री. हरप्रसाद रचनावली. भाग १, पृ. २३५.

---

१. पांचकौडी बंद्योपाध्याय रचनावली. भाग १ ला. पृ. ११.

२. तत्रैव. पृ. २१.

१०

गोव्यांतील ख्रिस्ती आदिवासी

हिंदुस्थानांतील दुसऱ्या भागांप्रमाणेंच गोव्यांतहि आदिवासी लोकांची वसती आहे. आणि त्या भागांत ज्याप्रमाणें तिकडील आदिवासी हे मूळचे वसती करणारे असावे असें मानलें जातें त्याचप्रमाणें येथेंहि समजूत आहे. परंतु या बाबतींत कांहीं पुरावा मिळत नसल्यामुळें त्या वसतीचा निश्चित काल ठरविणें कठीण आहे व त्यामुळें हें एक अनुमान होय असें म्हणणें भाग आहे. गोव्याच्या एकंदर लोकसंख्येंत यांचें प्रमाण किती याचे निश्चित आंकडे नाहींत. या बाबतींत एका ख्रिस्ती विद्वानाचें मत असें आहे कीं, ख्रिस्ती धर्मीयांत यांची संख्या पंचवीस हजारांच्या आसपास असावी. हिंदु आदिवासींची संख्या यापेक्षां अधिक असावी, असें दिसतें. मागील पोर्तुगीज राज्यकर्त्यांनीं येथील लोकसंख्येची गणना केली असली तरी ती जातवार नव्हती; धर्मवार वगैरे होती. त्यामुळें जातवार आंकडे त्या गणनेंत नमूद नाहींत.

गोव्यांत सर्वांत अगोदर कोणत्या जातीची वसती झाली हें कळण्यासाठीं या लोकांबद्दलची माहिती पुढें येणें जरूर आहे. गोव्याचीं शेतीपिकें हीं बंगाल, आसाम, उत्कल, केरळ वगैरेप्रमाणेंच भात (तांदूळ), नारळ, सुपारी, केळें, पानवेल, मिरीं वगैरे आहेत. तज्ज्ञांच्या मतें हीं पिकें प्रोटो-ऑस्ट्रालॉइड जातीचीं आहेत. या जातीचे कांहीं रिवाजहि गोमंतकांतील आदिवासी लोकांत दिसतात. त्यामुळें त्यांचा कांहींतरी संबंध त्या जातीकडे असावा, असें अनुमान निघतें. परंतु अद्याप या बाबतींत कांहीं संशोधन झालेलें नाहीं. तें होण्याची अत्यंत आवश्यकता आहे. आमचा असा विश्वास आहे कीं, गोव्यांत सर्वांआधीं येऊन वसती करण्याचें श्रेय त्यांच्याकडेच जात असावें.

या लेखांत आम्ही ख्रिस्ती आदिवासींची माहिती दिली आहे. (टीपेंत डॉ. पेरैरा यांच्या पुस्तकांतील हिंदुधर्मीय आदिवासींची माहिती दिली आहे ती पहावी.[१]) यांना गावडे अगर कुणबी या नांवानें संबोधिलें जातें. पोर्तुगिजांच्या अमदानींत गोव्याचे दोन भाग मानले जात :– जुनी काबिजाद व नवी काबिजाद. सासष्टी, मुरगांव, तिसवाडी व बारदेश या पोर्तुगिजांच्या ताब्यांत अगोदर आलेल्या तालुक्यांना जुनी काबिजाद हें नांव देण्यांत आलें होतें. बाकीच्या तालुक्यांना नवी काबिजाद या नांवानें संबोधण्यांत

---

१. लक्षांत घेण्यासारखी गोष्ट अशी कीं, मराठे कुणबी ही जुन्या काबिजादींतील कुणब्यांहून वेगळी अशी जमात आहे. जुन्या काबिजादींतील कुणब्यांचें नव्या काबिजादींतील गावड्यांशीं साम्य आहे. या गावड्यांच्या बायका कुणबिणींप्रमाणेंच पेहराव करतात. 'कुणबी' शब्दाचा अर्थ शेतकरी असा आहे. कुणबी व गावडे हे दोघेहि शेतमजूर आहेत. — Etnographia da India Portuguesa. Vol. 2. P. 35. Doutor A. B. de Bragança Pereira.

येत असे. जुन्या काबिजादींमध्येंच खिस्ती लोक व खिस्ती आदिवासीहि बहुसंख्य आहेत. शेती व मजुरी हेंच कुणबी-गावड्यांच्या उपजीविकेचें मुख्य साधन. बायका व पुरुष दोघेहि मेहनत करतात. यांच्यांत शिक्षणाचा प्रसार अद्याप झालेला नाहीं. अगदीं तुरळक प्रमाणांत अलीकडे तो होत आहे, असें म्हणतां येतें.

ज्यांनीं खिस्ती धर्म पोर्तुगिजांच्या बळजबरीमुळें स्वीकारला त्यांच्यांत साधारणतः परदेशगमन तसेंच खलाशीपणा यांच्याकडेच प्रथमतः लक्ष लागलें. पण हा वर्ग त्यापासून तसेंच पोर्तुगिजांच्या इतर कांहीं रीतीरिवाजांपासून अलिप्त राहिला. गोमंतकांतील खिस्ती समाज युरोपियन लोकांप्रमाणें आहारांत अनेक प्रकारचें मांस वापरतो. परंतु हे गावडे लोक गाय, डुकर, कोंबडी वगैरेचें मांस निषिद्ध मानतात. तसेंच हे जरी धर्मानें खिस्ती झाले तरी इतर खिस्ती लोकांकडे जेवण घेत नाहींत. पण हिंदूंच्या घरीं जेवतात. यांना वन्य जनावरें, रानडुकर, ससा, आकाशांतील पक्षी यांचें मांस चालतें, तसेंच मासळी सर्रास चालते. पण मासळी तळून खाण्यापेक्षां भाजून खाण्याची पद्धत जास्त आहे. इतर ठिकाणीं न दिसणारी यांच्यांतील एक पद्धत अशी कीं, हे लोक उंदरांचें, विशेषतः मोठ्या उंदरांचें – ज्यांना गोमंतकांत कोळउंदीर असें म्हणतात, त्यांचें मांस आवडीनें खातात. सुक्या पाचोळ्यांत उंदीर भाजून खाणें यांना जास्त आवडतें. यांची ही पद्धत अगदीं प्राथमिक अवस्थेंतील चालीचा अवशेष दिसते. हिंदु धर्मांत गणपतीचें वाहन उंदीर असल्यानें त्याला मान आहे. व म्हणून त्याला खाऊन गणपतीची नामर्जी करून घेणें हिंदु गावड्यांना पसंत नाहीं. परंतु खिस्ती गावड्यांत हा रिवाज आहे. गोव्यांत यांच्याशिवाय इतर कोणत्याहि जातींत हा रिवाज नाहीं.

उंदीर खाण्याची पद्धत भारतांतील इतर ठिकाणच्या कांहीं आदिवासी जातींतहि आहे. फादर एल्विन यांनीं आपल्या Tribal Myths of Orissa या ग्रंथांत ती दिली आहे. ते म्हणतात, "बऱ्याच आदिवासींना उंदीर खाण्याचा शौक आहे. बैगा लोक उंदरांतील बऱ्याच जातींचें मांस खातात. बोडा लोक त्यांचें पालनपोषण करतात.

"गावडे हे जुन्या काबिजादींत कुणबी या नांवानें ओळखले जातात. मीठगावडे म्हणून जे ओळखले जातात त्यांच्याहून हे भिन्न जातीचे होत. हे शेतकरी आहेत. यांच्यांत कुलदेवता असून एक कुलदैवत असल्यास लग्नसंबंधाला मनाई आहे. ज्या वृक्षाला यांनीं कुलदैवत मानलेलें असतें त्या वृक्षाच्या पानावर जेवण्याची मनाई आहे. हे ब्राह्मणाच्या घरीं जेवतात. यांच्या घरीं मालशी (Malxi), फर्जंद, चांभार व महार जेवतात. यांच्या स्त्रिया आपल्या पेहरावामुळें व कोंपरापर्यंत घातलेल्या पितळेच्या कांकणांमुळें इतर स्त्रियांहून वेगळ्या पडतात. यांच्यांत नेवरो, फोगरो, वेळीप, वैज, मिराशी हीं आडनांवें आहेत."

— Etnographia da India Portuguesa, Vol. 2, P. 42. Doutor A. B. de Bragança Pereira.

कांहीं सणांच्या व उत्सवसमारंभांच्या वेळीं त्यांना मारून खातात. त्यांच्या बाजारांत उंदरांचें मांस विकलें जातें. आज उंदीर खाणें ही गोष्ट लज्जास्पद मानली जाते. त्यामुळें हें मांस विकतांना अगर खरीदतांना उंदराचें मांस असें म्हणण्याऐवजीं जमिनींतील कंद असें म्हटलें जातें."

शेतीचा हंगाम झाल्यानंतर हे लोक मेहनतमजुरीच्या कामाकरतां जातात. पहिल्यांदां हे लोक गोव्याशेजारच्या भागांत जात होते. पोर्तुगीज अंमलाच्या शेवटच्या काळांत भारताचे व पोर्तुगिजांचे संबंध दुरावले व पर्मिट पद्धत आली. त्यामुळें यांचें जाणें बंद झालें. आतां तर गोव्यांतच खाणधंद्यांत व इतर कामांत मजुरांचा तुटवडा असल्यामुळें यांना काम भरपूर उपलब्ध आहे. गांवांत असो किंवा परगांवीं असो, यांच्यांत सामुदायिक रीतीनें काम करण्याची पद्धत आहे. अशा वेळीं त्यांच्या टोळींत खाणें एकत्र होतें व खर्च वांटला जातो. मात्र मुख्य जो असतो, त्याचा मिळकतीचा वांटा थोडा जास्त असतो. यांच्यांत वीस या संख्येनें मोजण्याची पद्धत आहे.

साधारणतः आर्यांचें वाहन रथ किंवा गाडी हें होतें. गोव्यांत जुन्या काळांत मेण्याची पद्धत बऱ्याच ठिकाणीं होती. कोंकणी भाषेंत याला माचील (मंचिल) म्हणतात. संथाळ लोकांत माचीलची पद्धत असल्याबद्दल March of India च्या नोव्हेंबर-डिसेंबर १९५३ च्या अंकांत माहिती आलेली आहे. यावरून ही पद्धत मूळ आदिवासींची असावी असें दिसतें. हें काम करणाऱ्यांना गोव्यांत भोई असें म्हणतात. चौघेजण हें वाहन नेण्याचें काम करतात. यांतील जो प्रमुख तो सर्वांपुढें असतो. तो दिशा वगैर दाखविण्याचें काम करतो.[1]

यांचे कांहीं रीतरिवाज पुढीलप्रमाणें आहेत. यांच्यापैकीं कित्येकांचा धर्म खिस्ती असला तरी कांहीं रिवाज पूर्वीचे हिंदूंचे आहेत. मनुष्याच्या जीवनांत विवाहाला फार मोठें स्थान असून तो महत्त्वाचा संस्कार गणला जातो. ह्या जातींत या संस्काराला हिंदूप्रमाणेंच पवित्र मानण्याची चाल आहे. लग्नाची वरात निघतांना समई पेटविली जाते आणि पान व सुपारी यांचा विडा ठेवून देवतेच्या नांवाचें स्मरण केलें जातें. हा विधी पुरा झाल्यावरच वरात निघते. हे खिस्ती झाल्यामुळें आतां त्यांना खिस्ताची तसबीर ठेवून व मेणबत्ती लावून तोहि विधी करावा लागतो, पण मूळ रीतिरिवाजावर त्यांची अद्याप श्रद्धा आहे. लग्नाच्या वेळीं मुलीच्या गळ्यांत हिंदूंप्रमाणें मुहूर्तमणी (मंगळसूत्र) बांधला जातो. वैधव्य मानण्याची यांच्यांत पद्धत आहे, पण पुनर्विवाहाला बंदी नाहीं. गळ्यांत मुहूर्तमणी व काळ्या मण्यांची माळ व कानांत कांहीं दागिना हीं सौभाग्य-

---

१. सर्वांत पुढें असलेला भोई हा प्रमुख असतो व तो मागच्यांना वाट दाखवितो. दिशा, रस्त्यांतील खांचखळगे, अडथळे वगैरेबद्दल सूचना तो, सावकाश, दगड, एक दांडा, पाणी, डावा, उजवा, पुढें, जलद, थांब इत्यादि शब्दांनीं देतो. — Etnographia da I. P. Vol. 2, P. 86. Dr. A. B. de B. Pereira.

वतीचीं चिन्हें व जिच्या अंगावर हीं चिन्हें नाहींत ती विधवा अशीं यांचीं लक्षणें आहेत. या जातींत पुनर्विवाहाला दोष नाहीं. पुनर्विवाह करतांना नवा मुहूर्तमणी घातला जातो. ह्या लोकांत इतर हिंदूंप्रमाणें आईला 'आवय' व बापाला 'आन' असें संबोधितात. हा आन शब्द अण्णा याचा अपभ्रंश असावा.

हिंदु अगर ख्रिस्ती आदिवासींच्या चालीरितींचा अभ्यास अद्याप कोणाकडून झाला आहे असें वाटत नाहीं. यांच्याबद्दलच्या अभ्यासांतून गोमंतकाच्या मूळ रहिवाशांवर प्रकाश पडूं शकेल. तरुणांचें या विषयाकडे लक्ष लागावें, या उद्देशानें हा प्रयत्न केला आहे.

('मंगल प्रभात' (दिल्ली) या हिंदी साप्ताहिकाच्या ८ व्या वर्षाच्या ४४ व्या अंकांत १९५७ मध्यें हा लेख प्रसिद्ध झाला होता. हिंदी अनुवाद श्री. चंद्रकांत केणी यांनीं केला होता. आतां या लेखांत थोडी भर घातली आहे.)

११

कुशस्थली

जुन्या काळीं भारतांत या नांवाचीं खालीलप्रमाणें कित्येक गांवें होतीं, असें आढळून येतें :– उत्तरेंतील कान्यकुब्ज ऊर्फ कनोज; गुजरातेंतील जुनी द्वारका ऊर्फ कुशस्थल; अवंती–उजयिनी; गोमंतकांतील कुडाळ; उत्तरेंतील दक्षिण कोसलमध्यें श्रीरामचंद्राचा पुत्र कुश यानें स्थापिलेली कुशस्थली (ही विंध्य पर्वतावर होती); याशिवाय ज्या ठिकाणीं बुद्धाचें परिनिर्वाण झालें त्या ठिकाणींहि एक कुशावती अगर कुशस्थली होती. (ही कनिंगहॅमच्या मतें गोरखपूर जिल्ह्यांत काशिया येथें होती.)

साधारणपणें जुन्या काळांतील वरील सहा कुशस्थलींचा उल्लेख आढळतो. यांतील मुख्य म्हणजे जिला आपण आज कनोज म्हणतों ती होय. हिच्या स्थापनेबद्दल निरनिराळ्या ठिकाणीं मिळणारी माहिती अशी :–

(१) सोमवंशीय विजयकुलोत्पन्न कुश अथवा कुशिक राजाच्या चार पुत्रांतील चवथा कुशनाभ यानें महोदयपुरी स्थापन केली होती. याच्या शंभर कन्या वायूच्या कोपानें वक्र झाल्या त्या चुलिसूनु ब्रह्मदत्त राजास दिल्यावर सरळ झाल्या. मात्र देशास कान्यकुब्ज हें नांव पडलें.[१]

(२) रामलक्ष्मणांस बरोबर घेऊन मिथिलेस जातांना वाटेंत विश्वामित्रानें त्या देशाची व आपल्या पूर्वजांची जी हकीगत सांगितली तींत आपला पूर्वज कुशनाभ याच्या तीन कन्या वक्र झाल्या व कुशनाभ यानें महोदयपुरी स्थापन केली असा उल्लेख आहे.[२]

(३) शणै गोंयबाब यांच्या मतें कान्यकुब्ज म्हणजे आतांचें कनोज, विश्वामित्राचा आजा कुशनाभ यानें तो देश व तेथील राजधानी महोदयपुरी वसविली, व त्याच्या वडिलांचें नांव कुश.[३]

(४) चंद्रवंशांतील ऐल याच्या पुरूरवा नांवाच्या मुलानें गंगाकिनाऱ्यावर कान्यकुब्ज नगरी वसविली.[४]

(५) राजा पुरूरवा याला ऊर्वशी अप्सरेपासून दोन मुलगे झाले. यांतील आयु नांवाच्या पहिल्या मुलाला बापाचें राज्य मिळालें व अमावसु यानें कान्यकुब्ज नगरीची स्थापना केली.[५]

---

१. ज्ञानकोश. 'कुशनाभ' पहा.
२. वाल्मीकिरामायण. सर्ग ३०×३३.
३. ऐन वेळार. शणै गोंयबाब. पृ. १२२.
४. भारतीय इतिहास की रूपरेखा. जयचंद्र विद्यालंकार. पृ. १२८.
५. भारतवर्षका पौराणिक इतिहास. हरि रा. दिवेकर. त्यागभूमि. वर्ष १, अं. ५.

वरील ठिकठिकाणीं मिळणारी माहिती लक्षांत घेतां असें आढळून येतें कीं, या राज्याची स्थापना अमावसूकडून झाली असा उल्लेख कांहीं ठिकाणीं आहे, तर दुसऱ्या कांहीं ठिकाणीं ती त्याचा वंशज कुशनाभ याकडून झाली, असेंहि सांगितलें आहे. याबद्दलचें स्पष्टीकरण पुढें येणार आहे. जुन्या काळच्या क्षत्रियांत दोन भेद होते ते म्हणजे सूर्यवंशी व चंद्रवंशी हे होत. सूर्यवंशाची सुरुवात वैवस्वत मनूपासूनची असून या कुलांत प्रथमार्धांत इक्ष्वाकु, मांधाता, हरिश्चंद्र, सगर, भगीरथ, दिलीप, रघु, अज, दशरथ, राम वगैरे राजे होऊन गेले. यांतील पूर्वार्धांतील कांहीं राजे महापराक्रमी झाले. पण उत्तरार्ध मात्र त्या मानानें फिका गेला. पूर्वार्धांतील कित्येकांचा पराक्रम अतुल व चारित्र्य आदर्शवत् होतें. म्हणूनच वाल्मीकिकालिदासासारख्या थोर कवींनीं आपल्या महाकाव्यांतून त्यांचीं चरित्रें गाइलीं.

दुसरा चंद्रवंश. याची सुरुवात चंद्रमा नांवाच्या राजापासून झाली. याचा मुलगा बुध. त्याचा मुलगा पुरूरवा. पुढें याचे अनेक वंश झाले. विश्वामित्र, दुष्यंत, भरत, ययाति, कौरव, पांडव, यादव हे याच वंशांतील होत.

पौराणिक कालांत सूर्यवंशाचीं अयोध्या व मिथिला हीं दोन राज्यें होतीं. आणि कुरुक्षेत्र व कान्यकुब्ज हीं चंद्रवंशाचीं होतीं. कान्यकुब्जाची स्थापना चंद्रवंशाकडून झाली हें यावरून दिसून येईल.

वर आम्ही अमावसु व कुशनाभ या दोघांचाही संबंध या राज्याच्या स्थापनेशीं जोडला जातो असें दाखवून दिलें आहे. वास्तविक यांचा काल एक नाहीं. अमावसूनंतर कुशनाभ साधारणतः दोनशें वर्षांनंतर होऊन गेला. असें असतां दोघांचाहि संबंध या स्थापनेशीं कसा जोडला गेला, याचें उत्तर इतिहासज्ञ जयचंद्र विद्यालंकार यांच्या पुस्तकांतून मिळतें तें असें :– या काळच्या राजांपुढें चक्रवर्ति तसेंच सम्राट् पद प्राप्त करून घेण्याची महत्त्वाकांक्षा होती. कित्येक वेळां आपल्याच वंशांतील राजांवर विजय मिळविण्यापर्यंत त्यांची मजल जात असे. चंद्रवंशांतील अमावसूनंतर सूर्यवंशांतील पराक्रमी राजा मांधाता यानें सम्राट्पद मिळविलें त्यावेळीं कान्यकुब्ज राज्य जिंकलें. परंतु त्याच्या वंशजांना तें टिकवितां आलें नाहीं. पुढें अमावसूचा वंशज कुशनाभ यानें कान्यकुब्ज राज्य पुन्हा जिंकून महोदयनगरी स्थापन केली. याच्या बापाचें नांव कुश होतें, त्यामुळें तिला कुशस्थली हें नांव प्राप्त झालें. या मूळ नांवाचा काल अंदाजें सनपूर्व अडीच हजार वर्षें इतका मागें जातो. तथापि अलीकडे सातव्या शतकापर्यंत तरी या नगरीचा उल्लेख 'कुशस्थल' असाच झालेला आढळतो. इ. स. ६०६ त ठाणेश्वरचा राजा राज्यवर्धन याचा वध बंगालच्या शशांक राजानें केला. याचा उल्लेख बाणाच्या हर्षचरितांत पुढीलप्रमाणें केलेला आहे :– "देवभूयंगते देवे राज्यवर्धने गुप्तनाम्नाच गृहीते कुशस्थले." याचा अर्थ 'राज्यवर्धनाच्या मृत्यूनंतर व गुप्तराजाचें कुशस्थल (कान्यकुब्ज) घेतल्यावर' असा आहे. यावरून सातव्या शतकापर्यंत हा शब्द होता,

असें म्हणतां येतें. मुळांत हा प्रदेश समृद्ध होता असें दिसतें. म्हणूनच त्याला महोदय (मोठें समृद्ध स्थान) असें नांव देण्यांत आलें. हें शहर गंगा नदीच्या किनाऱ्यावर होतें. आजहि कनोज संबंध हिंदुस्थानांत अत्तराच्या उत्पादनांत प्रसिद्ध आहे.

कुशस्थली (जुनी द्वारका) – वैवस्वत मनूचा पुत्र शर्याति याला एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन अपत्यें होतीं. त्यांपैकीं मुलाचें नांव आनर्त होतें. या आनर्ताला रेव नांवाचा तेजस्वी पुत्र झाला. त्याचा एक पुत्र ककुद्मी यालाच रैवत असें म्हणत. आनर्ताच्या राज्याला आनर्त नांव प्राप्त झालें व त्याच्या मुलाला (आनर्त) कुशस्थलीचें राज्य मिळालें.[१] हीच हकीगत विष्णुपुराणांतहि आहे.[२] मात्र याबद्दल गुजरातचे आचार्य ध्रुव यांचें म्हणणें असें कीं, अनृत शब्दावरून आनर्त शब्द झाला. नृत म्हणजे ब्राह्मणाचें यज्ञकर्म. तें न पाळणारा दस्यु अनार्य वर्ग ज्या देशांत राहतो तो आनर्त. रैवतामुळेंच येथील पर्वताला रैवतक हें नांव प्राप्त झालें. महाभारतांत उल्लेख असलेला रैवतक पर्वत तो हाच. पुढें कांहीं कालानें या नगरीचें महत्व नष्ट झालें. त्यानंतर बऱ्याच कालानें मथुरेवर जरासंधाच्या स्वाऱ्या होऊं लागल्यानें यादवांनीं आपलें स्थान बदलण्याचा विचार केला. व या नगरीला नवें स्वरूप देऊन तिचें नांव द्वारवती अगर द्वारका असें ठेवून ती आपली राजधानी केली. महाभारतांत[३] 'कुशस्थली पुरी रम्या रैवतेनोपशोभिताम्' त्याचप्रमाणें हरिवंशांतहि कुशस्थली नगरी रैवत पर्वताच्या पायथ्याशीं वसलेली असून समुद्रानजीक आहे[४] असें वर्णन आहे. यावरून ही नगरी रैवत पर्वताजवळ व सागराजवळ होती असें दिसून येतें. या जुन्या द्वारकेबद्दल गुजरातेंतील एक इतिहासज्ञ दुर्गाशंकर शास्त्री असें म्हणतात कीं, आजचें जुनागड ज्याला एका काळीं गिरी नगर असें म्हणत तेंच त्यापूर्वी द्वारका या नांवानें संबोधिलें जाई.[५] परंतु गुजरातमधील दुसरे एक संशोधक उमाशंकर जोशी यांना हें मत मान्य नाहीं. कृष्णाच्या निर्याणानंतर त्याच्या सांगणीप्रमाणें अर्जुन द्वारकेंत आला व त्यावेळीं अर्जुनाचा व वसुदेवाचा जो संवाद झाला त्यांत वसुदेवानें कृष्णाचा निरोप त्याला सांगितला. तो द्वारकेंतून सर्व स्त्रियांना घेऊन गेल्यानंतर सर्व द्वारका नगरीला समुद्र बुडवून टाकील, असें कृष्णानें सांगितलें होतें.[६] हीं व इतर उदाहरणें देऊन ते म्हणतात कीं, प्राचीन द्वारका ही समुद्रकिनाऱ्यावर होती ही गोष्ट संशयातीत आहे.[७] यामुळें हें ठिकाण पर्वताजवळ

---

१. हरिवंश. (चिपळूणकर मंडळी). पर्व १ लें, अध्याय १०.
२. श्रीविष्णुपुराण. (हिंदी). गीता प्रेस, गोरखपुर. चतुर्थ अंश, अ. १.
३. महाभारत (चित्रशाळा). सभापर्व अ. १४, श्लोक ५०.
४. हरिवंश (चिपळूणकर मंडळी) विष्णुपर्व, अ. ५५.
५. प्राचीन द्वारकापुरी (गुजराती). ऐतिहासिक संशोधन. दुर्गाशंकर के. शास्त्री. पृ. ३८४
६. श्रीमन्महाभारतार्थ. कर्नाटक प्रेस. मौसलपर्व, अ. ६.
७. पुराणोंमां गुजरात. (गुजराती). उमाशंकर जोशी. पृ. १०३.

तसेंच समुद्राजवळ होतें असें सिद्ध होतें. मूळ हें नगर रैवत राजानें स्थापलें असा उल्लेख आहे. साधारणतः रैवत राजाचा व अमावसूचा काल एक दिसतो. त्यावरून उत्तरेंतील कुशस्थली (कान्यकुब्ज)च्या कालांतच आगेमागें याचीहि स्थापना झाली असावी.

अवन्ती - उज्जैन (कुशस्थली) – गुजराती साहित्यिक उमाशंकर जोशी यांच्या 'पुराणोंमां गुजरात' या पुस्तकांत याबद्दलची माहिती पुढीलप्रमाणें आहे. याचीं वेगवेगळ्या कल्पांत वेगवेगळीं सात नांवें आहेत. प्रथम कल्पांत स्वर्णगंगा, दुसऱ्यांत कुशस्थली, तिसऱ्यांत अवन्तिका, चौथ्यांत अमरावती, पांचव्यांत चूडामणी, सहाव्यांत पद्मावती व सातव्यांत उज्जयिनी.[१] उज्जयिनीला कुशस्थली म्हणत व तेथें जवळ कुशावती असल्याची नोंद मिळते. पण मृच्छकटिकांत उज्जयिनीचा राजा पालक याला मारल्यानंतर आभीर वंशाचा राजा आर्यक यानें कुशावती चारुदत्ताला दिल्याचा उल्लेख आहे.[२] कुशस्थली, चूडामणी, कुशावती वगैरे नांवें, तसेंच चंद्रेश्वर, कपिलेश्वर हीं लिंगदैवतें गोमंतकांतहि आढळतात ही लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे. अवन्ती उज्जयिनी ही नगरी क्षिप्रा नदीच्या किनाऱ्यावर आहे[३] हेंहि साम्य लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

कुशस्थली (गोमंतक)–आपल्या गोमंतकांत हें गांव प्रसिद्ध आहे. याला कारण तेथें वास्तव्य करणाऱ्या लेखणीबहादुरांची बौद्धिक चमक असूं शकेल. गांव आघाशी नदीच्या किनाऱ्यावर, समुद्राचें तोंड जवळ, असा हा संगम असून जुन्या काळांतील सासष्टीची ही सीमा आहे. आज हा भाग मुरगांव तालुक्यांत समाविष्ट आहे. मुरगांव येथून जवळच आहे. पुढेमागें कदाचित् मुरगांवचें हें उपनगरहि होईल. या स्थलाचा ज्ञात इतिहास म्हणजे चांदर येथील भोज राजवटीच्या देवराज या राजानें येथील ठाणें वाड्यांतील कांहीं भूमी ब्राह्मणांना दान दिल्याचा ताम्रपटांत उल्लेख आहे, हा होय. हा ताम्रपट चौथ्या शतकांतील असून त्यांत ठाणीयार्क कोट्टीकाय असे शब्द आहेत. कोट्टीकाय याचा अर्थ नीट कळत नाहीं. कोट, प्राकृत कोट्ट, संस्कृत कोष्ट याचा अर्थ एक भाग व कुट्ट या संस्कृत शब्दाचा अर्थ तुकडा असा होतो. धर्मानंद कोसंबी यांचें मत कुठाळ हा गांव, नंतर जी सारस्वत मंडळी आली त्यांच्याकरतां नागवें व सांकवाळ यांचा भाग तोडून नवा बनविला[४] असें आहे. हें लक्षांत घेतां एक भाग (तुकडा) यावरून हें नांव पडलेलें असणें शक्य वाटतें. याचें संस्कृतीकरण मागाहून कुशस्थली

---

१. पुराणोमां गुजरात (गुजराती). उमाशंकर जोशी. पृ. ३३.
शृणु व्यास यथा पुरी दिव्या कुशस्थली, नामता कर्मता श्रेष्ठा स प्रकल्पानुवासिनी ॥५॥
स्कंदपुराण, अवन्तिक्षेत्र, ३६.

२. पुराणोमां गुजरात. पृ. ६६.

३. सुलभ विश्वकोश, भाग १ ला. य. गो. जोशी प्रकाशन.

४. दक्षिणी सारस्वत. धर्मानंद कोसंबी. विविधज्ञानविस्तार, वर्ष ५५, अं. २.

झालें असावें. कारण कोंकणाख्यानांत ही नंतर आलेली मंडळी कान्यकुब्ज येथील होती, अशी आख्यायिका असल्याचें सांगितलें आहे. त्यांनीं या गांवाचें नांव कुशस्थली ठेवलें असणें शक्य आहे. कारण इतर कुशस्थलींप्रमाणें हेंहि गांव नदीच्या कांठावर व समुद्राच्या तोंडाजवळ आहे.

कुशस्थली हें नांव कोणत्या तरी कुश नांवाच्या राजावरून भारतांत पडलें असा वरील इतिहासाचा निष्कर्ष येतो. परंतु कुश म्हणजे यज्ञाकरतां लागणारे दर्भ यांची निपज ज्या ठिकाणीं होते अशा पवित्र स्थानाला हें नांव मिळालें असणें शक्य आहे.[१] गोमंतकांतील कुशस्थली हें नांव मात्र येथें जो सारस्वतांचा दुसरा गट नंतर आला व जो कान्यकुब्ज येथून आला अशी दंतकथा आहे, त्याच्याकडून दिलें गेलें असण्याची शक्यता आहे.

(भारतमित्र – रिवण, वर्ष २२, अंक ११ मध्यें प्रसिद्ध झालेला लेख.)

---

१. पुराणांमां गुजरात. (गुजराती). उमाशंकर जोशी. पृ. ६६.

१२

नागेशींचा शिलालेख

नागेशीं (फोंडा तालुका) येथील देवस्थानांत पौष व. ३० रविवार शके १३३५ (ता. २४ डिसेंबर १४१३) चा जो शिलालेख[1] आहे त्याची भाषा मराठी असून लिपी देवनागरी आहे. हा शिलालेख आतांपर्यंत रॉयल एशियाटिक सोसायटी जर्नल (व्हॉ. २३), भारत इतिहास संशोधक मंडळ वार्षिक इतिवृत्त (शके १८३५), श्रीनागेश देवस्थानचा इतिहास (श्रीपाद व्यं. वागळे) व पोर्तुगीजपूर्व कालांतील शिलालेख (प्रो. पिसुर्लेकर – ओरियेंति पुर्तुगेज त्रैमासिक – अं. २२) या चार ठिकाणीं प्रसिद्ध झाला आहे. जिज्ञासूंनीं तो पहावा.

या शिलालेखावरून असें दिसून येतें कीं, बांदोडें येथील गृहस्थ राम नायक, नागण नायक, राम प्रभु व मंगेश प्रभु हे कांहीं मंडळीसह कुंकळयें ग्रामांतील माइं शेणवी यांच्याकडे जाऊन त्यांना नागेशीं येथील कांहीं जमिनी तेथील देवस्थानास मिळवून देण्याची विनंती केली व ती माइं शेणवी यांनीं मान्य केली. त्या वेळीं गोमंतक विजयनगरच्या अंमलाखालीं होता व विजयनगरचे राजे संगम देवराय प्रथम हे होते. त्यांच्या त्यावेळच्या गोमंतकांतील प्रतिनिधीचें नांव नजण गोसावी असून माइं शेणवी हेहि एक अधिकारी होते. त्याच्याबद्दल कोंकणाख्यान असें सांगतें :–

मग कित्येक दिवसांनंतरी । माधवराव गेले या उपरी ॥
वागळ, उपनांवें कारभारी । कोंकणामाझारी पाठविला ॥११९॥
तो बांदोडकर देशमुखासी । जामात होय तेणें देवासी ॥
वृत्ति वर्षासन श्रीनागेशीं । शासनपटेयांत दिधलें ॥१२०॥
त्यापासून श्रीनागेशीं । आधीं मान पूजा वागळे यासी ॥
त्यानें देवासन्मुख देवापासीं । वृत्तांत शासनपटे लिहिलें ॥१२१॥
शके तेराशें पंसतीशीं । विजय नाम संवत्सरासी ॥
दत्त दिधलें त्या अर्थासी । पाषाणीं शासनपटेंत पहावें ॥१२२॥

— कोंकणाख्यान, उत्तरार्ध, अ. ७.

यावरून माइं शेणवी यांचें उपनांव वागळे असून हा श्रीनागेश देवस्थानच्या कुळाव्याचा जांवई होता असें दिसतें. माइं शेणवी यांनीं 'वेदखंडिकेचें कुळागर', 'नागझरी मळो शेत' व गोलती वाड्यावरील 'रुबो कुळागर' या जमिनी श्रीनागेश व

---

१. अलीकडे पुणें विद्यापीठामार्फत 'प्राचीन मराठी कोरीव लेख' (संपादक – डॉ. शं. गो. तुळपुळे) हा ग्रंथ प्रसिद्ध झाला असून त्यांत हा लेख क्र. ५९ चा म्हणून पृ. २०६ वर छापला आहे व तेथें याचा शक १३३५ व सन १४१४ दिला आहे.

श्रीमहालक्ष्मी या देवस्थानांस देण्याची व्यवस्था केली. या शिलालेखाची तारीख पोर्तुगिजांच्या ९७ वर्षें अगोदरची आहे. यावरून बांदिवडें येथील श्रीनागेश व श्रीमहालक्ष्मी हीं दोन्ही देवालयें पोर्तुगिजांपूर्वी येथें होतीं, तीं बाटाबाटीच्या काळांत येथें आलेलीं नाहींत, हें सिद्ध होतें.

श्रीनागेश हा मुळचा येथीलच याबद्दल आणखी पुरावा असा कीं, ज्याला सह्याद्रिखंडांत नागाव्हय असें म्हटलें आहे त्या सासष्टीमधील नागवें या गांवांतील पोर्तुगिजांनीं मोडलेल्या देवळांची जी नोंद आहे, तींत नागेश दैवत तेथें असल्याचा उल्लेख नाहीं. तसेंच बांदोडें येथील महालक्ष्मी ही तेथीलच यालाहि पुरावा असा कीं, शिलालेखांत उल्लेखिलेल्या गोलती वाड्यावरील रुबो कुळागर याचा खंड आजहि वहिवाटदाराकडून या देवस्थानास मिळतो असें आम्हांला सांगण्यांत आलें. मात्र महालक्ष्मीबद्दल एक शक्यता अशी दिसते कीं, सासष्टींतील कोलवें गांवांत महालक्ष्मीचें देवालय होतें व बाटाबाटीच्या काळांत तिला शेजारच्या हिंदु राज्यांत जावें लागलें; तिचें मीलन या देवस्थानांत झालें असावें.

हा शिलालेख मराठी भाषेंत असल्यानें आजच्याप्रमाणेंच पूर्वीहि गोमची लिखित भाषा मराठीच होती हें सिद्ध होतें.

या शिलालेखांतील एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट अशी कीं, देवाच्या नैवेद्याकरतां आटवल (गूळ घातलेली पेज) करण्यासाठीं द्यावयाचे तांदूळ सुरय देण्यांत यावे असें त्यांत स्पष्ट नमूद केलें आहे. सुरै सडीक तांदूळ असे शब्द लेखांत आहेत. हा सुरै शब्द लेखांत दोनदां आला आहे. यावरून उकडा (उकडलेला) व सुरय (सुरै=न उकडलेला) असे आजच्याप्रमाणें त्यावेळींहि तांदुळांत दोन भेद होते व आजच्याप्रमाणेंच सुरय तांदूळ सोवळा व उकडा तांदूळ ओवळा मानण्याची चाल त्याकाळीं होती असें दिसतें. कारण कोणतेंहि वाफ दिलेलें धान्य धर्मशास्त्राप्रमाणें ओवळें अर्थात् निषिद्ध होतें. म्हणूनच या ठिकाणीं नुसता तांदूळ हा शब्द न वापरतां सुरै असा स्पष्ट उल्लेख केला असावा. आज गोमंतकांत सर्व ख्रिश्चनधर्मीय व हिंदूंतील बहुजनवर्गीय उकडा तांदूळ वापरतात. या लेखांतील स्पष्ट उल्लेखावरून पोर्तुगीजपूर्व काळींहि बहुजनसमाजांत हीच पद्धत असावी, असें दिसून येतें. दुसरें एक प्रमाण असें कीं, श्रीनागेश देवस्थानांत देवाच्या प्रसादाला उकडेच तांदूळ लावतात. वास्तविक उकडणें म्हणजे शिजविणेंच होय. तेव्हां ही निषिद्ध वस्तु कशी वापरली जाते, याबद्दल कोणालाहि कुतूहल वाटणें साहजिक आहे. पण यांत एक गोष्ट दिसून येते ती ही कीं, ही चाल मूळच्या लोकांत असावी व संस्कृतिसंगमामुळें तिचा स्वीकार उच्चवर्णीयांकडून झाला असावा. भावनादृष्ट्या आज या देवस्थानांत रूढ झालेला पर्याय असा कीं, येथील पुरोहित हे तांदूळ स्वतःच उकडून सोवळ्यांत ठेवतात व अशा रीतीनें मनाचें समाधान करून घेतात.

वास्तविक तांदूळ हें आर्यांचें अन्न नाहीं. ऋग्वेदांत तांदूळ शब्द नाहीं, असें तज्ज्ञांचें मत आहे. आर्यांचें हिंदुस्थानांत आगमन झाल्यावर कांहीं ठिकाणीं त्यांचें हें आवडतें अन्न झालें. व्युत्पत्तिकोशांत तांदूळ हा शब्द ऑस्ट्रिक अगर द्रविड असावा व त्याचें संस्कृतीकरण तण्डुल हें नंतर झालें असावें असें म्हटलें आहे. संस्कृतांत भाताला 'व्रीहि' हा शब्द आहे त्यावरूनच 'वरी' शब्द आला. वऱ्यांचे तांदूळ आपण उपवासाकरतां वापरतों व दुसरे तांदूळ निषिद्ध मानतों त्याचें कारण हें धान्य आर्येतर मानलें जात होतें, हेंच असावें.

तांदूळ मूळचा चीनचा दिसतो. तेथें त्याचा उल्लेख फार जुन्या काळीं झालेला आढळतो. सनपूर्व २८०० व्या वर्षी चीन देशांतील सार्वभौम राजा चिंग नुंग यानें मोठ्या समारंभानें पांच धान्यांची पेरणी केली. त्यांतील एक धान्य भात (तांदूळ) हें होतें. चीनमध्यें या धान्याला Ouzizz असा शब्द आहे. यावरून लॅटिन भाषेंत Oryza शब्द आला. अरबांचा संबंध चीनशीं आला व त्यांनीं त्याला Oruz हें रूप दिलें. पोर्तुगीज Arroz व तामीळ Ariz हें अरबी शब्दाचें अनुकरण दिसतें.

(भारतमित्र, रिवण. वर्ष २६, अंक १ (जानेवारी १९५४) मध्यें प्रसिद्ध झालेला लेख.)

१३

कवि हरि पंडित गोमंतकीय नव्हे

'गोमंतकांतील मराठी साहित्याच्या अभिवृद्धयर्थ झालेले प्रयत्न' या विषयावर आतांपर्यंत जे लेख लिहिले गेले, त्यांत कवि हरि पंडित यांचा गोमंतकीय म्हणून उल्लेख झाला आहे. वस्तुतः ही समजूत चुकीची असून कवि हरि पंडित हे गोमंतकीय नाहींत असें दिसून येतें.

हरि पंडितांचा उल्लेख प्रथमतः 'सत्संग' मासिककर्त्यांनीं केला. या मासिकाच्या तिसऱ्या वर्षांत 'महाराष्ट्र भाषाभिवृद्धयर्थ प्रयत्न' ही लेखमाला सुरू झाली. त्याच्या चौथ्या अंकांत या कवीबद्दल उल्लेख आहे तो असा :–

" हरि पंडित या नांवाचे शांडिल्यगोत्री श्रीलक्ष्मीनरसिंह देवाचे उपासक उत्तम कवि गोव्यांत होऊन गेले. यांचा काल बहुधा १८ व्या शतकाचा उत्तरार्ध असावा. यांचे दुसरे कांहीं ग्रंथ असावेत असा तर्क आहे. यांचा सद्वृत्तमुक्तामाला या नांवाचा एक लहानसा ग्रंथ उपलब्ध आहे. हा वृत्तांचीं उदाहरणें स्वकृतीनें दाखवून छंदःशास्त्रांत सुलभ रीतीनें जिज्ञासूंचा प्रवेश होण्यासाठीं त्यांनीं लिहिला. कविता प्रासादिक असून अलंकृत आहे.

या ग्रंथाच्या शेवटीं त्यांनीं आपली माहिती दिली आहे ती अशी :–

तातामिधा नृहरि पंडित माय लक्ष्मी
जे सर्वदा सुगुणयुक्त उदार लक्ष्मी
शांडिल्य गोत्र कुलदेव नृसिंह ज्याचा
दासानुदास हरि पंडित हा द्विजाचा."[१]

'सत्संगां'तील या संदर्भावरून कै. य. सू. सरदेसाई यांनीं 'महाराष्ट्र सारस्वत' वर्ष ४ थें यांतील आपल्या या विषयावरील लेखांत, नंतर कै. सांवर्डेकर यांनीं आपल्या 'गोमंतकपरिचय' पुस्तकांत, सु. रा. सामंत यांनीं आपल्या 'गोमंतकीयांची साहित्यसेवा' या लेखांत (गेल्या पावशतकांतील गोमंतक), तसेंच पंडित महादेवशास्त्री जोशी यांनीं गो. म. सा. संमेलनाच्या स्वागताध्यक्षीय भाषणांत आणि 'आजचा व कालचा गोमंतक' या पुस्तकांतील शांबाराव सरदेसाई यांच्या 'गोमंतकीय मराठी वाङ्मय' या लेखांत हरि पंडिताचा गोमंतकीय म्हणून उल्लेख केलेला आहे. या सर्वांनींच मागील माहिती पाहून तिचा अनुवाद केल्याचें दिसतें.

---

१. सत्संग, वर्ष ३ अंक ४. पृ. ६७.

कवि हरि पंडित हा गोमंतकीय असावा, असा समज होण्यास वरील श्लोक कारणीभूत झालेला दिसतो. यांत कवि आपलें गोत्र शांडिल्य व कुलदेव नरसिंह असून वडिलांचें नांव नरहरि व आईचें लक्ष्मी असल्याचें सांगतो.

शांडिल्य गोत्र सारस्वतांत आहे.[1] नरसिंह देवस्थानहि गोव्यांत आहे. या गोष्टींमुळेंच हरि पंडितास गोमंतकीय मानण्यांत आलें असावें. परंतु यांत एक चूक होत आहे. श्रीलक्ष्मीनरसिंह देवस्थान वेलिंग येथें आहे; तें मूळ सांकवाळचें. त्याच्या महाजनांचें गोत्र शंख-पिंग-कुत्स हें असून सर्व महाजन (कुळावी) या एकाच गोत्राचे आहेत. शांडिल्य गोत्राचे महाजन या दैवताला नाहींत. दुसरें एक देवस्थान श्रीनरसिंह नांवाचें सोनावळी (सांगें तालुका) येथें असल्याचा उल्लेख सांपडतो.[2] परंतु तें सारस्वतांचें नसावें.

यावरून शांडिल्य गोत्र व कुलदेव नरसिंह यांचा एकत्रितपणा गोव्यांत दिसून येत नाहीं, हें स्पष्ट होतें. अर्थात् वरील कवि हरि पंडित हे गोमंतकीय नसून गोमंतकाबाहेरील महाराष्ट्रीय असावे असें दिसतें.

आतां या हरि पंडितांबद्दल विशेष माहिती काय मिळते ती पाहूं. निर्णयसागर छापखान्यानें महाराष्ट्र कविवर्य वामनपंडित याचा कवितासंग्रह प्रसिद्ध केला आहे. त्याच्या पहिल्या भागांत (आ. २ री) भीष्मयुद्ध हें काव्य छापलेलें आहे. त्याखालीं टीपेंत संपादक वा. दा. ओक यांनीं वामनाच्या बापाचें नांव नृसिंह (नरहरि पंडित) व आईचें नांव लक्ष्मी असें दिलें आहे.[3]

काव्याची सुरुवात अशी आहे :-

लक्ष्मीनृसिंहचरणद्वयसारसाचा ।
जो रेणु मान्य वदती बहुसार साचा ।

आणि शेवटीं पुढील श्लोक आहे :-

तातामिधा नृहरि पंडित माय लक्ष्मी ।
जे सर्वदा सुगुणयुक्त उदार लक्ष्मी ॥
शांडिल्य गोत्र कुलदेव नृसिंह ज्याचा ।
दासानुदास निज वामन हो निजाचा ॥

मागें ज्या हरि पंडिताच्या कवितेंतील ओळी दिल्या आहेत त्या व या सारख्याच असून हरि पंडिताच्या जागीं निज वामन व द्विजाचा याऐवजीं निजाचा इतकाच फरक आहे.

---

१. सारस्वतभूषण. मठस्थ गणेश रा. शर्मा. पृ. १७८.

२. Ethnographia da India Portuguesa. Dr. Bragança Pereira.

३. कवि वामनपंडित यांचा कवितासंग्रह भाग १ ला. (निर्णयसागर) आ. २ री. पृ. १६६.

या 'भीष्मयुद्ध' काव्याचा कर्ता वामन नसून हरि पंडित असल्याचें 'महाराष्ट्र सारस्वत' कर्ते भावे आपल्या ग्रंथांत सांगतात. ते म्हणतात, "यांपैकीं आईबापांचीं नांवें अनुक्रमें नृहरि व लक्ष्मी अशीं दिलीं आहेत. ही बाब अडथळ्याची नाहीं. कारण वामनानें दुसरीं नांवें दिलीं नाहींत. परंतु यांत दिलेलें गोत्र शांडिल्य ही खरी अडचण आहे. कारण वामनानें आपलें गोत्र वाशिष्ठ असें सिद्धांतविजय ग्रंथांत सांगितलें आहे. तेव्हां हें प्रकरण वामनाचें नसून त्याचा शिष्य जो हरि त्याचें आहे हें उघड आहे."[1]

वामनाबद्दल चरित्रकोशांत मिळणारी माहिती अशी कीं, वामनपंडित ऋग्वेदी देशस्थ वाशिष्ठ गोत्री माध्वसांप्रदायी ब्राह्मण. पित्याचें नांव नरहरि, आईचें नांव लक्ष्मी. आईच्या घरचें गोत्र शांडिल्य.[2]

अलीकडे इतिहासज्ञ प्रो. पोतदार यांच्या अभिनंदन-ग्रंथांत 'नांदेडचें शेष घराणें' या विषयावर एक संशोधनात्मक लेख आला असून त्यांतील माहिती नवी आहे. ती अशी कीं, "शेष हे आश्वलायन सूत्री देशस्थ ब्राह्मण असून त्यांचें गोत्र पाराशर आणि वशिष्ठ, शक्ति व पाराशर असे प्रवर असून कुलदैवत देवी आहे. शेषांच्या शाखा निरनिराळ्या ठिकाणीं पसरल्या तेव्हां स्थलपरत्वें अगर कालपरत्वें कोठें शेषांचें कुलदैवत देवी, कोठें लक्ष्मीनृसिंह किंवा अन्य देवताहि असूं शकेल."[3]

या लेखांत वामनपंडिताच्या वडिलांचें नांव तानाजीपंत व आजा वामन अनंत शेष व वामनपंडिताच्या मुलाचें नांव रघुपती असें दिलें आहे. रघुनाथ ऊर्फ रघुपती शेष हा मराठी वाङ्मयांत फार चांगल्यापैकीं कवि होऊन गेला[4] असें लेखकाचें म्हणणें असून हें मत 'महाराष्ट्र सारस्वता'चे पुरवणीकार यांनींहि मान्य केलें आहे.[5] त्याचप्रमाणें वरील भीष्मयुद्ध वगैरे प्रकरणें वामनाचीं नाहींत, हरि वामन किंवा हरि दीक्षित यांचीं असण्याचा संभव आहे, असेंहि मत दिलें आहे.[6]

श्रीलक्ष्मीनृसिंह हें कुलदैवत देशस्थांप्रमाणें कोंकणस्थांतहि मिळतें. तेव्हां वरील कवि हरि पंडित हा गोमंतकीय नाहीं, असें म्हणावें लागतें.

कवि हरि पंडिताबद्दल, हे हरि पंडित व हरि दीक्षित एक कीं वेगळे, असा एक वाद आहे. या वादांत पडण्याची आम्हांला इच्छा नाहीं. आमचा प्रतिपाद्य मुद्दा एवढाच कीं, ज्यानें भीष्मयुद्ध अगर सद्वृत्तमुक्तामाला प्रकरण लिहिलें तो हरि पंडित

---

१. महाराष्ट्र सारस्वत. वि. ल. भावे. आ. ४ थी. पृ. ४७९.
२. मध्ययुगीन चरित्रकोश, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव. पृ. ७२९.
३. नांदेडचें शेष घराणें. प्रो. पोतदार अभिनंदन ग्रंथ. वि. अ. काळेले. पृ. ५७.
४. तत्रैव. पृ. ६५.
५. महाराष्ट्र सारस्वत–पुरवणी. डॉ. शं. गो. तुळपुळे. पृ. ९८१.
६. तत्रैव. पृ. ९८०.

गोमंतकीय नव्हे. या कवीबद्दल ज्यांना अधिक माहिती पाहिजे असेल त्यांनीं खालील लेखांचें अवलोकन करावें.

१. शतकत्रयाचा कवि वामन पंडित नव्हे, हरि दीक्षित. ले. ग. मो. देशमुख (सह्याद्रि, वर्ष ७, अं. ३)

२. हे हरि दीक्षित कोण ? – ग. ह. खरे (सह्याद्रि, व. ७, अं. ६).

३. हरि पंडितकृत भावबोधिनी–चिं. ना. जोशी. (महाराष्ट्र सा. पत्रिका, अंक ६९)

४. हरि पंडित–थोडा खुलासा–ग. ह. खरे (म. सा. पत्रिका, अंक ७०).

याशिवाय अलीकडे सन १९६६ सालीं पुण्याचे इतिहासज्ञ ग. ह. खरे यांचें Select Articles हें इंग्रजी लेखांचें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. त्यांत पृष्ठ ९७ वर छापलेला Hari Dikshit and His Works हा लेख जिज्ञासूंनीं अवश्य पहावा. हा कवि नरगुंद (धारवाड) येथील रहिवासी असून नरगुंदचे अधिकारी रामराय दादाजी भावे हे त्याचे आश्रयदाते होते आणि त्यांनीं त्याला कुरिगोवानाकोप हें खेडें इनाम दिल्याची ता. २७-९-१७३३ ची सनद उपलब्ध झाली असून त्याचे वंशज आजहि त्या इनामाचा उपभोग घेत आहेत, वगैरे माहिती या लेखांत दिली आहे. हरि दीक्षितांचीं ब्रह्मसूत्रावृत्ति, मितभाषिणी, बालानंदिनी हीं संस्कृत काव्यें, नृसिंह आणि विवेकभिहिर हीं संस्कृत नाटकें, तसेंच भावबोधिनी, भीष्मयुद्ध, जयद्रथवध, शतकत्रय वगैरे मराठी काव्यें यांसंबंधीहि लेखांत माहिती दिली आहे.

(दूधसागर पाक्षिक - मुंबई, वर्ष २ अं. १६ (ता. १२-५-१९५६) मध्यें प्रसिद्ध झालेला लेख—नवीन माहितीसह.)

१४

वासुदेव दंडनायक गोमंतकीय नव्हे व सारस्वतहि नव्हे

आपले गोमंतकीय इतिहासज्ञ कै. शणै 'गोंयबाब यांनीं गोंयकारांची गोंयाभायली वसणूक' आणि 'येवकार अध्यक्षांलें उलोवप' या आपल्या दोन पुस्तकांत वासुदेव दंडनायक यांची माहिती दिली आहे व ते गोमंतकीय होते असें आपलें मत दिलें आहे. इतिहासांत चूक राहूं नये म्हणून मला सत्य दिसणारी दुसरी बाजू मी या लेखांत पुढें मांडीत आहें.

शणै गोंयबाब म्हणतात, "नागपूरच्या सरकारी म्युझियममध्यें खांबावर कोरलेलें शक १००८ (सन १०८६) चें एक लिखाण आहे. तें नागपूरजवळ सीताबर्डी म्हणतात तेथें मिळालें. त्यांत असें म्हटलें आहे कीं, कल्याणचा चालुक्य राजा त्रिभुवनमल्लदेव ह्याचा धाडिभडक अगर धाडियदेव राणे नांवाचा एक महासामंत होता. तो मोठ्या राष्ट्रकूट कुळांत जन्माला आला आणि लतलौर गांवांतून बाहेर गेला. त्याची कुळदेवी चामुंडा. त्याचा वासुदेव या नांवाचा एक दंडनायक होता. तोहि लतलौर गांवांतून बाहेर गेला होता. त्याचा बाप पद्मनाभ भट्ट, आजा बोपपैभट्ट आणि पणजा विठपैभट्ट, काण्व शाखा, वत्स गोत्र, पांच प्रवर, कुळदेव नरसिंह." [१]

ते दुसऱ्या पुस्तकांत म्हणतात, "ह्या कुळनांवांवरून ह्या व्यक्ति कोंकणांतील गोव्याच्या होत्या यांत संशय नाहीं. लतलौर म्हणजे लतलउर, लोटली. वासुदेव पै याचा कुळदेव नारसिंघ म्हणजे नरसिंह. हा देव पूर्वी सासष्टींत सांकवाळ येथें होता. सोळाव्या शतकांत बाटाबाटीच्या काळांत तो अंत्रूज वेलिंग येथें गेला. नरसिंह देवाच्या महाजनांत पै या कुळनांवाचें घराणें आहे." [२]

शणै गोंयबाब हे आडनांव पै, कुळदेव नरसिंह आणि गांव लतलौर यावरून उपरोक्त वासुदेव हे गोमंतकीय असल्याचें मानतात. यांत कितपत सत्य आहे तें पाहूं.

गोमंतकांत आज वेलिंग (फोंडा) येथें नरसिंह देवस्थान आहे. या दैवताला श्रीलक्ष्मीनरसिंह असें संबोधितात. हें मूळ शंखवाळ (सांकवाळ) या गांवचें असून बाटाबाटीच्या काळांत वेलिंग गांवांत आलें. या देवस्थानच्या सर्व महाजनांचें गोत्र एकच आहे व तें म्हणजे शंख-पिंग-कुत्स हें होय. याला दुसऱ्या गोत्राचे महाजन नाहींत. यामुळें वत्स गोत्र व कुलदेव नरसिंह हें गोमंतकांत तरी जुळत नाहीं. प्रस्तुत लेखक वेलिंगच्या श्रीलक्ष्मीनरसिंह देवस्थानच्या महाजनांपैकीं असल्यानें या माहितींत संशयाला जागा नाहीं. यांतील बहुतेक महाजनांचीं आडनांवें नायक, भांडारे, शेणवी,

---

१. गोंयकारांची गोंयाभायली वसणूक. शणै गोंयबाब. पृ. ७१.

२. येवकार अध्यक्षांलें उलोवप. शणै गोंयबाब. पृ. ८९.

प्रभु, पडियार हीं आहेत. यावरून गोमंतकांत तरी वत्स गोत्र व पै आडनांव असलेल्या व्यक्तीचा कुलदेव नरसिंह असल्याचें आढळून येत नाहीं, हें स्पष्ट होईल. अर्थात् नागपूर येथें मिळालेल्या शिलालेखांतील वासुदेव दंडनायक हे गोमंतकीय मानण्यांत चूक होत आहे, असें दिसून येतें.

याच वासुदेव दंडनायकाबद्दल कै. रावबहादुर तालमकी वकील यांनीं आपल्या Saraswat Families भाग २ रा या पुस्तकांत आपलें मत दिलेलें आहे. ते म्हणतात, "सन १०८६ चा एक चालुक्यांचा लेख नागपूरच्या सीतावर्डी गांवांत मिळाला. वासुदेव नांवाचा कण्व शाखेचा गृहस्थ, ज्याचा बाप पद्मनाभ भट्ट, आजा बोप पै भट्ट व पणजा विठ पै भट्ट होता, त्याला जमीन (गुरुचरण) दिल्याबद्दलचा हा लेख आहे. मी नम्रपणें असें मत देतों कीं, त्यांच्या वाडवडिलांच्या पै या आडनांवावरून कांहीं लोक त्यांना गोमंतकीय मानतात, पण हा पुरावा तसें मानण्यास पुरेसा नाहीं. जुन्या काळांत सारस्वतांना बामण असें म्हणत, व इतर ब्राह्मणांना भट म्हणत. कण्व शाखा ही माझ्या माहितीप्रमाणें गोऱ्याच्या सारस्वतांत नाहीं. लेखांत वासुदेव याला गुरुचरण दिल्याचा उल्लेख आहे, त्यावरून कांहीं पूर्वकाळापासून तो तेथला रहिवासी होता असें दिसतें. जुन्या काळांतील तेथील रहिवासी देशस्थ व नंतर आलेले थोडे चित्पावन होते. सारस्वतांचें तेथें वास्तव्य दिसत नाहीं."[१]

हेंच सत्य दिसतें. रावबहादुर तालमकी यांनीं याच पुस्तकांत Pai and Appayya among the Deshasthas या मथळ्याखालीं आणखी एका अहमदनगर जिल्ह्यांतील संगमनेरच्या ताम्रपटाची माहिती देऊन त्यांतहि कानडी राजानें देशस्थांना अनुलक्षून पै आणि अप्पय्या हीं उपपदें वापरलीं असल्याचें दाखवून दिलें आहे.[२] जिज्ञासूंनीं तें पहावें.

श्रीलक्ष्मीनरसिंह दैवत देशस्थांत आहे हें आम्हीं याच पुस्तकांत कवि हरि पंडित यांवरील लेखांत दाखवून दिलें आहे.

(दूधसागर पाक्षिक, मुंबई, वर्ष ४ अं. १ (ता. १५-८-१९५७) मध्यें प्रसिद्ध झालेला लेख)

---

१. Saraswat Families, Part II. S. S. Talmaki पृ. २८.
२. तत्रैव. पृ. २६.

१५

आसामची देवी कामाक्षा

हिंदुस्थानांत जीं अनेक प्रसिद्ध तीर्थस्थानें आहेत त्यांत आसाममधील कामाख्या ऊर्फ कामाक्षा याचाहि समावेश होतो. या देवस्थानचें एक वैशिष्ट्य असें कीं, तें शक्ति-पीठांतील आद्यस्थान गणलें जातें.

आपल्या गोमंतकांत कामाक्षा दैवत आहे. ही देवता येथें काहूर अगर कोरंज देशाहून आणली असें सह्याद्रिखंडांत व कोंकणाख्यानांत सांगितलें आहे. पण हा देश आसाममधील कीं अन्य ठिकाणचा हें सांगतां येणें अशक्य आहे.

कामाक्षा दैवताचें आद्यस्थान आसाम ऊर्फ कामरूप होय. तेथील या दैवताची माहिती आसामवरील कांहीं ग्रंथांतून येथें देत आहों. प्रथमतः आजच्या कामाक्षा देवस्थानाच्या व दैवताच्या माहितीकडे वळूं.

"या ठिकाणीं जाण्यास कामाख्या स्टेशनावर उतरावें लागतें. हें स्टेशन या पर्वताजवळ आहे. तेथें जाण्याचे चार रस्ते असून त्याला चढण लागते. शेवटची चढण मोठी आहे. यात्रेकरू लोक पायांनींच वर जातात. स्टेशनपासून मंदिरापर्यंतची लांबी एक मैल आहे.

"या ठिकाणीं कामाक्षादेवीशिवाय भैरवी, छिन्नमस्ता, बगला, मातंगी, कालिका, भुवनेश्वरी, कमला, धुमावती व त्रिपुरा (षोडशी) या देवतांचीं देवस्थानें आहेत. याशिवाय कामेश्वर, सिद्धेश्वर, आम्रटेकेश्वर, केदारेश्वर व कोटिलिंग हीं पांच शिवमंदिरें आहेत. कामाक्षादेवीचें मंदिर शिखरावर असून तें इतर मंदिरांपेक्षां शिल्पयुक्त व मोठें आहे. हें स्थान शाक्त मताच्या ५१ पीठांत मुख्य असून याबद्दल अनेक दंतकथा आहेत. ह्यांतील एक अशी कीं, सती देवीचें अंग विष्णुचक्रानें छिन्न होऊन नीलांचलांत पडलें त्यावेळीं पर्वताला त्याचा भार वाहणें अशक्य झाल्यामुळें तो भार ब्रह्मा विष्णु महेश यांनीं घेतला.

"येथील कामाक्षादेवीची मूर्ति सिंहरूपांतील विष्णु, शवरूपांतील शिव व पद्मरूपांतील सृष्टिकर्ता ब्रह्मा यांवर अधिष्ठित असून द्वादश बाहु, अष्टादश नेत्र व सहा मुखें असलेली अशी आहे. मूर्ति अष्टधातुनिर्मित व सुमारें दीड फूट उंच असल्यानें मंदिरांत प्रवेश केल्यावर लगेच दृष्टीस पडते. देवीच्या दक्षिण भागीं अष्टधातुनिर्मित वृषभारूढ पंचमुख व दशबाहु शिवमूर्ति आहे.

"प्रथम या मूर्तीचें दर्शन घेऊन नंतर गुहेंत सतीच्या योनिमंडलाचें दर्शन घ्यावें लागतें. तेथें एक चतुष्कोणी दगड आठ हात लांबीरुंदीचा असून मध्यभागीं एक हात लांब व बारा अंगुळें रुंद असें शिवलिंगयुक्त योनिमंडल आहे. या ठिकाणीं हात

घातल्यावर एक छिद्र लागतें, त्यांतून अविरत पाणी वाहात असतें. अर्धी बाजू सुवर्णमय गोलाकार झांकणानें आच्छादित अशी असून अर्धी भक्तगणांच्या दर्शनासाठीं उघडी ठेवली आहे. तंत्रग्रंथांत असें सांगितलें आहे कीं, याच्या स्पर्शानेंच मनुष्य जीवन्मुक्त होतो. या ठिकाणीं पूर्वेकडे लक्ष्मी व सरस्वती यांच्या मूर्ती आहेत. गुहेंतून बाहेर आल्यावर चारहि पार्श्वभागीं मंगल चंडी, बटुक भैरव, नीलकंठ भैरव, नंदी, भृंगी, नागकन्या, द्रोणाचार्य व कुचबिहारचे महाराज नरनारायण व त्यांचे बंधु शुक्लध्वज यांच्या मूर्ती लागतात.

"कामाक्षादेवीची पूजा दिवसांतून तीन वेळां, सकाळीं षोडशोपचारांनीं, मध्यान्हीं रेड्याचा बळी देऊन व रात्रौ आरती करून होते. दिवसांतून बंगाली २० मण (आमच्या गोमंतकांतील जुन्या १० मुड्या) तांदूळ नैवेद्याकरतां लागतो. या पर्वतावर साडेतीनशें घरें असून त्यांतील बहुतेक ब्राह्मणाचीं आहेत. हा पर्वत देवस्थानच्या मालकीचा असल्यानें येथें वसती करणाऱ्यांना कर द्यावा लागत नाहीं."[1]

देवस्थानाचें वर्णन असें आहे. यावरून पाहतां तेथें असलेली मूर्ति अलीकडील असावी; देवतेचें मूळ प्रतीक योनिरूपी शिला हें असावें. कालिकापुराण सांगतें कीं,

मयि लिंगत्वमापन्ने शिलायां योनिमंडले ।
सर्वे शिलात्वमगमच्छैलरूपाश्च निर्जरा ॥

म्हणजे दगडाच्या योनिमंडलामध्यें मला शिलारूप प्राप्त झाल्यावर सगळ्या देवतांना शिलारूप प्राप्त होऊन त्यांनीं पर्वताचें रूप धारण केलें.[2]

याबद्दल डॉ. काकती म्हणतात, कामाक्षा देवालयांत देवीची मूर्ति नाहीं. मात्र देवी मातेची प्रजननशक्ति दाखविणारें योनीसारखें प्रतीक आहे.[3]

---

१. वसुमती (बंगाली मासिक). वर्ष २, अं. ६. पृ. ७५४. ह. चट्टोपाध्याय.

२. कामाक्षामाहात्म्यम्. शिवकृष्ण शर्मा.

३. The Mother Goddess Kamakhya. Dr. B. Kakati. पृ. ४१

There was a natural fissure in shape about nine inches in length and fifteen inches in width and reddish pink (water) in colour looking very much like the genital organ of a woman.... The place was therefore called Kameika (Mother water course). Later on Hindus named the place Kamakhya, and worshipped as the genital organ of the Supreme Mother.

—The Background of Assamese Culture. R. M. Nath, B. E. P. 4.

आसामचा व नरकासुराचा संबंध घनिष्ठ आहे. दीपावलीच्या सणाशीं संबंधित असलेल्या नरकासुराचें नांव सर्वांच्या ओळखीचें आहे. आमच्या पुराणांत व महाभारतांत त्याच्याविषयीं मिळणारी माहिती अशी :–

१. हा भूमिपुत्र म्हणून याला भौमासुर असें नांव होतें. भूदेवीनें विष्णूस प्रसन्न करून त्यापासून नरकासुराकरतां वैष्णवास्त्र संपादन केलें होतें. या अस्त्रानें हा अवध्य झाला होता. पुढें यानें हें अस्त्र आपला पुत्र भगदत्त यास दिलें. (महाभारत, द्रोणपर्व, अध्याय २९).

२. यादवांच्या सभेंत इंद्र येऊन त्यानें नरकासुराचा वध करण्याची विनंती केली. हा ब्रह्मदेवाच्या वरानें मत्त झाला होता. कृष्णानें त्याचा वध करण्याची प्रतिज्ञा केली, आणि त्याच्याशीं युद्ध करून सुदर्शन चक्रानें त्याचें शिर उडविलें व बंदींत असलेल्या कुमारिकांची मुक्तता केली. (हरिवंश, २×६३ व ६४.)

३. श्रीकृष्णानें हस्ततलानें नरकासुरावर प्रहार करून त्याला ठार केलें. पडल्यावर त्यानें श्रीकृष्णाची स्तुति केली तेव्हां त्यानें त्याला वर मागण्यास सांगितलें. त्यानें मंगलस्नानाचा वर मागितला. हा आश्विन वद्य चतुर्दशीस ठार झाल्यानें त्या तिथीस मंगलस्नान करण्याचा प्रघात पडला. (पद्मपुराण, उ. २४९.)

४. नरकासुराच्या वधानंतर त्याच्या मातेच्या सांगण्यावरून कृष्णानें त्याचा मुलगा भगदत्त यास अभयदान देऊन नरकासुराचें राज्य दिलें. (भागवत, १०×५९.)

आमच्या पुराणग्रंथांतील माहिती अशी आहे. जुन्या काळच्या ग्रंथांत एकाच गोष्टीची माहिती निरनिराळ्या स्वरूपांत आढळते. कित्येकदां त्यांत परस्परविरोधहि असल्याचें दिसून येतें.

कालिकापुराणांत या नरकासुराची माहिती निराळ्याच स्वरूपांत मिळते. हें पुराण आसामांत कोणत्या तरी राजाच्या आज्ञेनें तयार झालें. याचा कर्ता गृहविप्र भेदांतील ब्राह्मण आहे. या पुराणांत पहिल्या भागांत पुराण व दुसऱ्या भागांत कामरूपाचें माहात्म्य व पूजाविधि आहे. याचा काल आठवें शतक[1] तर कांहींच्या मतें दहावें शतक आहे.[2]

कामाख्या यांतील मूळ शब्द कामायखा, आई जलप्रवाह. ज्या खडकांतून पाणी ओघळूं लागतें त्या ठिकाणीं स्त्रीच्या इंद्रियासारखा आकार दिसतो. यावरून ही कल्पना सुचली. कामरूप या शब्दाची उत्पत्ति अशाच स्वरूपाचा आहे.

—आसामच्या प्रवासांतील कांहीं अनुभव. (साधना, ता. २१-५-६०). श्री. भाऊसाहेब रानडे.

---

१. पूजा पार्वण. बंगाली. योगेशचंद्र विद्यानिधि. पृ. १५.

२. A Cultural History of Assam. Dr. B. K. Barua. पृ. ११.

हें पुराण आम्हांला वाचावयास मिळालें नाहीं. परंतु आसामवरील कांहीं ग्रंथांत, विशेषतः डॉ. काकती यांच्या The Mother Goddess Kamakhya या पुस्तकांत या पुराणांतील कथा दिली आहे ती पुढीलप्रमाणें :–

नरकासुराच्या जन्मकाळीं विदेह (मिथिला) येथें जनक नांवाचें राजघराणें राज्य करीत होतें. तेथील राजाला आपल्या यज्ञभूमींत एक वेवारसी मूल सांपडलें. त्याला घरीं आणून त्यानें मुलासारखें त्याचें लालनपालन करून आपल्या मुलाबरोबर त्यालाहि शिक्षण दिलें. या मुलाच्या आईचें नांव भूमी व बापाचें विष्णु असें होतें. मुलाची आई पुत्रप्रेमानें कात्यायनी हें नांव धारण करून त्याच्या शुश्रूषेकरतां त्या राजाकडे राहिली. या मुलांत स्वभावतःच कांहीं गुण होते. यामुळें प्रत्येक बाबतींत याचा राजकुमाराहून वरचढपणा दिसून आला. यामुळें एखादे वेळीं हा मुलगा आपल्या मुलांना भारी होऊन आपलें राज्यसुद्धां याच्या ताब्यांत जाईल अशी भीति राजाराणीच्या मनांत उत्पन्न झाली. त्यांचीं कांहीं गुप्त बोलणीं एक दिवस कात्यायनी हिच्या कानावर गेलीं व आपल्या मुलानें येथें राहणें धोक्याचें आहे हें तिला कळून चुकलें. त्यानंतर आपल्या मुलाला त्या राज्याबाहेर काढण्याचें तिनें ठरविलें. तिनें आपल्याला तीर्थयात्रा करावयाची आहे असें सांगून त्याला आपल्याबरोबर येण्यास सांगितलें. त्यावर त्यानें आपले वडील जनक यांची परवानगी घेतली पाहिजे असें उत्तर दिलें. तेव्हां तिनें त्याला आजवर ठाऊक नसलेली खरी हकीगत सांगितली. तुझा बाप जनक नाहीं, व तुला या राज्यांत कांहीं वांटाहि नाहीं; जर तूं माझ्याबरोबर येशील तर मी तुझ्या बापाची तुझ्याशीं भेट करून देईन, वगैरे गोष्टी सांगून तिनें त्याची कबुली घेतली; व तीं दोघेंहि जनक राजाला न कळवितां तेथून निघून गंगेच्या किनाऱ्यावर आलीं. तेथें तिनें त्याची बापाशीं भेट करून दिली व मूळचा सर्व वृत्तांत सांगितला. नंतर तीं तिघेंहि नदींतून प्राग्ज्योतिषपुर येथें आलीं. त्यावेळीं तेथें किरात जातीचा राजा राज्य करीत होता. नरकासुरानें त्याला जिंकून त्याचें राज्य आपल्या ताब्यांत घेतलें. या कामीं त्याच्या मूळच्या वडिलांची त्याला मदत झाली. नरकासुर हा बुद्धिमान् व कर्तृत्ववान् असल्यानें थोडक्याच काळांत त्याच्या राज्याची भरभराट झाली. त्याचें बालपण मिथिलेंत आर्य संस्कारांखालीं गेलें होतें. त्यामुळें त्यानें आपल्या राज्यांतहि मुख्य मुख्य अधिकाराच्या जागांवर मिथिलेंतील आर्य लोकांची नेमणूक केली. पुढें त्यानें आपले मानलेले आईवडील जनक राजा व राणी यांना आपल्या राज्यांत बोलावून त्यांचा सत्कार केला. यानंतर त्यानें तेथील देशाचें मूळ नांव जें प्राग्ज्योतिषपुर असें होतें तें बदलून कामरूप असें ठेवलें, व तेथील देवी कामाक्षा हिला राज्यदेवतेचा मान दिला. या त्याच्या कार्यामुळें तेथें आर्य संस्कृतीचा प्रभाव हळूहळू वाढूं लागला. व तेथील मूळची संस्कृति जी ऑस्ट्रिक व किरात (मंगोल) तिचा प्रभाव ओसरत चालला. कांहीं लोक आर्य संस्कृतींत गेले तर कांहीं डोंगरभागांत गेले. याप्रमाणें नरकासुराचें राज्य चाललें असतां शेजारच्या

देशांत शोणितपुर[१] येथें बाणासुर नांवाचा राजा राज्य करीत होता. त्यानें शिवाला प्रसन्न करून घेतलें होतें व तो सर्व भयापासून मुक्त होता. त्यानें नरकासुराकडे मैत्री केली व त्याच्या मनांत असें भरवून दिलें कीं, आज तुझ्या राज्यांतील सर्व अधिकार-सूत्रें देव व ब्राह्मण यांच्या हातांत आहेत. याचा परिणाम असा होईल कीं, तूं त्यांच्या हातांतील बाहुलें बनशील. तेव्हां या गोष्टीचा तूं गंभीरपणें विचार कर. नरकासुराला त्याचें हें म्हणणें पटलें व त्यानें या लोकांना अधिकारावरून काढून त्यांच्या जागीं आपल्यांतील असुर लोकांची नेमणूक केली. हळूहळू त्याची मनोवृत्ति बदलली. यज्ञयाग, देवब्राह्मण यांच्यावरील त्याची भक्ति नाहींशी झाली व कामाक्षा देवतेविषयींहि मनांत औदासीन्य संचरलें.

त्यावेळीं वाशिष्ठ नांवाचा एक संन्याशी त्याच्या राज्यांत आला असतां त्याला कामाक्षा देवतेचें दर्शन घेण्यास तसेंच कोणतेंहि धार्मिक कृत्य करण्यास नरकासुरानें बंदी केली. तेव्हां त्या संन्याशानें, थोडक्याच काळांत विष्णूकडून तुझा वध होईल, असा त्याला शाप दिला व तो तेथून निघून गेला.

संन्याशी निघून गेल्यावर नरकासुर घाईघाईनें कामाक्षादेवीच्या देवळांत गेला. तेंव्हां त्याला देवी आपल्या सर्व अलंकारांसह गुप्त झालेली दिसली. अशा रीतीनें भयाची सावली पडल्यानंतर नरकासुरानें आपला मित्र बाणासुर याच्याशीं विचारविनिमय सुरू केला. बाणासुरानें त्याच्या राज्यांत येऊन सर्व परिस्थिति अवलोकन केली व असा सल्ला दिला कीं, इंद्रदेव वाईट असून तो असुरांचा शत्रु आहे. विष्णु त्याचा पुरस्कर्ता आहे. इंद्राचें वाईट झालेलें विष्णूला नको आहे. तूं ब्रह्मा अगर शिवयांपैकीं एकाची उपासना कर. नरकासुरानें ब्रह्मदेव पसंत करून त्याची आराधना केली व त्याच्याकडून वर मिळविला. त्यानें आपल्या राज्याचा कडेकोट बंदोबस्त केला व देवब्राह्मण यांची छळणूक सुरू केली. याचें पर्यवसान शेवटीं श्रीकृष्णाकडून नरकासुराचा वध होण्यांत झालें. लक्षांत घेण्यासारखी गोष्ट अशी कीं, या वेळीं कामाक्षादेवी ही कालीचें रूप घेऊन श्रीकृष्णाच्या बाजूनें नरकासुराकडे लढत होती.

---

१. This was the Kingdom of Banasur with its capital at Sonitpur which is said to have been located on the bank of Lohit river not far from the sea. — The Background of Assamese Culture. R. M. Nath, B. E. P. 28.

असें म्हणतात कीं, आसाममधील तेजपुर (दरभंगा जिल्हा) याचें प्राचीन नांव शोणितपुर होतें व याच ठिकाणीं बाणासुराची राजधानी होती. तेथें प्राचीन शिल्प आहे तें कांहींच्या मतें बाणासुराचें तर कांहींच्या मतें बोडो या आसाममधील मूळच्या जातीचें होय. — प्रवासी (बंगाली मासिक), वर्ष ५०, आश्विन. पृ. ३१८. ले.नलिनीकुमार भद्र.

ही कथा कालिकापुराणांतील होय. हिच्यावरून निष्कर्ष काढावयाचा झाला तर नरकासुर हा असुर आई व आर्य बाप यांचा मुलगा दिसतो. याचें लालनपालन आर्य संस्कृतींत झाल्यानें याचा ओढा पहिल्यांदा साहजिकच आर्य संस्कृतीकडे राहिला. नंतर त्याला असुरांनीं आपल्याकडे ओढलें. यानें नंतर आर्यांशीं लढा मांडला व यामुळें श्रीकृष्णानें त्यास ठार केलें. मात्र त्याचें राज्य त्याच्या मुलाकडेच दिलें. त्याचा हा भगदत्त नांवाचा मुलगा कौरवपांडवांच्या लढाईत कौरवांच्या बाजूनें लढला होता.

नरकासुरानंतर कामाक्षादेवीची परिस्थिति काय होती याचा पुराणांत उल्लेख नाहीं. पण योगिनी तंत्र म्हणतें कीं, या देवीला कांहीं वर्षें ग्रहण लागलें.[1]

कामाक्षा देवीचे मूळ संस्थापक कोण ?

देवीचें देवस्थान ज्या ठिकाणीं आहे, तें ठिकाण गोहत्तीपासून तीन मैलांवर आहे. तसेंच या पर्वतापासून पन्नास मैल दूर खासी व गारो या जातींची वसती आहे. यांपैकीं पहिली ऑस्ट्रो-आशियाटिक व दुसरी मंगोलियन होय.[2]

देवीचें नांव कामाख्या याबद्दल असा प्रवाद आहे कीं, सती देवीचें योनिमंडल ज्या जागेवर पडलें तो पर्वत शिवाचें शव होय. कामाख्या शब्दांत काम शब्द मुख्य आहे. डॉ. काकती यांच्या मतें या शब्दाचें साम्य ऑस्ट्रिक जातीच्या भाषेतील पुढील शब्दांशीं असल्याचें आढळतें :- Kamoi = Demon (भूत, पिशाच), Kamoit = Devil (भूत, पिशाच), Kamin = Grave (प्रेताचा खड्डा, स्मशान), Kamet = corpse (शव, प्रेत),) Kamru (संथाळी लोकांचा देव). तसेंच Kamarupa शब्दाची व्याख्या Kamru (देव) व Pau (Hill डोंगर) अशी आहे.[3] यावरून ही देवी पहिल्यांदां भूतपिशाच पूर्वज स्वरूपाची प्रतीक होती व पुढें तिला योनिदेवतेचें स्वरूप आलें असें डॉ. काकती म्हणतात. ही पूर्वजमाता ऑस्ट्रिक लोकांबरोबर इकडे आली.[4] आर्यसंस्कृति मान्य केलेल्यांनीं आर्य संस्कृतीच्या प्रभावा-

---

१. The Mother Goddess Kamakhya. Dr. B. Kakati. पृ. १९.

२. The Khasis and Garos, the former belonging to the Austro-Asiatic stock and the latter Mongolian. — The Mother Goddess Kamakhya. Dr. B. Kakati. पृ. ३६.

उपर मालूम होता है असमके खासी लोग नस्ल में किरात हैं और भाषा में निषाद या ऑस्ट्रिक बने हैं. — भारतमें आर्य और अनार्य. डॉ. सुनीतिकुमार चटर्जी.

३. The Mother Goddess Kamakhya. Dr. Kakati. पृ. ४०.

४. Ancestral Mother and that she migrated into Assam with the migration of Austric peoples. — The Mother Goddess Kamakhya. Dr. Kakati. पृ. ४३.

करतां तिला स्थानिक करून घेतलें.[1]

ऑस्ट्रिक लोकांबद्दल सविस्तर माहिती आम्ही पहिल्या लेखांत दिलीच आहे. यांची वसती आसाममध्यें झाली. तेथील शेतीबागायती पिकांत या लोकांचीं पिकें अधिक आहेत. यांपैकीं मुख्य म्हणजे भात हें होय. याच्या जाती शंभर आहेत. फळांत फणस, आंबा, जांब, नारळ, व याशिवाय भोपळा, पानवेल, सुपारी, केळीं, हळद, आलें, वांगीं, वगैरे तेथलीं पिकें होत. म्हणजे साधारणपणें गोमंतकासारखींच तेथलीं पिकें आहेत.

देवीचीं शाक्त व इतर स्वरूपें

आठव्या शतकांतील देवीपुराण सांगतें कीं, या देवीची उपासना कामरूप देशांत कामाक्षा व इतर ठिकाणीं दुसऱ्या नांवानें प्रचलित होती. शाक्तपंथाचें मुख्य स्थान कामरूप[2] व दैवत कामाक्षा असें मध्ययुगापासून अठराव्या शतकापर्यंत समजलें जाई. शाक्त पंथ हिंदुस्थानांत केव्हां सुरू झाला हें सांगणें कठीण आहे. मागील काळांतील सुप्रसिद्ध इतिहासज्ञ कै. चंदा हे याचें मूळ अनार्य असें बहुतेक विद्वानांचें मत आहे असें सांगतात.[3] यांत स्त्रीतत्वाची पूजा मुख्य आहे. यांची वामाचार पद्धत रूढ नीतितत्वांना मानीत नाहीं. या पंथाचा प्रभाव आसाम व बंगाल या ठिकाणीं जोराचा होता. याची माहिती आमच्या बंगालवरील लेखांत आलीच आहे.

Kamakhya seems to be a new name of the Goddess and it does not appear in the early literature. Kakati gives evidence for thinking that the word is non-Sanskritic in origin. He has equated the word with similar Austric formation which means ghost or dead body. He further suggests that Kamakhya was formerly a goddess of ghosts and spirits who was worsbipped in a *smashan* or cremation ground. (Assamese, its formation and development. Dr. B. Kakati.) — A Cultural History of Assam. Dr. B K. Barua. पृ. १४८.

---

१. The Mother Goddess Kamakhya. Dr. B. Kakati. पृ. १७

२. शाक्त पूजाका तीन केंद्र है, कास्मीर, कांची और कामाक्षा। इनमें प्रथम दोनों स्थान श्रीविद्याके केंद्र थे और कामाख्या कौलमतका मुख्य स्थान आज भी है। कामाख्या में अनार्य तिबेटी तंत्रों के विशेष प्रभाव पडने के कारण पंचतत्वोंका इतने उग्र रूप में प्रचार दृष्टिगोचर होता है। – आर्य संस्कृतिके मूलाधार. श्रीबलदेव उपाध्याय. पृ. ३३७.

३. A Cultural History of Assam. Dr. B. K. Barua. पृ. १४७.

देवी कामाक्षा ही शाक्त पंथाची मुख्य देवता असें मानण्यांत येतच होतें. यानंतर हिचीं अनेक स्वरूपें निर्माण झालीं. यांतील मुख्य म्हणजे Kacai Khali (कच्चें मांस खाणारी) हें एक होय. हिच्या देवस्थानांत दरवर्षी नरमेध होत असे. हिचीं सारिया भागांत जीं देवळें आहेत, त्यांत तिला ताम्रेश्वरी (तांब्याच्या देवळांतील देवी) असें म्हणतात. डॉ. काकती यांचें मत असें कीं, जिला कालिकापुराण ईशान्य आसाम-मधील प्रमुख देवता मानतें ती देवी डिकरवासिनी हीच होय. हिचीं तीक्ष्णकांता आणि ललितकांता अशीं दोन स्वरूपें आहेत. हिच्या अनुचारी म्हणजे भागा, सुभागा, चामुंडा, कराला, भीषणा, विक्राळा हीं सर्व भयंकर स्वरूपाचीं नांवें. साधारणतः यांची बहुतेक कामाक्षा देवतेसारखीच पूजा होते. पण कडक दारू, नरमांस, मोदक, मांस, कढी, नारळ व ऊस यांचा नैवेद्य लागतो. हिचीं विशेषणें उग्रतारा व एकतारा हीं होत. हीं सर्व बौद्ध स्वरूपाचीं आहेत. गोहत्तीमध्यें उग्रतारा अगर एकजाता देवीचें देऊळ आहे. ह्या बौद्ध देवींना नंतरच्या काळांत हिंदु तंत्रांनीं आपल्यांत समाविष्ट करून घेतलें. आणि दुर्गा व काली यांचीं तीं स्वरूपें मानलीं. तारा हीच काली होय असें योगिनी तंत्र सांगतें. हीच प्रेतदेवता, हीच कामाक्षा. यानंतर गांवच्या उमा, काली, कराला, चामुंडा वगैरे देवता म्हणजेच कामाक्षा तसेंच दुर्गा असें मानण्यांत येऊं लागलें.[१]

आसामांतील इतर दैवत

पूर्वापार आसामांत शैवोपासना ही आदिवासी तसेंच आर्यप्रभावित लोकांत प्रचलित होती. डॉ. काकती यांचें मत असें कीं, शैवधर्म हा आसामांतील आदिवासी किरात (मंगोल) या जातींत मद्यमांसयुक्त पूजापद्धतीच्या रूपांत प्रचलित होता.[२] एक वेळ आर्यप्रभावित लोकांनीं यावर बहिष्कार घातला होता. पण पुढें त्याला लोकप्रियता मिळाली. इतर ठिकाणच्याप्रमाणें येथेंहि या धर्माचा सर्व काळांत जोर दिसतो. अनेक लेखांतून या दैवतांचीं जीं अनेक नांवें मिळतात तीं म्हणजे परमेश्वर, महेश्वर, ईश्वर वगैरे होत. कालिकापुराण व योगिनीतंत्र यांत मात्र भैरव हेंच नांव आढळतें. इतर ठिकाणांप्रमाणें येथेंहि शैवोपासना लिंगप्रतीकांत होत असे. योगिनीतंत्र म्हणतें कीं, काम-रूपांत लाखों लिंगें आहेत. इतिहासांत असा उल्लेख आढळतो कीं, कुचबिहारचे राजे नरनारायण (काल सन १५४० ते ८७) यांनीं आहोम राजावर स्वारी करतांना शिवाची सशास्त्र पद्धतीनें पूजा करण्याची तयारी केली. त्यावेळीं त्याच्या कच्छारी सैनिकांनीं त्याला हरकत घेऊन आपल्या पूर्वापार पद्धतीनें ती करावयास लावली. ही पद्धत म्हणजे, रेडा, शूकर, कबूतर, बदक, कोंबडें यांचे बळी देणें आणि दारू व देवदासी वगैरे अर्पण करणें ही होय. पुढें ही पद्धत राजानें मान्य केली इतकेंच नव्हे तर तिला कायदेशीर स्वरूप दिलें. आजहि आसामांत शिवचतुर्दशीला बकऱ्याचा खची करण्याच्या

---

१. A Cultural History of Assam. Dr. B K. Barua. पृ. १४८

२. The Mother Goddess Kamakhya. Dr. B. Kakati. पृ. १७

पद्धतीनें बळी देण्यांत येतो.[१]

पूर्वकाळांत आसामांत विष्णूच्या उपासनेचीं चिन्हें दिसतात. कालिकापुराणांतच, विष्णूनें मणिकूटांत हयग्रीवाचें रूप घेऊन ज्वरासुराला मारणें, विष्णूची मत्स्यावतारांत पूजा, त्याचें वराहरूपांत चित्रकूट पर्वतावर आगमन, अशा कांहीं खुणा आढळतात.[२]

प्रत्यक्ष प्रमाण वर्मन राजघराण्याच्या वेळीं मिळतें. बलगंगा लेखांत (सन ५५४) राजा महाभूतिवर्मन याला परम भागवत असें म्हटलें आहे. हर्षचरितामध्यें वरील राजाचा वंशज भास्कर याला वैष्णव वंशाचा म्हटलें आहे. आणखी उदाहरणें म्हणजे ९ व्या शतकांतील एक विष्णुमूर्ति मिळाल्याचें इतिहासज्ञ के. एन्. दीक्षित यांनीं प्रसिद्ध केलें असून दहाव्या व अकराव्या शतकांत या बाजूला विष्णूचीं देवालयें होतीं असें दाखवून दिलें आहे.[३]

पंधराव्या शतकांत आसामांत एक मोठा वैष्णव संत शंकरदेव या नांवाचा होऊन गेला. हा कायस्थ जातीचा होता. यानें एकसारण धर्म म्हणजे एक ईश्वर व तो म्हणजे विष्णु या मताचा प्रसार केला. तो व त्याचा शिष्य माधवदेव यांनीं पुष्कळ संस्कृत ग्रंथांचीं आसामी भाषेंत भाषांतरें केलीं. आजहि त्याचें स्थान टिकून आहे. या मुख्य देवतांशिवाय आणखीहि पौराणिक देवता येथें अस्तित्वांत असल्याचें आढळून येतें. या देवता म्हणजे गणेश, कार्तिकेय, इंद्र, अग्नी, कुबेर, सूर्य, ब्रह्मा वगैरे होत. बहुतेक सर्व देवालयांवर गणेशाची मूर्ति कोरलेली असते. एका सनदेंत गणेशाला लंबोदर असें म्हटलें आहे. सूर्यदेवतेला आसामांत बरेंच महत्व होतें. आसामच्या तेजपुर भागांत सहाव्या शतकांतील प्राचीन अवशेष दिसतात. त्यावरून तेथें सूर्यदेवतेचें मोठें देवालय होतें असें दिसतें असें इतिहासज्ञ बानर्जी यांचें मत आहे. मार्कंडेयपुराणहि कामरूपांत सूर्यदेवतेचें देवालय होतें, असें सांगतें.

इतर ठिकाणीं आढळतें त्याचप्रमाणें बऱ्याच देवतांचें स्वरूप महिषासुरमर्दिनी गटांतील आहे. यांतील बरींचशीं देवळें आहोम राजाच्या अमदानींत (काल सनाच्या १३ व्या शतकापासून १९ व्या शतकापर्यंत) बांधलीं गेलीं. नवगाँग येथील हाथीमुरा देवालयांत एक देवी महिषासुरमर्दिनी आहे. हिची मूर्ति भव्य आहे. दहा हात, प्रत्येक हातांत एकेक आयुध, उजवा पाय सिंहावर व डावा पाय महिषासुराच्या खांद्यावर ठेवलेला आणि देवीच्या हातांतील त्रिशूळ असुराच्या पोटांत खुपसलेला, अशी ती मूर्ति आहे. आसाममधील हिंदु देवतांची माहिती थोडक्यांत अशी आहे.

---

१. A Cultural History of Assam. Dr. B. K. Barua. पृ. १४३ व १४९.

२. The Mother Goddess Kamakhya. Dr. B K Kakati. पृ. ७१

३. A Cultural History of Assam. Dr. B K Barua पृ. १५३

आसामांतील कांहीं धार्मिक चालीरिती

देवळांतून कांहीं देवतांप्रीत्यर्थ पशुपक्ष्यांचे बळी देण्याची चाल होती.

देवदासींची प्रथा बहुतेक सर्व देवळांतून आढळते. राजा वनमालीदेव (९ वें शतक) यानें यांना दुल अंगना असें म्हटलें आहे. राजा सिवसिंह (काल इ. स. १७१४-४४) याची पत्नी शिवदेवालयांतील कलावंतीण होती.

देवळांतील नोकर चुतिया जातीचे लोक असून तेथील पुजारी त्यांना देवरी (Deori) असें म्हणतात. हा शब्द Indo-Aryan म्हणजे संस्कृत देवगृहिक आहे.

आसामांतील सण :– एप्रिलमध्यें बोहाग वैशाख नांवाचा सण साजरा होतो. विवाहित व अविवाहित बायका व मुली चांगले कपडे करून उघड्या मैदानावर प्रेमगीतें गाऊन नृत्य करतात. यावेळीं सर्व मुली तांबड्या किनारीचे कपडे व तांबडीं फुलें वापरतात, आणि हाताचे तळवे व पावलें मेंदी लावून रंगवितात. वैशाख, कार्तिक व माघ महिन्यांच्या पूर्व दिवशीं म्हणजे चैत्र, आश्विन व पौष अमावास्येला जो सण पाळला जातो त्याला बिहू म्हणतात. आश्विन अमावास्या सर्व घरांतून दिवे लावून साजरी केली जाते.

देवालयांतील वाद्यांत झाडाच्या खोडाचे तुकडे कोरून दोन्ही तोंडें चामड्यानें झांकून केलेलीं वाद्यें ढोल व ढोलकी हीं आहेत. बाकीचीं नांवें कळत नाहींत.[1]

सत्यनारायण व्रताची सुरुवात आसामांत ?

आसाममधील कालित जातींतील राजा सत्यनारायण[2] यानें इ. स. १३९५ मध्यें काश्यप गोत्रांतील नारायण नांवाच्या ब्राह्मणाला आठशें एकर जमीन दिली. या राजाचा पुत्र लक्ष्मीनारायण यानें शांडिल्य गोत्री ब्राह्मण रविदेव याला सुभानशिरी नदीकडील जमीन वासुदेव देवाच्या पूजेकरतां दिली. तेथील लोकांचे एकमेकांशीं नेहमीं भांडणतंटे होत. त्यांची नीतिमत्ता खालावली होती. म्हणून या ब्राह्मणांनीं सहज करतां येण्याजोगें एक व्रत तयार केलें.[3] तेंच सत्यनारायण व्रत होय. याचा प्रसार नंतर बंगालमध्यें झाला.

(अर्चना, मुंबई. दिवाळी अंक १९६२ मध्यें प्रसिद्ध झालेला लेख)

---

१ The Background of Assamese Culture. R. M. Nath B. E. पृ. ७ व ९.

२. इतिहासांत कालित (Kalit) घराण्यांतील राजे सत्यनारायण यांचा काल सन १३९० ते १४०० व राजे लक्ष्मीनारायण यांचा काल सन १४०० ते १४३० असा मिळतो.

३. The Background of Assamese Culture. R. M. Nath B. E. पृ. ६६

लत्तलूर अगर लतलौर म्हणजे लातूरच, लोटली नव्हे

गोमंतकीय इतिहासज्ञ कै. शणै गोंयबाब अर्थात् वा. र. वर्दे वालावलीकर यांनीं 'गोंयकारांची गोंयाभायली वसणूक' हें पुस्तक प्रसिद्ध करून त्यांत इतिहासदृष्ट्या वादग्रस्त अशीं कांहीं विधानें केलीं. राष्ट्रकूट राजे हे गोव्याच्या सासष्टी तालुक्यांतील लोटली गांवचे होते, हें त्यांचें विधान इतिहासज्ञांना धक्का देणारें होतें. अशा वादग्रस्त विधानांना त्यांनीं हिंदुस्थानांतील बऱ्याच लोकांना न समजणाऱ्या कोंकणीमधून पहिल्यांदां प्रसिद्धी न देतां तीं इंग्रजीमधून दिली असती तर सबंध हिंदुस्थानच्या व हिंदुस्थानाबाहेरील विद्वानांच्या निदर्शनास त्यांचें मत आलें असतें व त्यावर साधकबाधक चर्चा झाली असती. पण एकेकाचें स्वभाववैशिष्ट्य असें असतें कीं, दुसऱ्याचें समंजसपणाचें सांगणेंहि त्यांना पटत नाहीं. कै. वर्दे वालावलीकर हे इतिहासाचे अभ्यासू होते याबद्दल वाद नाहीं. परंतु त्यांनीं आपल्या दृष्टीनें इतिहासांतील अनेक घटनांबद्दल काढलेलीं अनुमानें मात्र सर्वांनाच पटण्याजोगीं आहेत असें नाहीं. त्यांत प्रांतिक अभिमानाचा अभिनिवेश बराच दिसतो. 'लत्तलूरपुरपरमेश्वर' या राष्ट्रकूट राजाच्या नांवामागें लावलेल्या पदवींतील लत्तलूर हें लोटली गांव असून राष्ट्रकूट राजे हे मूळ लोटलीचे होत व तेथूनच ते दुसरीकडे गेले, हें त्यांचें विधान अशांपैकींच होय. या विधानाचें समर्थन त्यांनीं आपल्या 'गों. गों. वसणूक' या पुस्तकांत पृ. ३४ ते ३६ वर पुढीलप्रमाणें केलें आहे :–

"धारवाड जिल्ह्यांतल्या शिरूर गांवांत शके ७८८ (खि. स. ८६६) सालचा एक शिलालेख आहे. त्यांत राष्ट्रकूट सम्राट पहिला अमोघवर्ष ह्याला लत्तलूरपुरपरमेश्वर म्हणजे लत्तलूर नगराचा मोठा मालक अथवा लत्तलूरकर ही पदवी लावलेली आहे. ह्या नगराचें नांव वाराव्या शैकड्याच्या अखेरपर्यंतच्या लिखाणांत लत्तलूर आणि लतलौर असें आलेलें आहे. त्यानंतर बेळगांव जिल्ह्यांतील सौंदत्तीचा रट्ट महामंडलेश्वर चौथा कार्तवीर्य ह्याच्या खि. स. १२०९ सालच्या ताम्रपटांत लत्तनूर असें आलें आहे. परंतु ही ताम्रपट कोरणाऱ्याची चूक असावी. खरा शब्द लत्तलूर अथवा लतलौर यांत संशय नाहीं. ही दोन्ही रूपें लत्तलपुर या शब्दापासून झालीं आहेत.

लत्तलूर शब्दासंबंधीं सर वॉल्टर ईलियट म्हणतात, "ह्या नांवाचें एकहि नगर आढळून आलेलें नाहीं; परंतु पहिल्यांदाच हें नांव वाचल्यानंतर तें लत-एलुरा ह्या शब्दापासून झालें असावें असें माझ्या मनांत आलें. लत्तलूर हें नांव लत-एलुरा असें वाचणें हें ओढूनताणून केल्यासारखें वाटतें. परंतु राष्ट्रकूट राजे लाट देशावर राज्य करीत होते आणि एलूर ही त्या घराण्याची पहिली राजधानी होती ही गोष्ट ध्यानांत घेतल्यावर माझ्या कल्पनेंत सत्याचा आभास असल्याशिवाय राहणार नाहीं असें

वाटलें.'' ह्या अवतरणांत सर वॉल्टर हे आपलें स्पष्टीकरण ओढूनताणून केल्यासारखें वाटतें हें स्वतःच कबूल करतात ही फार चांगली गोष्ट आहे. परंतु त्यांना आपल्या या कल्पनेंत सत्याचा भास आहे असें जें वाटतें तो मात्र त्यांचा भ्रम आहे. लत-एलुरा असा शब्द घडवण्यामागें राष्ट्रकूटांच्या राजधान्यांची व प्रमुख जनपदांची यादी करण्याचा उद्देश असावा असा जर सर वॉल्टर यांचा समज असेल तर तो शब्द घडवणाऱ्यानें मयूरखंडी व मान्यखेट या राजधान्याहि त्या शब्दाला जोडावयास पाहिजे होत्या; परंतु त्या जोडलेल्या नाहींत. लत्तलपूर हा शब्द अमोघवर्ष राष्ट्रकूटाच्या कारकिर्दीत इ. स. ८६६ च्या ताम्रपटांत पहिल्यांदाच आढळतो आणि त्यापूर्वी पुष्कळ वर्षें खुद्द अमोघवर्षानेंच मान्यखेट ही आपली राजधानी केली, म्हणून त्या राजाचा मान राखण्यासाठीं, मान्यखेट हें नांवसुद्धां लत्तलूर ह्या नांवाला मुद्दाम जोडून यायला पाहिजे होतें; परंतु तें तसें आलेलें नाहीं. यावरून, राष्ट्रकूटांचें प्रमुख जनपद आणि राजधान्या यांची नामावली करण्याचा उद्देश ह्या शब्दांत दिसून येत नाहीं हें सिद्ध होतें आणि सर वॉल्टरांच्या कल्पनेंत सत्याभास नसल्याचें स्पष्ट होतें.

ह्या शब्दासंबंधीं डॉ. फ्लीट म्हणतात, ''राष्ट्रकूट मूळ ज्या गांवांतून बाहेर पडले तो कुठला गांव ह्याची ओळख अजून पटलेली नाहीं; परंतु त्याचें एखादें रूप अजून वहिवाटींत असेल तर, मध्यप्रांतांत, बिलासपूर जिल्ह्यांत, रतनपूर नांवाचा एक गांव आहे तो असूं शकेल.'' ह्या अवतरणाचा सारांश एवढाच कीं, मुळचा लत्तलपूर याच्यापासून सध्याचा रतनपूर हा शब्द झाला. परंतु असें घडणें हें प्राकृत व्याकरणाच्या नियमांना व व्यवहाराला सोडून आहे असें वाटतें. मुळचें नांव 'रतन' असतें तर त्याचें प्राकृत रूप 'लतन' अथवा 'लतल' होऊं शकलें असतें; परंतु 'लत्तल' ह्या शब्दाचें 'रतन' होणें जरा कठीणच.

ह्या शब्दासंबंधीं मा. चिंतामण वि. वैद्य हे आपल्या मराठी मध्ययुगीन भारताच्या दुसऱ्या खंडांत म्हणतात, ''राष्ट्रकूटांना 'लट्टलूरपुरपरमेश्वर' अशीहि एक पदवी होती. हें नांव त्यांना कसें मिळालें यासंबंधीं स्पष्टीकरण आजपर्यंत कुणीहि केलेलें नाहीं. आमच्या मतें, मालखेडच्या स्थापनेपूर्वी, एवढेंच नव्हे तर मयूरखंडीच्याहि पूर्वी 'लट्टलूरपुर' गांव राष्ट्रकूटांची राजधानी असावी आणि तेवढ्याचकरितां त्यांना 'लट्टलूरपुरपरमेश्वर' असें म्हणतात.'' माननीय वैद्य हे आपल्या इंग्रजी मध्ययुगीन हिंदु भारताच्या दुसऱ्या खंडांत म्हणतात, ''इतिहास-संशोधक विश्वनाथ काशीनाथ राजवाडे सुचवितात कीं, उत्तरेस चेदीच्या मुलखांत रत्नपुर नांवाचें जें नगर होतें, तेंच हें लट्टलूर. परंतु याचें कारण त्यांनीं दिलेलें नाहीं. आम्हांला वाटतें कीं, ताम्रपटांवरील संस्कृत लिहिणाऱ्यांना आपल्या लिखाणांत लट्टलूर या प्राकृत शब्दाऐवजीं रत्नपुर हें संस्कृत नांव फार सोपेपणानें घालतां आलें असतें. उदाहरणार्थ, राष्ट्रकूटांची राजधानी मालखेड या मराठी नांवाऐवजीं त्यांनीं मान्यखेट हें संस्कृत रूप घातलें आहे.''

लत्तल शहरासंबंधीं सर बॉल्टर, डॉ. फ्लीट, मा. वैद्य आणि राजवाडे यांचें मत काय आहे तें आम्ही दिलें. परंतु तें वाचून लत्तल हें नगर कोणतें व तें कुठें असावें, हें खरोखरी कळत नाहीं. फ्लीट व राजवाडे यांच्या म्हणण्याप्रमाणें मध्यप्रांतांतलें रतनपुर किंवा रत्नपुर हेंच लत्तलपुर. परंतु भक्कम ऐतिहासिक पुरावा दाखवून या त्यांच्या म्हणण्याचें खंडन करणें कठीण नाहीं. रत्नपुर या नगराचा व नांवाचा जन्म केव्हां झाला असावा हें शोधून काढल्यावर फ्लीट व राजवाडे यांचें म्हणणें बिलकूल टिकून राहत नाहीं हें सिद्ध होईल. रतनपुर किंवा रत्नपुर यापासून जर लत्तलपुर झालेलें असेल, तर रत्नपुरचा जन्म लत्तलपुरच्या पूर्वी बऱ्याच वर्षांआधीं झाला असला पाहिजे हें कुणालाहि मान्य करावें लागेल. परंतु इतिहास आम्हांला निराळीच गोष्ट सांगतो. तो म्हणतो कीं, रत्नपुराच्या पूर्वी लत्तलपुराचा जन्म झाला. तो कसा काय तें आतां पाहूं. मध्यप्रांतांत रत्नपुरांत सांपडलेला एक शिलालेख आहे; तो सध्या नागपूरच्या म्युझियमांत असून त्याची तारीख चेदी संवत् ८६६ म्हणजे ख्रि. स. १११४ आहे. हा लेख रत्नपूरच्या चेदी वंशांतील राजा जाजल्लदेव याच्या काळांतील आहे. ह्या राजानें कांहीं दानधर्म केला होता त्यासंबंधींचा हा लेख असून त्यांत म्हटलें आहे कीं, जाजल्लदेवाचे आजोबा रत्नराज अथवा रत्नेश्वर यांनीं रत्नपुर हें शहर बांधलें. यावरून जाजल्लदेवाच्या पूर्वी दोन पिढ्या म्हणजे ख्रि. स. १०७० च्या सुमारास रत्नराजानें एक राजधानी बांधून तिला आपल्या नांवाच्या स्मरणार्थ रत्नपुर हें नांव ठेवलें हें स्पष्टपणें सिद्ध होतें. आतां लत्तलपुर हें नांव पाहतां १०७० सालाच्या पूर्वी बऱ्याच काळापासून वापरांत होतें असें दिसतें. सौंदत्तीचा रट्ट महासामंत एरेयम्मरस अथवा एरग याला ख्रि. स. १०४० च्या एका शिलालेखांत 'लत्तलूरपुरवरेश्वर' हें बिरुद लावलें आहे. त्याहिपूर्वी वर सांगितल्याप्रमाणें ख्रि. स. ८६६ सालच्या शिलालेखांत अमोघवर्ष राष्ट्रकूटाला 'लत्तलूरपुरपरमेश्वर' ही पदवी लावलेली आहे. या पुराव्यावरून सिद्ध होतें कीं, रतनपुर अथवा रत्नपुर नगराच्या पूर्वी लत्तलपुराचा जन्म झालेला असून तीं दोन्ही ठिकाणें वेगवेगळीं आहेत व त्यांचें एकमेकांशीं कसलेंच नातें नाहीं. तर आतां आम्ही लत्तलपुर नांवाचें स्थळ कुणीकडे शोधायला जाऊंया? इंग्रजी हिंदुस्थान, फ्रेंच हिंदुस्थान आणि देशी संस्थानें यांच्यांतील प्राचीन नांवाजलेल्या कुठल्याहि स्थळाशीं त्याचा मेळ बसत नाहीं. म्हणून लत्तलपुर या नांवाचें ठिकाणच नव्हतें असें आपण समजायचें काय? राष्ट्रकूटांनीं केवळ पोकळ बढाईकरतां ती पदवी घेतली होती असें आपण मानावयाचें काय? तसें असावेंसें वाटत नाहीं. लत्तलपुर हें स्थळ आठव्या शतकांत राष्ट्रकूटांच्या काळीं जसें नांदत होतें तसेंच तें आज विसाव्या शतकांतहि नांदत आहे. तें नष्ट झालेलें नाहीं. तें स्थळ म्हणजे पोर्तुगीज हिंदुस्थानांतलें, गोव्यांतलें, सासष्टींतलें लोटली हें होय. लत्तल या शब्दाचा लोटली या शब्दाशीं बरोबर मेळ बसतो. मालखेड या प्राकृत शब्दाचें जसें संस्कृत लेखकांनीं मान्यखेट केलें तसेंच लोटली ह्या प्राकृत शब्दाचें त्यांनीं लत्तल केलें यांत शंकाच नाहीं. लोटलीच्या शेजारच्या चांदरला रट्टराज शिलाहाराच्या ख्रि. स. १००८ च्या ताम्रपटांत

जसें चंद्रपुर म्हटलें आहे, तसेंच लोटलीला लत्तलपुर हें नांव दिलें आहे."

लत्तलूर गांवाबद्दल कै. वालावलीकर यांचें मत वरीलप्रमाणें आहे. कांहीं पाश्चात्य विद्वानांनीं लत्तलूर म्हणजे आतांचें लातूर होय असें मत दिलें होतें. डॉ. आळतेकर या हिंदी इतिहासज्ञांचेंहि मत असेंच होतें. परंतु गोमंतकाच्या इतिहासाच्या बाबतींत शणै गोंयबाब यांचा एक विशिष्ट दृष्टिकोन असतो. ते आपल्याच मताला चिकटून राहतात. आपल्या मताशीं न जुळणारी सयुक्तिक विचारसरणी पुढें आली तरी तीं ते विचारार्थ लक्षांत घेत नाहींत. सन १९३३ सालीं बडोद्याच्या The Oriental Conference मध्यें पुण्याचे इतिहासज्ञ श्री. ग. ह. खरे यांनीं 'The Ancient Latlur and Modern Latur' या मथळ्याचा एक निबंध वाचला. हा निबंध बडोद्याच्या परिषदेच्या रिपोर्टांत प्रसिद्ध झाला आहे. यानंतर या निबंधाचा मराठी अनुवाद श्री. खरे यांनीं 'केसरी' पत्राच्या ता. १६-२-३४ च्या अंकांत प्रसिद्ध केला. परंतु हे दोन्ही निबंध माझ्या वाचनांत आले नाहींत. गेल्या वर्षी म्हणजे १९६६ सालीं खरे यांनीं आपल्या इंग्रजी निबंधांचें पुस्तक Select Articles या नांवाखालीं प्रसिद्ध केलें. त्यांत पृ. ७७ वर हा निबंध छापलेला आहे. हें पुस्तक नुकतेंच माझ्या वाचनांत आलें. या निबंधांत खरे यांनीं लातूर येथील एका जुन्या देवळांतील सन ११२८ (शक १०४९) च्या शिलालेखाचा कांहीं भाग उद्धृत केला आहे. त्यांत त्या गांवाचें नांव लत्तलौर असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. यावरून लत्तलौर म्हणजे लातूर हें निर्विवादपणें सिद्ध होतें. इतिहासज्ञ श्री. खरे यांच्या निबंधांतील या भागाचा मराठी अनुवाद खालीं देत आहों :–

"६. अलीकडेच डॉ. फ्लीट यांच्या व माझ्या विधानांची सत्यता पडताळून पाहण्यासाठीं आणि स्थानिक शिलालेखासारखा कांहीं पुरावा उपलब्ध होऊं शकेल कीं काय याचा शोध घेण्यासाठीं मी त्या गांवीं गेलों. आणि मला सांगायला आनंद वाटतो कीं, त्या गांवाला जुन्या काळीं लत्तलौर म्हणत असें स्पष्टपणें सांगणारा एक जुना शिलालेख मला तेथें खरोखरच मिळाला. त्यावरून उपरिवर्णित अन्य शिलालेखांत ज्याचा उल्लेख केलेला आहे तो गांव म्हणजे लातूरच होय, असें आपण आतां निःशंकपणें म्हणूं शकतों. मला मिळालेल्या शिलालेखाचें येथें थोडक्यांत वर्णन करून विषयाशीं संबंध असलेल्या त्यांतील ओळी उद्धृत करणें अप्रस्तुत होणार नाहीं.

७. या गांवाच्या उत्तरेस पापनाशी नांवाची एक मोठी विहीर आहे. तिच्या जवळ एक साधें ओबडधोबड भूतनाथाचें देऊळ आहे. या देवालयाच्या मंडपांत गर्भागार आणि मंडप यांच्यामधील पश्चिमेकडल्या भिंतीला टेकवून ठेवलेली एक शिला आहे. तिच्या तीन बाजूंवर लेख कोरलेला असून चौथ्या बाजूवर माणसें, वृक्ष व पक्षी यांच्या कांहीं पुसट आकृती आहेत. ही शिला पूर्वी विहिरींत होती. त्यामुळें तिच्यावरील लेखांतील अक्षरें झिजून पुसट झालीं आहेत. म्हणून शिलेवरील संपूर्ण लेख

मी येथें देऊं शकत नाहीं. पण त्याचा जो भाग मला प्रयत्नांतीं वाचतां आला त्यांत-देखील अत्यंत महत्वाची माहिती आहे. लेख संस्कृत भाषेतील व नागरी लिपींतील आहे. प्रथम त्यांत कल्याणच्या चालुक्य वंशांतील तीन लागोपाठच्या राजांचीं नांवें दिलीं आहेत. अहवमल्ल, त्याचा पुत्र परमर्दी आणि ज्याच्या कारकिर्दीत हा लेख कोरला गेला तो त्याचा पुत्र भूलोकमल्ल हीं तीं नांवें होत. नंतर पुढील दोन श्लोकांत नगराचें व ज्याच्या देवळाप्रीत्यर्थ दान देण्यांत आलें त्या देवाचें नांव पुढीलप्रमाणें आलें आहे (ओळी १२ ते १६) :–

अस्ति दिव्यं पुरस्रेष्ठं लत्तलौराभिधानकम्
महाजनै पंचशतैर्व्वेदविद्भिर्निषेवितं ॥
देवोऽस्ति प्रथितस्तत्र नाम्ना पापविनाशनः ।
यं दृष्ट्वा देवदेवेशं सिध्यंति मनुजा भुवि ॥

शिलालेखांतील वरील उताऱ्यावरून यांत उल्लेखिलेलें नगर लातूर हेंच होय, असें स्पष्टपणें दिसून येतें.

८. दुसऱ्या बाजूवर दिलेली लेखाची तिथि फाल्गुन शुद्ध ८ मी शके १०४९ प्लवंग संवत्सर शुक्रवार ही आहे. दक्षिणेकडील संवत्सरगणनेप्रमाणें प्लवंग संवत्सराचा शक १०४९ शीं मेळ पडतो. आणि फाल्गुन शुद्ध अष्टमी शुक्रवारीं आल्याचें दिसून येतें. इसवी सनाप्रमाणें तो दिवस १० फेब्रुवारी ११२८ हा होता.

९. आणखी टिपा :–

(१) इट्टगी लेखांत (शक १०३४) लत्तलूर हें रूप आढळतें. (Epi. Ind. Vol. XIII, p. 47.)

(२) डॉ. बार्नेट यांनीं दोन ठिकाणीं, लत्तलूर किंवा लत्तनूर म्हणजे आतांचें लातूर होय, असें मत व्यक्त केलें आहे. (Epi. Ind. Vol. XIII, p. 41; Antiquities of India, p. 262) डॉ. अळतकर यांनीं अलीकडील आपल्या Rasbtrakutas and their times या ग्रंथांतहि तसेंच मत दिलें आहे. (पृ. २२ ते २४).

(३) 'लत्तनूर' किंवा 'लत्तलूर' हें नांव 'रट्टनुरु' किंवा 'रट्टरुरु' यांपैकीं कोणत्याहि शब्दापासून व्युत्पादितां येतें. दोन्ही शब्द कानडी असून पहिल्याचा अर्थ रट्टांचा गांव (रट्टन उरु), तर दुसऱ्याचा अर्थ रट्टांचा गांव (रट्टर उरु) असा आहे. ट चा त होतो आणि न व ल हे एकमेकांची जागा घेऊं शकतात, हे अपभ्रंशाचे नियम जमेला धरून ही व्युत्पत्ति लावली आहे. हे नियम सर्वांच्या माहितीचे असल्यामुळें त्यांच्या पुष्टयर्थ उदाहरणें देण्याची गरज नाहीं.

(४) शिलालेखाची तिथि पुढीलप्रमाणें अक्षरीं आणि अंकांतहि दिली आहे:-

शकनृपकालात् एकोनपंचाशदुत्तरे वत्सरसहस्रे अतीते १०४९ ॥
प्लवंगसंवत्सरे फाल्गुने मासि शुक्लाष्टम्यां सुक्रवारे ॥

(दुसरी बाजू, ओळी ७ ते ११)."

श्री. खरे यांच्या वर दिलेल्या उताऱ्यावरून लत्तलौर म्हणजे लातूर हें स्पष्टपणें सिद्ध होतें.

१७

हेमाडपंत गोमंतकीय ?

तेराव्या शतकांत महाराष्ट्रामध्यें हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत हे एक थोर गृहस्थ होऊन गेले. देवगिरी येथील यादव राजघराण्यांतील अखेरचे राजे महादेवराव व रामदेवराव यांचें मंत्रीपद हेमाडपंतांनी भूषविलें होतें. करणाधिप हें पदहि त्यांच्याचकडे होतें. राजकारण-धुरंधर, उत्कृष्ट प्रशासक, युद्धकलानिपुण तसेंच संस्कृत भाषेंतील फार मोठे अधिकारी असा हेमाडपंतांचा लौकिक होता.

हेमाडपंत ब्राह्मण होते. परंतु त्यांची शाखा, तसेंच त्यांचें जन्मग्राम याबद्दलची निश्चित व स्पष्ट माहिती अद्यापि पुढें आलेली नाहीं. त्यामुळें त्यासंबंधी अजूनहि केवळ अनुमानांवरच अवलंबून रहावें लागत आहे. हेमाद्रि हे गोमंतकीय होत, असें अनुमान कांहीं वर्षांपूर्वी दोन गोमंतकीय लेखकांनी मांडलें होतें. पुढें तो विषय तसाच राहिला होता. पण गेल्या वर्षीच्या मार्च महिन्यांत पद्मश्री कवि बोरकर यांनीं पणजी येथें भरलेल्या पहिल्या मराठी कवि-संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणांत त्या विधानाचा जोरदार पुरस्कार केला. तसेंच त्यानंतर त्यांनीं 'Goa Today' या इंग्रजी मासिकांत "Hemadri or Hemadpant: was he a Goan?" या मथळ्याखालीं कांहीं आधार देऊन विस्तृत लेख लिहिला होता. पद्मश्री बोरकर सांगतात, " हेमाडपंतांच्या चरित्राचा अभ्यास केलेल्या इतिहासतज्ञांनी असें मान्य केलें आहे कीं हेमाडपंत श्रीकृष्ण देवतेचे उपासक होते. तसेच त्यांचें गोत्रहि वत्स होतें. तर कांहीं इतिहासकारांच्या मतें ते कर्नाटकी होते. आणखी कांहीं जणांचे मतें हेमाडपंत महाराष्ट्रीय असून त्यांचें वास्तव्य कर्नाटकांत होते. फक्त इतिहासाचार्य राजवाडे यांनींच असा तर्क मांडला कीं हेमाद्रि हे गौड ब्राह्मण होत. पण हेमाद्रिपंतांच्या मूळ गांवाचें गूढ मात्र अद्यापि तसेंच आहे. खालील पुराव्यावरून असें दिसतें कीं ते सारस्वत अगर शेणवी ब्राह्मण असून मूळचे गोमंतकीय होत. (It leads to the inference that he was a Saraswat or Shenavi Brahman of Goa Origin.)"

बोरकर यांचें अनुमान

पद्मश्री बोरकर म्हणतात, "पंढरपूर येथील विठोबाच्या देवालयांत एक शिलालेख आहे. त्या देवळाचें बांधकाम ११७३ मध्यें सुरू होऊन तें ११७६ मध्यें पूर्ण झालें. त्या देवळानिमित्त ज्या मंडळींनीं देणग्या दिल्या त्यांत कांहीं गोमंतकीयांचीं नांवें आहेत. तीं म्हणजे कोंकण, नायक, दणाईत, तेलंग, पडियार, लाड व कर्णिक. त्यांतील चार नांवांच्या आडनांवांचे शेवटीं 'कार' असें आहे. गोव्यांत आडनांवाला 'कार' जोडण्याची पद्धत चालू आहे, तर महाराष्ट्रांत 'कर' असें जोडलें जातें. ज्या आडनांवांच्या शेवटीं

'कार' असें लावलेलें आहे, त्यांत हेमाद्रीचा उल्लेख 'सोडवीकार हेमाद्रि पंडित' असा आहे. यावरून हेमाद्रिपंतांचा गांव सोडवी असावा असें दिसतें. गोव्यांत सोडवी, सोडवें वा सोडवय या नांवाचें खेडें हेमाडबारशें अगर 'उगें' गांवाजवळ असण्याचा संभव आहे. त्या 'उगें' गांवालाच पूर्वी 'सोडवी' असें नांव असल्याचें आढळून आल्यास मला आश्चर्य वाटणार नाही."

पद्मश्री बोरकर नुसतें अनुमान करून थांबलेले नाहींत. तर त्यांनीं पुराव्यादाखल एका देवळाचाही उल्लेख केला आहे. ते म्हणतात, "उगें गांवांत जरा मोडक्या स्थितींत 'हेमाडदेव' या नांवाचें एक देवालय आहे. त्या देवळांत लिंगाकृतीची एक शिला पिंडिकेवर आहे. त्या शिलेवर हेमाडदेवाचें चित्र कोरलेलें आहे. शिलेवर एकूण तीन चित्रें कोरलेलीं आहेत. उभ्या असलेल्या मधल्या व्यक्तीच्या माथ्यावर मुकुट असून खांद्यावर जानवें व उजव्या हातांत राजदंड आहे. तिच्या डाव्या हातावर शाल आहे. डाव्या हाताला असलेल्या सेवकानें मधल्या व्यक्तीवर छत्र धरलें आहे. उजव्या बाजूस असलेल्या व्यक्तीनेंही जानवें धारण केलें आहे. उजव्या बाजूला असलेलें लहानसें चित्र हेमाडपंतांचे मित्र बोपदेव यांचें दिसतें. ते हेमाडपंतांचे सहकारी होते." 'अ इंदिया पोर्तुगेज–भाग दुसरा' या सिंयोर लोपिस मेंदिस यांनी लिहिलेल्या ग्रंथांत हें चित्र आहे.

"उगें हा गांव हेमाडबारशेंहून फारसा लांब नाही. त्या भागाला हेमाडबारशें हें हेमाद्रीचें नांव असून तें कांहीं वर्षांपासून चालू आहे. तसेंच हिंदुस्तानांत तें नांव 'एकसेंव' असें आहे. हेमाडबारशें ही हेमाडपंतांची खाजगी इस्टेट असावी. सरकारी नोकरींतून निवृत्त झाल्यावर त्यांनीं आपलें उर्वरित आयुष्य तेथें घालविलें असावें. आणि त्यांचा मृत्यूहि त्यांच्या पूर्वजांच्या 'उगें' याच गांवीं झाला असावा. व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांचें स्मारक म्हणून देवालय बांधलें असावें."[१]

पद्मश्री बोरकर यांचें हें अनुमान वास्तविक रीत्या तसें नवें नाहीं. कारण सन १९५९ सालीं गोव्यांतील 'भारतमित्र' या मासिकाचे संपादक श्री. ना. भा. नायक यांनीं 'गोमंतकीय देवालयें' असें एक पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें होतें. हेमाडदेव–उगें या देवळाची माहिती त्यांनीं अशी दिली आहे कीं, "सांगें महालांतील हेमाड व हेमाडदेव म्हणजे हेमाडपंत हे देवगिरीच्या यादवांचे मंत्री असावेत, असें वाटतें. पुढें त्यांच्या (हेमाडपंत) जहागिरींत त्यांची मूर्ति बडवून आणणें हें अशक्य दिसत नाहीं."[२]

त्याहीपूर्वी कै. मठस्थ गणेश शर्मा यांनी सारस्वतांच्या चरित्रनामावलींत (प्रसिद्धी १९५०) हेमाडपंत यांना सारस्वत ठरविलें आहे (ग्रंथ–सारस्वतभूषण). मात्र त्यासाठीं

१. Goa Today. August 1966.
२. गोमंतकीय देवालयें. ना. भा. नायक. पृ. ९५.

त्यांनी आधार असा कांहीं दिलेला नाहीं. तर रा. पाध्ये यांच्या हेमाद्रि अगर हेमाडपंत चरित्रावरून आपण तें घेतलें आहे असें म्हटलें आहे.

आतां या साऱ्या तर्काचा साकल्यानें विचार करूंया. प्रथम कै. मठस्थ गणेश शर्मा यांच्या 'सारस्वत-भूषण' ग्रंथांतील तो उल्लेख बघूंया. कै. शर्मा यांनीं त्या ग्रंथांत हेमाडपंतांचे चरित्राशिवाय विशेष असें कांहीं लिहिलेलें नाहीं. शर्मा कालवश झाले असल्याने, 'हेमाडपंत गोमंतकीय असावेत' हें मत त्यांनीं कोणत्या आधारावर बनविलें होतें तेंहि कळण्यास मार्ग नाहीं. शर्मा यांनी तसें विधान करतांना पाध्ये यांचे पुस्तकांतील गोविंद कवी याच्या एका मेस्तकाचा उल्लेख केला आहे. (मेस्तक=मायना). त्यांत शेणवाई मेस्तकें म्हणजे शेणवी यांचीं मेस्तकें असें म्हटलें आहे. त्यावरून पाध्ये यांनी तसा ग्रह बनविला असावा. कारण अॅ. पाध्ये 'हेमाद्रि-चरित्र' या ग्रंथांत लिहितात, "राजकीय व खाजगी पत्रव्यवहारांत बरीच सुधारणा करून हेमाडपंतांनी नवीन मेस्तकें तयार केलीं." तर सांगायचें असें कीं, गोविंद कवी यानें लिहिलेल्या मेस्तकांत असें म्हटलें आहे कीं, "पूर्वी तया देवगिरीसी । रामदेव राजापाशी । असतां हेमाडपंतांशी । युक्ती असे आठविली । मोडी लिपी लंकेहुनी आणिली । त्यावरी स्वमतियुक्त लिहिली । आणि कामराजाशी आज्ञा दिधली । शेणवाईं पद्धत रचावया ॥"[१]

यांत शेणवाई अर्थात् शेणवी हा शब्द असल्याने हेमाडपंडित हे शेणवी असावेत, असें कै. गणेश शर्मा यांना वाटलें असावें. वास्तविक 'कवितेंत शेणवाई पद्धतीचीं मेस्तकें रचावयास आज्ञा दिली' असा याचा अर्थ आहे. हेमाद्रीनें मेस्तकें लिहिलीं, त्यांना शेणवाई मेस्तकें हें नांव पडलें, असा याचा अर्थ होत नसावा, असें वाटतें. उलट तशीं तीं मेस्तकें पूर्वापार असावींत व त्यांना शेणवाई मेस्तकें असें नांव असावें. कारण त्याहीपूर्वी शेणवी यांनी गोवा, कदंब व शिलाहार यांच्या राज्यांत मंत्री व इतर पदें भूषविलेलीं होतीं.

त्यानंतर 'भारतमित्र' मासिकाचे संपादक श्री. नायक यांच्या म्हणण्याचा विचार करूं. "सांगें तालुक्यांतील कांही भागाला 'हेमाडबारशें' असें पडलेलें नांव आणि उगें येथील हेमाडदेव या नांवानें ओळखलें जाणारें देऊळ, या आधारें आपण तें मत बनविलें; इतकेंच काय पण हेमाडपंतांची कुलस्वामिनी म्हाळसा (वेरगें, नंतर म्हाडदोळ-गोवा येथील दैवत) होती हेंहि आपण लेखनाच्या ओघांत लिहिलें" असें श्री. नायक यांनी मला समक्ष भेटींत चर्चेचे वेळीं सांगितलें. तसेंच तें अनुमान आतां त्यांनाहि सत्य वाटत नसल्याचें बोलून दाखविलें.

बोरकरांचीं विधानें व इतिहास

पद्मश्री बोरकर यांचीं विधानें पडताळण्यासाठीं इतिहासाचीं पानेंच उलटणें आवश्यक आहे. अगदीं हेमाडबारशें याच नांवापासून आपण ऐतिहासिक मागोवा घेऊंया.

---

१. हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंडित. अॅ. के. आ. पाध्ये. पृ. १४.

हेमाडबारशें हें नांव सांगें तालुक्यांतील त्या भागाला केव्हांपासून लागू झालें, याबद्दल निश्चित माहिती उपलब्ध नाही. तो महाल तसेंच फोंडें, केपें व काणकोण हे सौंदेकर यांजकडे होते. १७-१-१७९१ रोजीं झालेल्या तहाप्रमाणे ते त्यांजकडून पोर्तुगिजांच्या ताब्यांत आले.[1] सन १७६६ च्या महाल-जमाबंदीचे कांही मोडी कागद पोर्तुगीज दप्तरांत आहेत. त्यावरून असें आढळतें की हेमाडबारशें महालांत पस्तीस मौजे अथवा गांवें यांचा अंतर्भाव होता. त्यांच्या नऊ तर्फा पाडल्या होत्या (तर्फ=भाग). (१) सुर्ल, (२) सांकोर्डे, (३) बांदोडबार्शे, (४) कुर्ले, (५) कोडली, (६) सालावली, (७) आठबार्शे, (८) लाटबार्शे व (९) तुडव अशा त्या तर्फा होत्या. त्यांपैकीं सांकोर्डे, सालावली, तुडव व कोडली या चार तर्फांतील चौदा गांवांतून श्रीहेमाडदेव याचेप्रीत्यर्थ कांहीं खर्ची पडल्याचा उल्लेख आढळतो.[2]

हेमाड शब्दाची व्याख्या कै. वर्दे वालावलकर यांनी अशी केली आहे कीं, श्रीकृष्ण-जरासंधाचें युद्ध ज्या भागांत झालें, त्याला हेमाड अगर हेमाड-बारशें म्हणतात. संस्कृत शब्द हेमाद्रि याचा अर्थ 'सुवर्णाचा पर्वत मेरू' असा होतो. 'हेमाद्रि' वरून हेमाड शब्द बनला हें निःसंशय.[3] हेमाद्रि हा शब्द संस्कृत असून तो हेम अगर हेमन्-वरून आला. त्याचा संस्कृत कोशांतील अर्थ 'सुवर्ण' असा आहे.

कानडी भाषेतील एक व्युत्पत्ती:– हेमाड हा शब्द द्राविडी वाटतो. हेमाडी अगर हेम्माडी असें आडनांव धारण करणारीं कुटुंबें कॅनरा जिल्ह्यांत आहेत. त्याबाबत मंगळूर येथील एका स्नेह्याने असें कळविलें कीं, "कुंदापूर तालुक्यांत हेमाडी नांवाचें खेडेगांव आहे. आपण हेमाडपंत या नांवावरून ती माहिती विचारली असावी असा माझा तर्क आहे. साधारणतः 'अडि' या शब्दाचा अर्थ झाडांचा पुंजका असा आहे. हेमाडी अगर हेमाडपंत हा 'परमार्डी' या शब्दाचा अपप्रयोग आहे. 'परमार्डी' याचा अर्थ :– 'पेर' म्हणजे मोठा व 'अडि' म्हणजे हुकुमाचा तावेदार, आज्ञापालन करणारा असा आहे. आणि 'परमार्डी' हा शब्द तामीळ आहे. (परमार्डी–पेरमार्डी) त्याचा अर्थ पेर म्हणजे मोठा व अडि म्हणजे उपाध्याय (Priest) असा आहे. तो शब्द प्रथम पल्लव राजांच्या कारकीर्दीत उत्पन्न झाला."

स्वतः हेमाडपंतांनी दिलेली माहिती

हेमाडपंत हे शुक्ल यजुर्वेदी शाखेचे वत्स गोत्री पंच-प्रवरी ब्राह्मण होते. त्यांच्या वडिलांचें, आजोबांचें व पणजोबांचें नांव अनुक्रमें कामदेव, वासुदेव व वामन असें होतें. ही माहिती त्यांनी स्वतः लिहिलेल्या 'चतुर्वर्ग-चिंतामणी' ग्रंथांत दिलेली आहे असें

---

१. गोमंतक इतिहास दिग्दर्शन. ना. भा. नायक. पृ. ९५.

२. डायरेक्टर ऑफ आर्कीव्हज डॉ. व्ही. टी. गुणे यांजकडून हें पत्रद्वारा समजलें.

३. गोंयकारांची गोंयाभायली वसणूक. शणै वा. र. वर्दे वालावलीकार. पृ. ५.

त्यांच्या चरित्रकारानें लिहून ठेवलें आहे. हेमाडपंत हे संस्कृतज्ञ, राजकारणी, हस्तिदलाचे सेनापती, युद्धकुशल नेते व करणाधिप होते. त्यांनी लिहिलेले संस्कृत ग्रंथ त्याही काळांत मान्यता पावले होते. यादव राजे रामदेवराव व महादेवराव यांचे दरबारीं हेमाडपंतांनी प्रधान म्हणून लौकिक कमाविला.[१] परंतु पुढें पुढें त्या काळांत उदयाला आलेल्या महानुभाव पंथाची छाप देवगिरीच्या राजघराण्यावरही पडली. त्या पंथाचे गुरु व हेमाडपंत यांच्यांत विरोध निर्माण झाला. (हेमाडपंतांना क्लेशपूर्ण देहांत शासन भोगावें लागलें, वगैरे मजकूर महानुभाव ग्रंथांत असल्याचें कळतें.[२] कदाचित् विरोधामुळें तसें लिहिलें गलें असणें शक्य आहे.) पण एक खरें कीं कोणत्याहि मार्गानें हेमाडपंतांच्या उत्तरार्धाची (शेवटच्या कांहीं वर्षांची) माहिती स्पष्ट होत नाही. हेमाडपंत यांच्या चरित्राची उपलब्ध असलेली सर्वसाधारण माहिती ही अशी आहे.

कालगणनेंतील चूक

पद्मश्री बोरकर यांनी आपल्या लेखांत प्रारंभींच असें म्हटलें आहे कीं, हेमाडपंत बाराव्या शतकांत होऊन गेले. तसेंच पंढरपूर येथील त्या देवालयाचें बांधकाम ११७३ ते ११७६ मध्यें झाल्याचेंही म्हटलें आहे. त्यांत पद्मश्री बोरकर यांना एका शतकाची चूक केलेली दिसते.

देवगिरीचे प्रधान हेमाडपंत (हेमाद्रि) यांचा काल १३ वें शतक होय. डॉ. पानसे यांनी आपल्या ग्रंथांत तो काल सन १२६० ते १३१० असा दिला आहे.[३] पंढरपूरच्या शिलालेखाचाहि काल तेरावें शतकच आहे. तो शिलालेख कोरण्याचें काम शके ११९५ मध्यें सुरू होऊन ११९८ मध्यें समाप्त झालें.[४] त्याहीवरून सनगणनेप्रमाणें सन १२७३ ते ७६ हींच वर्षें येतात. पद्मश्री बोरकर यांच्याकडून शक व सन यांचा मेळ घालतांना ती चूक घडली असावी.

शिलालेखांतील तीन हेमाडपंत

पंढरपूर येथील देवळांतील शिलालेख पाध्ये यांनी आपल्या ग्रंथांत सविस्तरपणें दिला आहे. त्यांत खालील तीन हेमाडपंडित आढळतात. (१) सोडवीकार हेमाडि पंडिती-वामनादत्त, (२) कौटौन हेमाडी पंडित, (३) कोहोर हेमाद्रि पंडित.

पहिल्या दोघांचें नांव कानडी हेमाडी आहे. व तिसऱ्याचें नांव संस्कृत हेमाद्रि असें दिलें आहे. वामनादत्त म्हणजे वामनाचा मुलगा असें म्हटल्यानें हा कोणी दुसरा

---

१. हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत. ॲ. के. आ. पाध्ये.
२. मध्ययुगीन चरित्रकोश. 'हेमाद्री' पहा. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.
३. यादवकालीन महाराष्ट्र. डॉ. मु. ग. पानसे. पृ. १०३.
४. हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत. ॲ. के. आ. पाध्ये.

कीं काय असा संशय कांहीं जणांनी प्रकट केला. परंतु शिलालेखांत हेमाडी पंडिताचा शक ११९८ दिला असून, त्याखालीं लगेच चक्रवर्ती रामचंद्र देवराय यांचें नांव आहे. मात्र त्याचा शक ११९९ दिला आहे. त्यावरून असें वाटतें कीं हेमाडीनंतर एका वर्षानें राजाने देणगी दिली असावी. परंतु दोन्ही नांवें बरोबर असल्यानें यादवांचे मंत्री हेमाडपंत हेच शिलालेखांतील हेमाडपंत असावेत.

हेमाडदेव पदवी आणि गोमंतकीय कदंब राजे

गोमंतकावर कदंब घराण्याचें राज्य तीन शतकें अबाधित (सन ९८०-१३००) व पुढें अंशतः होतें. त्यांतील जयकेशी दुसरा (११०४ ते ११४८) याला दोन मुलगे होते. त्यांचीं नावें अनुक्रमें शिवचित ऊर्फ पेरमाडी व विधुचित ऊर्फ विजयादित्य अशीं होतीं. विजयादित्याला 'युवराज' हा किताब होता. त्यावरून असें अनुमान निघतें कीं विजयादित्य हा पळासगे टापूचा प्रांताधिकारी (व्हाइसरॉय) असावा व पेरमाडी हा त्याची मुख्य राजधानी गोवा येथें रहात होता. त्या (शिवचित) पेरमाडीचा काळ सन ११४७ ते ८१ असा आहे.

शिवचित कदंबांचें एक सोन्याचें नाणें उपलब्ध आहे. त्याच्या एका बाजूला सिंह व शकाचें नांव असून, दुसऱ्या बाजूला पांच ओळींत पुढील मजकूर आहे.

१ श्री सप्त को
२ टिश लब्धवर सि
३ वचित वीर हेमा
४ डि देवर मल
५ वर मारि

तो लेख सुस्पष्ट आहे. हें नाणें 'वृष' संवत्सरामधील आहे. त्याचा शक १०८३ आणि सन ११६१ येतो. त्या नाण्यांतील चौथ्या ओळींतील 'डि' या अक्षराऐवजीं 'द्रि' असें अक्षर आहे, असें मत सुप्रसिद्ध नाणकतज्ञ श्री. खरे यांनी व्यक्त केलें होतें. परंतु त्या नाण्याचें बारकाईने अवलोकन केल्यावर असेंच आढळून येतें कीं, तें अक्षर 'द्रि' नसून 'डि'च आहे.

कदंब राजवटींतील नाण्यांबद्दल डॉ. दीक्षित यांनी लिहिलेला लेख,[1] तसेंच म्हैसूर राज्यांतील पुरातत्व विभागाकडे असलेलीं शिवचित पेर्माडीचीं नाणीं आणि त्यांसंबंधींची म्हैसूर आर्किऑलॉजिकल सर्व्हेमधें दिलेली माहिती यांवरून एक गोष्ट सिद्ध होते ती ही कीं, हेम्माडि, हेमाडीदेव ही पदवी धारण करणारा राजा होता व तो हेमाडपंतांचे एक शतक अगोदर होऊन गेला. पण हेमाडपंत गोमंतकीय होता याचा कांहीही निश्चित वा अनिश्चित पुरावा त्या नाण्यांवरून मिळत नाही.

---

१. गोव्याच्या कदंबांचीं नाणीं. (मांडवी, अस्नोडा-गोवा. मार्च १९६५). डॉ. मो. ग. दीक्षित.

हेमाडपंत व ब्राह्मणी पोटभेद

हेमाडपंत गोमंतकीय होते असें म्हणणारे विद्वान त्यांना सारस्वत ठरवूं पाहतात. परंतु एकतर हेमाडपंतांनी स्वतः लिहून ठेवलेल्या आणि प्रारंभीं उल्लेख केलेल्या पुराव्यापुढें तें विधान टिकणें कठीण. ते होते शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन.[1] याला आणखीहि एक प्रबळ आधार 'सारस्वत-भूषण' या ग्रंथांतील पान १७ व ६६ वर मिळतो. त्यांत असें म्हटलें आहे कीं ' एके काळीं सारस्वत ब्राह्मण चारहि वेदांचें व शाखासूत्रांचें अध्ययन करीत. पण सांप्रत दक्षिणेस आलेले सारस्वत फक्त ऋग्वेद व त्याच्या शाखांचें अध्ययन करतात.'

सारस्वतांमधें अशी एक पद्धत आहे कीं मामाची मुलगी केली जाते. उपनयनाचें वेळीं बटूचा मामा बटूला मुद्दाम येऊन सांगतो कीं 'मी तुला आपली मुलगी देईन.' परंतु जुन्या काळीं उत्तरेंत ती चाल प्रचलित नव्हती. तसेंच बौद्धायनाखेरीज सर्वांनी तिचा निषेधच केला होता. तसेंच अपरार्क आणि हेमाद्रि यांसारख्या महाराष्ट्रीय धर्मशास्त्रकारांनी तिचा निषेधच केला होता.[2]

हेमाद्रीने धर्मशास्त्रावर ग्रंथ लिहिले हें तर सर्वश्रुतच आहे. ब्राह्मण शाखांमध्यें आंतर-शाखाविवाहाचा त्यानें सर्रास पुरस्कार केलेला आढळतो.[3] उलट तत्कालीन सारस्वत समाजांत पोटशाखांत रोटीव्यवहारसुद्धां होत नसे, मग बेटी-व्यवहार तर दूरच. याही गोष्टीवरून हेंच सिद्ध होतें कीं ते गोमंतकीय नसावेत.

हेमाडपंत वैदर्भीय होते का ?

सन १९१२ सालीं विदर्भ मराठी साहित्य संमेलनाचे वेळीं म. म. डॉ. पां. वा. काणे यांनी 'विविधज्ञानविस्तार'मध्यें एक लेख लिहिला होता. त्यांत त्यांनी असा उल्लेख केला होता कीं, ' चतुर्वर्ग चिंतामणी ' या धर्मशास्त्रावरील प्रचंड व प्रमाणभूत ग्रंथाचा कर्ता हेमाद्रि हा वैदर्भी होता.[4]

हेमाद्रीचे मित्र बोपदेव यांनीही संस्कृत भाषेंत अनेक ग्रंथ लिहिले होते. त्यांतील एका ग्रंथांत बोपदेव यांनी 'वेदपद' हें आपलें जन्मस्थान दिलें आहे. आणि बोपदेव हे वऱ्हाडांतील सार्थ ऊर्फ सार्ध येथील रहिवासी होते, हें मान्य झालें आहे. आतां 'हेमाद्रि' या नांवावरून ते महाराष्ट्रीय नसावेत असें पुष्कळांना वाटतें. परंतु त्याकाळीं

---

१. हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत. ॲ. के. आ. पाध्ये. मुसलमानपूर्व महाराष्ट्र, खंड २. भावे.

२. नवभारत, वाई, जून १९५७. प्राचार्य भुसारी यांचा लेख.

३. यादवकालीन महाराष्ट्र. डॉ. मु. ग. पानसे. पृ. १०४.

४. विदर्भ व महाराष्ट्र यांसंबंधीं चार शब्द. म. डॉ. पां. वा. काणे. (विविधज्ञानविस्तार, वर्ष ४३, अं. ११).

वऱ्हाड-खानदेशकडे हें नांव प्रचलित होतें. उदाहरणार्थ देवगिरीच्या यादवांचे मांडलीक व निकुंभ कुळांतील राजे सोईदेव व हेमाडिदेव हे बंधु खानदेशकडील रहिवासी होते.[१] वऱ्हाडच्या पर्णखेरच्या राजाचें नांवहि हेमाद्रि होतें.[२]

हेमाद्रि यांचें उपास्य दैवत

ज्या इतिहासकारांनी हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत यांच्या चरित्राचा अभ्यास केला आहे, त्यांचे मतें हेमाद्रीचें उपास्य दैवत कृष्ण होतें, असें विधान पद्मश्री बोरकर यांनी केलें आहे. परंतु खुद्द हेमाद्रीचा शिष्य व परमस्नेही बोपदेव 'मुक्ताफल' या त्याच्या ग्रंथांत म्हणतो कीं त्यांचें उपास्य दैवत विष्णु होय.[३]

विष्णु व श्रीकृष्ण हीं दैवतें वैष्णव असलीं तरी गोव्यांत वैष्णवपंथ आला तो मध्वाचार्यानंतर. गोमंतकांतील अनेक शैव देवतांना जरी वैष्णव नांवें दिलेलीं असलीं तरी तीं नांवें मूळचीं शैवच होतीं. हेमाडपंत हे सारस्वत ब्राह्मण व मूळचे गोव्याचे असते तर त्यांनी इकडील सारस्वत ब्राह्मणांच्या उपास्य दैवतांपैकीं एकाची उपासना केली असती. परंतु तसें आढळत नाहीं.

मग हेमाडपंती देवळें कशीं ?

इतकें सगळें आहे तर मग गोमंतकांत हेमाडपंती देवळें आलींच कशीं ? याला उत्तरें अनेक आहेत. गोवा आर्कीव्हिजचे संचालक डॉ. गुणे यांनी 'Ancient Shrines of Goa' हें पुस्तक लिहिलें आहे. त्यांतील एक संदर्भ पुरेसा बोलका आहे. "तांबडी सूर्ल देवालय हें एकच देवालय असें दाखवितां येईल कीं ज्याची बांधणी हेमाडपंतांचे काळीं झाली. पंढरपूर येथील विठोबाच्या देवळांतील शिल्पाची बरीचशी छाप या देवळावर पडली आहे. आणि पंढरपूरचें तें देऊळ हेमाडपंती बांधकामाचा एक आधारभूत (Standard) नमुना मानला जातो. [हेमाडपंती रचना म्हणजे होयसळ आणि यादव शिल्पांच्या संयोगाने निर्माण झालेली रचना.]"

मेजर गिल यानेही वऱ्हाडांतील दौऱ्यांत तेथें आढळलेल्या हेमाडपंती देवळांविषयीं बरीच माहिती दिली आहे.

राहतां राहिलें उगें येथील देऊळ. तें जीर्णशीर्ण अवस्थेंत असल्याचा उल्लेख Lopes Mendes यांनी केला आहे. प्रस्तुत लेखकास प्रकृतिस्वास्थ्याचे अभावीं त्या देवळाची पहाणी करणें शक्य झालेलें नाही. तरीही येथवरच्या विवेचनावरून असें दिसून येतें कीं, तें देऊळ हेमाडपंतांचें स्मारक म्हणून तेथील ग्रामस्थांनी हेमाडदेव चित्रित करून बांधलें असें म्हणावयाचें झालें तर त्याला पुरावा पाहिजे. यांत आणखीहि

---

१. हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंडित. ॲ. के. आ. पाध्ये. पृ. ३६८.
२. यादवकालीन महाराष्ट्र. डॉ. मु. ग. पानसे. पृ. ३०
३. हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंडित. ॲ. पाध्ये. पृ. ३९–४०.

एक बारकावा असा कीं, जर तें देऊळ हेमाडपंतांचें स्मारक म्हणून बांधलें गेलें असतें, तर त्याची रचना हेमाडपंती झाली असती. कदंब राजा शिवचित हा आपल्या नांवापुढें हेमाडदेव ही पदवी लावीत होता, हेंहि येथें लक्षांत घेतलें पाहिजे.

सारांश हेमाडपंत, हेमाद्रि या यादवांचे प्रधान असलेल्या, विद्वत्ता, शौर्य धैर्यादि गुणांनी युक्त अशा राजकारणी पुरुषाचें आद्यस्थान गोमंतकच आहे असें ठामपणें म्हणतां येत नाही. तसेंच ते वैदर्भी होते असें म्हणण्याइतका सबळ पुरावाहि उपलब्ध नाही. पण एक मात्र खरें कीं ते गोमंतकीय होते हें विधान उपलब्ध पुराव्याचे कसोटीवर उतरत नाही.

(दीपावली, मुंबई. दिवाळी अंक, १९६७ मध्यें प्रसिद्ध झालेला लेख.)

टीप – १९१२ सालीं 'विविधज्ञानविस्तारां'त आजचे पद्मभूषण महामहोपाध्याय काणे यांनीं एक लेख लिहिला होता. त्यांत त्यांनी हेमाडपंत हे वैदर्भीय होते असा ओझरता उल्लेख केला होता. पण आधार दिला नव्हता. महामहोपाध्याय काणे ह्यांच्या आजच्या वयाची मला कल्पना होती, पण माझे मित्र श्री. श्रीपाद शंकर नवरे ह्यांच्या सूचनेवरून त्या विधानाबद्दल त्यांना कांहीं खुलासा करतां येईल कीं काय, अशी त्यांना पत्रांतून पृच्छा केली. पद्मभूषण काणे ह्यांनीं स्वदस्तुरचीं तीन कार्डें लिहून आपल्या वयोमानामुळें आधार शोधणें अशक्य आहे असें कळविलें. त्यानंतर माझे मित्र नवरे ह्यांनीं प्राध्यापक न. र. फाटक ह्यांच्याकडे पृच्छा केली. त्यांनीं चटदिशीं सांगितलें कीं हेमाडपंत हे गोमंतकीय नसून खानदेशी आहेत. आपल्या डोळ्यांच्या अधूपणामुळें तूर्त आपण पुरावा देऊं शकत नाहीं. पण आणखी थोड्या दिवसांनीं आपल्या मोतीबिंदूवर ऑपरेशन करणार असून त्यानंतर पुरावा पाठवतों. त्यांनीं असाही निरोप पाठवला कीं राजश्री नायक ह्यांना ते खानदेशी होते असें स्पष्ट घालण्यास सांगा. कांहीं वाद उपस्थित झालाच तर मी पाठीशीं आहें. पण पुरावे न मिळाल्यामुळें हा लेख थोडासा अपूर्ण राहिला आहे. तथापि त्यांच्याकडून पुरावे मिळतांच ते कशाहि रीतीने प्रसिद्ध होतीलच.

१८

गोव्यांतील राज्यकर्त्यांचीं नाणीं

(त्रोटक परीक्षण)

सुरुवातीस माझी भूमिका स्पष्ट करण्यासाठीं थोडें प्रास्ताविक निवेदन करणें जरूर आहे. मी एक नाणकसंग्राहक आहें. १९५४ ते १९५८ पर्यंत माझें मुंबईत वास्तव्य झालें व त्या कालांत माझ्या नाणकसंग्रहाला व्यवस्थित रूप येऊं लागलें. त्यापूर्वी गोव्यांत असतांनाहि मला हा छंद होता. पण गोव्यांत नाणीं मिळविण्याच्या कामांत अनेक अडथळे येतात. मुक्तिपूर्व कालांत गोव्यांत आलेल्या पोर्तुगीज लष्करांतील अनेक लोकांना हा छंद होता व त्यांनीं इंडोपोर्तुगीज सोन्यारुप्याचीं नाणीं बरींच नेलीं, असें समजतें. मुंबईत गेल्यावरसुद्धां मला तेथें नाणीं कुठें मिळतात त्याचा शोध घ्यावयास २ वर्षें लागलीं. त्यानंतर दोघां विक्रेत्यांची भेट झाली व त्यांच्याकडून मी नाणीं विकत घेऊं लागलों. १९५७ सालीं Numismatic Society of India ह्या संस्थेचा मी सभासद झालों. त्यावेळीं सभासदत्वाची वर्गणी ५ रु. असावी. आतां ती १५ रु. आहे. ह्या सोसायटीचा सभासद झाल्यानें अनेक फायदे उपलब्ध होतात. संस्थेचें एक वार्षिक किंवा षण्मासिक नियतकालिक निघतें. तें सभासदांना मोफत मिळतें. इतरांना तें विकत घ्यायला आज ३० रु. भरावे लागतात. दुसरा फायदा असा कीं, तुमच्या संग्रहांत कांहीं अडथळा आल्यास ते सल्लामसलत देतात. ह्याशिवाय All India Oriental Conference व All India Historical Conference या परिषदा ज्यावेळीं हिंदुस्थानच्या कुठल्याहि भागांत भरतात त्यावेळीं तेथें हजर राहाण्यास प्रवासखर्चांत सवलत मिळते. जाण्यायेण्याच्या प्रवासांत फक्त जाण्याचाच खर्च द्यावा लागतो. १९५७ सालीं या सोसायटीचें ऑफिस मुंबईस होतें, आतां बनारसच्या हिंदु युनिव्हर्सिटींत आहे. नाणकसंग्राहकाला दोन गोष्टी कराव्या लागतात. पहिली गोष्ट म्हणजे जुन्या कालांतील खरोष्ठी व ब्राम्ही तसेंच नंतरच्या कालांतील फारशी अरबी ह्या लिपींचें थोडेंबहुत ज्ञान असावें लागतें. त्याशिवाय त्याच्या अभ्यासाला मुख्य साधनें ताम्रपट, शिलालेख व दप्तरें हीं नसून त्या त्या राजवटींतील नाण्यांचे क्याटलॉग व प्रत्यक्ष नाणीं हींच असतात. मागें इंग्रजांनीं हिंदुस्थानची आर्थिक लूट बरीच केली, परंतु शिक्षणाला व इतिहाससंशोधनाला उत्तेजन दिलें. त्या वेळीं हिंदुस्थानांत नाणीं मुबलक होतीं, कारण येथें अडीच हजार वर्षांच्या कालांत शेंकडों राजवटी होऊन गेल्या होत्या. त्या कालांत इंग्रजांनीं हिंदुस्थानांतील मुख्य मुख्य शहरांत म्युझियम्स स्थापन करून नाण्यांचा व कलात्मक वस्तूंचा संग्रह केला. नाणकसंग्रहाला व्यवस्थित स्वरूप देऊन नाण्यांचे कॅटलॉगहि प्रकाशित केले. नाण्यांचा कॅटलॉग करणें व तो प्रकाशित करणें हें सरकारलाच शक्य असतें. आज हें वाङ्मय इतकें दुर्मिळ झालें आहे कीं, २५ रु. च्या किंमतीचें पुस्तक आज ३००-४०० रु. ला-

सुद्धां मिळत नाहीं. आज कांहीं म्युझियम्स आपल्याकडील नाण्यांचे क्याटलॉग्स प्रसिद्ध करीत असतात. अभ्यासकाला त्यांची फार जरूरी असल्यानें नाण्यांप्रमाणेंच त्यांसंबंधींचें उपलब्ध वाङ्मय मी संग्रहित केलें आहे. जुन्या लिपींचें पूर्ण ज्ञान मला झालेलें नाहीं. परंतु आज दहाबारा वर्षें त्यांत गेल्यामुळें व आयुष्यांतील प्रत्येक दिवसांतील कांहीं तास त्यांत जात असल्यामुळें हातांत आलेलें नाणें कोणत्या राजवटीचें हें ओळखतां येतें. ज्या अभ्यासकाला इतकें मामुली ज्ञान नसेल त्याच्या संग्रहांत एकाच जातीचीं अनेक नाणीं जमतील. व नाणकविक्रेत्यांकडून त्याची फसगत होऊं शकेल. साधारण नाणकविक्रेता हा फारशी उर्दू लिपी असलेलें नाणें अकबराचें अगर शहाजहानाचें असें ठोकून देतो. परंतु तें बहुधा आधुनिक कालांतील हैदराबादचें असतें व त्याची किंमतहि जास्त नसते. अनेक कारणांमुळें संग्राहकाला इतकें मामुली ज्ञान असावेंच लागतें. वाराणशीला जी नाणक सोसायटी आहे तिचा गोव्यांत सभासद मी एकटाच आहें. आणखी कुणी नाहीं. वरील कारणामुळें माझा नाणकसंग्रह व्यवस्थित आहे. मात्र अजून पुस्तकसंग्रह व क्याटलॉग संग्रह मनाचें समाधान होईल इतका नाहीं. म्हणून मी माझा बराच अभ्यास असूनही पोर्तुगीज नाण्यांशिवाय दुसऱ्या राजवटींच्या नाण्यांसबंधीं लेखन केलें नाहीं.

१९६३ साली रिवगच्या 'भारतमित्र' मासिकांत संपादक श्री. नारायण भास्कर नाईक ह्यांची गोव्याच्या राजकर्त्यांचीं नाणीं ही लेखमाला सुरू झाली. तें पाहून मला आश्चर्याचा धक्का बसला. परंतु मला कांहीं करतां येत नव्हतें. मत विचारल्याशिवाय आपण होऊन देणें योग्य नसतें. लेखमाला पुरी झाल्यावर प्रसिद्ध झालेलें पुस्तकहि मी विकत आणलें. तें वाचल्यावर त्यांत पुष्कळच चुका आहेत असें आढळून आलें. कांहीं मुसलमानी नाण्यांचीं वजनें व त्या नाण्यांवरील फारसी नांवें ह्यांचाही उल्लेख आलेला पाहून आणखी आश्चर्याचा धक्का बसला. पुस्तक पुरें होण्यापूर्वी 'भारतमित्रां'त लेखमाला चालू असतांना एके दिवशीं ते माझ्या घरीं आले होते. मी कांही कामासाठीं बाहेर जाण्याच्या तयारींत असतांना बाहेरच्या खोलींत ते माझी वाट पहात बसलेले आढळले. येण्याचें कारण विचारतांच नाणीं पाहाण्यास पाहिजेत असें त्यांनीं सांगितलें. त्याबद्दल त्यांनीं मला पूर्वसूचनाहि दिली नव्हती. मी त्यांना माझ्या खोलींत आणलें व त्यांना हवी असलेली माहिती सांगण्यास सुरुवात केली. मला त्या दिवशीं बाहेर कांहीं जरुरीचें काम असल्यानें थोड्याच वेळांत निघण्याची निकड होती. त्यामुळें थोडक्यांत जें सांगतां येईल तें मी त्यांना सांगितलें. आपण ती माहिती प्रसिद्ध करणार आहों हें त्यांनीं मला सांगितलें नाहीं. पुढें 'भारतमित्रा'च्या अंकांत ती माहिती प्रसिद्ध झालेली आढळली. पुस्तकवाचनानंतर त्यांतील चुकींची माहिती पाहून असें वाटलें कीं, इतकी चुकींची माहिती गोव्याच्या नाण्यांच्या इतिहासांत असणें ही गोष्ट सामान्य गोमंतकीयाच्या मनांत गोव्याच्या गतकालांतील नाण्यांबाबत अपसमज निर्माण करणारी आहे. परंतु माझा निरुपाय होता. त्यानंतर त्या पुस्तकाला गोमंतक साहित्य संमेलनांत पुरस्कारादाखल कांहीं रक्कम देण्यांत आली असें त्याच्या जाहिरातीवरून दिसून आलें. 'गोमंत-

वाणी' पत्रांतून मला त्या पुस्तकाचें परीक्षण करतां आलें असतें. पण तें कठोर वाटेल याची कल्पना आल्यामुळें तो विचार सोडून दिला. 'गोव्याच्या राज्यकर्त्यांची नाणीं' याविषयींची खरी माहिती लिहून प्रसिद्ध करण्याचें माझ्या मनांत होतें. पण त्याला कांहीं साधनांची गरज होती व तीं मिळण्यास अडचण पडत होती. तथापि पुढें १९ डिसेंबर १९६४ च्या 'गोमंतवाणी'च्या खास अंकांत 'गोमंतकांतील पोर्तुगीज राजवटींतील नाणीं' या विषयावर मी एक लेखमाला सुरू करून सत्य माहिती लोकांपुढें मांडली. परंतु त्या लेखमालेंत 'भारतमित्र'कर्त्यांच्या पुस्तकांतील चुका दाखविल्या नव्हत्या. त्यामुळें जनतेवर तिचा परिणाम झाला असें दिसून आलें नाहीं. म्हणून त्या चुका जनतेच्या नजरेस आणणें जरुरीचें होऊन बसलें.

तूर्त अनारोग्यामुळें 'गोव्यांतील राज्यकर्त्यांचीं नाणीं' या पुस्तकांतील माहितीसंबंधीं सांगोपांग विवेचन करणारा लेख लिहिणें मला शक्य होईल कीं काय, याची शंका आहे. परंतु 'भारतमित्र'कर्त्यांच्या पुस्तकांत ज्या अनेक चुका झालेल्या आहेत, त्या तशाच राहूं देणें म्हणजे सामान्य जनांत गोमंतकाच्या नाणकविषयक इतिहासाबाबत भ्रामक कल्पना प्रसृत होण्यास मोकळीक ठेवण्यासारखें होईल. म्हणून आजारीपणांतहि हें अल्प परीक्षणाचें कटु कर्तव्य नाइलाजानें करावें लागत आहे. या पुस्तकांतील ढोबळ चुकांसंबंधींच मी या लेखांत थोडक्यांत चर्चा करून त्या त्या बाबतींतील खरी माहिती देणार आहें. आजच्या आजारीपणांत याहून अधिक कांहीं करणें शक्य नाहीं.

श्री. नारायण भास्कर नायक आपल्या या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत लिहितात, " या विषयावरील हा ग्रंथ अगदीं पहिलाच आहे. असा एखादा ग्रंथ मराठींत किंवा पौरवात्य अन्य भाषेंत तर नाहींच; पण पोर्तुगीज, इंग्रजी किंवा अन्य पाश्चिमात्य भाषांतहि नाहीं. केवळ नाणक शास्त्रावरील ग्रंथ कांहीं भाषांत असले तरी प्रत्यक्ष गोव्याच्या राजकर्त्यांच्या नाण्यांची माहिती सहजासहजीं कुठें मिळत नाहीं, आणि त्यामुळें आरंभीं या ग्रंथलेखनाचें काम जरी सहजसाध्य वाटलें, तरी पुढें विविध माहिती मिळविण्यासाठीं पोर्तुगीज, इंग्रजी किंवा अन्य नाणक ग्रंथांपेक्षां शिलालेख, ताम्रपट, नाणीं व दप्तरेंच अधिक पाहण्याचे परिश्रम करावे लागले. नाणीं प्रत्यक्ष पहाण्यासाठीं गोमंतकांत व गोव्याबाहेरहि अनेक ठिकाणीं प्रवास करावा लागला आणि अशा रीतीनें परिश्रमपूर्वक माहिती मिळवून ती ग्रंथरूपानें आज जनतेसमोर येत आहे. अशा या गोमंतकांतील पहिल्या नाणकग्रंथाचें रसिक वाचकवर्ग सप्रेम स्वागत करील अशी आशा आहे."

आतां श्री. नारायण भास्कर नायक यांनीं अत्यंत आत्मविश्वास दाखवून प्रसिद्ध केलेलें हें पुस्तक कितपत यशस्वी झालेलें आहे, तें पाहूं. मागें मी नाणकशास्त्रज्ञाला भारतीय इतिहासाचा अभ्यास असला पाहिजे, हें सांगितलेंच आहे. पुस्तककर्ते

पृ. ७ वर 'शांत इतिहासारंभींचीं नाणीं' या सदराखालीं इतिहास देतात. ते म्हणतात, "मगधाची राजधानी प्रथम राजगृह व नंतर पाटलीपुत्र होती. कण्व राजांकडून मगध राज्य मौर्यवंशीय चंद्रगुप्त यानें खिस्तपूर्व ३२१ त घेतलें. याच्यामागून त्याचा मुलगा समुद्रगुप्त गादीवर आला. यानें अश्वमेध यज्ञ करून उत्तर व दक्षिण भागांतल्या अनेक राजांना जिंकून मांडलीक केलें. यावेळीं सबंध कोंकण याच्या कक्षेंत आलें होतें."

हा इतिहास संपूर्णपणें चुकीचा आहे. वस्तुतः या कालाचा खरा इतिहास शालेय पुस्तकांतूनहि दिलेला आढळतो आणि तो असा आहे :– चंद्रगुप्त मौर्याच्या पूर्वी मगध राज्य नंद वंशाकडे होतें. या नंद राजांपैकीं घनानंद या राजाकडून आर्य चाणक्य याचा भर दरबारांत अपमान झाला. व त्यामुळें त्यानें नंद राज्याचा उच्छेद करीन अशी प्रतिज्ञा केली. त्यानें चंद्रगुप्त नांवाच्या एका तरुणाला हाताशीं धरून सैन्य जमविलें व त्याच्याकरवीं नंद राजसत्तेचा पाडाव करून चंद्रगुप्त मौर्यांचें राज्य स्थापन केलें. या चंद्रगुप्ताला बिंदुसार नांवाचा मुलगा झाला. व त्याचा मुलगा हाच हिंदुस्थानचा विख्यात सम्राट् अशोक होय. त्याच्या एका वंशजाकडून तो दुर्बल झाल्यामुळें त्याचा पाडाव करून शुंग घराण्यांतील पुष्यमित्र नांवाच्या सरदारानें राज्य आपल्या ताब्यांत घेतलें. हा राजा कट्टा हिंदु धर्माभिमानी होता. याच्याकडून पुढें कण्व घराण्यांतील राजांनीं मगध राज्य आपल्या ताब्यांत घेतलें. हें इ. स. पूर्व ७३ ते २७ मध्यें घडलें. पुढें मगध राज्य गुप्त नांवाच्या घराण्याच्या ताब्यांत आलें. त्याचा पहिला राजा चंद्रगुप्त हा होता. याचा काळ इ. स. ३२० ते ३३० हा होय. या चंद्रगुप्ताचा मुलगा समुद्रगुप्त होय. अर्थात् चंद्रगुप्त मौर्य व समुद्रगुप्ताचे वडील चंद्रगुप्त यांत साडेसहा शतकांचें अंतर आहे. यावरून श्री. ना. भा. नायक यांनीं लिहिलेला इतिहास कसा अजब आहे, हें वाचकांस कळून येईल.

आतां त्यांच्या नाण्यांच्या माहितीकडे वळूं. पृष्ठ ७ वर ते म्हणतात, "पराक्रमी विक्रम राजानें सनपूर्व ५७ सालीं शकांचा पराभव करून त्यांना भारतांतून घालवून दिलें. याचवेळीं त्यांनीं विक्रम संवत् सुरू केला. याबद्दलच्या उज्जयनींतील महोत्सव प्रसंगीं विक्रम राजाचीं जीं नाणीं निघालीं तीं देवनागरी लिपींतील आहेत."

'विक्रमादित्य' ही पदवी होय. ही पदवी धारण करणारा राजा कोण याबद्दल निश्चित मत नाहीं. कांहीं इतिहासकार समुद्रगुप्ताचा मुलगा दुसरा चंद्रगुप्त हाच विक्रमादित्य असें मानतात. पण अलीकडील एका हिंदी भाषेतील इतिहासतज्ज्ञानें विक्रमादित्यावर एक पुस्तक लिहिलें असून तें वाराणशीच्या चौखंबा प्रकाशनानें प्रसिद्ध केलें आहे. त्यांत अवंती, उजयनी, माळवा येथील गणराज्यांपैकीं एकानें या शकांचा पराभव केला व विक्रम-संवत् सुरू केला असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. या अवंती, उज्जयनी, माळवा येथील गणराज्यांचीं बरीचशीं नाणीं माझ्या संग्रहांत आहेत. त्यांत कित्येकांवर स्वस्तिक डम्लेस चिन्ह व कित्येकांवर देवीचीं चिन्हें आहेत.

एका नाण्यावर एक योद्धा हातांत भाला घेऊन उभा असून त्याच्याजवळ वृक्षाची चिन्हें आहेत. व पाठीमागें डम्लेस स्वस्तिक चिन्ह आहे. नाणकशास्त्रज्ञांचें मत असें आहे कीं, अवंती, उज्जयिनी येथील नाणीं अनेक प्रकारचीं असून त्यांची लिपी त्या काळची ब्राम्ही आहे. त्या काळीं ब्राम्ही व खरोष्टी या लिप्या चालत होत्या.

श्री. ना. भा. नायक त्याच पृष्ठावर पुढें म्हणतात, "पश्चिमीय छत्रपांच्या नाण्यांवर एका बाजूस राजाचें व त्याच्या बापाचें नांव असून दुसऱ्या बाजूस राजमुखवटा व संवतचे आंकडे होते. मजकूर देवनागरी लिपींतील आहे." शक राजांच्या ताब्यांत कांहीं काळ हिंदुस्थानचा कांहीं भाग गेला. या नहपान नांवाच्या शक राजाचा आंध्र राजा गौतमीपुर शातकर्णी यानें पराभव करून त्याच्या नाण्यांवर आपला शिक्का मारला. हीं दोन्ही नाणीं माझ्या संग्रहांत आहेत. या शक राजाच्या नाण्यांवर ज्या भाषा आहेत, त्यांची लिपी ब्राम्ही व खरोष्टी होय. इंग्रजीनाणकशास्त्रज्ञ C. V. Brown यांनीं The Coins of Ancient India या पुस्तकांत हेंच मत दिलें आहे. या शकांचे कांहीं अधिकारी हिंदुस्थानांत राहिले. त्यांना पश्चिमी छत्रप असें म्हणतात. अशा एका दामसेन नांवाच्या पश्चिम छत्रपीय राजाच्या नाण्याचें चित्र Brown यानें आपल्या पुस्तकांत प्लेट ३ मध्यें दिलें आहे. या छत्रपी नाण्यावर मागल्या बाजूस जी लिपी आहे, तिला डॉ. ब्राउन 'नागरी' असें म्हणतात. या नागरी लिपीबद्दल त्यांनीं टीपेंत असा खुलासा केला आहे कीं, 'Nagari is a later form of Brahmi Script' (ही नागरी म्हणजे ब्राम्हीचें नंतरचें स्वरूप होय.) श्री. नायक यालाच **देवनागरी** म्हणतात कीं काय, समजत नाहीं.

गोव्यावरील मुसलमानी अंमल

१३०९ सालीं अल्लाउद्दीन खिलजीचा सरदार गोव्यावर स्वारी करून लूट घेऊन गेला. यानंतर खिलजी घराण्याचा शेवटचा राजा मुबारक याचा अंमल गोव्यावर सुरू झाला. तो १३१८-१९ पासून १३२१ पर्यंत होता. या मुबारक खिलजीचीं कांहीं नाणीं माझ्या संग्रहांत आहेत. या खिलजीचा शेवट नासिरुद्दीन खुशरू यानें करून राज्य आपल्या ताब्यांत घेतलें. हा नासिरुद्दीन खुशरू हिंदु अंत्यज होता. तो मुसलमान होऊन खिलजीच्या सैन्यांत होता. त्याच्या हातांत राज्य गेल्यावर मुसलमान सरदारांना फार वाईट वाटलें. पुढें तघलख नांवाच्या एका सरदारानें त्याचा खून करून दिल्लीचें राज्य आपल्या ताब्यांत घेतलें. या नासिरुद्दीन खुशरूचें राज्य ४ महिने होतें. त्याचीं बिलीयन व तांब्याचीं कांहीं नाणीं माझ्या संग्रहांत आहेत. गोव्याचें राज्य पुढें बहामनी नांवाच्या मुसलमानी अंमलाखालीं गेलें. या बहामनीचा अंमल पहिल्या खेपेस सन १३५२ पासून १३६६ पर्यंत होता. या १४ वर्षांनंतर त्याच्याकडून गोव्याचें राज्य विजयनगरने घेतलें. त्यानंतर १०४ वर्षांनीं दुसऱ्या खेपेला बहामनी सरदारांनीं गोवा आपल्या ताब्यांत घेतला व १९ वर्षें तो त्यांच्या ताब्यांत होता. या बहामनी

राजवटींत एकंदर अठरा राजे झाले. यांपैकीं ११ राजांचीं २५० तांब्याचीं नाणीं माझ्या संग्रहांत आहेत. व दोनच रुप्याचीं नाणीं आहेत. यांचीं सोन्याचीं, रुप्याचीं व तांब्याचीं नाणीं अत्यंत सुबक अशीं होतीं. या नाण्यांच्या संग्रहाचा एक कॅटलॉग हैद्राबाद म्युझियमने नुकताच प्रसिद्ध केला आहे. श्री. ना. भा. नायक हे आपल्या पुस्तकांत पान २० वर बहामनीच्या रुप्याच्या नाण्याला लॉरी असें म्हणतात, पण ती चूक आहे. लॉरी हें नाणें आदिलशाही राजवटीनें काढलें. त्याचा उल्लेख त्यांनीं आदिलशाही राजवटीच्या नाण्याच्या माहितींत केलेला आहे. व माझ्या संग्रहांतील आदिलशाही राजवटीचें लॉरी नाणें त्यांनीं पाहिलेलें आहे. यावरून बहामनीच्या रुप्याच्या नाण्याला ते लॉरी असें नांव देतात तें कोणत्या कारणामुळें तें समजत नाहीं.

श्री. ना. भा. नायक यांनीं आपल्या पुस्तकांत पृष्ठ ६८ वर ईस्ट इंडिया कंपनीच्या नाण्यांची माहिती दिली आहे. त्यांत ते म्हणतात, "इ. स. १६७७ मध्यें मुंबईच्या टांकसाळींत जो पहिला रुपया पाडण्यांत आला त्या रुपयावर एका बाजूला मध्यभागीं Rupee of Bombaim अशीं अक्षरें व खालीं दोन फुल्या असून सभोवतीं By authority of Charles the second, 1677 हीं अक्षरें आहेत. दुसऱ्या बाजूस मध्यभागीं इंग्रजी राजचिन्ह असून भोंवतीं King of Great Britain, France and Ireland अशीं अक्षरें आहेत. यानंतर भारतांत कंपनीनें सुरत, बेंगाल व मद्रास (अर्काट) येथें जे चांदीचे रुपये पाडले ते तेथील राजांच्या नाण्यांच्या धर्तीवर व कांहीं मोंगल बादशहाच्या नांवानें पाडले. वरील तिन्ही ठिकाणीं कंपनीच्या टांकसाळी होत्या." या त्यांच्या लिहिण्यावरून वाचक गोंधळांत पडतो. कंपनीनें इंग्रजांच्या नांवाचे रुपये काढल्यावर ते बंद करून, सुरत, बंगाल व मद्रास येथील मुसलमानी राजांच्या नाण्यांच्या धर्तीवर तसेंच मोंगल बादशहाच्या नांवावर रुपये कां पाडले, याचा अर्थबोध वाचकांना होत नाहीं. शिवाय कंपनीनें पाडलेले मुंबईचे इंग्रजी रुपये इतके दुर्मिळ आहेत कीं ते कुणाहि सर्वसामान्य मनुष्याला दिसतसुद्धां नाहींत. तेव्हां याचें खरें कारण असें कीं, ईस्ट इंडिया कंपनीला सुरतेला वखार स्थापन करण्याची परवानगी मिळाल्यावर तसेंच मद्रास प्रांतांत आपली सत्ता स्थापन झाली असें त्यांना वाटल्यावर त्यांनीं तेथील राजाच्या नांवाचे रुपये काढले. इ. स. १६७१ मध्यें कंपनीच्या मालकांनीं इकडील नोकरांना मुंबईत टांकसाळ घालण्यास आज्ञा दिली. तिच्यांत प्रथमतः तांबें व तीन धातूंचे शिक्के तयार होत होते. हे शिक्के मराठा राज्यांत व गोव्याच्या सीमेवर चालत होते. १६७६ सालीं मुंबईच्या वखारवाल्यांना सोनें, तांबें, चांदी, शिसें, वगैरे धातूंचे शिक्के तयार करण्याची आज्ञा मिळाली. मुंबईत पहिल्यांदा द्वितीय चार्लस याचे रुपये निघाले. याच्यावर इंग्लंडच्या शिक्क्याप्रमाणें राजाचा छाप होता. पुढें त्यांना असा अनुभव आला कीं, हे शिक्के भारतांतील इतर जनता घेण्यास तयार नाहीं. त्यामुळें त्यांनीं ती पद्धत बदलून भारतीय राजाच्या नांवाचे शिक्के काढण्यास सुरवात केली. (भारतीय शिक्के, वासुदेव उपाध्याय. पृष्ठ २४९–५०.)

आपल्या पुस्तकांत पृष्ठ ७० वर श्री. नायक असें सांगतात कीं, " सिंह छापाच्या कंपनीच्या चांदीच्या नाण्यांत रुपया, अधेली, पावली व चवली अशीं नाणीं असून ब्रॉझच्या नाण्यांत ढब्बू, पैसा, अर्धा पैसा व पै हीं नाणीं होत. .... चांदीचीं नाणीं गांठलीं-रूपाने धनगर लोक वापरीत असत व ते चांदीच्या आंगठ्यांनादेखील वरच्या बाजूने चवली बांधून घेत असत." नाण्यांची माहिती त्यांनीं अशी दिली आहे. वस्तुतः नाण्यांची माहिती देण्याची पद्धत अशी कीं, मुख्य बाजूस कोणता छाप आहे व काय अक्षरें आहेत व दुसऱ्या बाजूला कोणतीं अक्षरें किंवा सन इत्यादि आहे वगैरे नमूद करावयाचें. अवांतर गोष्टींना नाण्यांची माहिती या दृष्टीनें महत्व नसतें. तीं गांठल्यांच्या रूपानें वापरीत होते वगैरे गोष्टी नाण्यांच्या अभ्यासास आवश्यक माहिती या सदरांत कशा येतील, तें त्यांनाच माहीत.

आतां माझ्याकडे ईस्ट इंडिया कंपनीचीं नाणीं आहेत त्यांची माहिती देतों. माझ्या नाण्यांत ईस्ट इंडिया कंपनीचीं मुंबई येथील टांकसाळींतून निघालेलीं बरींचशीं तांब्याचीं नाणीं आहेत. त्यांतील कित्येकांची माहिती येथें देतों. मुंबई इंग्रजांना मिळाल्यावर लगेच कंपनीनें तेथें कांहीं नाणीं काढलीं. तीं सुमारें सन १६६७ चीं समजलीं जातात. त्यांच्यावर मध्यभागीं इंग्रजींत

Moneta
Bombay
Anglic
Regime

अशीं अक्षरें आहेत. त्याशिवाय आणखी अनेक तऱ्हांचीं मुंबईचीं नाणीं आहेत. त्यांतील कित्येकांवर एका बाजूनें राजाचा मुकुट व खालीं Bombay हीं इंग्रजी अक्षरें व दुसऱ्या बाजूनें 'Aus Fieros Regiset Senatus Anglia' हें लॅटिन वाक्य आहे. अशा प्रकारचीं मुंबई छाप असलेलीं अनेक लहानमोठीं नाणीं माझ्या संग्रहांत आहेत. हीं नाणीं दुर्मिळ समजलीं जातात. विस्तारभयास्तव त्या सर्वांची माहिती येथें देणें शक्य नाहीं.

ही कंपनी प्रथमतः व्यापाराकरतां हिंदुस्थानांत आली. येथील अंदाधुंदीचा राज्यकारभार पाहून येथील राज्य हातांत घेतां येईल असा तिनें अंदाज केला. व हळूहळू सत्ता हातांत घेण्यास सुरवात केली. पुढें हें राज्य ब्रिटिश राजाच्या हातांत गेलें. माझ्या संग्रहांत तांब्याच्या नाण्यांत तीन नाणीं आहेत. त्यांवर १७९५–१७९६ हा सन दिसतो. नऊच्या (9) जागीं शून्य आहे कीं नऊ हें कळत नाहीं.

या नाण्यावर United East India Company व खालीं मोठ्या नाण्यावर 48 to 1 Rupee व लहान नाण्यावर 96 to 1 Rupee अशीं अक्षरें आहेत. यावरून मोठ्या नाण्याची किंमत त्या काळच्या ४ पैइतकी व लहान नाण्याची

किंमत २ पै इतकी ठरते. या नाण्यांवर एका बाजूस बदामाच्या आकाराचें चित्र असून आंत चौकोन आहेत व त्यांत V, E, I, C, अशीं अक्षरें आहेत. दुसऱ्या बाजूस दोन सिंह राज्याचा Crown धरून उभे आहेत. या नाण्यांपैकीं एक मला मुंबईत व दोन गोव्यांत मिळालीं. यांच्यावर United East India Company हें नांव असण्याचा इतिहास असा दिसतो कीं, पहिल्या कंपनीनें व्यापारांत बराच नफा मिळविल्यावर आणखी कांहीं लोकांनीं तशीच दुसरी कंपनी काढली. पण इंग्रज लोक महा बुद्धिमान. आपसांत स्पर्धा नको म्हणून त्यांनीं दोन्ही कंपन्या एकत्र करून पुढें ईस्ट इंडिया कंपनी हेंच नांव ठेवलें. हीं नाणीं त्याचीं द्योतक दिसतात. असा इतिहास मी वाचल्याचेंहि आठवतें. पण तें पुस्तक आज माझ्या हातांत नाहीं. माझ्याकडे ईस्ट इंडिया कंपनीचीं आणखी तीन नाणीं आहेत. त्यांपैकीं दोन आकारानें मोठीं असून एक लहान आहे. या नाण्यांवर बंगाली, हिंदी व उर्दू भाषेंत 'एक पाई शिक्का' अशीं अक्षरें आहेत. व पई आकाराच्या नाण्यावर हिंदी अक्षरांशिवाय 1 Pai अशीं इंग्रजी अक्षरें आहेत. तेव्हां त्या सर्वांचीच किंमत १ पै होती किंवा काय, हें त्यावेळच्या नाण्यांच्या क्याटलॉगाशिवाय नीट कळणें शक्य नाहीं. कोणत्याहि नाण्यांवर लिहितांना त्या नाण्यांचे तज्ज्ञांनी तयार केलेले क्याटलॉग आपल्या हातीं असल्यास त्यावरून केलेलें विधानच सत्याला धरून असेल. दुसरीं विधानें चुकीचीं ठरणें शक्य असतें.

माझ्याकडे ईस्ट इंडिया कंपनीचीं कांहीं थोडीं सोन्याचीं, बरींचशीं रुप्याचीं व शेकडों तांब्याचीं नाणीं आहेत. सिंह असलेलें रुप्याचें नाणें मला अद्याप पहावयाला मिळालें नाहीं. पण तांब्याच्या नाण्यांत 'ईस्ट इंडिया कंपनी' हीं इंग्रजी अक्षरें व एका बाजूस दोन सिंह असलेलीं नाणीं, अर्धा आणा, पैसा, अर्धा पैसा व पै अशीं कित्येक वापरांत होतीं. हीं सन १८०४ पासून १८४५ पर्यंतचीं सांपडतात व अलीकडेसुद्धां हीं वापरांत होतीं. कंपनीचीं रुप्याचीं नाणीं माझ्याकडे आहेत तीं बहुतेक दिल्लीचा शहा-अलम दुसरा, आलमगीर दुसरा यांचीं व इतर नबाबांचीं वगैरे आहेत. त्यांच्यावर फार्सी अक्षरें व त्यावेळच्या अधिकाऱ्यांचीं नांवें आहेत. विशिष्ट चिन्हांवरून हीं नाणीं ईस्ट इंडिया कंपनीचीं समजलीं जातात. ईस्ट इंडिया कंपनीचीं नाणीं १८३५ मध्यें इंग्लंडचा बादशहा विल्यम चौथा याच्या छापाचीं निघालीं. त्यांच्यावर 'ईस्ट इंडिया कंपनी' अशीं इंग्रजी अक्षरें होतीं व ८।४ आणे हे विभागहि होते. अशींच नाणीं तो राजा दिवंगत झाल्यावर व्हिक्टोरिया राणीचीं निघालीं. त्यांत ८, ४ व २ आणे हीं नाणीं होतीं. सन १८५७ च्या लढाईनंतर इंग्लंडच्या राजाच्या ताब्यांत हिंदुस्थानचा कारभार गेला. त्यानंतर इंग्लंडच्या ब्रिटिश हिंदुस्थानच्या नाण्यावर 'व्हिक्टोरिया क्वीन' असे शब्द होते. कांहीं वर्षांनंतर 'क्वीन'च्या जागीं 'एम्प्रेस' (सम्राज्ञी) असा शब्द आला. इंग्लंडमध्यें व्हिक्टोरिया राणीनंतर सन १९०१ मध्यें एडवर्ड ७ वे गादीवर आले. पण त्यांचीं नाणीं इंग्लंडांत १९०२ पासून १९१० पर्यंत व हिंदुस्थानांत १९०३ पासून १९१० पर्यंत निघालीं. १९१० त ते वारल्यावर पंचम

जॉर्ज गादीवर आला. हा १९३६ सालीं वारला. त्यानंतर परंपरेनें त्याची गादी ८ वा एडवर्ड याकडे गेली. हा राजपुत्र बाणेदार स्वभावाचा होता. तो गादीवर आल्यानंतर मंत्रिमंडळाला असा सुगावा लागला कीं, त्याचें प्रेम एका सामान्य स्त्रीवर बसलेलें आहे. व तिच्याशीं लग्न करण्याची त्याची इच्छा आहे. इंग्लंडांत परंपरेलाच कायद्याचें स्वरूप येतें व परंपरेप्रमाणें जी स्त्री राणी होणार असते तिला मंत्रिमंडळाची मान्यता असावयास पाहिजे. त्यावेळच्या मंत्रिमंडळाला आठव्या एडवर्डनें पत्नी म्हणून निवडलेली स्त्री मान्य नव्हती. त्यामुळें हा प्रश्न चर्चेस आला व आठव्या एडवर्डसमोर प्रेयसी आणि राज्य या दोहोंपैकीं कोणत्या तरी एका गोष्टीचा त्याग केला पाहिजे, असा पेंचप्रसंग उपस्थित झाला. त्यानें राज्यत्याग केला व सहावा जॉर्ज सिंहासनारूढ झाला. ८ व्या एडवर्डचें राज्य फक्त चार महिने होतें. श्री. नारायण भा. नायक हे पृष्ठ ७२ वर लिहितात, "आठव्या एडवर्डच्या रुपयांत ११ भाग चांदी व १ भाग तांबें होतें. आणि तांब्याच्या नाण्यांत ७५ टक्के चांदी व २५ टक्के निकल होतें. आण्याचें नाणें निकलचेंच होतें." श्री. नायक यांच्या या लिहिण्यावरून आठव्या एडवर्डचीं नाणीं हिंदुस्थानकरितां निघालीं असें ठरतें. पण वस्तुतः तशीं तीं निघालीं नाहींत, हें मी पुढें देत असलेल्या आठव्या एडवर्डच्या नाण्यांच्या माहितीवरून स्पष्ट होईल. आठव्या एडवर्डचें राज्य चार महिनेच टिकल्यानें इंग्लंडांत त्याची नाणीं निघालीं नाहींत. तांब्याचीं One penny चीं नाणीं पांच छापून निघतांच बंदीचा हुकूम आला. त्यामुळें एका पेनीचीं सगळीं पांचच नाणीं छापून निघालीं. या एक पेनीच्या नाण्याची किंमत आज एक हजार पौंड आहे.

आठव्या एडवर्डच्या नाण्यांबद्दल अशी माहिती उपलब्ध आहे कीं, त्याच्या राजवटीचीं नाणीं छापण्यासाठीं एकंदर दोनशें Dies तयार केल्या होत्या. परंतु त्यानें गादी सोडल्यामुळें त्या तशाच पडून राहिल्या. क्राउन (पांच शिलिंग) च्या दोन हजार चारशें त्र्याहत्तर नाण्यांची दुसऱ्या बाजूची छपाई झाली होती. पण बंदी आल्यामुळें मुख्य बाजूवर आठव्या एडवर्डचें चित्र छापण्याऐवजीं सहाव्या जॉर्जचें चित्र छापण्यांत आलें. या क्राउनच्या नाण्यांची किंमत लंडन बाजारांत आज ५ पौंड आहे. आठव्या एडवर्डच्या राजवटीच्या चार महिन्यांत कांहीं वसाहतींत त्यांचीं नाणीं निघालीं. ईस्ट आफ्रिका, वेस्ट आफ्रिका, न्यू गिनी आणि फिजी हीं त्या वसाहतींचीं नांवें होत. हीं सर्व नाणीं कमी किंमतीचीं होतीं. या चार वसाहतींपैकीं ईस्ट आफ्रिका आणि वेस्ट आफ्रिका या वसाहतींचीं नाणीं माझ्या संग्रहांत आहेत. हिंदुस्थानांत ८ व्या एडवर्डच्या नांवाचीं ब्रिटिश राजवटीचीं नाणीं निघालींच नाहींत. पण कांहीं देशी राज्यांत तेथल्या राजांनी आपल्या नाण्यांवर आपल्या नांवाबरोबर त्याचेंहि नांव घातलें होतें. सौराष्ट्रमधील कच्छ राज्य त्यांपैकीं एक होय. ह्या राज्याचीं, पांच कोरी, २॥ कोरी व १ कोरी अशीं रुप्याचीं नाणीं होतीं. त्या राज्यांत आमच्या पावलीला कोरी मानीत. त्यामुळें आमच्या रुपयाच्या सव्वापट त्यांच्या रुपयाचें वजन होतें. या तिन्ही रुप्याच्या

नाण्यांची अमेरिकेंतील किंमत ५३ डॉलर आहे. म्हणजे पूर्वीच्या एक्श्चेंजनें २६५ रु. होतात. हीं तिन्ही नाणीं माझ्या संग्रहांत असून मला त्या तिन्ही नाण्यांची किंमत ७३ रु. द्यावी लागली. त्याच राजाचा कच्छमधील तांब्याचा ढबू आहे. त्याची सौराष्ट्रांतील किंमत ५ रु. व अमेरिकेंतील किंमत ७॥ डॉलर आहे. माझ्याकडे हेंहि नाणें आहे. ह्याशिवाय राजस्थानांतील जोधपूर राज्यांत आपल्या नाण्यावर सार्वभौम राजा इंग्रज म्हणून त्यांच्याहि राजाचीं नांवें आपल्याबरोबर घालण्याची पद्धत होती. या जोधपूर राज्याचीं ८ व्या एडवर्डचें नांव असलेलीं दोन नाणीं माझ्या संग्रहांत आहेत, व तीं मी अगदीं कमी मूल्यांत विकत घेतलीं आहेत. हिंदुस्थानांत ब्रिटिश राजवटीचीं आठव्या एडवर्डचीं नाणीं निघालींच नाहींत. त्याच्यानंतर गादीवर बसलेला सहावा जॉर्ज याची नाणीं निघालीं. श्री. ना. भा. नायक यांनीं लिहिलेला मजकूर सहाव्या जॉर्जच्या नाण्यांना अनुलक्षून असावा, असें दिसतें. आमच्या गांवठी पोर्तुगीज भाषेंत 'बावी शावी Pouca diferença' असें म्हणतात. तसा प्रकार होऊन सहाव्या जॉर्जच्या जागीं आठवा एडवर्ड हें नांव आलें कीं काय, तें त्यांनाच माहीत. याशिवाय त्यांच्या माहितींत 'तांब्याच्या नाण्यांत पंचाहत्तर टक्के चांदी व पंचवीस टक्के निकल होतें' असा मजकूर आहे. पण तांब्याच्या नाण्यांत पंचाहत्तर टक्के चांदी घातल्यास तें नाणें तांब्याचें कसें राहील? तें रुप्याचें होईल. तसेंच पंचाहत्तर टक्के चांदी व पंचवीस टक्के निकल हा हिशेब पाहिल्यास त्यांत तांबें मुळींच नव्हतें असें ठरतें. तेव्हां या ठिकाणीं लिहिण्यांत किंवा छापण्यांत कांहीं नजरचूक झाली असावी. ही चूक सुधारावयास पाहिजे होती. कुठल्याहि संदर्भग्रंथात अशा चुका राहूं देणें योग्य नसतें. वेळींच त्यांची दुरुस्ती झाली पाहिजे.

आतां गोमंतकांतील पोर्तुगीज राजवटीच्या अखेरच्या शतकांतील नाण्यांच्या काय चुका झाल्या आहेत त्याबद्दलची माहिती देऊन हा विषय पुरा करूं.

सन १८७८ सालीं गोव्याच्या गव्हर्नरपदावर कायतान आल्मैद आल्बुकेर्क याची नेमणूक झाली. यावेळीं पोर्तुगाल व इंग्लंड या देशांत हिंदुस्थानांतील वसाहतींत उभयतांचीं वजनें, मापें, नाणीं सारखींच असावींत असा करार झाला. हा करार गोव्यांत १५ जानेवारी १८८० मध्यें अंमलांत आला. त्या करारांत रुपये, आणे (तांगे) हें चलन हिंदुस्थानप्रमाणें पोर्तुगीज सत्तेखालील गोव्यांतहि प्रचलित करावें, अशी अट होती. त्याप्रमाणें त्यानंतर गोव्यांत चलनांत आलेलीं नाणीं पुढीलप्रमाणें होतीं :–

रुप्याचीं नाणीं :–

D. Ludovicus I (दों लुईज १)
सन १८८१ – रुपया, अर्धा रुपया, पाव रुपया व चवली.
सन १८८२ – रुपया व अर्धा रुपया.

तांब्याचीं नाणीं :–

सन १८८१ – पाव आणा (पैसा) व अर्धा पैसा.

सन १८८४ – ,, ,, ,, ,, ,,

सन १८८६ – ,, ,, ,, ,, ,,

रुप्याच्या नाण्यावर रुपया, अर्धा रुपया, पाव रुपया व अष्टमांश रुपया अशा पोर्तुगीज अक्षरांत लिहिलेल्या किंमती होत्या. व तांब्याच्या नाण्यावर पाव तांग अशीं पोर्तुगीज अक्षरें होतीं. वर ज्या कराराचा उल्लेख केला आहे, त्यांत अर्धा आणा व पै यांचा उल्लेख आहे. पण हीं नाणीं निघालीं नाहींत. कारण कोठल्याहि कॅटलॉगांत तीं आढळून येत नाहींत.

श्री. ना. भा. नायक हे दों लुईश यांच्या तांब्याच्या नाण्याबद्दल पृष्ठ ३८ वर तांब्याच्या नाण्यांत अर्धा आणा व पै अशीं नाणीं होतीं असें लिहितात व त्यांचें वजनहि देतात. परंतु हें कोणत्या आधारावरून हें कळणें शक्य नाहीं. या राजाचीं अर्धा आणा व पै हीं नाणीं निघालींच नाहींत. फक्त पैसा व अर्धा पैसा हीं नाणीं निघालीं होतीं. यानंतर सन १८८९ मध्यें पोर्तुगालच्या गादीवर दों कार्लोश पहिला हा राजा आला. याबद्दल श्री. ना. भा. नायक हे पृष्ठ ३९ वर लिहितात कीं, "याच्या मुखवट्याचीं नाणीं निघालीं. नाण्यांचा नमुना मागच्याप्रमाणेंच होता."

दों. कार्लोश याच्या पोर्तुगीज हिंदुस्थानांत निघालेल्या नाण्यांची माहिती पुढीलप्रमाणें आहे :–

रुपें :– सन १९०३ – फक्त रुपया

सन १९०४ – फक्त रुपया

याशिवाय या राजाचीं रुप्याचीं दुसरीं नाणीं म्हणजे रुपयाचे कोणतेही विभाग निघालेले नाहींत.

तांब्याचीं नाणीं :– सन १९०१ – अर्धा आणा, पैसा, अर्धा पैसा, एक पै.

सन १९०३ – अर्धा आणा, पैसा, अर्धा पैसा, एक पै.

यानंतर १९०८ सालीं दों कार्लोश व त्याचा पहिला मुलगा यांचा खून झाला व पोर्तुगालच्या गादीवर त्याचा दुसरा मुलगा दों मानुएल हा आला. याच्याबद्दल श्री. नायक आपल्या पुस्तकांत लिहितात कीं, याच्या राजवटींतील गोव्याचीं नाणीं मागच्याप्रमाणेंच रुपया, अर्धा रुपया, पावली हीं रुप्याचीं आणि पाव आणा, अर्धा पैसा अशीं तांब्याचीं होतीं. श्री. ना. भा. नायक यांची ही माहिती सर्वस्वी चुकीची आहे. हा राजा अंदाजें २॥ वर्षें गादीवर होता. याचीं नाणीं पोर्तुगालमध्यें निघालीं. परंतु पोर्तुगीज हिंदुस्थानांत या राजाचें कोणतेंहि नाणें निघालें नाहीं. श्री. नायक कोणत्या आधारानें ही माहिती देतात हें कळत नाहीं.

५ ऑक्टोबर १९१० रोजीं पोर्तुगालांत क्रांति होऊन प्रजासत्ताक राज्यपद्धति सुरू झाली, व दों मानुएल राजा इंग्लंडमध्यें पळून गेला. ही प्रजासत्ताक राज्यसत्ता १९१० ते १९२६ पर्यंत होती, असें म्हणतां येतें. या राजवटींत निघालेल्या नाण्यांची माहिती देतांना श्री. नायक हे ६१ पृष्ठावर लिहितात कीं, "१९११ सालीं जो रुपया पाडण्यांत आला, त्यावर पुढच्या बाजूनें हातांत विळा असलेल्या स्वातंत्र्यवादी बाईचें चित्र असून सभोंवतीं Republica Portuguesa अशीं अक्षरें व खालीं सन व पाठच्या बाजूनें दोन वेलींमध्यें 'Uma Rupia' व खालीं 'India Portuguesa' अशीं अक्षरें होतीं. अधेल्या व पावल्याहि अशाच शिक्क्याच्या होत्या." त्यांची ही माहिती चुकीची आहे. या 'Republic' राजवटींत म्हणजे १९१२ ते १९२६ पर्यंत एकच रुपया रुप्याचा निघाला. त्यावर पुढच्या बाजूस स्वातंत्र्यदेवतेचा मुखवटा, वरती 'Republica Portuguesa' व खालीं सन १९१२ आहे. दुसऱ्या बाजूनें वेली-मध्यें India व 'Uma Rupia' इतकेंच आहे. या नाण्याच्या अधेल्या व पावल्या निघाल्याच नाहींत. यापुढें १९२६ सालीं नवें गव्हर्मेंट आलें. याला सालाझार गव्हर्मेंट असें नांव आहे. तें गोव्यांत १९६१ पर्यंत चालू होतें. या काळांत गोव्याचीं खालील नाणीं निघालीं :--

१ तांग – धातु तांबें १९३४.

२ तांग – धातु कॉपर निकल १९३४.

४ तांग – धातु कॉपर निकल १९३४.

पोर्तुगीजमध्यें आण्याला तांग म्हणतात.

यानंतर १९३५ सालीं पूर्ण रुप्याचें १ रुपयाचें व १९३६-३७ सालीं अर्ध्या रुपयाचें नाणें निघालें.

पुढें १९४७ सालीं आणखी नाणीं निघालीं तीं अशीं :–

१ तांग (तांबें)

अर्धा रुपया (कॉपर निकल)

पाव रुपया (कॉपर निकल)

याच सालीं एक रुपयाचेंहि नाणें निघालें. त्यांत कॉपर निकल धातु असली, तरी रुप्याचें प्रमाण जास्त होतें. पुढें तांब्याच्या महर्घतेमुळें १९५२ सालीं लहान आकारांत १ तांग (धातु तांबें) हें नाणें निघालें. व याच सालीं कॉपर निकल धातूचीं १ रुपया, अर्धा रुपया, पाव रुपया हीं नाणीं निघालीं.

यानंतर पोर्तुगीज सरकारनें गोमंतकांत पोर्तुगालप्रमाणें इस्कूद नाणें चालू करण्याचें ठरविलें. या इस्कूद नाण्यांची माहिती देतांना श्री. ना. भा. नायक पृष्ठ ६३ वर असें सांगतात कीं, "चलनांत आलेलीं इस्कूदचीं नाणीं अशीं होतीं :– सहा इस्कूद, तीन

REFBK-0016607

ऑक्टोबर १९१० पासून डिसेंबर १९६१ पर्यंत पोर्तुगिजांनीं गोवा-दमण-दीवमध्यें काढलेलीं १९ नाणीं (पुढील बाजू)

ऑक्टोबर १९१० पासून डिसेंबर १९६१ पर्यंत पोर्तुगिजांनीं गोवा-दमण-दीवमध्यें काढलेलीं १९ नाणीं (मागील बाजू)

इस्कूद, दीड इस्कूद, ८० सेंताव, ४० सेंताव, २० सें. व १० सें." इतक्या अलीकडील नाण्यांची – कीं जीं शेवटपर्यंत चलनांत होतीं त्यांची सर्वस्वी चुकीची माहिती या पुस्तकांत देण्यांत आल्यामुळें गोमंतकाच्या नाणकेतिहासांत बराच गोंधळ उत्पन्न झाला आहे. प्रत्यक्षांत जीं नाणीं निघालीं तीं अशीं होतीं :–

सन १९५८

३ इस्कूद	कॉपर निकल
१ इस्कूद	,, ,,
६० सेंताव	,, ,,
३० सेंताव	तांबें
१० सेंताव	,,

सन १९५९

६ इस्कूद	कॉपर निकल
३ इस्कूद	,, ,,
१ इस्कूद	,, ,,
६० सेंताव	,, ,,
३० सेंताव	तांबें
१० सेंताव	,,

१९६१ सालीं फक्त १० सेंतावचें तांब्याचें नाणें निघालें. हें नाणें पोर्तुगिजांचें गोव्यांतलें शेवटचें नाणें होय. १९१० त पोर्तुगालांत रिपब्लिक झाल्यापासून डिसेंबर १९६१ पर्यंत पोर्तुगिजांनीं गोव्यांत एकंदर १९ नाणीं काढलीं. १९६१ च्या डिसेंबर महिन्यांत पोर्तुगिजांची भारतांतील राजवट संपली, व गोवा, दमण, दीव हा प्रदेश भारताचा भाग झाला. पुढें हीं सर्व पोर्तुगीज नाणीं व नोटा स्टेट बँकेनें आपल्या ताब्यांत घेऊन विशिष्ट मुदतींत त्यांच्या बदल्यांत भारतीय नाणीं दिलीं. यावेळीं ६ इस्कूद म्हणजे एक रुपया होता.

श्री. ना. भा. नायक यांनीं १९६४ सालीं आपलें पुस्तक पुरें केलें. त्यावेळीं हीं इस्कूदचीं नाणीं त्यांना कुठेंहि पहावयास मिळालीं असतीं. त्यावेळींच नव्हे तर अजूनहि फेरीवाल्याकडे हीं नाणीं पहावयास मिळतात. ज्यांना पद्धतशीरपणें नाणीं पहावयाचीं असतील त्यांनीं R. S. Yeoman यांचें 'A Catalog of Modern World Coins' हें अमेरिकन पुस्तक पहावें.

याप्रमाणें या पुस्तकांत बऱ्याच चुका आहेत. त्यांतील ढोबळ चुकाच मी दाखविल्या असून कित्येक चुकांकडे दुर्लक्ष केलें आहे. अशा या पुस्तकाला गोमंतक मराठी साहित्य संमेलनानें आर्थिक पुरस्कार दिलेला आहे, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. नाण्यांचा इतिहास व माहिती देणारें कोणतेंहि पुस्तक लिहिणें ही गोष्ट अत्यंत कठीण अशी आहे. माझा या विषयाचा कांहीं वर्षांचा अभ्यास असूनहि या पुस्तकाच्या परीक्षणासाठीं मला बरेच परिश्रम करावे लागले. या परीक्षणांतील माझा हेतु शुद्ध व स्पष्ट आहे. गोमंतकांतील नाण्यांच्या इतिहासांत अशा चुकांमुळें गोंधळ माजेल व मग हा संशोधनाचा विषय होऊन बसेल हें लक्षांत आल्यामुळें सत्य माहिती लोकांपुढें ठेवावी, याच एका उद्देशानें हा प्रयत्न केला आहे. पुस्तककर्त्यांशीं माझा कोणताहि हेवादावा नाहीं. गोव्याच्या नाणकेतिहासांत कांहीं गोंधळ राहूं नये असें वाटल्यामुळेंच हा थोडासा कटु भासणारा प्रयत्न मला करावा लागला. बराच काळ विचार करून मी हा निर्णय घेतला आहे. पुस्तककर्ता त्यावरून कांहीं गैरसमज करून घेणार नाहीं अशी मी आशा करतों.



पद्मश्री कविवर्य बा. भ. बोरकर यांनीं पुस्तकाचीं मुद्रितें वाचून लिहिलेलें पत्र

सेवेशीं कृ. सा. न. वि. वि.

आपल्याला भेटल्यानंतर तसाच गोमंत छापखान्यांत जाऊन मी आपल्या पुस्तकाचीं मुद्रितें मिळविलीं आणि तीं सगळीं त्याच दिवशीं काळजीपूर्वक वाचून काढलीं. सारें पुस्तक जसें उद्‌बोधक माहितीनें भरलेलें आहे तसेंच तें सुबोध आणि सुभग शैलींत लिहिलेलें आहे. त्यामुळें एकाद्या चांगल्या कादंबरीप्रमाणें तें मोठें चटकदार झालें आहे. साधनांचा अपुरेपणा आणि त्यांत झालेली भाकडकथांची भेसळ या गोष्टींतून नेमका ग्राह्यांश टिपणें, त्याची संगति लावणें आणि तिच्या द्वारा ऐतिहासिक सत्याचा अचूक वेध घेऊन संस्कृतिविकासाचा अन्वयार्थ लावणें हें मोठें दुर्घट काम असतें. अस्सल ऐतिहासिक प्रतिभेशिवाय तें शक्य नसतें. आपण काढलेल्या निष्कर्षाबद्दल उदाहरणांत मतभेद असूं शकतील पण त्यांतून व्यक्त झालेल्या प्रतिभेबद्दल आदर व्यक्त केल्याशिवाय ते खचित रहाणार नाहींत.

गोव्याच्या आर्यीकरणाआधीं येथील संस्कृति चांगलीच विकसित झाली होती. तिचें श्रेय आजच्या गावड्यांच्या पूर्वजांकडे जातें. आमच्या ग्रामसंस्थांचा उगम त्यांच्यापर्यंत जातो. शिवशक्तीचीं देवळें हीं बव्हंशीं त्यांचींच वगैरे जें आपण दाखवून दिलें आहे तें रूढ कल्पनांना धक्का देणारें आणि अनेकांच्या आत्मप्रतिष्ठेला न रुचणारें असलें तरी तें सत्य आहे. मला उपलब्ध झालेली कांहीं नवी माहितीहि आपल्या याच निष्कर्षाला बळकटी आणणारी आहे.

आम्हां सारस्वतांच्या उगमस्थानांबद्दलचें आपलें प्रतिपादनहि असेंच फार मोलाचें आहे. खास सारस्वतांच्या मालकीच्या तीस ग्रामसंस्था अत्यंत सुपीक आणि समृद्ध असाव्या यावरून आपण मानीत आलों आहोंत त्यापेक्षां आपल्या पूर्वजांचें इथलें आगमन अधिक पुरातन असलें पाहिजे याविषयीं शंका रहात नाहीं. ते कश्मीर आणि पंजाबमधून आले असले पाहिजेत हें आपण फार चांगल्या तऱ्हेनें दाखवून दिलें आहे. पण त्यांचा एक फांटा तिरहूतहून आला नसेलच असें म्हणवत नाहीं. मी हा भाग पाहून आलों आहे. तेथील लोकांत मला गोमंतकीयांचीं ठळक शारीरिक वैशिष्ट्यें दिसलीं. कांहीं स्त्रिया तर अस्सल सारस्वत वाटल्या. कुलीनत्वाची प्रथा बिहार-बंगालमधल्या ब्राह्मणांत रूढ होण्यापूर्वी तर आपले पूर्वज तेथून निघाले नसतील ना अशी शंका माझ्या मनाला चाटून गेली. कोकणी भाषा, म्हणी, वाक्प्रचार, रीतीभातीं आणि जानपद साहित्य यांची भाषाशास्त्रीय आणि वंशशास्त्रीय छाननी नीट झाली तर यावर कांहीं नवीन प्रकाश पडूं शकेल असें मला वाटतें.

आपला हेमाडपंतांवरचा लेख मी काळजीपूर्वक वाचला. सोडवें हा गांव आतां शिवोली गांवांत अंतर्भूत झाला असल्यावें कळलें. उगेंचें देऊळ कदंबराजाचें मानलें तर त्याच्या शेजारची दुसरी ब्राह्मण मूर्ति कोणाची वगैरे प्रश्न मनांत उभे राहिले. माझ्याकडून एक शतकाची जी चूक झाल्याचें आपण दाखवून दिलें आहे तें मला मान्य आहे. अन्य मुद्द्यांबद्दल पुष्कळसें बोलण्यासारखें आहे पण आपली प्रकृति लक्षांत घेऊन मी आपणास अधिक शीण देऊं इच्छीत नाहीं. या ग्रंथानें गोव्याच्या इतिहासांत आपण फार मोलाची भर घातली आहे आणि ह्याबद्दल गोमंतक आपला नेहमींच ऋणी राहील. आपल्या प्रकृतींत आराम पडावा असें मनोमन इच्छितों.

आपला स्नेहांकित – **बा. भ. बोरकर.**

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	छापलेले शब्द	हवे असलेले शब्द
३	४	एककल्लीपणा	एकांतिकपणा
१२	११	पुढेंहि जिवंत राहील	कदाचित् पुढेंहि जिवंत राहील.
२३	३२	अवस्ता	आवेस्ता
२६	१७	भारताच्या वांशिक घडगीचा	भारताच्या सांस्कृतिक घडणीचा
४९	१९	कनिष्कांच्या काळीं (सनपूर्व पहिलें शतक)	कनिष्कांच्या काळीं (सनाचें २ रें शतक)

गोवा प्रथ संग्रहालय, ठाणे. स्थलम
क्रमांक ७५२६ दि: ...
क्रमांक 2732 दि: 22/3/67